
म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र. ९८८४
९८८६



REFBK-0017298

# संस्कृतीच्या प्रांगणात

पं. महादेवशास्त्री जोशी

निबंध
५१३२४
१२।३।५०
संदर्भ

१५८४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ५१३२४ वि: निबंध
क्रमांक १५८४ नों: दि: १२।३।५०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ०९३२४ वि: निबंध
क्रमांक १५५४ नों: दि: ९/५/३/००

# संस्कृतीच्या प्रांगणात

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १०२९८
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

पं. महादेवशास्त्री जोशी

REFBK-0017298
REFBK-0017298

ज्ञानराज प्रकाशन

पाच रुपये

प्रकाशक
अशोक महादेव जोशी
ज्ञानराज प्रकाशन
४२१ शनिवार, पुणे ३०

मुखपृष्ठ
खासगीवाले चित्रायन

ठसे
कलाभुवन, पुणे

प्रकाशन
डिसेंबर १९६९

मुखपृष्ठ छपाई
केसरी मुद्रणालय

मुद्रक
य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय
१५२३ सदाशिव, पुणे ३०

या पुस्तकात महामंडळाचे शुद्धलेखन स्वीकारले आहे.

# चार शब्द

दोन वर्षांपूर्वी मी केसरीत लिहिलेल्या लेखांचा हा संग्रह आहे. जे मनाला भावले ते लिहिले, अशा स्वरूपात हे लेखन झाल्यामुळे त्यात पूर्वापर-संगती आढळणार नाही. यात एक अव्यक्त सूत्र आहे, ते संस्कृतीचे. संस्कृती ही मूर्तिमंत दाखवण्याजोगी वस्तू नाही. ती माणसांच्या मनात भावनांच्या रूपाने वसते. संकेतांच्या द्वारे विधिनिषेधांच्या कक्षेत येते. साहित्याच्या द्वारे बोलते. श्रेष्ठ पुरुषांच्या आचरणातून शोभते. ऋषि-मुनी, संत आणि आचार्य यांच्या विचारधनाने श्रीमंत होते. आणि कलांच्या विविध संप्रदायांतून अमरपद मिळवण्याचा प्रयत्न करते. संस्कृतीचा असा कोणता ना कोणता तरी आविष्कार या पुस्तकातल्या प्रत्येक लेखात आढळून येईल. संस्कृतीची इरावती कर्वे यांनी दिलेली व्याख्या अशी—

**मनुष्यसमाजाची डोळयांना दिसणारी भौतिक वस्तुरूप निर्मिती व डोळयांना न दिसणारी, पण विचारांना आकलन होणारी मनोमय सृष्टी म्हणजे संस्कृती.**

पुणे
दि. ५।१२।६९

महादेवशास्त्री जोशी

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | प्रियं भारत भारतम् | १ |
| २. | मारुती नाटककार | ८ |
| ३. | सीतात्यागाची व्यथा | १२ |
| ४. | विष्णु-नारायण | १८ |
| ५. | भामिनी-विलास | २२ |
| ६. | वचन साहित्य | २७ |
| ७. | निदान; पण रोगाचे नव्हे | ३२ |
| ८. | ग्रंथ एक; पण कर्ते तीन | ३७ |
| ९. | दखनचा बिरबल | ४२ |
| १०. | नीतिकथा | ५२ |
| ११. | त्रिभुवनसंचारी | ५८ |
| १२. | मिथिलेची जन्मकथा | ६४ |
| १३. | ढोला मारू | ७० |
| १४. | मूर्तिकलेची अनोखी सृष्टी | ७६ |
| १५. | वेदार्थाचे उपबृंहण | ८२ |
| १६. | राजा गोपीचंद | ८८ |
| १७. | प्रहेलिका–एक बौद्धिक कसरत | ९४ |
| १८. | पंचपीर, नव्हे पंचवीर | १०१ |
| १९. | मथुरा : एक कलाकेन्द्र | १०८ |
| २०. | प्राणप्रतीक | ११५ |
| २१. | बुद्धघोष–एक प्रखर पांडित्य | १२३ |
| २२. | कामाख्या–कामरूप | १३१ |
| २३. | महाभाष्यं वा पठनीयम् | १३८ |
| २४. | जैन रामकथा | १४६ |
| २५. | शिवतांडव | १५४ |


□

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थल
अनुक्रम ५१३२५ वि: निबंध
क्रमांक १५६८
मराठी ग्रंथ
दा. क्र. १६२
शाखा

# प्रियं भारत भारतम्

महाभारताच्या भीष्म पर्वातला प्रसंग आहे. कौरव-पांडव अंतिम युद्धासाठी कुरुक्षेत्राकडे प्रस्थान ठेवायला निघाले आहेत. थोड्याच काळात युद्धाला तोंड लागायचे आहे. धृतराष्ट्र अस्वस्थ झाला आहे. युद्धाचे बदलते रागरंग पाहण्याची इच्छा, पण डोळे नाहीत. योगेश्वर श्रीकृष्णाला त्याचे हे आर्त जाणवले. त्याने संजयाला दिव्य दृष्टी देऊन त्याच्याकडे बसवले. रणभूमी-वरचा प्रत्येक प्रसंग अंतर्दृष्टीने पाहून तो जसाच्या तसा धृतराष्ट्राला सांगत राहणे हे त्याचे नेमून दिलेले काम.

संजय त्या कामाला सिद्ध झाला; पण तो केवळ सांगकाम्या नव्हता. तो ज्ञाता, इतिहासज्ञ होता. त्याचे भारत देशावर नितांत प्रेम होते. हा देश ज्यांनी घडवला, सजवला अशा अनेक राजर्षींची चरित्रे त्याला अवगत होती. कुरुक्षेत्रावरचा 'आँखों देखा हाल' सांगायला सुरू करण्यापूर्वी आपल्या कामगिरीचा उपक्रम म्हणून त्याने भारताच्या प्राचीन इतिहासाची झलक धृतराष्ट्राला ऐकवली.

" हे प्रज्ञाचक्षू धृतराष्ट्रा, हा भारत देश स्वर्गसम्राट इंद्रालाही परम प्रिय. इथे अनेक राजेमहाराजे सत्ता गाजवून आणि प्रजेचे कल्याण साधून निघून गेले. नहुष, मुचकुंद, पृथू, इक्ष्वाकू, मांधाता अशी किती नावे सांगावी ! त्यांच्या कथागाथा भारतीय जनमानसात गर्जत आहेत. धृतराष्ट्रा, असा हा आपला प्रिय भारत आहे. "

मनूला तर या भारताचा एवढा गौरव, की त्याने निःसंकोचपणे लिहून ठेवले—

**एतद्देशप्रसूतस्य सकाशादग्रजन्मनः ।**
**स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्वमानवाः ॥**

' या देशात जन्म घेतलेल्या ज्ञानी पुरुषांकडून पृथ्वीवरच्या सर्व मानवांनी आपापले चरित्र ( जीवनमार्ग ) शिकून घ्यावे.'

एतद्देश म्हणजे भारत देश ! ऋषींचा, महर्षींचा, राजर्षींचा, वीरांचा, वीरांगनांचा, आचार्यांचा, संतांचा, तत्त्वज्ञांचा देश ! अनेक महामानवांनी ज्याचे भले चिंतिले, आणि ज्यातील जनतेला नीतीच्या, सत्याच्या, पराक्रमाच्या अन् समृद्धीच्या पथावरून चालवले, तो देश ! म्हणजेच भारत देश !

प्रत्येक नावाला काही तरी व्युत्पत्ती असते. एखादा संकेत असतो. काही इतिहास असतो. भारत या नावाचेही तसेच आहे. ' भरताचा तो भारत ' ही त्याची पहिली व्युत्पत्ती. पण हा भरत कोण ? दुष्यंतपुत्र भरत अनेकांना ठाऊक आहे. काही ग्रंथ अन् काही पंडित त्या भरताशी भारताचा संबंध जोडतात. तो चक्रवर्ती झाला, त्याने समुद्रवलयांकित पृथ्वीचे राज्य केले, अनेक अश्वमेधही केले, अशी त्याची पुराणांतरीची चरित्रगाथा. पण तेवढ्यावरून तो भारत नावाचा जनक समजणे युक्तिसंगत नाही. मूळ भरत दुसरीकडे कुठेतरी शोधला पाहिजे. शोधू गेल्यास तोही पुराणातच आढळतो. भागवत, वायू, मार्कंडेय ही पुराणे त्याचे वर्णन करतात, त्याचा वंशवृक्ष देतात आणि भारत नावाशी त्याचा संबंधही जोडतात. त्याच्याविषयीचे पुढील श्लोक भागवतातले आहेत –

**प्रियव्रतो नाम सुतो मनोः स्वायंभुवस्य यः ।**
**तस्याग्नीध्रस्ततो नाभिः ऋषभस्तत्सुतः स्मृतः ॥**
**अवतीर्णं पुत्रशतं तस्यासीद् ब्रह्मपारगम् ।**

तेषां वै भरतो ज्येष्ठो नारायणपरायणः।
विख्यातं वर्षमेतद्यन्नाम्ना भारतमुत्तमम्॥

'स्वायंभुव मनूचा पुत्र प्रियव्रत. त्याचा आग्नीध्र. त्याचा नाभी. त्याचा ऋषभ. त्याला शंभर पुत्र झाले. हे सगळे ब्रह्मज्ञानी होते. त्या सर्वांत मोठा तो भरत. तो नारायणाचा परमभक्त होता. त्याच्यावरून या देशाला भारत हे नाव मिळाले.'

पण या उगमस्थानाबद्दलही संशोधक समाधानी नाहीत. ते म्हणतात, की भारताचे नाव शोधण्यासाठी याच्याही मागे गेले पाहिजे. पार वेदकाल गाठला पाहिजे.

आर्य लोक कुठल्या तरी मूलस्थानापासून सरकत सरकत या देशात प्रविष्ट झाले. प्रथम त्यांनी पंचनद प्रदेशात म्हणजेच पंजाबमध्ये आपली वस्ती जमवली. ते पाच गटानी आले म्हणून पंचजन अशी संज्ञा पावले. त्या पंचजनातले एक कुल भरताचे होते. हे भरत मोठे प्रतापी होते. सुदास, दिवोदास ही नावे त्यांच्यापैकीच आहेत. ते ज्या प्रदेशात वसले अन् सत्ता स्थापते झाले, त्या प्रदेशाला भरत जनपद हे नाव मिळाले. ब्राह्मण काळात कुरु-पांचाल अशी त्यांना संज्ञा लाभली. या कुरु-पांचालाचे राजनैतिक प्रभुत्व सर्वांच्यावर उठून आले. हळूहळू भूमी व्यापीत, सत्ता स्थापीत ते लोक गंगा-यमुनांच्या अंतर्वेदीत प्रवेशले. तो प्रदेशही त्यांनी आपल्या सत्तेखाली आणला. भरतांनी व्यापलेला म्हणून पंजाबापासून गंगा-यमुनांच्या दुआबापर्यंतच्या सर्व प्रदेशाला लोक भारत म्हणू लागले. विश्वामित्र हा त्या कुळाचा पुरोहित होता. त्याला आत्मसामर्थ्याचा अभिमान मोठा. तो म्हणाला—

विश्वामित्रस्य रक्षति ब्रह्मेदं भारतं जनम्।

'विश्वामित्राचे हे ब्रह्म म्हणजे सूक्त भारतजनांचे रक्षण करीत आहे.'

पुढे ती भारत ही संज्ञा समग्र देशालाच लागू झाली. हा झाला देश-नामाचा राजकीय संकेत.

याबरोबरच भारत नावाची एक सांस्कृतिक व्युत्पत्तीही काही विद्वानांनी सांगितली आहे. अग्नीची जी अनेक नावे आहेत, त्यांत एक भरत असेही आहे. 'अग्निर्वै भरतः स देवेभ्यो हविं भरति' = अग्नी हा भरत आहे.

कारण तो हविर्द्रव्याने देवांचे भरण करतो. अशी त्याची व्याख्या कौषीतकी उपनिषदाने सांगितली आहे.

अंगिरसांनी भरतांसाठी या भूमीवर पहिल्या प्रथम यज्ञीय अग्नी प्रज्वलित केला. म्हणून अग्नीही भरत झाला, ही दुसरी व्युत्पत्ती. आर्यांनी या देशात आपले सांस्कृतिक साम्राज्य फैलावले, ते भरताला म्हणजे यज्ञीय अग्नीला पुढे करूनच. वैदिक ऋषी जसे द्रष्टे होते, तसेच ते व्यापनशीलही होते. नव्या नव्या प्रदेशात शिरायचे अन् तिथे पहिल्या प्रथम यज्ञाग्नीची स्थापन करायची, हा त्यांचा बाणा. 'यावती भूमिस्तावती वेदिः' जेवढी भूमी तेवढी यज्ञभूमी, हा मंत्र घेऊनच ते देशाच्या चारही दिशांना पसरले. जिथे जिथे दैत्यांनी, राक्षसांनी त्यांच्या अग्निहोत्राला उपद्रव सुरू केला, तिथे तिथे त्यांनी आर्य क्षत्रियांना आपल्या संरक्षणासाठी पाचारले. विश्वामित्राने आपल्या यज्ञरक्षणासाठी राम-लक्ष्मणांना दशरथाकडून मागून नेले होते, हे त्याचे ठळक उदाहरण. अशा प्रकारे हा सारा द्वीपकल्पी भूखंड यज्ञाग्नीच्या सांस्कृतिक सत्तेखाली आला आणि मग या सगळ्याच द्वीपकल्पाला भारत ही गौरवास्पद संज्ञा प्राप्त झाली.

भारत हे या देशाचे नामकरण निश्चित झाल्यावरही आणखी तीन नावे याला दिली गेली होती. पुराणात त्यांचा आढळ होतो. त्यातले पहिले नाव कूर्मसंस्थान. कूर्म म्हणजे कासव. या देशाचा आकार कोण्यातरी कल्पकाला कासवासारखा वाटला अन् तो म्हणाला, की 'हा देश कूर्मसंस्थान आहे.' वराहमिहिर या ज्योतिर्विदाला ते नाव पटले अन् त्याने ते आपल्या बृहत्संहितेत नोंदून टाकले. मग त्याच्या मागूनच्या ज्योतिष्यांनीही तेच नाव वापरले. मार्कंडेय पुराणाने पुढे त्या कासवाचे अवयव कल्पिले आणि भारत कूर्मरूपात बसवून दाखवला.

या कूर्माकृतीतही एक रहस्य शोधता येते. कासवाची पाठ टणक असते. 'सोशी जगाचे आघात' अशी त्या टणकपणात ताकद असते. प्रसंग पडताच कासव आपले अवयव पोटात ओढून घेते. जीवनात विषयांच्या रानातून इंद्रिये आत ओढून घेणे, त्यांचा संकोच करणे हे संयमाचे लक्षण. 'यदा संहरते चायं कूर्मोंगानीव सर्वशः।' म्हणून भगवंताने ते स्थितप्रज्ञतेचेही लक्षण सांगितले आहे. भारताची आध्यात्मिक धारणा सूचित करणारे असे

हे नाव आहे. आज ते लोपले आहे, पण त्याची सामक्षा शिल्लक राहिली आहे. पूर ओसरून गेला, तरी ओल्हासा शिल्लक राहावा तशी. देवस्थानांच्या बहुतेक सभामंडपात बसवलेल्या कासवाच्या रूपाने ती दिसते.

दुसरे नाव कार्मुकसंस्थान. कार्मुक म्हणजे धनुष्य. कल्पनाकाराला भावले, की भारत हा प्रत्यंचा ओढलेल्या अन् कांब वाकलेल्या धनुष्यासारखा आहे. त्याची ओढलेली अतएव गोलाकार झालेली दोरी म्हणजे उत्तरेचा शिखर-युक्त हिमाचल पर्वत आणि त्याची वाकलेली कांब म्हणजे दक्षिणसागरात घुसलेले त्याचे टोक.

या नावाने भारताची राजकीय धारणा सूचित होते. भारत जणू जगाला बजावतो 'माझी खोडी काढायची चावटी करू नका. माझे धनुष्य बाण लावून सज्ज आहे. शिवाचे पिनाक, विष्णूचे शार्ङ्ग अन् अर्जुनाचे गांडीव. त्याची प्रत्यंचा ओढलेली आहे. आक्रमणासाठी नव्हे, पण आत्मरक्षणासाठी हा देश सन्नद्ध आहे.' ही धारणा मध्ययुगात विक्रमादित्य, चंद्रगुप्त, पुष्य-मित्र, यशोधर्म, इ. श्रेष्ठ अन् उद्दंड पुरुषपुंगवांनी जागवली. इतिहास-पुराणांनी त्यांच्या जयगाथा मुक्तपणे गायिल्या आहेत.

पुराणांनी भारताला केवळ समुद्रवलयांकित एवढेच न म्हणता त्याच्या उत्तर-दक्षिण सीमाही सांगून टाकल्या. विष्णुपुराण म्हणते –

उत्तरं यत्समुद्रस्य हिमाद्रेश्चैव दक्षिणम्।
वर्षं तद् भारतं नाम भारती यत्र संततिः॥

'समुद्राच्या उत्तरेस व हिमाचलाच्या दक्षिणेस वसलेला भूखंड म्हणजे भारत होय. तिथल्या प्रजेला भारती म्हणतात.'

मत्स्य अन् वायू या पुराणांनी भारताची उत्तरसीमा 'गंगायाः प्रवहावधि' म्हणून अधिक निश्चित सांगितली. गंगेचा उगम ही भारताची उत्तरसीमा होय. हिमालयात गंगेच्या चार प्रमुख धारा आहेत. अलकनंदा, भागीरथी, मंदाकिनी आणि जान्हवी अशी त्यांची नावे. वरवर पाहणाऱ्याला ती एकाच गंगेची पर्यायनावे वाटतात. पण वस्तुस्थिती तशी नाही. त्यापैकी जान्हवी गंगा ही भारताची उत्तरसीमा होय. तिचा उगम हिमाचलाच्या या अंगाला नाही, तर पलिकडच्या अंगाला जंस्कर नामक पर्वतश्रेणीत आहे. एका काळी आपला भारत तिथवर होता, म्हणजे हिमालय व्यापून होता, असे पुराणे

निक्षून सांगतात. ' गंगायाः प्रवहावधि ' या चरणाचा अर्थ इतका दूर अन् इतका अत्युच्च आहे.

गुप्त साम्राज्याच्या काळापर्यंत भारताचे मानचित्र आणखी बदलले. पूर्वेला अन् आग्नेयीला त्याची व्याप्ती वाढली. तो काळच मोठा भाग्यशाली होता. त्या काळीं भारतीय महत्त्वाकांक्षा शिगेला पोचली होती. राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक, आध्यात्मिक या सर्व क्षेत्रांत भारताची चहू दिशांनी प्रगती होत होती. भारताचे साहसी सुपुत्र लहान–मोठ्या नौका हाकारून द्वीपांतराच्या सफरींना जात होते. धर्मप्रचारक, विजिगीषू क्षत्रिय, व्यापारी, श्रेणी-निगमांचे संघटक हे सारे त्यात होते. त्यांना समुद्रप्रवासाचा निषेध नव्हता, सामाजिक बहिष्कार नव्हता किंवा प्रायश्चित्तांचाही ससेमिरा नव्हता. त्यांनी निरनिराळ्या द्वीपांत जाऊन तिथे वसाहती स्थापल्या. हिंदू राज्ये उभारली. रामायण-महाभारत तिथवर पोचवले. बौद्धांनी आपला धर्म प्रचारला. देवा-धर्मांची प्रचंड शिल्पे उभी केली. यवद्वीप, बलिद्वीप अशी त्यांना नावे दिली. मूळ भूमी अन् वसाहतीचे प्रदेश यांच्यामध्ये सागरी यातायात सुरू झाली. आग्नेय दिशेच्या अनेक द्वीपांना पोटाळून भारत हा बृहत्तर भारत बनला. मग या मूळ भूमीला एखादे नवे नाव देण्याची गरज निर्माण झाली. भारताच्या दक्षिण टोकाला कुमारी देवी तिष्ठत होती, तिच्यावरून मग त्यांनी त्याला कुमारीद्वीप असे नाव दिले.

महोदधी अन् रत्नाकर हे भारताच्या कुशींना भिडलेले दोन समुद्र. पूर्वेचा म्हणजे बंगालचा उपसागर तो महोदधी अन् पश्चिमेचा तो रत्नाकर. पुराणांत या दोघांना हीच नावे आहेत. कालिदासानेही याच दोन नावांनी त्यांचा उल्लेख केला आहे. या दोन सागरांच्या संगमावरच कुमारीचे स्थान आहे. ही कुमारी कन्या आहे. मूळची ती हिमाचलकन्या गौरी अन् शिवाची अर्धांगी. पण बाणासुर कुमारीच्या हातून मरायचा होता. म्हणून ती त्या नावाने अवतरली आणि तिने त्या असुराचा वध करून देवांची एक मोठी चिंता दूर केली. अवतार घेतेवेळीं शिवाने तिला अभिवचन दिले होते, की ' मी योग्य वेळीं पुनश्च तुझे पाणिग्रहण करीन. ' पण अजून ती योग्य वेळ आलीच नाही. त्यामुळे ती अजून कुमारीच राहिली आहे अन् उत्तरेच्या कैलासाकडे डोळे लावून बसली आहे. शिवशंकरही हिमाचलावरच्या

देवदारू वृक्षांच्या वनात तिच्याचकडे दृष्टी लावून बसला आहे.

त्या उभयतांची अर्थात् शिव-शक्तीची ही दक्षिणोत्तर संतत दृष्टी म्हणजे भारताची प्राणधाराच होय. भारताच्या एकात्मतेची धारणा या उभयान्वयी पवित्र दृष्टीतून निर्माण झाली आहे. दक्षिणेचा माणूस शिवदर्शनासाठी हिमाचलाची शिखरामागून शिखरे चढतो आणि उत्तरेचा यात्रिक विंध्य ओलांडून कुमारीच्या दर्शनासाठी दक्षिणेचे टोक गाठतो, ते त्यासाठीच. भारताच्या एकात्म भावनेतूनच ही ओढ निर्माण झाली आहे.

असा हा भारत देश. आपली मातृभूमी. रामप्रभूच्या भाषेत सांगायचे तर ' स्वर्गादपि गरीयसी ! ' देशाची किंवा मातृभूमीची एकात्मधारणा ही एक संजीवनी शक्ती असते. तिचे स्फुरण हृदयात जागृत असले म्हणजे क्षुद्र भेदभाव वर उठत नाहीत. आपले राष्ट्रीय जीवन स्वच्छ, निर्मळ अन् पावन व्हायला हवे असेल, तर ऐक्याची भावगंगा त्यातून सतत वाहती ठेवली पाहिजे. जाती, धर्म, प्रांत, भाषा हे सर्व भेद राष्ट्रीयतेच्या महामंत्राने प्रोक्षूनच धारण केले पाहिजेत. ' प्रियं भारत भारतम् ' या भावनेचा आविष्कार कौरवपांडवांच्या युद्धापूर्वी संजयाने केला. तो करताना काही श्रेष्ठ आदर्शही त्याने डोळ्यांपुढे उभे केले. तेच आदर्श चित्तात ठसवून आपणही या संघर्षकाली एकमुखाने म्हणू या– ' प्रियं भारत भारतम् ! '

# मारुती-नाटककार

चैत्राचा कृष्ण पक्ष हा मारुतिरायाचा पंधरवडा. या दिवसांत पुण्यनगरी-मध्ये कथाकीर्तनांचा सुकाळ असतो. अक्षय्यतृतीयेपर्यंत हे कीर्तनसत्र चालते. त्यामुळे आबालवृद्धांना श्रवणाची पर्वणी लाभते.

मारुतीची उपासना हे महाराष्ट्राचे एक वैशिष्ट्य. समर्थ रामदासांनी हेतु-पूर्वक ही उपासना महाराष्ट्रात वाढवली. त्यासाठी सातारा जिल्ह्यात अकरा मारुती स्थापले. मग त्या गोष्टीचे अनुकरण सर्वत्र झाले. गावोगावी मारुती अंगाला शेंदूर फासून उभे झाले. ‘ गाव तिथे मारुती ’ असा जणू संकेतच ठरला. मारुती हा ग्रामांचा अन् ग्रामजनांचा संरक्षकच बनला.

‘ भीमरूपी महारुद्रा वज्रहनुमान मारुती ’ ही आपली मारुतीविषयीची स्थूल ओळख. समुद्रोल्लंघन, लंकादहन, द्रोणागिरीचे उत्पाटन, ही त्याची ठोस प्रमाणे. मारुती रामभक्त आहे अन् बलवान् आहे, एवढेच आपल्याला पुरेसे असते. तेवढ्यासाठीच आपण त्याच्यापुढे नारळ फोडतो अन् त्याच्या गळ्यात रुईच्या पाना-फुलांची माळ घालतो.

पण वाल्मीकीला आणि इतरही रामायणकर्त्यांना मारुतीच्या रूपाने शड्डू ठोकणारा एक पैलवान लोकांच्या पुढे उभा करायचा नव्हता. त्यांनी त्याला इतरही अनेक गुणांनी मंडित करून आकाराला आणले आहे. रामायणातली ‘ मतिमान् ’ अन् ‘ महाप्राज्ञ ’ ही दोन विशेषणे पाहिली, की मारुती हा प्रज्ञावान् पंडितही होता, याची सूचना मिळते. खरे पाहिले, तर मारुतीची विद्वत्ता ही त्याच्या बल–पराक्रमाच्या झगझगाटात झाकळली गेली आहे. मारुती हा संस्कृत अन् प्राकृत अशा दोन्ही भाषा अस्खलित बोलत होता. त्यामुळेच अशोकवनात सीताभेटीच्या वेळी त्याला प्रश्न पडला, की ‘ मी सीतेशी संस्कृतात बोलू का प्राकृतात ? एखाद्या ब्राह्मण पंडिताप्रमाणे संस्कृत बोलू लागलो, तर सीतेला वाटायचे, हा वानररूपधारी रावणच आपल्याला भुरळ घालायला आला आहे. तसे झाले तर ती घाबरेल. तेव्हा सामान्यजनांप्रमाणे प्राकृतातच बोलावे हे बरे ! ’

संस्कृतात शुद्ध, स्वच्छ बोलणे म्हणजे ते येरागबाळाचे काम नव्हे. त्यासाठी व्याकरणाचे ज्ञान आवश्यक आहे. मग मारुती व्याकरण कुठे बरे शिकला असेल अशी जिज्ञासा उत्पन्न होते. तिचा उपशम पुढील कथेत केलेला आहे —

मारुतीला वाटले, की व्याकरण शिकल्यावाचून भाषाज्ञानाचे मडके कच्चे ! म्हणून तो सूर्यनारायणाकडे शिष्यभावाने उपस्थित झाला. सूर्याने त्याला ‘ शक्ल पच् मुच्... ’ पढवले. सुबन्त अन् तिङन्त यांची माहिती दिली. सर्व काही शिकवले. मारुती वैय्याकरण बनला. मग सूर्यदेव त्याला म्हणाला, ‘ आता मला गुरुदक्षिणा हवी ! ’ मारुतीने विचारले. ‘ काय देऊ ? ’ सूर्य नारायणाला भविष्यकालातल्या घटना स्वच्छ दिसत होत्या. तो म्हणाला, ‘ सुग्रीव हा माझा पुत्र. त्याचे अन् वालीचे पुढे युद्ध जुंपणार आहे. त्या युद्धात तू सुग्रीवाला साह्य करावेस, ही माझी गुरुदक्षिणा. ’ मारुती म्हणाला, ‘ अवश्य ! ’

महाभारताच्या वनपर्वात मारुती अन् भीम यांचा संवाद आहे. त्या संवादात मारुती हा तत्त्वज्ञानी आणि धर्मवेत्ता या स्वरूपात आपल्याला दिसतो. त्या प्रसंगी चतुर्युगातला धर्म अन् चारी वर्णांची कर्तव्ये त्याने भीमाला उपदेशिली आहेत. पुढील काळात रामरहस्य नावाचे एक उपनिषद् त्याच्या नावावर जमा आहे. त्या उपनिषदात तो सनकादी मुनींना रामोपासनेचे तत्त्व

विशद करून सांगतो. रामभक्तीच्या रसिक संप्रदायात तर त्याला माधुर्यभक्तीचा प्रवर्तकच मानले आहे. बंगाली रामायणात मारुती हा ज्योतिषी आणि संगीत-कलानिधी मानला गेला आहे. तुलसीदासानेही त्याला सामगायक म्हणून गौरवले आहे.

पण मारुती हा नाटककार आहे ही गोष्ट तर आश्चर्यकारकच म्हणावी लागेल. राम हा त्याचा देवाधिदेव. त्याचा धीरोदात्त नायकही तोच. त्यामुळे त्याने नाटक लिहिले तेही रामचरित्रावरच. ‘ महानाटक ’ हे त्याचे नाव. त्या नाटकाने थोड्याच काळात अमाप लोकप्रियता मिळवली. इतकी की त्यामुळे आदिकवी वाल्मीकीचे धावे दणाणले. तो तुरंत रामप्रभूकडे गेला अन् त्याला आवर्जून म्हणाला—

“ प्रभो, प्रसंग मोठा कठीण आला आहे. महानाटकाच्या तुलनेने माझे रामायण मागे पडू लागले आहे. कारण मी लिहिले, ते ध्यानाने साऱ्या घटना लक्षात आणून अन् मारुतीने लिहिले आहे ते सगळे रामचरित्र स्वतःच्या डोळ्यांनी पाहून. त्यामुळे त्याच्या लेखनाला अनुभूतीचा जिवंत स्पर्श आहे. लोकांना तो जाणवतो. ते प्रभावित होतात. तेव्हा प्रभुराया, माझे रामायण जिवंत राहावे असे तुम्हांला वाटत असेल, तर मारुतीच्या महानाटकाची काही-तरी विल्हेवाट लावा. ”

रामप्रभूने त्या बाबतीत काहीतरी करण्याचे आश्वासन देऊन वाल्मीकीला परत पाठवले. मग मारुतीला बोलावून घेतले. वाल्मीकीची मनोव्यथा त्याला सांगितली. मारुती त्यावर म्हणाला, “ प्रभो ! माझे नाटक मरू दे; पण आदिकवीचे रामायण अमर राहू दे ! ”

मारुती तिथून उठला. किती झाले तरी तो हाडाचा कलावंत होता. आपल्या ललित कृतीवर त्याचे जिवाआगळे प्रेम होते. त्याने ते आपले समग्र नाटक एका मोठ्या शिळेवर नांदीपासून तो भरतवाक्यापर्यंत कोरून काढले अन् ती शिळा आपल्या समर्थ हातांनी समुद्रात लोटून दिली. एका महान् साहित्य-शिल्पाच्या अमरत्वासाठी त्याने उदार मनाने आपल्या लघू पण काळजातून आलेल्या ललित कृतीला ‘ समुद्रास्तृप्यन्तु ’ म्हटले. त्यामुळे मारुतीच्या रामभक्तीच्या शिरी त्यागाचा सुवर्णमुकुट चढला.

यावर कोणी विचारील ' अहो सांगता काय ? सांप्रत ते महानाटक ' हनुमन्नाटक ' या नावाने उपलब्ध आहे. हे कसे झाले ? ' त्याला मी प्रतिप्रश्न विचारू शकेन. ' इंद्रायणीत बुडविलेली तुकोबांची अभंग–गाथा कशी उपलब्ध झाली ? ' पण असा तेढा सवाल न विचारता मी त्या प्रश्नाचे उत्तरच देतो.

भोजराजा सर्वांना माहीत आहे. तो विद्या-कलांचा कमालीचा भोक्ता होता, हेही ठाऊक आहे. त्याच्या कानी ही महानाटकाची गोष्ट आली. त्याने समुद्र, धांडोळून ती नाटकशिला वर काढायचे ठरविले. त्याच्या प्रयत्नांना यश आले.

ψ ψ ψ

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वत्व.
अनुक्रम ७९३२४ वि: निबंध
क्रमांक १७०२ नों: दि: २५।३।७०

# सीतात्यागाची व्यथा

एखादा सच्चरित माणूस एखादे लोकविलक्षण कृत्य करून जातो. लोकांना त्यामुळे धक्का बसतो. ते करणारा त्या कृतीचे समर्थन करू शकत नाही. त्यामुळे तो भला माणूस लोकांच्या मनातून उतरण्याची पाळी येते. पण त्याचे म्हणून काही चाहते असतातच. त्यांना अशा वेळीं मूग गिळून बसवत नाही. ते मग आपण होऊन त्या सज्जनाच्या बचावासाठी पुढे येतात. त्याच्या त्या कृतीचे परोपरीने समर्थन करू लागतात. त्यासाठी काही आधारही शोधतात आणि ती कृती करणाऱ्या व्यक्तीच्याऐवजी ते स्वतः जनांच्या अपवादांना तोंड देण्यासाठी पुढे होतात.

प्रभू रामचंद्राच्या बाबतीत अशीच गोष्ट घडली आहे. त्याने साध्वी सीतेचा त्याग केला, हे त्याचे लोकविलक्षण कृत्य. ते लोकांना आवडले नाही. सीता त्या वेळीं गर्भवती होती, पहिलटकरीण होती, ही त्यातली विशेष बोच. सीतेने लंकेत अग्निदिव्य केले होते. त्यामुळे प्रजेच्या हृदयात ती पवित्र दीपज्योत ठरली होती. आणि एवंगुणविशिष्ट धर्मपत्नीचा रामाने त्याग केला होता.

आजच्या प्रगत विचारांच्या भारतीय स्त्रिया या कृत्याबद्दल मर्यादापुरुष रामचंद्राला दूषण लावतात. स्त्रीदाक्षिण्यवादी पुरुषही त्यांची री ओढतात. आपण सदसद्विवेक बुद्धीला धरून आणि स्मरून विचार करतो, त्या आधारावर एखाद्याच्या कृतीची पारख करतो, असे ते म्हणतात. बुद्धी हे शस्त्र आहे. ते खऱ्याखोट्याचा निवाडा करताना समोरचा मनुष्य सामान्य आहे, का महापुरुष आहे ते पाहणार नाही, असा या बुद्धिवादी विचारवंतांचा दावा असतो.

पण निदान या बाबतीत तरी अशा विचारवंतांना पुरोगामित्वाचा दावा सांगता येणार नाही. रामप्रभूच्या त्या कृतीबद्दल त्या काळातच लोकांच्या मनात किंतू आला होता. त्याच्या त्या कृतीविषयी गवगवाही झाला होता. रामाच्या त्या कृतीमुळे एखादा धोबी खूष झाला असेल; पण पातिव्रत्याची कदर असणारे भावनाशील लोक रामाला दोष देऊ लागले होते. त्यामुळे प्रजारंजनरूप धर्माने लोकांच्या हृदयात आदराचे, भक्तिप्रेमाचे अढळपद मिळवून बसलेला प्रभू राम; त्या पदावरून च्युत होतो की काय, अशी धास्ती निर्माण झाली.

तसे होऊ नये, जनांच्या मनातला रामाविषयीचा भक्तिभाव कमी होऊ नये, एक उज्ज्वल आदर्श डागळला जाऊ नये म्हणून मग कवी, महाकवी, पुराणकार, लोककथाकार, पुढे सरसावले. कविकुलगुरू कालिदास म्हणाला —

कौलीनभीतेन गृहान्निरस्ता न तेन वैदेहसुता मनस्तः।

‘अहो, रामाने लोकापवादाच्या भयाने सीतेला घरातून घालवली हे खरे, पण तिला मनातून नाही घालवली.’

पण कालिदासाची ही आध्यात्मिक वकिली सामान्यजनांना पटण्याजोगी नव्हती. त्यांना हवे होते ठळक ढोबळ कारण. त्यांना रामावरचा दोषारोप तर धुऊन निघायलाच हवा होता; पण त्याबरोबरच सीतेच्या शुद्ध चारित्र्यावरही ओरखडा उठायला नको होता. त्यासाठी मग कवींनी आणि पुराणकर्त्यांनी सीतात्यागाच्या घटनेभोवती कथा अन् आख्यायिका यांचे जाळेच विणले.

कथासरित्सागरात त्याविषयी कथा सांगितली गेली ती अशी —

एक दिवस रामप्रभू गुप्त वेषाने नगरजनांची परिस्थिती पाहण्यासाठी निघाला. हिंडता हिंडता एका घराजवळ थांबला. तिथे एक दुःखांतिका घडत

होती. एक पुरुष आपल्या पत्नीला घरातून ओढून बाहेर घालवीत होता. ती पत्नी रडत होती, आक्रोशत होती आणि जमलेल्या लोकांना म्हणत होती. 'बघा हो माझा नवरा. हा रामापेक्षाही स्वतःला मोठा नीतिमान् समजतो. रामाने राक्षसाच्या घरी राहिलेल्या सीतेलाही घरातून घालवले नाही आणि हा तर मी भावाच्या घरी गेले, एवढ्याच कारणासाठी मला घालवून देतो आहे.' तिचे ते बोलणे रामाच्या जिव्हारी झोंबले. आपल्यावर फार मोठा लोकापवाद आला आहे., हे त्याला समजून चुकले. तो लगेच राजवाड्यात परतला आणि त्याने तावडतोब सीतेची वनात रवानगी केली.

पण कवींना वाटले की हे कारणही पोचट आहे. लोक काय वाटेल ते बोलतील. मारणाऱ्याचा हात धरवतो, पण बोलणाऱ्याचे तोंड धरवत नाही. रामासारख्या नृपश्रेष्ठाने केवळ लोकापवादासाठी सीतेवर एवढा घोर अन्याय करावा, हे विचारी माणसाला पटायचे नाही. त्यासाठी यापेक्षाही एखादे जोरकस कारण हवे.

आणि मग आनंद रामायणाच्या कर्त्याला कल्पना स्फुरली, की या कामी कैकेयीचा उपयोग करून घ्यावा. राम-सीतेच्या वनवासाला तीच महामाया कारणीभूत झाली नव्हती का? त्या गोष्टीला चौदा वर्षे होऊन गेली हे खरे, पण माणसाचा स्वभाव कधी बदलत नसतो. त्यानंतर पुढील कथा तयार झाली —

सीता पट्टराणी झाली हे शल्य कैकेयीला सतत खुपत होते. एक दिवस ती सीतेजवळ आली अन् तिच्या पाठीवरून हात फिरवून तिला म्हणाली. 'रावणाने तुला पळवून नेली अन् रामाने त्याचा वध केला. रामाचा हा पराक्रम सगळेच वाखाणतात. तो रावण कसा काय होता जानकी? मला त्याचे चित्र तरी काढून दाखव.' सीता म्हणाली, 'सासूबाई, मी त्या रावणाकडे डोळे वर करून कधी पाहिलेच नाही. मी पाहिले होते ते त्याचे पाय. तेवढे हवे तर काढून दाखवते.' कैकेयी म्हणाली 'काढ.' सीतेने मग रावणाचे पाय चितारले. कैकेयीने ते चित्र उचलले. ती सीतेच्या महालातून स्वतःच्या महालात आली. तिने त्या पायांच्या मापाने उभा रावण चित्रित केला. मग ते चित्र रामाकडे घेऊन जाऊन ती त्याला म्हणाली.

"बघ, हे तुझ्या बायकोचे चरित्र! तू रावणाला मारलेस, पण ते बाह्यात्कारी. सीतेच्या हृदयात रावण अजून जिवंत आहे. ती त्याच्या या चित्राची

नित्य पूजा करीत असते. असली अवदसा तू पट्टराणी म्हणून घरात ठेवू नकोस. लक्ष्मणाच्या करवी तिला वनात सोडून दे. अन् त्याला म्हणावे, परत येताना परपुरुषाचे चित्र काढणारा तिचा तो उजवा हात तोडून आण. ”

ही कथा चपखल बसली. पण थोडा अधिक विचार केल्याअंती या कथेचं ठिसूळपणही कळून येण्याजोगे होते. रामाला कैकेयीचा मत्सरी स्वभाव ठाऊक नव्हता काय ? मग त्याने तिच्यावर विश्वास कसा ठेवला ? हे काहीतरी कारस्थान असेल, असे का त्याला वाटले नाही ? त्याने त्याबद्दल सीतेला का विचारले नाही ? अन् शिवाय सीतेने रामासमक्ष स्वतःच्या शुद्धत्वाबद्दल अग्निदिव्य केले होते त्याचे काय ? छेः ! ही कथा समाधानकारक नाही. तिच्यात भोळेपणाचा एक नवाच दोष रामाच्या अंगी लावल्यासारखे होते... मग काय करायचे ?

यावर विचार करता करता पद्मपुराणाच्या कर्त्याला वाटले, की कुठून तरी एखाद्या शापाची घटना दाखवली, तर हा तिढा सहजपणे सुटू शकेल. कालिदासानेही असेच केले होते नाही का ? दुष्यंत राजा शकुंतलेवर मोहित होतो, तिच्याशी लग्न करतो, तिला पट्टराणी करण्याचे वचन देतो, मग तिला विसरतो आणि शकुंतला आपण होऊन त्याच्या दरबारात गेल्यावर ‘ तुझी माझी कधी ओळखच झाली नाही, मग लग्न कुठले ? ’ असे म्हणून तिचा त्याग करतो.

आता काय करायचे ? कालिदासाने तर धीरोदात्त नायक म्हणून, एक राजर्षी म्हणून दुष्यंताचा स्वीकार केला होता. त्याच्या राजर्षिपणाशी या त्याच्या शठ कृतीचा मेळ बसत नव्हता. मग त्याला लोकनिंदेपासून वाचवायचे कसे ? कालिदास म्हणाला, आता त्यासाठी एखादा शापप्रसंग उभा करणे भाग आहे. मग त्याने दुर्वासाला शकुंतलेच्या आश्रमात आणवले, त्याच्याकडे तिचे दुर्लक्ष झाल्याचे भासवले आणि त्याच्या मुखाने एक शाप वदवला —

“ नवऱ्याच्या नादात गुंगली आहेस, त्यामुळे माझ्यासारखा तपोधन ऋषी दारी आल्याचेही तुला भान उरले नाही. माझा तुला शाप आहे, की तो तुझा वल्लभ तुला संपूर्णपणे विसरून जाईल. ”

पद्मपुराणकर्त्याने हाच तोडगा स्वीकारला अन् कथा बनवली ती अशी —

लग्न होण्यापूर्वी सीता एक दिवस उद्यानात गेली होती. तिथे वाल्मीकीच्या आश्रमातून आलेले एक शुकदांपत्य रामकथेचे गायन करीत होते. सीतेला ती कथा

विस्ताराने ऐकावी असे वाटले आणि तिने त्या जोडप्याला फसवून पिंजऱ्यात पकडले. तिच्या सांगण्यावरून त्या जोडप्याने सविस्तर रामकथा ऐकवली. मग तरी तिने त्यांना सोडावे की नाही ? पण ती म्हणाली. ‘ जेव्हा श्रीराम इथे येऊन माझा स्वीकार करील तेव्हाच मी तुम्हांला सोडीन. त्यावर शुक कळवळून बोलला. ‘ सीते, माझी पत्नी गर्भवती आहे. तिच्या प्रसूतीसाठी आम्हांला आमच्या घरट्यात जाऊ दे. ’ त्यावर सीतेने शुकाला सोडले, पण शुकीला मात्र अडकवून ठेवले. शुकीला ते वियोगदुःख सहन झाले नाही. ती तळतळून सीतेला शापवाणी वदली —

यथा त्वं पतिना सार्थं वियोजयसि मामितः ।
तथा त्वमपि रामेण विमुक्ता भव गर्भिणी ॥

‘ ज्या अर्थी मी जड जिवाची असताना तू माझी अन् माझ्या पतीची ताटातूट केलीस, त्या अर्थी तू गर्भवती होशील तेव्हा तुलाही तुझा राम टाकून देईल आणि तू विरहिणी बनशील ! ’

असे बोलून शुकीने त्या पिंजऱ्यातच प्राणत्याग केला. ही वार्ता तिच्या शुकाला कळली. तो म्हणाला, ‘ मी या गोष्टीचा सूड घेईन. ’ त्यानेही मग गंगेत आत्महत्या केली. पुढील जन्मी तो अयोध्येतला धोबी झाला आणि रामावर अपवाद घालून तोच सीतात्यागाला कारणीभूत ठरला.

ही कथा ऐकल्यावर मात्र कोणाला काही बोलायला तोंडच उरले नाही. लोक म्हणू लागले, की ‘ अश्राप सीतेला वियोगदुःख भोगावे लागले याबद्दल हळहळ वाटते; पण त्यासाठी रामाला तरी दोष कसा द्यायचा ? शाप म्हणजे अटळ गोष्ट ! ’

अशा प्रकारे रामावरचा हा अभियोग दूर केला गेला. उरलेसुरले शल्य भवभूतीने काढून टाकले. भवभूतीचा राम सीतात्यागाबद्दल इतका पश्चात्ताप करतो, की पाषाणाने रडावे अन् वज्राचेही हृदय फुटावे. ‘ पश्चात्तापेन शुद्ध्यति ’ हे तत्त्व तिथे लागू पडले. मग रामाविषयी भक्तिभाव धारण करणाऱ्या लोकांनी असे ठरवले, की हा नियतीचा खेळ आहे. यात रामाचा काडीमात्र दोष नाही.

यदभावि न तद्भावि भाविचेन्नतदन्यथा ।
तदा दु:खैर्न लिप्येरन् नलरामयुधिष्ठिरा: ॥

'जे व्हायचे नाही, ते कधीही घडणार नाही. जे व्हायचे ते कधीही टळणार नाही. असे जर नसते, तर नल, राम अन् युधिष्ठिर यांना कशाला दु:ख भोगावे लागले असते !'

# विष्णु-नारायण

'नारायणनामाने नच सोडावे कदापि हे वदन' असा मोरोपंतांचा एक आर्यार्ध आहे. नारायण नामाचा सतत जप करावा असा त्याचा भावार्थ. संन्याशी तसे करतात. कोणाला आशीर्वाद द्यायचा झाला, तरी 'नारायण'च म्हणतात. व्यासांनीही तोच मंत्र जपला आहे. 'नारायणं नमस्कृत्य' म्हणूनच त्यांचा 'जय' ग्रंथ सुरू होतो.

नारायण म्हणजे विष्णूचेच एक वेगळे नाम-रूप अशी सगळ्यांची धारणा आहे; पण काही लोकांची जिज्ञासा पुराणात सांगितले आहे एवढ्यावर स्वस्थ बसत नाही. ते खोल पाण्यात शिरू पाहतात. नारायणाच्या बाबतीत काही संशोधकांनी तसा प्रयत्न केला आहे. त्यासाठी ते इतिहासालाही अगम्य अशा भूतकालाच्या गुहेत शिरले आहेत.

विष्णू हा वैदिक देव. ऋग्वेदातल्या देवमंडळात त्याला दुय्यम स्थान असले, तरी तो तिथे आहे. 'विष्णूचे पराक्रम अवर्णनीय. त्याने तीन पावलांत त्रिभुवन व्यापले. त्याचे परमपद उच्च जागी आहे.' हे त्याचे ऋग्वेदा-

तले वर्णन. पुराणांनी त्याला चतुर्भुज केले अन् त्याच्या हाती शंख, चक्र, गदा, पद्म ही आयुधे दिली. ऋग्वेदात लक्ष्मी आहे, पण तिचे विष्णूशी काही नाते आहे असे दिसत नाही. पण पुराणांनी लक्ष्मीला त्याच्या गळ्यात माळ घालायला लावली. शिल्पकलेत भूदेवी नावाची तिला एक सवतही लाभली आहे. त्याच्या परमपदाला पुराणांनी वैकुंठ असे नाव दिले. वैकुंठ म्हणजे विष्णु-भक्तांनी गजबजलेला, पार्षदगणांनी संरक्षिलेला, अतिसमृद्ध अन् अत्युच्च लोक. विष्णूची स्वारी तिथे वास्तव्य करून आहे.

आता नारायण पाहा. तो क्षीरसागरातल्या श्वेतद्वीप नामक बेटात वास्तव्य करतो. त्याचा त्या वरच्या वैकुंठाशी काही संबंध नसून, तो पाण्याशी आहे. नावाची व्युत्पत्तीही तशीच आहे—

**आपो नारा इति प्रोक्ता आपो वै नरसूनवः ।**
**ता यदस्यायनं पूर्वं तेन नारायणः स्मृतः ॥**

'आपतत्त्व म्हणजे नारा होय. आप हे नाराख्य परमात्म्याचे अपत्य आहे. ते या देवाचे पूर्वीचे निवासस्थान म्हणून लोक त्याला नारायण म्हणू लागले.'

ऋग्वेदात देव म्हणून नारायण नाही. आहे तो त्या नावाचा ऋषी. सुप्रसिद्ध पुरुषसूक्ताचा कर्ता म्हणून तो लोकविश्रुत आहे. विष्णू अत्युच्च परम-पदावर विराजमान तर नारायण समुद्रनिवासी. विष्णू सृष्टीच्या पालनपोषणासाठी सदैव उभा; तर नारायण सदैव पहुडलेला. दोहोत अशी ही स्थलभिन्नता आणि कार्यभिन्नताही दिसते. तेव्हा संशोधकांना वाटले, की नारायणाचा उगम वैदिक संस्कृत वाङ्मयात न शोधता तो संस्कृत भाषेच्या बाहेर कुठे तरी शोधला पाहिजे. म्हणून त्यांनी तो द्रविड भाषेत करायचे ठरवले आणि त्यांना त्या शब्दाची व्युत्पत्ती गवसली.

नार + अय + अन् हे तीन अंश मिळून नारायण हा द्रविड शब्द बनतो. नार हे नीर वरून आले आहे. नीर शब्द संस्कृताने उचलला तो द्राविड भाषेतूनच. 'अय' = पहुडण्याचे स्थान आणि 'अन्' हा पुरुषवाचक प्रत्यय. तमिळ भाषेत तो सर्वत्र आढळतो. उदा० मुरुगन, अय्यप्पन, इत्यादी. नारायण शब्दाची द्राविड व्युत्पत्ती अशी लागते. त्यावरून नारायण हा मुळात द्रविडांचा सागराधिष्ठाता देव असावा असे म्हणता येते. द्रविड हे मुळात दर्यावर्दी होते.

ऋग्वेदातले पणी हे त्यांचेच पूर्वज असावे. तेही दर्यावर्दी होते. द्रविडांचा प्राचीन काळापासून समुद्राशी निकट संबंध आहे. तेव्हा त्यांनी नारायण या नावाने आपल्या एका पाळित्यापोशित्या देवाची कल्पना केली असावी. बौद्धांच्या अवदानशतकात एक कथा आली आहे ती अशी —

राजगृहामध्ये एक व्यापारी होता. तो आपले जहाज घेऊन सागरी व्यापाराला निघाला. बरेच दिवस तो परत आला नाही, की त्याचे काही वर्तमानही कळले नाही. तेव्हा त्याच्या बायकोने नारायणाला नवस केला, की 'माझा नवरा सुखरूप परत येऊ दे; मी तुला सुवर्णचक्र वाहीन.' व्यापारी थोड्याच दिवसांत सुखरूप घरी आला. मग त्याची बायको नवस फेडण्यासाठी समुद्रतीरावर गेली. तिथे जे नारायणाचे मंदिर होते, त्यात तिने आपले नवसाचे सुवर्णचक्र वाहिले.

ही कथाही नारायणाचा सागरसंबंधच दर्शविते. या द्रविडसंबंधातच पुढे त्याला शेषशय्या प्राप्त झाली. नाग ही द्राविड जमातच आहे. शेष हा त्या जमातीचा प्राचीन काळचा राजा किंवा कुलदेव असावा. तो पाताळात राहतो. पाताळ हा नागलोक आहे, असे अमरकोशातही म्हटले आहे. पातालम् हा शब्दही द्राविडच आहे. त्यातला आलम् हा अंश पाणी या अर्थाचाच आहे. संस्कृतात पाण्याला आलम् हा शब्द नाही. पुढे कोणत्या तरी काळात शेष व नारायण यांचे संयोगीकरण होऊन आजची शेषशायी नारायणमूर्ती निर्माण झाली.

नारायण हा जसा मूळ आर्येतरांचा देव, तसाच तो शिवाचे एक भिन्न रूप होता, असा सिद्धान्त श्री. लीलाधर केणी यांनी मांडला आहे. त्याला त्यांनी कांही पुरावेही दिले आहेत. त्या पुराव्यांपैकी एक दृश्य पुरावा म्हणजे दक्षिणेतील शेषशायी नारायणाच्या मूर्ती. शिवसमुद्रम्, श्रीरंगम् अन् श्रीरंगपट्टम् या तीन ठिकाणी महान् आकाराच्या शेषशायी मूर्ती स्थापलेल्या आहेत. ही तिन्ही क्षेत्रे मुळात वैष्णव नसून शैव आहेत. दक्षिणेत नारायणाला रंगनाथ म्हणतात. हेही मुळात शिवाचेच नाव असावे. जसे नटराज, तसे रंगनाथ. शिवसमुद्रम् क्षेत्रात शेषशायीबरोबरच एक शिवलिंगही आहे अन् त्यापुढे नंदीही आहे.

वरील तिन्ही क्षेत्रे नदीचा प्रवाह दुभंगून आणि पुन्हा सांधून बनलेल्या

बेटावर वसली आहेत. नारायण हा सभोवती जलविस्ताराने वेढलेल्या श्वेतद्वीपाचा निवासी होता, या कथेशी हे जुळते. ही तिन्ही क्षेत्रे नारायणाचे शिवाशी अभिन्नत्व दर्शवितात, असे श्री. केणी यांचे म्हणणे आहे.

महाभारतातील नारायणीय आख्यान वाचल्यानंतर श्री. केणी यांच्या या मतात काही तथ्य असावे असे वाटू लागते. त्या आख्यानात कारण नसताना वाकडी वाट करून नारायणाने आपण व शिव एकच असल्याचे सांगितले आहे. नारायण पुढे म्हणतो, ‘ शिव आणि नारायण हे एक सत्त्व असून ते द्विधा विभक्त झाले. जो शिवाला जाणतो तो मला जाणतो अन् जो मला जाणतो तो शिवाला जाणतो. ’

पुढे पुराणांनी हा संबंध बदलून टाकला. त्यांनी नारायणाचा शिवाशी असलेला अभेदसंबंध क्षीण करून तो विष्णूशी जोडून दिला. वैष्णवसंप्रदायांनी विष्णु-नारायणामधली भेदरेषाही पुसून टाकली. विष्णू म्हणजेच नारायण अन् नारायण म्हणजेच विष्णू आणि तोच सृष्टीचा कर्ता, धर्ता, असे ठरवून टाकले.

शेषशायी मूर्ती हा नारायणाच्या मूर्तिकरणातला पहिला टप्पा होय. वर उल्लेखिलेल्या श्रीरंगम् इत्यादी क्षेत्रात त्या मूर्तीबरोबर ब्रह्मा नाही. पुढच्या काळात ब्रह्मा–विष्णू हे त्याचे गण म्हणून त्यांच्या डाव्या उजव्या अंगी दाखल झाले. पुढे नारायणाच्या आर्यीकरणात ब्रह्मदेवाला महत्त्व आले आणि नारायणशिल्पाच्या वरच्या अंगी त्याला स्थान मिळाले. पण तिथेही त्याचा नारायणाच्या नाभीशी संबंध नाही. मध्यप्रदेशातील देवगढ येथील शेषशायी शिल्प हे मात्र पौराणिक दृष्टीने सर्वांगपरिपूर्ण ठरले. त्यात शेषशायीच्या नाभीतून उमललेल्या कमलावर ब्रह्मा आसनस्थ आहे, लक्ष्मी नारायणाचे पाय चेपीत आहे आणि दोही अंगी मधु-कैटभ दैत्य उभे आहेत. नारायणाच्या आर्यीकरणाचा हा शेवटचा टप्पा होय.

अशा प्रकारे विष्णु-नारायण अभिन्न झाल्यावर तैत्तिरीय आरण्यकाने त्या दोघांचा आणि त्याबरोबरच अवतार म्हणून वासुदेव-कृष्णाचाही अद्वैत संबंध पुढील गायत्रीमंत्र निर्माण करून पक्का केला —

> नारायणाय विद्महे। वासुदेवाय धीमहि।
> तन्नो विष्णु: प्रचोदयात्।

अनुक्र ७१३२४ विषय
९८५८

# भामिनी-विलास

लेखाचा मथळा फसवा आहे. कारण यात भामिनीच कुठे आढळायची नाही; मग तिचा विलास कुठला ? पण हा मथळा देणे ही कल्पना माझी नव्हे. ते काम मूळ कवीचेच आहे. हा कवी कोण माहीत आहे ? पंडितराज जगन्नाथ !

भामिनीविलास ही पंडितराजाची स्फुट काव्यरचना आहे. त्याचे प्रास्ताविकविलास, शृंगारविलास, करुणविलास आणि शांतविलास असे चार भाग आहेत. हे सगळे मिळून भामिनीविलास बनतो. हे नाव त्याला का द्यावेसे वाटले, ते एक तोच जाणे !

एखादा माणूस लोकविलक्षण वागायला लागला, आपल्या चरित्राने लोकांना धक्के द्यायला लागला, की आपण म्हणतो, ' अमक्या तमक्याचे चित्र काढवत नाही. ' याचा अर्थ तो लौकिक रूढ कल्पनेच्या चौकटीत बसत नाही. पंडितराज हा तसा होता. तो मळलेल्या मार्गाने कधीच गेला नाही. त्याने आपली स्वतःची नवी वाट निर्माण केली. त्या कामी त्याने कोणाचीही पर्वा केली नाही. तत्का-

लीन रूढिबद्ध पंडितांना आणि त्यांच्या मतांना त्याने आयुष्यभर टकरा अन् ठोकरा दिल्या. जन्म तेलंगणात, तारुण्य मोगलदरबारात, पोक्त वय मधुपुरीत म्हणजे मथुरेत अन् जीवनाची अखेर काशीक्षेत्री गंगेच्या प्रवाहात.

भट्टोजी दीक्षिताच्या मनोरमा नामक व्याकरण ग्रंथावर टीका लिहून त्याने ' मनोरमाकुचमर्दन ' केले. अनेक शास्त्री-पंडितांना वादविवादाच्या आखाड्यात ओढून त्यांना चारी मुंड्या चीत केले. पण त्याचे असामान्यपण याहूनही आगळे आहे. इस्लामसारख्या परक्या धर्माचे खोलवर अध्ययन करून त्याने एका विद्वान काजीशी शास्त्रार्थ केला अन् त्याची मस्ती जिरवली. आणि तीही दिल्लीश्वर जहांगिराच्या समक्ष. ही काय साधीसुधी गोष्ट आहे ! जिवावर बेतली असती म्हणजे ? पण जगन्नाथाचे पांडित्य निर्भय होते. दिल्लीपतीच्या अंतःपुरात उमललेल्या फुलावर—त्या यवनी कोमलांगीवर तो भाळला, यात तर त्याच्या धाडसाची कमालच म्हटली पाहिजे. कारण त्या कोमलांगीभोवती कांटेरी कुंपण जबरदस्त होते. पण तरीही तो त्या दीपशिखेवरचा पतंग झालाच.

त्याचे पांडित्य मोठे तसा गर्वही मोठा ! कविकुलगुरु कालिदासाची कुचाळी करायलाही त्याला दिक्कत वाटली नाही, मग इतरांची कथा काय ! आपण वादविवादाच्या कुरुक्षेत्रात ' निर्वीरमुर्वीतलम् ' करून टाकले, अशी त्याची आढ्यता होती. त्याने स्वतःवरच तशी एक अन्योक्ती लिहून ठेवली आहे—

'आपण म्हणजे मृगपती सिंह. आपली नखे कशी शिवशिवतात. पण रान ओसाड पडले आहे. मदोन्मत्त हत्ती कुठे दिगंती आहेत अशी ऐकीव बातमी. हरण, कोल्हे, लांडगे आहेत; पण ते आपल्या बरोबरीचे नाहीत. त्यांच्यावर काय हात टाकायचा ! आता मला प्रश्न पडला आहे, की माझ्या नखांची तीक्ष्णता अन् तीव्रता मी कुठे अन् कोणाला दाखवू !'

असा आहे या पंडितराजाचा ताठा.

त्याच्या भामिनीविलासातला प्रास्ताविक विलास जो माझ्यापुढे आहे, त्यात बहुतेक अन्योक्तीच आहेत. अन्योक्ती हा एक अर्थालंकार आहे. त्यात बोलणारा समोरच्या माणसाकडे तोंड करून बोलताना दिसतो; पण ते बोलणे असते तिसऱ्याच कोणाला तरी उद्देशून ! थोडक्यात म्हणजे ' लेकी बोले सुने लागे ' असा तो प्रकार आहे. शहाणा असेल तो जाणून घेतो, की हा फटका आपल्याला आहे ! या अन्योक्तीचा आश्रय करून पंडितराजाने समाजातल्या

अनेक लब्धप्रतिष्ठितांना चिमटे घेतले आहेत.

'उद्योगिनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मीः' असे सुभाषित आहे. पण ते सुभाषितच. उद्योगाचे कातळ फोडताना त्यातून संपत्तीचा झरा उचंबळेलच असे नाही. त्या बाबतीत 'दैवं फलति सर्वत्र' हाच न्याय खरा. दैवयोगाने एखाद्याला अशी धनदौलत लाभली, की मग त्याच्या माड्या–हवेल्या चढतात. वस्त्रालंकारांनी कपाटे, तिजोऱ्या भरतात. गाड्या–घोडी अंगणात उभी होतात. संसाराचा सारा नूरच पालटतो. पुष्कळदा स्वभावही बदलतो. गरीब, दुबळी माणसे मग आशेने त्याच्या दारी येतात. त्यांना वस्त्रालंकार नको असतात. त्यांना हवे असते गोळाभर अन्न! हवी असते चतकोर भाकरी! त्यांची भूक असते केवळ टीचभर खळगीची! पण तिथे त्यांना थारा मिळत नाही. त्यांच्या थाळींत काही पडत नाही. कुत्र्यासारखी त्यांना हड्हड् होते. पंडितराज हे दृश्य पाहतो. त्याला ते सहन होत नाही. त्याच्या काळजात कालवते. मग त्याच्या दृष्टीपुढे येतो तो अगाध सागर! मग त्या सागराला निमित्त करून तो एक अन्योक्ती उद्गारतो—

किं खलु रत्नैरेतैः किं पुनरभ्रायितेन वपुषा ते।
सलिलमपि यन्न तावकमर्णव वदनं प्रयाति तृषितानाम्॥

'हे सागरा, तुझ्या अपार जलसंचयातला एक बिंदूसुद्धा जर तहानलेल्या माणसाच्या सुकलेल्या ओठाला लागणार नसेल, तर तुझ्या पोटातल्या त्या रत्नांना घेऊन काय करायचे आहे! तुझा निळासावळा चकचकीत पृष्ठभाग दिसतो सुंदर! पण उपयोग काय त्या चकचकीतपणाचा!'

पण काही लोक 'इससे भी जादा' असतात. ते गरजवंताला स्वतः तर काही देणार नाहीतच अन् दुसरा कोणी दाता निघाला, तर त्यांच्या 'झारीतले शुक्राचार्य' होऊन बसतील. तोंडाशी आलेला एखाद्याचा घास काढून घेतील. धनाढ्य लोकच असे असतात असे नाही, तर त्यांना घेरून असणारे खल–दुर्जनही असले 'पुण्य कर्म' आचरीत असतात. 'गवाणीतले कुत्रे' हा वाक्प्रचार अशांनाच उद्देशून निर्माण झाला आहे. भर्तृहरीने माणसाच्या स्वभावभेदावरून त्यांच्या चार जाती ठरवल्या आहेत. त्यातली कारण नसताना एखाद्याचे अहित करणाऱ्या माणसांची जात ही शेवटची. तिला नाव काय द्यावे, हे भर्तृहरीला सुचत नाही. 'ते के न जानीमहे' म्हणून तो मोकळा होतो. पण

पंडितराज तेवढ्यावर त्यांना सोडायला तयार नाही. तो एक चपखल बसणारी अन्योक्ती लिहून अशा लोकांना चार शब्द सुनावतो --

**अहह चंड समीरण दारुणं किमिदमाचरितं चरितं त्वया ।**
**यदिह चातकचंचुपुटोदरे पतति वारि तदेव निवारितम् ॥**

ही अन्योक्ती प्रास्ताविक विलासात नाही; पण वरच्या अन्योक्तीच्या संदर्भात ती मला आठवली. तिचा भावार्थ असा—चातक नावाचा एक पक्षी असतो. त्याची चोच सदैव उघडी अन् आकाशाकडे लागलेली. वर्षाऋतूतला मुसळधार पाऊस पडून जातो; पण नियतीने त्या चातकाच्या वाट्याला नेमून दिलेला असतो तो स्वाती नक्षत्राचा एकच बिंदू. त्याकडे तो डोळे लावून असतो. ढग जमा होतात. आकाश काळे होऊन ओथंबते. आता जलधारा बरसणार यात शंका नसते; पण त्याच वेळी नेमका चंडप्रचंड झंझावात सुटतो. तो जणू हातांत शंभर खराटे घेऊन जमलेल्या मेघांना झाडून काढतो. त्यामुळे पाऊस उडतो. आकाश स्वच्छ होते. अन् चातकाची चिरंतन तृषा कायम राहते. मग पंडितराज त्या वादळीवाऱ्याला विचारतो, 'का रे बाबा ? पाऊस पडला असता अन् चातकाची चोच ओली झाली असती, तर त्यात तुझे काय दोन चव्वल खर्च झाले असते ? का हे तू नाहक निंद्य कर्म आचरलेस ?'

काही माणसे अचानक संपन्न होतात. कुठून तरी त्यांची भाग्यरेषा उमटते. मग काल रस्त्यात अनवाणी फिरणारा माणूस आज मोटारपदस्थ झालेला दिसतो. त्याला मग वाटू लागते, की आपण मोठे झालो. आता मोठ्यांसारखे वागले पाहिजे. तसा डामडौल केला पाहिजे. मोठ्यांच्या वर्तुळात मिसळले पाहिजे. आता वेगळ्या दृष्टीने पाहायचे, वेगळ्या शब्दांनी बोलायचे. आपले मोठेपण सगळ्या वर्तनातून लोकांच्या मनावर ठसवायचे. पण सगळीच माणसे त्याच्या या मोठेपणाला फसत नाहीत. खरा मोठा कोण ? तर ज्याच्या संसर्गाने, सहवासाने दुसरी माणसे वृत्तीने बदलतात, मनाने विशाल होतात, तो ! अशा मोठ्यांचे केवळ बाह्यात्कारी अनुकरण केल्याने काय होणार ! अजाण माणसे एक वेळ असल्या नकली मोठ्याला फसतील; पण पंडितराजाला कोण फसवू शकेल ? अशा एका घमेंडी 'मोठ्या' माणसासाठी पंडितराजाची अन्योक्ती तयार होती —

**न वारयामो भवतीं विशंतीं वर्षानदि स्रोतसि जन्हुजाया:।**
**न युक्तमेतत्तु पुरो यदस्यास्तरंगभंगान् प्रकटीकरोषि ॥**

'हे वर्षाऋतूत फुगलेल्या ओढ्या, तू आता धडपडत जाऊन गंगेला मिळशील, हे मला माहीत आहे. खुशाल मीळ. मी तुला हरकत घेत नाही. पण गंगाप्रवाहावर लहरी उठतात, तशा मी माझ्याही पृष्ठभागावर उमटवीन, अशी जी तुझी धडपड चालली आहे ती मात्र व्यर्थ आहे. अरे, गंगा ती गंगा, अन् ओढा तो ओढा. ( चंदनाच्या गावी बाभुळ जाऊन वाढली तरी तिचे काटेसुद्धा झडायचे नाहीत. मग सुगंध तर दूरच ! )

पंडितराजाच्या एकंदर स्फुट कवितेचा रोख समाजातल्या अहंमन्यांवर किंवा लब्धप्रतिष्ठितांवर दिसतो. ढोंगधत्तुऱ्यावर त्याच्या वाणीचे उपहासगर्भ फटके कसे सपासप बसतात. तो अनेक प्रदेश हिंडलेला होता, बारा गावचे पाणी प्यालेला होता. अनेक सुष्ट, दुष्ट, गर्विष्ठ त्याने जवळून पाहिलेले होते. बरे-वाईट अनेक प्रकारचे अनुभव त्याच्या जमेला होते. त्या अनुभवांचे पृथक्करण करून त्यातून सामाजिक आणि नैतिक निष्कर्ष काढण्याचे सामर्थ्य त्याच्या अंगी विलक्षण होते. दुर्जनांना तो कठोर होता हे जितके खरे; तितकाच सज्जनांच्या पुढे, रसिकांच्या पुढे तो विनम्र होता, हेही खरे आहे. सज्जनांची भलावण करताना त्याची वाणी प्रसन्न होते, मधुर होते. समदृष्टीच्या सज्जनांना, निरपेक्ष उपकारकर्त्यांना तो मेघाची उपमा देतो. रसिक खरा, पण अकिंचन असल्यामुळे तो कवीला किंवा गुणी माणसाला काही देऊ शकत नाही अशी स्थिती पाहिली, की पंडितराजच उलट त्याचे सांत्वन करतो. त्यासाठी कूपान्योक्ती लिहितो—

**नितरां नीचोऽस्मीति त्वं खेदं कूप मा कदापि कृथा:।**
**अत्यंतसरसहृदयो यत:परेषां गुणग्रहीतासि ॥**

'हे कूपा, 'मी अत्यंत नीच ( खोल ) आहे' म्हणून तू कधीही खेद करू नको. कारण तुझे हृदय अत्यंत सरस ( जलमय ) आहे. आणि त्यामुळेच तू दुसऱ्याचे गुण ( पोहऱ्याची दोरी ) ग्रहण करणारा आहेस.'

ψψψ

# वचनसाहित्य

'वचने किं दरिद्रता' असे एक सुभाषित आहे. पण सगळ्याच वचनांत श्रीमंतीचा आढळ होत नाही. किंबहुना श्रीमंत माणसे जशी अल्प, तशी 'श्रीमंत' वचनेही अल्पच असतात. पण भारतात असा एक प्रदेश आहे, की ज्यामधली सारगर्भ 'वचने' हिऱ्या-माणकांच्या मोलाने तोलावी. असा हा वचनसमृद्ध प्रदेश म्हणजे आपला शेजारी कर्नाटक. महाराष्ट्रात जशी अभंग-वाणीची खाण लागली, तशी कर्नाटकात वचनसाहित्याची. श्री. दिवाकर यांनी 'वचनशास्त्ररहस्य' नावाचा एक ग्रंथ लिहिला आहे. त्यात त्यांनी कन्नड वचनसाहित्याचा अंतर्बाह्य परिचय करून दिला आहे. प्रस्तुत लेखाला प्रामुख्याने आधार घेतला आहे तो त्या ग्रंथाचा.

महाराष्ट्रातल्या नामदेवापासून निळोबापर्यंतच्या बहुतेक संतांचे वाङ्मय हे जसे विठ्ठलभक्तिपर आहे, तसे कर्नाटकातले हे वचनसाहित्य मुख्यत्वे शिवभक्ति-पर आहे. वीरशैव संप्रदायाच्या कुशीतून ते जन्माला आले आहे.

या वीरशैव संतांना अनुभवी म्हणतात. अनुभवी म्हणजे साक्षात्कारी किंवा

अनुभव-सिद्ध. अनुभव ही त्यांनी ज्ञानाची कसोटी मानली आहे. वचने म्हणजे अशा साक्षात्कारी संतांच्या वाणीतून निघालेले खडे बोल. सिद्धान्त आणि साधना ह्या दोन्ही अंगांना ते स्पर्श करून जातात. ही वचने जशी उच्च आत्मस्थितीचा आविष्कार करतात, तशीच ती साधकाला मार्गदर्शनही करतात. कधी चुचकारतात, तर कधी फटकारतात.

वचन म्हणजे सामान्यपणे २० ते ३० शब्दांचे सुटसुटीत वाक्य. ते सूत्ररूप असते. पण पाणिनीच्या सूत्रांवर सिद्धान्तकौमुदी नावाची टीका लिहावी लागली किंवा ब्रह्मसूत्रांच्या स्पष्टीकरणासाठी अनेक आचार्यांना भाष्ये लिहावी लागली, तशा टीकाटिप्पणीची इथे गरज नाही. त्यातला आशय स्पष्ट आणि निःसंदिग्ध असतो. उदाहरणार्थ –

**ओडुवात लेकनल्ल, नडुवात भक्तनल्ल ।**

‘ जो प्रसंगी पळून जातो तो नोकर नव्हे. जो हात पसरतो, तो भक्त नव्हे.’

**आशयें दासत्व । निराशये ईशत्व ।**

‘ आशा म्हणजे गुलामगिरी. निराशा म्हणजे स्वामित्व. ’

**हसिविगे लयविल्ल, विषयक्के कालविल्ल।**

‘ भुकेला अंत नाही. विषयाला काळ वेळ नाही. ’

काही वचनकारांनी उपनिषदांचा, काहींनी शैवागमांचा, तर काहींनी पुराणांचा आधार क्वचित्प्रसंगी घेतला आहे. पण बहुतेकांचा भर आत्मानुभवावरच आहे. काही वचनकारांच्या वाणीतून असे काही विरोधालंकारात्मक बोल उमटतात, की लोकोक्ती किंवा वाक्प्रचार म्हणून ते देशभर सर्वतोमुखी व्हावे. उदाहरणार्थ—

‘ सापाची फणा पकडून कनवट खाजवू नको. ’

‘ जळत्या मशालीने केसांचा गुंता सोडविण्याचा प्रयत्न करशील, तर काय होईल ठाऊक आहे ना ? ’

‘ भुकेल्या पोटावर रोटीची मोटली बांधून ठेवली म्हणून भूक शमत नाही.’

‘ बर्फाच्या देवळावर उन्हाचा कळस चढवायला जाशील, तर देऊळच पिघळून जाईल. ’

महाराष्ट्रात ज्ञानेश्वरांनी गीतेवर टीका लिहून भागवतधर्माचा पाया घालताच त्यावर कवित्वाची इमारत उभारायला ब्राह्मण, साळी, माळी, सोनार, कुंभार, महार, चांभार असे अठरापगड जातीतले संत, कवी पुढे सरसावले. कर्नाटकातही तसेच झाले. शेकडो वचनकारांनी त्या प्रदेशात वीरशैव संप्रदाय परिपुष्ट केला. या वचनकारांच्या समूहात दासिमय्या हा पारधी होता. माचय्या हा धोबी होता. केतकय्या हा अंत्यज होता. अप्पण्ण हा न्हावी होता. चौडय्या हा नावाडी होता. बोम्मण्ण हा ढोल्या होता. कण्णप्प हा तेली होता. चन्नय्य हा डोंब होता. असे अनेक जातीजमातींचे कितीतरी. आजपर्यंत अशा दोनशे तेरा वचनकारांचा शोध लागला आहे. अधिक तपास केल्यास आणखीही सापडतील.

या सर्व वचनकारांनी मिळून १६० कोटी वचने लिहिली अशी बोलवा आहे. पण नामदेवांनी शतकोटी अभंग लिहिले, यासारखीच ती अफाट अतिशयोक्ति समजली पाहिजे.

सर्व वचनकारांत देवरदासिमय्या हा पहिला अन् सर्वज्ञ हा शेवटचा. पहिला दहाव्या शतकातला तर दुसरा सतराव्या शतकातला. यांच्यामधल्या काळात अल्लम प्रभू, बसवेश्वर, चेन्नबसव, अक्क महादेवी अन् सिद्धरामय्या या विभूती नावाजून गेल्या. या सर्वांनी मिळून वचनसाहित्याची प्रतिष्ठा शिगेला नेली.

या वीरशैव संतमालिकेतला मेरुमणी म्हणजे बसवेश्वर. तो केवळ शिवभक्तच नव्हता, तर नव्या धर्मक्रांतीचा नेताही होता. तो दुष्ट रूढींचा दुष्मन होता. तत्त्वज्ञानापेक्षा धर्माचरणावर त्याचा विशेष भर होता. वर्णाश्रमसंस्था ही जराजर्जर झाली आहे, बुरसटली आहे, असे तो मानी आणि म्हणूनच ‘ जुने जाउ द्या मरणालागुनि ’ अशा अभिनिवेशाने तो समाजाचे पुनर्घटन करायला निघाला. जातीपाती तोडायला निघाला. अंत्यजांना ब्राह्मणांच्या जवळ आणायला, वर्ण आणि वर्णबाह्य यांच्यातली भेदाची दरी मोडायला सिद्ध झाला. महार, मांग, धेड, चांडाळ यांच्या व्याख्याच त्याने बदलल्या. महारमांग गावाबाहेर नाहीत तर ते गावातच—समाजातच कसे आहेत ते त्याने दाखवून दिले. त्याचे एक वचन आहे —

‘ आई-बापाना शिवीगाळ करतो, तो अस्पृश्य. परोपकारात विघ्न आणतो, तो चांडाळ. धनासाठी दुसऱ्याचे प्राण घेतो, तो मांग. परस्त्रीची कामना धरतो,

तो वेड. कूडलसंगम देवा, असले हे अस्पृश्य जर गावात अन् गावभर राहत असतील, तर महार-मांगांना गावाबाहेर का ठेवायचे ?'

बसवेश्वराने अन्य अनेक देवतांचा निषेध करून एक शिव हे आपले परम उपास्य ठरवले. शिवाला सोडून अन्य देवाला भजणे हा व्यभिचार आहे असे सांगितले. शिवज्ञान अन् शिवानुभव यांच्यासाठी त्याने गुलबर्गा जिल्ह्यातल्या कल्याण गावी अनुभवमंडप नावाची एक संस्था उभारली. बसवयुगातली ती एक क्रांतिकारक धर्मसंस्था होती. या मंटपाच्या छायेखाली त्याने शेकडो शिवशरणांना एकत्र आणले. हे साधक पोटासाठी 'कायक' ( शरीरश्रम ) करीत अन् उरल्यावेळी साधनमार्ग आचरीत. बसवेश्वराने त्यांना तसा आदेशच दिला होता. त्यामुळे त्या शिवशरणात भीकमागी वृत्ती निर्माण झाली नाही.

अल्लमप्रभू हा त्या अनुभवमंडपाचा अध्यक्ष झाला. बसवेश्वरानेच त्याला तशी विनंती केली. अल्लम म्हणजे विरक्तीचा पुतळा. तो कोण, कुठला याचा पत्ता नाही. तो शैवसाधना करता करता सिद्ध झाला होता, शून्य अवस्थेला गेला होता. त्याची मोठी शिष्यशाखा होती. त्या सर्वांसह तो कल्याणला राहायला आला आणि तिथल्या साधकांचा ज्ञानदाता गुरू झाला. अल्लमाची वचने सुप्रसिद्ध आहेत. त्यावरून त्याची तीव्र बुद्धिमत्ता अन् विचाराची उंच झेप दिसून येते. त्याने शिष्यांना ज्ञानोपदेश करता करता अनेक ग्रंथही लिहिले.

तशीच ती महादेवी. रूपयौवनाची खाण. सामान्य नव्हे, तर एका राजाची राणी. ती लग्नाआधीपासून शिवशरण होती. तिने आपल्या नवरदेवाला अट घातली होती, की 'तुम्ही माझ्या शिवसाधनेत व्यत्यय आणता कामा नये.' राजाने तिच्या सौंदर्यावर भाळून प्रथम ती अट कबूल केली अन् लग्न झाल्यावर ती निःसंकोच मोडली. महादेवीला ते सहन झाले नाही. शिवसाधनेवाचून तिला जीवनच असह्य झाले. तिच्या अंगी धैर्य बळकट होते. तिने राज्या-सह पतीचा त्याग करून स्वतःला भवजंजाळातून मोकळे केले. ती तडक कल्याणला आली. तिने घोषित केले 'की माझा पति परम शिव कैलासनाथ !' त्या भावनेनेच ती शिवाशी एकरूप झाली. तिचे एक वचन आहे—

'हे परम शिवा, मी तुझ्यावर मुग्ध–लुब्ध आहे अन् तू माझ्यावर. मी तुझ्याशी अविभक्त आहे अन् तू माझ्याशी !'

महादेवी अनुभवमंडपात आली. सर्व शिवशरणांची ' अक्का ' बनली. सर्वांवर तिने मायेची पाखर घातली. सर्वांना सन्मार्ग दाखविला. तिची वचने संख्येने अल्प आहेत, पण ती तत्त्वार्थाला भिडणारी आहेत.

चेन्नबसव हा आणखी एक वचनकार. तो बसवेश्वराचा भाचा होता. मामाच्या धर्मक्रांतीत भाच्याने मनोभावे सहकार्य दिले. वीरशैव संप्रदायाला तत्त्वज्ञानाची बैठक मिळवून दिली, ती यानेच. तो शैवशास्त्रात पंडित होता. शिवशरण त्याला ' षट्स्थलचक्रवर्ती ' या उपाधीने गौरवितात. बसवेश्वर, अल्लमप्रभू अन् चेन्नबसव ही वीरशैवांची त्रिमूर्ती आहे. बसवेश्वर भक्तीसाठी, अल्लमप्रभू विरक्तीसाठी आणि चेन्नबसव ज्ञानासाठी प्रसिद्ध आहे.

असे हे धुरंधर अन् त्यांचे शेकडो अनुयायी. सगळे शिवशरण. त्यातले बहुतेक वचनकार. या सर्वांनी वचने निर्मून ती कन्नड जनतेच्या मनीमुखी रिगवली. त्यांनी शिवभक्ती तर वाढवलीच, शिवाय कन्नड भाषेला आविष्काराचे आगळे सामर्थ्य दिले. त्यांनी वर्ण, जाती, लिंग, हे भेद तुच्छ मानले. कोणी ब्राह्मण नाही, कोणी महार नाही, तर सारे समान, सारे बंधू. लिंगभेद, वर्णभेद, यांचे स्तोम माजवणाऱ्या रूढिपंडितांना ते रोखठोक सवाल विचारतात, ' काय हो ? ब्राह्मणाच्या आत्म्याच्या गळ्यात काय जानवे असते ? महाराच्या आत्म्याच्या हातात काय झाडू असतो ? स्त्रीच्या आत्म्याला काय स्तन असतात ? नाही ना ? मग कशाला माजवता हे भेदाचे खूळ ? '

जातिभेदाचा निषेध अनेक संतांनी अन् संप्रदायांनी केला आहे. पण त्यावर इतके निर्दय अन कठोर प्रहार वचनकारांइतके दुसऱ्या कोणीही केले नसतील.

वचनसाहित्य हे संप्रदायाच्या मुशीतून निघाले असले, तरी ते संप्रदायाच्या मर्यादा ओलांडून पलिकडे गेले आहे. त्याने विश्वमानवतेला स्पर्श केला आहे. वचनामधले नैतिक उपदेश हे केवळ सांप्रदायिकांसाठी नसून ते मानवमात्रासाठी आहेत. वचने ही ज्ञानाचे आगर अन् मोक्षाचे सागर आहेत. ती दिव्यत्वाला कवटाळणारी अमृतवाणी आहे. म्हणूनच संप्रदायाच्या धुरीणांनी आपल्या अनुयायांना स्पष्ट आदेश दिला आहे, की शुद्ध आचार अन् विचार यांच्या ज्ञानासाठी आणि स्वतःचे भ्रम-प्रमाद सुधारण्यासाठी वचनसाहित्याचे चिंतन–मनन करा !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर.
अनुक्रम 47328 वि. निबंध

# निदान; पण रोगाचे नव्हे

बौद्ध साहित्यात कथांचे भांडार भरून राहिले आहे. बौद्ध आचार्यांनी आपला धर्म सामान्य जनांच्या उरात रुजवला, तो कथांच्या साह्याने. त्यातल्या काही कथा त्यांनी स्वतःच्या कल्पनेतून तयार केल्या, तर काही मूळच्या लोककथांना बौद्ध वळण देऊन त्या धर्मसाहित्यात दाखल केल्या. अट्ठकथा, जातककथा, अवदानकथा अन् निदानकथा या नावांनी त्या प्रसिद्ध आहेत.

अट्ठकथा म्हणजे अर्थकथा. या पाली भाषेत आहेत. बौद्ध पिटकांवरचे भाष्य असे त्यांचे स्वरूप आहे. पिटकग्रंथांत मूळ पाठाची व्याख्या नीट आकलन व्हावी म्हणून तत्संबंधी एक कथा सांगितलेली असते. त्रिपिटकाच्या प्रत्येक ग्रंथावर अशा अट्ठकथा उपलब्ध आहेत. स्थविर महेंद्र अन् त्यांचे सांगाती जेव्हा धर्मप्रसारासाठी लंकेत गेले, तेव्हा ते सिंहली जनतेसाठी या अट्ठकथांचे उपायन घेऊन गेले. लंकेतल्या लोकांना या कथा सांगताना त्या सिंहली अनुवादात सांगाव्या लागल्या. पुढे असे झाले, की त्यांचे मूळचे पालीरूप लुप्त होऊन सिंहलीरूपच रूढ झाले. पुढे लंकेत बौद्ध धर्म तरारला;

पण भारतात त्याची पीछेहाट सुरू झाली. त्याला सावरून धरायचे, तर कथा हव्या होत्या. म्हणून मग बुद्धघोष हा आचार्य लंकेत गेला आणि त्याने त्या अट्ठकथांच्या सिंहली अनुवादाचा पुनश्च पालीत अनुवाद करून तो कथा-संभार भारतात आणला. त्यामुळे बुद्धघोषाची अट्ठकथाकार म्हणून ख्याती झाली. बुद्धघोषाबरोबरच बुद्धदत्त अन् धर्मपाल हे आचार्यही अट्ठकथाकार म्हणून गाजले.

अवदानकथा हा दुसरा प्रकार. अवदान म्हणजे धार्मिक, नैतिक किंवा परोपकारात्मक असे असाधारण कर्म. या सर्व कथा स्वतः बुद्धाने आपल्या शिष्य भिक्षूंना सांगितल्या आहेत. या कथा मुख्यत्त्वे कर्मवादाचा प्रचार करणाऱ्या आहेत. कृष्णकृत्यांचे फळ काळे अन् शुभ्र कृत्यांचे फळ शुभ्र मिळते, हा नीतिसिद्धान्त पटवून देणे हा या कथासाहित्याचा उद्देश आहे. या बुद्धनिरूपित कथा पाली साहित्यात अवदानशतक या नावाने प्रसिद्ध आहेत. त्यातल्या एका कथेचा नमुना असा—

एक होती मुलगी. ती अगदी गरीब होती. ती एकदा बुद्धाच्या दर्शनाला आली. तिने आपल्याबरोबर थोडे चंदन उगाळून आणले होते. त्या चंदनाची तिने बुद्धाच्या चरणांना उटी लावली. त्यामुळे त्या जागीच नव्हे; तर सर्व शहरभर चंदनाचा सुवास दरवळला. त्यामुळे बुद्ध तिच्यावर प्रसन्न झाला. तिने बुद्धाकडे मागितले, की ' मी पुढील जन्मी प्रत्येकबुद्ध व्हावे. ' बुद्ध तिला स्मितपूर्वक म्हणाला, ' तू एके दिवशी गंधमादन नामक प्रत्येकबुद्ध होशील. '

जातककथा हा खुद्दकनिकाय या ग्रंथाचा दहावा भाग आहे. बुद्धाच्या पूर्वजन्मविषयक कथा त्या जातककथा होत. बुद्धाने बोधी प्राप्त करून बुद्धत्व मिळविण्यापूर्वी अनेक जन्म घेतलेले असतात. त्या अवस्थेत तो बोधिसत्त्व म्हणजे ज्ञान मिळवण्यासाठी प्रयत्नशील असतो. तो बुद्धत्वाचा साधक असतो. त्याला अनेक योनींत अनेक जन्म घ्यावे लागतात. त्या प्रत्येक जन्मात तो पारमितांचा अभ्यास करतो, भूतदया बाळगतो अन् एखादेवेळी दुसऱ्याला संकटमुक्त करण्यासाठी आत्मबलिदानही करतो. आणि अशा त्याच्या त्या सत्कर्मांचे फल म्हणून अखेरीस त्याला बुद्ध होण्याची योग्यता प्राप्त होते. या जातककथा ५५० च्या वर आहेत. काही जातककथांत बोधिसत्त्व हा नायक असतो, काहीत तो दुय्यम पात्र असतो, तर काहीत तो घडणाऱ्या घटनेचा

केवळ प्रेक्षक असतो. त्यांपैकी एक कथा अशी—

एक होता नावाडी. तो फार लोभी होता. एकदा बोधिसत्त्व त्याच्या नावेतून नदीपार झाला. नावाड्याला देण्यासाठी त्याच्याजवळ पैसे नव्हते. म्हणून त्याने त्या नावाड्याला नीतितत्त्वांचाच उपदेश केला; पण तो नावाड्याला रुचला नाही. त्याने बोधिसत्त्वाला झोडपायला सुरुवात केली. एवढ्यात नावाड्याची गर्भवती पत्नी तिथे आली. तिला बोधिसत्त्वाची दया आली. तिने त्याला न मारण्याविषयी नवऱ्याला विनवले; पण नावाड्याचा आता विवेक सुटला होता. बोधिसत्त्वाला बेदम मारल्यावर त्याने त्याच काठीने आपल्या पत्नीलाही झोडपले. त्या माराने ती बेशुद्ध पडली अन् तिथल्या तिथे मरण पावली.

निदानकथा या जातककथांचा उपोद्घात या स्वरूपात येतात. निदान म्हणजे मूळ कारण. गौतमाला बोधी प्राप्त होऊन बुद्धत्व मिळवण्यामागे काहीतरी कारण असलेच पाहिजे. ते कारण म्हणजे त्याने बोधिसत्त्व अवस्थेत केलेला दहा पारमितांचा अभ्यास हे होय. पारमिता म्हणजे साधनेची पूर्णता. बौद्धांनी ज्या दहा पारमिता मानल्या आहेत, त्यांची नावे अशी—दान, शील, नैष्कर्म्य, प्रज्ञा, वीर्य, क्षांती, सत्य, अधिष्ठान, मैत्री अन् उपेक्षा. या सर्व पारमितांची साधना बोधिसत्त्वअवस्थेत करायची असते. त्यानंतर बुद्धत्व मिळते.

निदानकथेत गौतम बुद्धाच्या पूर्वजन्मातल्या पारमितासाधनेचा कथाभाग वर्णित आहे, तसेच गौतम जन्माला आल्यानंतर त्याला बुद्धत्व कसे मिळाले, त्याचाही कथाभाग त्यात सांगितलेला आहे. बुद्धाने अनाथपिंडक नावाच्या एका श्रीमंत व्यापाऱ्याकडून जेतवनाचे दान घेतले, इथपर्यंतचे बुद्धचरित्र कथन करून निदानकथा विराम पावली आहे. दूरे निदान, अविदूरे निदान आणि संतिके निदान अशी त्या कथांची त्रिधा विभागणी आहे. त्यातली एकच कथा मी सांगणार आहे, ती बुद्धाच्या पूर्वजन्माची—

फार फार पूर्वकाली गौतमबुद्ध हा अमरावती नगरीत एका ब्राह्मण कुलात जन्माला आला होता. आई-बापांनी त्याचे नाव सुमेध असे ठेवले. दुर्दैवाची गोष्ट अशी, की सुमेध लहान असतानाच त्याचे आई-बाप इहलोक सोडून गेले. सुमेध पोरका झाला. पण तो लहानपणापासूनच शहाणा अन् विवेकी होता. त्याने विचार केला, की जीवन हे असेच क्षणभंगुर आहे. केव्हा

बुडबुडा फुटेल त्याचा नेम नाही. तेव्हा ' जन्मा आलियाचे ' काही सार्थक करणे हे चांगले. हा विचार येताच त्याने लगेच संन्यास घेतला. संन्याशाला परिग्रह म्हणजे अपथ्य. म्हणून त्याने वडिलार्जित संपत्ती होती, ती सारी दान देऊन टाकली. अशा प्रकारे अकिंचन बनून त्याने घर सोडले. तो सरळ हिमालयाच्या दिशेने चालू लागला. तिथल्या धम्मेख नामक एका शिखरावर चढून तो थांबला. ती जागा त्याला आवडली. त्याने तिथे एक पर्णकुटी उभी केली. तिच्यात बसून ध्यानचिंतनाच्या द्वारे तो भवभयातून मुक्त होण्याचा मार्ग शोधू लागला. जगात दुःख असते, त्याप्रमाणेच त्याला विरोधी असे सुखही असते. उष्ण असते, त्याप्रमाणे त्याचा उपशम करणारे शीतही असते. मग जर जन्म आहे, तर त्याचा प्रतिपक्षी मोक्षही का असू नये ? असलाच पाहिजे. आपण तोच मार्ग शोधून काढला पाहिजे, असे त्याने ठरवले. त्याच्या जोडीला तपश्चर्याही होतीच. त्या तपश्चर्येने त्याला आकाशसंचाराची सिद्धी लाभली. मग तो गगनमार्गाने हिंडून लोकस्थिती पाहू लागला.

अशा स्थितीत फिरत असता एक दिवस त्याला दिसले, की खाली एक नगर आहे अन् तिथे काहीतरी गडबड, धावपळ सुरू आहे. काय आहे ते पाहावे म्हणून तो खाली उतरला. त्या नगरातल्या लोकांना आज महापर्वणी आली होती. सगळे नागरिक खडबडून उठले होते, कामाला लागले होते. कोणी रस्ते झाडीत होते, कोणी सडासंमार्जन करीत होते, कोणी पताका-तोरणे लावीत होते, कोणी सुगंधी फुले अन् ताज्या लाह्या यांचा गालिचा पसरीत होते, कोणी दरवाजात केळींचे खुंट उभारीत होते, तर कोणी भरलेले घडे दरवाज्याच्या दोही अंगी स्थापीत होते. आबालवृद्धांच्या उत्साहाला पौर्णिमेचे उधाण आले होते. सर्वांच्या मुखावर आनंदाच्या लहरी नाचत होत्या.

सुमेध तापसाने ते सारे पाहिले अन् जवळच्या एका माणसाला विचारले. " ही शहरसजावट, ही घरादारांची शोभा कशासाठी ? कसला उत्सव आहे आज ? "

तो माणूस म्हणाला. " सगळ्या शहराला माहीत आहे अन् तुम्हांला ठाऊक नाही ? अहो, आज दीपंकर बुद्ध या नगरीत येणार आहेत. त्यांचे दर्शन आणि उपदेशश्रवण या नगरीला घडणार आहे. अति दुर्लभ सुयोग ! "

आणि एवढ्यात भेरी दुंदुभी वाजू लागल्या. पाठोपाठ दीपंकर बुद्धाची

तेजागळी प्रसन्न मूर्ती चालत येतांना दिसली. दीपंकाराच्या मागून त्याचा शिष्यपरिवार चालत होता. दीपंकराने नगरप्रवेश करताच सर्व लोक ‘ नमो बुद्धाय ’ असा उद्घोष करीत पुढे धावले. आकाशातून देवांनी त्यांच्यावर कल्पवृक्षाच्या फुलांची वृष्टी सुरू केली.

सुमेध तापसाने हे पुण्यपावन दृश्य पाहिले. दीपंकराची श्रीमूर्त न्याहाळली. त्या दर्शनाने सुमेधाचे सर्वांग पुलकित झाले. डोळ्यातून आनंदाच्या झरी वाहू लागल्या. अचानक एक कल्पना सुमेधाच्या मनात स्फुरली. तो आपल्या जटा खोलून त्या गर्दीतून पुढे घुसला अन् दीपंकराच्या मार्गात सपशेल आडवा झाला. त्याने इच्छा केली, की दीपंकर बुद्धाची पावले आपल्या देहावर पदमुद्रा उमटवून पुढे जावी. त्याची ती इच्छा सफल झाली. मग तो उठला. दीपंकराच्या पुढे नतमस्तक होऊन उभा राहिला. दीपंकराने त्याच्याकडे कृपाळू दृष्टीने पाहिले. त्याला भविष्य दिसले. तो जमलेल्या लोकांना उद्देशून मेघगंभीर वाणीने बोलला.

“ लोकहो ! या जटिल तापसाकडे पाहा. हा बुद्धबीज आहे. हा बुद्धांकुर आहे. भावी काळात हा बुद्ध होणार आहे. ”

लगेच सर्व लोकांनी सुमेधाचा जयजयकार केला. त्याला प्रदक्षिणा घालून नमस्कार केला. त्याच क्षणी सुमेधाच्या समोर दहा पारमिता मूर्तिमती होऊन प्रकट झाल्या. त्यांना पाहून सुमेध म्हणाला.

“ मला दीपंकर बुद्धाचा आशीर्वाद लाभला आहे. मी या पारमिता आत्मसात् करीन. भावी काळात बुद्ध होईन आणि भवतापतप्त जीवांना आत्यंतिक सुखाचा मार्ग दाखवीन ! ”

# ग्रंथ एक, पण कर्ते तीन

ही घटना एका प्रचंड ग्रंथाच्या बाबतीत घडली आहे. या ग्रंथाचे नाव महाभारत. त्याचा पहिला कर्ता व्यासमहर्षी. त्याने तो ग्रंथ हिमालयातल्या बद्रिकाश्रमात बसून लिहिला. 'ततो जयमुदीरये' हा त्याच्या पहिल्या नमन श्लोकाचा शेवटचा चरण. त्यावरून त्या ग्रंथाचे मूळ नाव 'जय' असावे अशी विद्वानांची समजूत आहे. महाभारताची पर्वे अठरा. ही संख्या 'जय' या शब्दावरून सूचित होते. ज = आठ अन् य = एक. हे वर्णमालेला दिलेले सांकेतिक अंक होत.

'अंकानां वामतो गतिः' हा संख्याशास्त्रातला एक नियम आहे. तदनुसार 'एकं'च्या जागी आठ घ्यायचा अन् 'दहं'च्या जागी एक घ्यायचा. म्हणजे ती संख्या होते अठरा. तेव्हा व्यासांनी जय शब्द घेतला तो अठरा पर्व भारतासाठीच घेतला असावा असे दिसते. हे मूळचे भारत सुमारे दहा हजार श्लोकांचे असावे, असे डॉ. बेलवलकर सांगतात. हा जय ग्रंथ भर घालून वाढविला तो व्यासशिष्य वैशंपायन याने. या घटनेचे स्थळ हस्तिनापूर.

'मला माझ्या पूर्वजांचा इतिहास सांगा,' असे जनमेजयाने विनविल्यावरून वैशंपायनाने कौरव-पांडवांची ती कथा विस्ताराने त्याला सांगितली. त्या विस्तारात ग्रंथाची श्लोकसंख्या पंचवीस हजारांपर्यंत गेली. वैशंपायनाने त्या ग्रंथाचे जय हे नाव बदलून भारत असे त्याचे नामकरण केले.

भारताचे 'महाभारत' घडवले ते सौती नावाच्या एका सूतपुत्राने. त्याचे कर्तृत्व अचाट खरे! कारण त्याने अनेक आख्याने, उपाख्याने, संवाद, चर्चा अशी भर घालून आपल्या महाभारताची श्लोकसंख्या पंचवीस हजारांवरून एका लाखावर नेली. 'भारतं पंचमो वेदः' असा गौरव त्या ग्रंथाला प्राप्त झाला, तो सौतीच्या या महाप्रयत्नाने. नैमिषारण्यात ही घटना घडली. तिथे शौनकादी ऋषी सत्र आरंभून बसले असता, त्यांच्याच विनंतीवरून सौतीने हा कथाप्रपंच केला.

अशाचसारखी, म्हणजे ग्रंथ एक, पण कर्ते तीन, अशी घटना तेलुगू महाभारताच्या बाबतीतही घडली आहे. सर्व भारतीय भाषांतून महाभारताचे अनुवाद झाले आहेत. काही संक्षिप्त, तर काही विस्तृत. काही मुळाला धरून, तर काही त्यात आत्मकल्पनेची भर घालून. त्यामुळे प्रत्येक भाषेतल्या महाभारताला एक वेगळी रुची आली आहे, एक वेगळा स्वाद चढला आहे.

तेलुगू महाभारताचा हा उपक्रम झाला, तो इ. स. च्या ११ व्या शतकात. त्या काळात राजराज हा चालुक्यनरेश वेंगीदेशावर म्हणजे आंध्रावर राज्य करीत होता. त्याचे प्रजेच्या पोटापाण्याकडे लक्ष होते, तसे तिच्या धार्मिक-सांस्कृतिक जीवनाकडेही होते. लोकस्थिती पाहत असता त्याला आढळून आले, की राज्यातले लोक विकृत धर्मकल्पनांच्या आहारी गेले आहेत. वैदिक धर्माची श्रेष्ठ तत्त्वे ते विसरत चालले आहेत. नैतिक मूल्यांनाही पारखे झाले आहेत. त्यामुळे प्रजेला सन्मार्गावर आणण्यासाठी काय बरे उपाय करावा, ही चिंता त्याला अहर्निश जाचू लागली.

आजच्या राज्यसंस्थेला असले विचार कधी सुचणार नाहीत, असली चिंता कधी त्रस्त करणार नाही, कारण आजच्या राज्यघटनेत धर्म हे जीवन-मूल्यच मानलेले नाही. धर्म ही केवळ वैयक्तिक बाब! कृताकृत म्हणजे आचरली तरी वाहवा न आचरली तरी वाहवा! पण वेंगी नरेशाला मात्र त्या गोष्टीने अस्वस्थ केले.

स्वतःला उपाय सुचेना, तेव्हा त्याने तो त्याचा दरबारी पंडित नन्नय्यभट्ट याला विचारला. त्यावर नन्नय्यभट्ट म्हणाला.

" महाभारताचा तेलुगूत अनुवाद करावा. लोकांची धर्मग्लानी दूर करण्याच्या कामी अन् त्यांना खऱ्या धर्माचे ज्ञान देण्याच्या कामी तोच ग्रंथ समर्थ आहे. "

सौतीच्या त्या विशाल महाभारताचा उद्देशही धर्मग्लानी दूर करणे हाच होता.

जैन व बौद्ध धर्मांच्या प्रचारामुळे आर्यांची बुद्धी सनातनधर्मापासून भरकटू लागलेली पाहून सौतीने वैदिक धर्माचे श्रेष्ठत्व आर्यांच्या मनावर ठसविण्याकरिता एवढे गाढ परिश्रम केले होते.

नन्नय्यभट्टाचे वरील उत्तर राजाने मान्य केले. पण ती गोष्ट करायला माणूसही तसाच समर्थ हवा हे जाणून राजा त्याला म्हणाला.

" तर मग मग तुम्हीच तो अनुवाद करा. "

" त्या कामी एक अडचण आहे. सांप्रतच्या तेलुगू भाषेला महाभारताचा अनुवाद पेलणार नाही. अजून तिचे व्याकरणही निर्माण झालेले नाही. "

" मग तेही तुम्हीच करा. काही झाले तरी महाभारत तेलुगूत आलेच पाहिजे. "

नन्नय्यभट्टाने ती राजाज्ञा मानली. तो खंदा पंडित त्या कामी साऱ्या शक्तीनिशी सरसावला. त्याने प्रथम तेलुगूचा शब्दकोश तयार केला, मग व्याकरण लिहिले अन् त्यानंतर महाभारताच्या अनुवादाला प्रारंभ केला. तो केवळ अनुवादकच राहिला नाही. त्याने मूळ ग्रंथांतली अनेक ठिकाणची नीरसता दूर केली अन् अनेक नवे सौंदर्यपूर्ण प्रसंग निर्माण करून ते अनुवादात घातले.

प्रादेशिक अभिमान ही काही आजकालची गोष्ट नाही. तो अभिमान हजार वर्षांपूर्वीही होता अन् नन्नय्यभट्टाच्या हृदयातही होता. मूळ महाभारतात अर्जुनाची आसेतुहिमाचल तीर्थयात्रा वर्णिली आहे; पण नन्नय्यभट्टाने पाहिले, की या यात्रेत अर्जुन वेंगी देशाला काही आला नाही. त्याला ते खटकले. मग त्याने आपल्या अनुवादात अर्जुनाला त्या देशातल्या यात्रा करायला लावून यासाचे ' न्यून ते पुरते ' केले.

पण दुर्दैवाची गोष्ट अशी, की आदी, सभा अन् वनपर्व अर्धे एवढा भाग पुरा झाला अन् नन्नय्यभट्टाला काळाने ओढून नेले. ग्रंथ अपुरा राहिला. पुढे दोनशे वर्षे तो तसाच होता. त्यानंतर तेराव्या शतकाच्या अखेरीस त्याला पुनश्च ऊर्जितकाळ आला.

त्या काळात मनुमसिद्धी हा राजा नेल्लोर येथे राज्य करीत होता. त्याच्या पदरी एक अष्टपैलू गृहस्थ होता. त्याचे नाव होते तिक्कन्न. तो विद्वान ब्राह्मण होता अन् त्यातही विशेष म्हणजे त्याने अग्निहोत्र बाळगून सोमयाग केला होता. त्यामुळे त्याला लोक तिक्कन्न सोमयाजीच म्हणत. बुद्धिमान आणि कर्तृत्वशाली असल्यामुळे राजाने त्याला आपले मंत्रिपद दिले होते. लढाईचा प्रसंग आला, तर सेनापतीही तोच बने. त्याचे पांडित्यही प्रखर होते. एकदा भरल्या राजसभेत एका जैन पंडिताशी शास्त्रार्थ करून त्याने त्याचा पराभव केला होता.

पुढे एका प्रसंगी राजाची अन् तिक्कन्नाची तेलुगू महाभारताबद्दल चर्चा झाली. त्या ग्रंथाचे अपुरेपण त्या दोघांच्याही मनात सलत होते. राजा त्याला म्हणाला.

" तुम्ही इतके दिवस राज्याचे मंत्रिपद भूषवलेत. आता महाभारत पुरे करून राजकवीही तुम्हीच व्हा. "

तिक्कन्नाने तीही कामगिरी पत्करली. महाभारताचे वनपर्व हे अपेशी असल्याचा पंडितसंकेत आहे. त्या पर्वाचा अनुवाद चालू असतानाच नन्नय्यभट्टाचा मृत्यू ओढवला होता. तो संकेत तिक्कन्नाच्याही मनात कळमळत होताच ! तेव्हा विषाची परीक्षा न पाहणे बरे, असा विचार करून त्याने विराटपर्वापासून अनुवादाला सुरुवात केली. यथाकाल शेवटच्या पर्वापर्यंत मजल मारून त्याने तो ग्रंथ पुरा केला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्याचा अनुवाद नन्नय्यभट्टाच्या अनुवादाहूनही सरस उतरला. त्या ग्रंथकर्तृत्वाने तिक्कन्नाची प्रतिभा सर्वत्र विद्युल्लतेसारखी चमकली. भीष्माची निष्कपट वृत्ती, द्रोणाचार्यांचे पांडवांवरचे प्रेम, कर्णाची राजभक्ती, शकुनीची कपटविद्या, अर्जुनाचा सव्यसाची पराक्रम, अभिमन्यूचे ' मुहूर्तं ज्वलितं तेज ' या गोष्टीचे तिक्कन्नाने घडविलेले दर्शन आजही रसिकांना मंत्रमुग्ध करून टाकते. त्यावेळचे लोक तर म्हणत, की ' तिक्कन्नाने मंत्रशक्तीच्या बलावर महाभारतातल्या घटना प्रत्यक्ष पाहिल्या

असल्या पाहिजेत. ' राजधर्म हा महत्त्वाचा अन् सर्वश्रेष्ठ धर्म असून तो नीट चालला तर आणि राजा सन्मार्गावर दमदारपणे उभा ठाकला, तरच इतर धर्म व्यवस्थित चालतात असे त्याचे ठाम मत होते. तो शांतिपर्वातला एक प्रसंग साधून जणू आपल्या राजाला उपदेश करतो.

" हे राजा, लोक आणि लोकधर्म हे राजाच्या वर्तनावर अन् सामर्थ्यावर अवलंबून असतात. राजाने दुर्बळ राहता कामा नये. तो दुबळा आणि असमर्थ ठरला, तर प्रजेची स्थिती कशी होते सांगू ? आटलेल्या सरोवरातल्या माशां-सारखी ! "

तेलुगू पंडितांनी तिक्कन्नाचे महाभारत शिरोधार्य मानले. रसिकांनी ते आपल्या जिव्हाग्री नाचवले. राजा म्हणाला, ' तेलुगू भाषा आज समृद्ध झाली, कृतार्थ झाली. '

अशा रीतीने तो विशाल ग्रंथ पुरा झाला खरा; पण अजून त्यात एक फट राहिली होती. अर्धे वनपर्व अजून तसेच होते. आंध्रात पंडित होते, कवीही होते; पण कोणी त्याला हात लावायला धजेना. पण १४ व्या शतकात यर्राप्रगड या कवीने सांकेतिक मृत्युभय खुंटीला टांगून ते साहस केले. मात्र पद्यरूपात त्याचा अनुवाद न करता त्याने तो प्रबंधरूपात केला. त्याच्या या कविकृतीने आंध्र महाभारत साग्रसंपूर्ण झाले आणि यर्राप्रगड हा ' प्रबंध परमेश्वर ' ठरला.

ψ ψ ψ

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलमत.
अनुक्रम ७१३२४ वि: निबंध
क्रमांक ९५८४ नों: दि: ११.१.३।८०

# दख्खनचा बिरबल

तेन्नाली रामन् नावाची एक अजब व्यक्ती किंवा वल्ली आंध्रप्रदेश गाजवून गेली. या गृहस्थाला विजयनगराच्या कृष्णदेवरायाचा आश्रय होता. त्यावरून याचा काल पंधराव्या शतकाच्या अखेरीचा ठरतो. हा पढिक पंडित होता; त्याहूनही अधिक चतुर अन् चक्रम होता. उत्तरेला जे स्थान बिरबलाचे तेच दक्षिणेत रामनचे. बिरबल-बादशहाच्या कित्येक कथा ग्रंथनिविष्ट झाल्या आहेत अन् अजूनही कित्येक लोकसमाजात वावरत असतील. तेन्नाली रामन्च्या बाबतीतही तसेच म्हणावे लागेल. आंध्रातल्या जनतेचा तो लाडका पुरुष आहे. त्याच्या कथा सांगता–ऐकता लोकांच्या मनाची धणी पुरते. आंध्रातल्या ‘ रसालु ’ आंब्याची गोडी जशी अवीट, तशीच रामनच्या कथांची ! रायल् अर्थात कृष्णदेवराव अन् रामन् ही जोडी त्या कथातून मिरवते. कथात्मक घटनांचे कर्तृत्व मात्र रामन्कडेच असते. त्या सगळ्याच कथा साक्षात् घडल्या आहेत, असे समजायचे कारण नाही. रामन् हा एकदा चतुर अन् चाणाक्ष ठरल्यानंतर अनेक गोष्टीवेल्हाळांनी आपल्या कल्पनांची कलमे राम-

नच्या फांदीवर बांधली असतील हेही बरेचसे शक्य आहे.

तो तेन्नाली गावचा रहिवासी असल्यामुळे दक्षिणेतील रिवाजाप्रमाणे त्याच्या नावाआधी गावाचे नाव लागले आहे. तो रामय्या नामक एका कौंडिण्यगोत्री ब्राह्मणाचा मुलगा. कारटे जन्मापासूनच व्रात्य अन् विचक्षण. वयाच्या बाराव्या वर्षीच तो कविता रचू लागला. पण या कवीला पदवी मिळाली ती मात्र ' विकट कवी ! ' ती कोणी माणसाने दिलेली नव्हे, तर कालीमातेने ती त्याला बहाल केली आहे.

एका संन्याशाने त्याला गुरुमंत्र देऊन विद्याप्राप्तीसाठी कालीची आराधना करायला सांगितले. त्याने त्याला दुसराही एक कानमंत्र दिला होता. " हे पाहा, देवी तुला दर्शन देईल, पण ती अक्राळविक्राळ स्वरूपात; पण तू न घाबरता तिचे पाय धर. "

रामन्‌ने अनुष्ठान सुरू केल्यावर एका मध्यरात्री कालीने त्याला गुरूने सांगितल्याप्रमाणेच उग्रचंड दर्शन दिले. देवीला हात होते दोनच; पण मुखे होती एक सहस्र. पण रामन त्या करालमुखीला मुळीच भ्याला नाही. तो प्रथम टक लावून बघत राहिला अन् मग खो खो हसत सुटला. देवी मनात म्हणाली, ' विलक्षणच दिसतेय कारटं ! ' तिने त्याला विचारले.

" एवढं हसायला काय झालं ? "

" हसू नको तर काय करू ? अगे महामाये, माझ्या दोन हातानी मला माझं एकुलत एक नाक साफ करणं कठीण जातं. तुझ्या हजार तोंडावर हजार नाकं अन् हात मात्र दोनच. सर्दी पडस झालं म्हणजे तुझं कसं होत असेल, या कल्पनेनं मला हसू आलं. "

त्याची कल्पना अफाट होती. त्यामुळे देवीलाही हसू फुटल्यावाचून राहिले नाही. ती त्याला म्हणाली.

" तू विकट कवि आहेस. "

" मला आवडली ही पदवी. "

" का रे ? "

" कारण तिची अक्षरे उलटी वाचली तरी शब्द तोच राहतो. "

म्हणजे त्यातही त्याचे डोके चाललेच. मग देवीने त्यावर अनुग्रह करायचे ठरवले. ती त्याला बोलली.

" तू विद्वान होशील. पण तुझा हा विदुषकी स्वभाव मात्र जाणार नाही. अस्तु ! तू आता विजयनगरच्या कृष्णदेवरायाकडे जा. तिथे तुझा ऊर्जित काळ येईल."

कालीने आदेश दिला खरा; पण विजयनगरच्या दरबारात प्रवेश मिळविणे ही गोष्ट सोपी नव्हती. कोण्या मातबर माणसाची कास धरूनच तिथवर पोचायला हवे होते. पण एवढ्यात त्याला समजले, की विजयनगरच्या सम्राटाचा राजगुरु ताताचार्य हा काही दिवसांच्या क्षेत्रवासासाठी जवळच्या मंगलगिरीवर आला आहे. त्याच्या वशिल्याने आपले काम साधावे म्हणून रामन् मंगलगिरीवर चढला अन् त्याच्या सेवेला राहिला.

ताताचार्य हा मोठा धूर्त माणूस होता. दुसऱ्याला नादी लावून आपली पूजा कशी बांधून घ्यावी, या कलेत तो प्रवीण होता. त्याची 'बोलाची कढी' सदैव उकळत असे. तोच प्रयोग त्याने रामन्‌वरही केला अन् त्याला कित्येक दिवस आपल्या सेवेत राबवून घेतले. 'घरी गेल्यावर तुला लगेच सम्राटाकडून निमंत्रण पाठवतो,' अशी रामन्‌ला भूलथाप देऊन तो परत गेला. रामन् आपला पाहतोय वाट ! कित्येक महिने असे प्रतीक्षेत गेले. मग लोक लागले त्याची चेष्टा करायला. ते सारे तेन्नाली रामन्‌ला असह्य झाले अन् तो एके दिवशी पहाटेला कोणाच्या नकळत विजयनगरचा पांथस्थ झाला.

विजयनगरला पोचल्यावर प्रथम त्याने ताताचार्यांचे दर्शन घेतले. पण तो लबाड माणूस त्याला म्हणाला, की 'तुला मी ओळखीत नाही. राजदरबारात प्रवेश मिळवणे म्हणजे काय सहस्रभोजनात जेवायला जाणे वाटले की काय तुला ? चालता हो इथून.'

रामन् मुखभंग होऊन तिथून परतला. मग त्याने स्वत:च्या अक्कलहुशारीवर पुढे जायचे ठरवले. तो रोज राजमार्गाच्या चव्हाट्यावर उभा राहून नकला करू लागला. लोक त्याच्याभोवती गोळा होऊ लागले. त्याची विनोदी बोलणी ऐकताना हसून हसून त्यांच्या पोटात गोळे उठू लागले. त्याला लोकांकडून थोडेबहुत पैसेही मिळू लागले.

काही दिवसांनी ही वार्ता कृष्णदेवरायाच्या कानी पोचली. त्यालाही एखादा खुषमस्कऱ्या हवाच होता. त्याने रामन्‌ला बोलावणे धाडले. ताताचार्यांच्या वशिल्यावाचून रामन् दरबारात प्रविष्ट झाला. पहिल्याच भेटीत त्याने सम्राटाला

अन् त्याच्या प्रभावळीला आपल्या बोलांनी चकित केले. सम्राट त्याला म्हणाला, 'तू उद्याही ये.' दुसऱ्या दिवशीही तो हजर झाला. मग रोज जाऊ लागला. कृष्णदेवरायाला त्याच्यावाचून करमेनासे झाले. शेवटी त्याने रामनला दरबारचा आश्रितच करून टाकले. ताताचार्य हे सगळे उघड्या डोळ्यांनी पाहत होता. दात-ओठ चावत होता; पण राजाचीच मर्जी बसली, तिथे दुसरा कोण विपरीत करणार ?

तेन्नाली रामनला आता कशाची चिंता नव्हती; पण राजगुरु त्याच्या जिव्हारी सलत होता. त्याची एकदा फट्फजिती केल्याशिवाय त्याचा जळता जीव शांत होणार नव्हता. ती संधी त्याने लवकरच साधली.

कोणती तरी पर्वणी होती. म्हणून ताताचार्य भल्या पहाटे तुंगभद्रेच्या स्नानाला चालला होता. नदीचा घाट अजून निर्मनुष्य होता. फक्त त्याचा मागोवा घेतला होता, तो रामनने. ताताचार्याला विवस्त्र स्नान करायची सवय आहे, हे रामनला पूर्वीच्या सहवासात ठाऊक झाले होते. याही वेळी त्याने तेच केले आणि तो तसा नदीच्या पात्रात उतरताच रामन्ने त्याची वस्त्रे पळवली. स्नान उरकून काठावर येतो तर वस्त्रहरण झालेले. रामन् तेवढा थोड्या अंतरावर दात घाशीत उभा.

हळूहळू दिशा फाकत होत्या. आता नदीवर जनरहाटी सुरू होणार होती अन् राजगुरूचा तो 'बं भोला नाथ'...त्याने परत पात्रात जाऊन आपले अर्धे अंग बुडवून घेतले अन् तिथूनच रामनला हाक मारली.

"अरे माझं धोतर ! माझी शाल..."

रामन् थोडा जवळ आला अन् म्हणाला. "मी काय तुमचा वस्त्ररक्षक आहे ?"

"असं नको रे करू ! मी तुझ्याशी वाईट वागलो हे खरं, पण एकवार मला क्षमा कर. मी तुझी सगळी भरपाई करीन"

"मला खांद्यावर घेऊन घरी पोचवशील ?"

"अलबत ! पण माझी वस्त्रं आधी आण. लोक यायला लागले बघ नदीकडे."

रामनने त्याची वस्त्रे आणून पुढे ठेवली. ताताचार्य सवस्त्र झाला. मग खाली वाकला. रामन् उडी मारून त्याच्या खांद्यावर बसला. ताताचार्य

ते ओझे वागवीत नगरात पोचला. नगरजनांनी ते दृश्य पाहिले. लोक म्हणू लागले, की एका लब्धप्रतिष्ठिताची भली खोडकी जिरली. ' भले रे तेन्नाली रामन् ! ' पोरेसोरे तर त्याच्या मागेच लागली. ' हुर्यो हुर्यो ' सुरू झाले.

कृष्णदेवरायाने आपल्या माडीतून ती मिरवणूक पाहिली. तेन्नाली रामन्‌चे ते कृत्य त्याला आवडण्याजोगे नव्हते. कारण शहरभर अप्रतिष्ठा होत होती, ती त्याच्या गुरूची. त्याने लगेच आपल्या दूतांना आज्ञा केली.

" पळा. त्या मिरवणुकीत जो कोणी खांद्यावर बसला आहे, त्याला लाथा-बुक्यांनी तुडवा आणि ज्याच्या खांद्यावर बसला आहे त्याला माझ्याकडे आणा. "

या घटनेचा वास आला नसता तर तो रामन् कसला ! त्याने लगेच पवित्रा बदलला. तो खाली उडी टाकून ताताचार्यांच्या पायाला लागला.

" गुरुमाउली, अजाण लेकराच्या हातून महान् प्रमाद घडला. क्षमा असावी. आता मी तुम्हांला खांद्यावर घेऊन घरी पोचवितो. "

ताताचार्याला विचार करायला उसंत न देता रामन्‌ने त्याला खांद्यावर उचलले. त्यामुळे मिरवणुकीचे दृश्य लगेच उलटे झाले. तेवढ्यात ते राजदूत तिथे पोचलेच. ते कशाला मागचा पुढचा विचार करताहेत ? त्यांनी खांद्यावर बसलेल्या राजगुरूला खाली ओढून यथेच्छ तुडवले अन् खांद्यावर घेणाऱ्या रामन्‌ला नेऊन सम्राटापुढे उभे केले.

कृष्णदेवरायाने रामन्‌चा तो कावा ओळखला. तो अधिकच संतप्त झाला.

" शरम नाही वाटली राजगुरूचा असा अपमान करायला ? तुझी कुटिल बुद्धी इतक्या थराला जाईल अशी कल्पना नव्हती... "

सम्राट क्षणभर थांबला आणि त्याने त्या राजदूतांना दुसरी आज्ञा दिली.

" वनात नेऊन या हरामखोराचा शिरच्छेद करा. "

तेन्नाली रामन्‌ला वधदंडाची शिक्षा होताच मारेकरी त्याला घेऊन रानात गेले. ' घे आता देवाचे नाव ! ' त्यांनी रामनला म्हटले. पण रामनने देवाचे नाव न घेता त्यांच्याच दाढीला हात लावला. तो म्हणाला.

" ताताचार्यांमुळे मला ही शिक्षा झाली. तो माणूस तुम्हांला आवडतो का ? "

" छट् ! असला दुष्ट व कावेबाज माणूस दुनियेत गावायचा नाय ! "

" मग मी त्याची जरा फजिती केली, तर त्यात काय बिघडलं ? "

" ते फार चांगलं झालं. "

" मग मला तुम्ही मारू नका. सम्राटाला थोड्याच वेळात मला शिक्षा दिल्याबद्दल पश्चात्ताप होईल अन् मग तो तुमचंच डोकं उडवील. "

मारेकऱ्यांना ते खरे वाटले. त्यांनी रामनला सोडून दिले अन् वन्यपशूंच्या रक्ताने आपल्या तलवारी माखून त्या सम्राटाला नेऊन दाखवल्या. रामन् तिथून सुटला तो भूमिगत झाला.

आणि खरोखरच रामनला वधदंडाची शिक्षा देऊन आपण ब्रह्महत्येचे धनी झालो, अशी रुखरुख सम्राटाच्या मनाला जाळू लागली. नगरातही त्या गोष्टीचा खूप बभ्रा झाला. लोक म्हणू लागले, की " या ब्रह्महत्येमुळे राजावर अन् प्रजेवरही काही तरी संकट गुदरल्यावाचून राहणार नाही. "

सम्राटाला वाटले, की या पातकाची आता काहीतरी निष्कृती केलीच पाहिजे. म्हणून त्याने ताताचार्याला बोलावून घेतले. ताताचार्य म्हणाला.

" रामन् दुर्मरणानं मेला आहे. त्यामुळे तो ब्रह्मसमंध झाला असणार. त्याची शांती करायची, तर मोठं अनुष्ठान करावं लागेल. "

सम्राट म्हणाला, " जे करायचं ते त्वरित करा. "

ताताचार्याने मग १०८ ब्राह्मण तिन्हीसांजा एका वडाखाली अनुष्ठानाला बसवले. मध्यरात्री त्यांनी बलिदानाचा विधी सुरू केला. " हे ब्रह्मसमंधा ! हा बळी तू भक्षण कर... " त्या सरशी ' आलोऽऽ ' म्हणून ब्रह्मसमंधाने त्या वटवृक्षावरून उडी ठोकली. मग काय विचारता ! अनुष्ठान राहिले बाजूला अन् त्या ब्रह्मवृंदाला पळता भुई थोडी झाली. अर्थात् ते ब्रह्मसमंधाचे सोंग रामननेच आणले होते हे सांगायला नकोच. त्यामुळे सम्राटाने आरंभलेले अनुष्ठान भंगले. ब्रह्मसमंध काही गाडला गेला नाही.

त्यानंतर तेच काम मी करतो, म्हणून एक महामांत्रिक सम्राटापुढे आला. काम फत्ते झाल्यास तुला एक हजार सुवर्णमुद्रा देईन, असे सम्राटाने त्याला कबूल केले. सम्राट त्याला म्हणाला.

" तुझं काम पुरं झाल्यावर मी माझं प्रायश्चित करीन. "

" कशाबद्दल प्रायश्चित ? " मांत्रिकाने विचारले.

" ब्रह्महत्त्येबद्दल मला प्रायश्चित करायचं आहे. "

" पण तुमच्या हातून ब्रह्महत्त्या घडलीच नाही, असं मी केलं तर ? "
सम्राट त्यावर एकदम उत्तेजित झाला.
" म्हणजे ? तू रामन्‌ला परत जिवंत करशील ? "
" आज्ञा झाली तर तेही करीन. "
" मग काय पाहिजे तुला, बोल. "
" फक्त अभय पाहिजे. "

असे म्हणून रामनने आपली नकली दाढी ओढून काढली अन् सम्राटाचे पाय धरले. सम्राटाच्या आश्चर्याला पारावार उरला नाही. त्याच्या हृदयावरचे केवढे तरी दडपण उतरले होते ! त्याने रामनला क्षमा तर केलीच, शिवाय ठरलेले पारितोषिकही दिले.

अशा प्रकारे एका घटनेवर पडदा पडला; पण रामन् हा असा काही अवखळ अन् साहसी होता, की त्याच्या त्या जन्मखोडीमुळे त्यापुढेही त्याला राजकोपाची शिकार व्हावे लागले.

रामन्‌ला ढोंगधत्तुऱ्याचा लहानपणापासूनच तिटकारा. तशा लोकांची रेवडी उडविण्याच्या उद्योगात त्याला अचाट कल्पना सुचत. ताताचार्य हा भोंदूबुवांपैकीच असल्यामुळे त्याची तर रामन्‌ने कायमची डूख धरली होती. पुढची गोष्ट त्याच संदर्भात आहे.

सम्राट कृष्णदेवरायाच्या मातेला अंतकाळी आंबे खाण्याची इच्छा उत्पन्न झाली. कृष्णदेवरायाने त्वरा करून आंबे आणण्यासाठी दूत पिटाळले. पण आंबे येण्याच्या आतच तिचे प्राणोत्क्रमण झाले. आईची ती अंतकालीन इच्छा कशी पुरी करता येईल, या विवंचनेत त्याने ताताचार्याला बोलावून घेतले. ताताचार्याला वाटले, की ही संधी ' सोन्याची ' आहे. तो म्हणाला.

" सोपी गोष्ट आहे. तुम्ही श्राद्ध करा अन् राजपुरोहितासह श्राद्धाच्या ब्राह्मणांना एकेक सोन्याचा आंबा दान द्या म्हणजे स्वर्गात तो राजमातेला पोचेल. "

कृष्णदेवरायाने लगेच सोनारांना सुवर्णाची आम्रफले बनवण्याची आज्ञा फर्मावली. हा वास रामन्‌च्या नाकात शिरायला वेळ लागला नाही. तो मनात म्हणाला. " बच्चमजी, सोन्याचे आंबे हवेत काय ? "

दुसऱ्याच दिवशी तो राजगुरूकडे गेला अन् त्याला म्हणाला. " उद्या

माझ्या मातु:श्रीचे श्राद्ध आहे. तुम्ही चार ब्राह्मण घेऊन क्षणाला यावं. दक्षिणा भरघोस देईन. चिंता नसावी. ”

त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी ताताचार्यासह ब्राह्मणांनी श्राद्धाचा क्षण घेतला. ब्राह्मण जेऊन पिंडदान झाल्यावर दक्षिणा देण्याची वेळ आली. रामनने इशारा केला, त्यासरशी काही धटिंगणा आत घुसले. प्रत्येकाच्या हातात तापवून लाल केलेली लोखंडाची सळई होती. एकेकाने एकेला ब्राह्मणाला धरले अन् त्याच्या हातावर चरचरीत डाग दिला. ब्राह्मण बोंबाबोंब करीत सम्राटाकडे फिर्याद घेऊन गेले. ब्राह्मणांची ती डागळलेली अवस्था पाहून सम्राट संतप्त झाला. त्याने रामन्‌ला धरणे पाठवले. तो हजर झाल्यावर त्याला केल्या कृत्याचा जाब विचारला. त्यावर रामन् साळसूदपणे म्हणाला.

“ महाराजांनी माझ्यावर कोप करू नये. आपल्यासारखाच मीही मातृ-भक्त आहे. माझ्या आईला मरताना कावीळ झाली होती. वैद्य म्हणाला, की ‘डाग दिल्याने कावीळ साफ जाईल.’ आम्ही ती तयारी करतो, एवढ्यात तिचा प्राण गेला. अजूनही स्वर्गात ती आजारीच असेल. म्हणून म्हटलं, राजगुरूंनी आप-ल्याला सांगितलेला उपाय आपणही करावा. त्यासाठी ब्राह्मणांना डागलं. आता ती बरी होईल अन् स्वर्गातून मला आशीर्वाद देईल. ”

त्यावर सम्राट म्हणाला.

“ मूर्खा, तुझ्या अकलेला काय म्हणावं ? ब्राह्मणांच्या हातावर दिलेला डाग स्वर्गात आईच्या हातावर उठेल होय ? ”

“ का नाही उठणार ? सोन्याचे आंबे दान दिल्यानं तुमच्या आईची आंबे खाण्याची इच्छा नाही का पुरी होणार ? तसंच हे ! ”

ते उत्तर ऐकून सम्राटाला रामन्‌चा शहाणपणा आणि आपला भोळसटपणा उमगला. नुसते हसून त्याने ते प्रकरण हातावेगळे केले. सोनारांना दिलेली सोन्याच्या आंब्यांची आज्ञा रद्द झाली; पण थोड्याच दिवसात दुसरे एक प्रकरण उद्‌भवले अन् त्यात रामनला पुनश्च वधदंडाची शिक्षा मिळाली.

एक दिवस एक साधू विजयनगरात डेरेदाखल दाखल झाला. तो मांत्रिक होता, वैद्य होता, धर्माचार्य होता, सारे काही होता; पण खरं म्हणजे तो शत्रुराज्याचा हेर होता. थोड्याच दिवसात त्याने नगरात आपला चांगला जम

बसवला. शेकडो लोक त्याच्या दर्शनाला जाऊ लागले. कित्येक सेवेलाही राहू लागले. त्याने कित्येक महत्त्वाच्या राजकीय व्यक्तींना प्रसाद म्हणून विष चारून मारले. कित्येकांना काहीबाही जडीबुटी देऊन मतिमंद बनवले. कित्येकांना सफाई लुटले, नागवले. बायाबापड्यांनाही आपल्या 'सेवेसी सादर' केले. त्याचे छां छू असे काही भुरळ पाडणारे होते, की नगरातले भले भले लोक म्हणू लागले. 'असा सत्पुरुष पाहिला नाही, असा महात्मा ऐकला नाही.'

पण तेन्नाली रामन्‌ने त्याचे काळेकुट्ट अंतरंग पुरतेपणी हेरले. त्याने मनाशी ठरवले, की या सोळभोक संताचा काटा काढायचा. मग त्याने त्या साधूशी संधान बांधले. आपण त्याचा पुरता भक्त बनल्याचे दाखवून त्याला विश्वासात घेतले. तो निघाला, की रामन त्याच्याबरोबर निघे. छायेसारखा त्याच्या मागेपुढे राही.

असेच ते दोघे एकदा मार्गातून जात असता त्यांना एक वेडा दिसला. तो अगदी डफाळून आलेला होता. रामन्‌ने सहज म्हणून त्या साधूचा हात त्या वेड्याच्या हाती दिला. खरी गोष्ट अशी होती, की त्या साधूनेच सर्वस्व नागवून त्या माणसाला वेड लावले होते. दुसऱ्याच क्षणी वेड्याने त्याला ओळखले. मग काय विचारता! त्याने त्या साधूला लोळवून, तुडवून, बुकलून हां हां म्हणता ठार केले.

राज्यावरची अलाबला गेली; पण ताताचार्याने सम्राटाकडे चुगली केली, की साधूच्या मृत्यूला रामनच कारणीभूत आहे. आपल्या राज्यात एका साधूचा खून व्हावा अन् त्या कामी आपला एक आश्रित कारणीभूत व्हावा, ही गोष्ट सम्राटाच्या क्रोधाला पुरेशी ठरली. त्याने मारेकऱ्यांना लगेच हुकूम दिला. "रामनला मारा. त्याला रानात घेऊन जा. आधी एका खड्डयात गळ्यापर्यंत पुरा अन् मग त्याच्या मस्तकावर हत्ती नाचवा. मरू दे हरामखोराला!"

मारेकऱ्यांनी त्याप्रमाणे रामन्‌ला पुरण्याचे काम केले. पण अजून हत्ती आला नव्हता. आता काही रामन खड्डयातून वर येऊ शकणार नाही असे समजून ते मारेकरी हत्तीच्या तलासासाठी निघून गेले. रामन् एकटाच तिथे मृत्यूची घटका मोजीत राहिला.

एवढ्यात तिकडून एक धोबी कपड्याचे गाठोडे पाठीवर घेऊन तिथे आला

तो धोबी अष्टांगी वाकडा होता. त्याने रामनला हा काय प्रकार आहे म्हणून विचारले. रामन म्हणाला. "हा एक माझा उपचार आहे. मी तुझ्यासारखाच कुबडा वाकडा, आहे. माझे ते वाकडेपण घालविण्यासाठी वैद्याने मला इथे पुरले आहे. तू मला बाहेर काढ अन् साक्षात्कार पाहा."

धोब्याने माती उकरून रामनला बाहेर काढले. पाहतो तो रामन वाकड्याचा सरळ झालेला. धोब्याला नवल वाटले. त्यावर रामन त्याला म्हणाला.

"तू सुद्धा माझ्यासारखाच सरळ होशील. तुझ्या या कुबडेपणाला सारं गाव हसत असेल. तुझी बायकोही तुझ्यावर नाखूष असेल. छे: ! कसलं हे तुझं जिणं !"

"खरं आहे." धोबी म्हणाला आणि तो सरळ होण्याचा उपचार करून घ्यायला तयार झाला. रामन्‌ने मग त्याला त्याच खड्डयात आपल्या इतकेच आकंठ पुरले अन् तो तिथून पसार झाला. पुन्हा एकदा त्याने मृत्यूला ठकवले.

अशा या तेन्नाली रामन्‌च्या कथा. एकेक अद्‌भुत अन् लोकविलक्षण ! पण त्याच्या केवळ कथांवरच त्याचे मूल्यमापन करणे योग्य ठरणार नाही. तो कवी होता, तसाच भक्तही होता. तो शैव असला, तरी हरिहरात भेद मानीत नसे. त्याने तेलगू भाषेत लिंगपुराण लिहिले आहे, तसेच पांडुरंग माहात्म्यही लिहिले आहे. त्याला आंध्रातले लोक शिवाचा अवतार समजतात, हे त्याहून विशेष होय.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९०२९८
अनुक्रम ८१३२५
१५८४
निबंध
१२/३/७

# नीतिकथा

भारतीय कथासाहित्य अफाट आहे. भारत हा कथाप्रिय म्हणून नावाजलेला देश आहे. जगातल्या दुसऱ्या कुठल्याही सुसंस्कृत राष्ट्राच्या पूर्वी भारतीयांनी पुराणकथा, व्रतकथा, कल्पितकथा, अद्‌भुतकथा, यक्ष गंधर्वकथा, प्राणिकथा, नीतिकथा अशा विविध कथाप्रकारांना अभिजात साहित्याचे स्वरूप देऊन ग्रंथबद्ध केले आहे. प्रस्तुत लेखात वरील प्रकारांपैकी नीतिकथा प्रकाराविषयी चार शब्द सांगायचे आहेत.

माणसाला लौकिक व्यवहारात चतुर बनवणे, सदाचारी बनवणे, दुष्ट अन् धूर्त लोकांचे अंतरंग ओळखण्याइतकी त्याची बुद्धी तीक्ष्ण करणे आणि पर्यायाने त्याचे धर्म, अर्थ, काम हे सिद्ध व्हायला मदत करणे, एवढ्या व्यापक उद्देशाने नीतिकथा प्रवृत्त झालेली असते. कोरड्या नीतिप्रवचनापेक्षा तेच नीतितत्त्व कथेच्या साखरेत घोळवून माणसाला चाखायला देणे, हे परिणामाच्या दृष्टीने चांगले असते. नीतिवृद्धांना याचा अनुभव आला आणि त्यासाठी त्यांनी कथेचा आश्रय केला. हितोपदेश या ग्रंथाच्या प्रारंभी तसे

स्पष्टच म्हटले आहे—

कथाच्छलेन बालानां नीतिस्तदिह कथ्यते ।

'कथेच्या मिषाने मी बालांना म्हणजे अज्ञांना या ग्रंथात नीती शिकवीन.'

नीतिकथांच्या निर्मात्यांनी त्यांचे क्षेत्र माणसापुरतेच मर्यादित ठेवले नाही. त्यात पशुपक्षी, वृक्ष-वल्ली, नदी-पर्वत, देव-देवता या सर्वांनाच त्यांनी वेठीला धरले. त्यांनी पशूंना राजकारण करायला लावले, पक्ष्यांना माणसाच्या पातळीवर उतरायला लावले आणि जड पंचमहाभूतांना नीतिविचार सांगण्याची पात्रता दिली. याविषयीचे एकच उदाहरण पुढे देतो.

सागर हा सरितांचा पती. सर्व सरिता अखेर त्याच्याशी मीलन साधायला धावतात. कधी कृश रूपात, तर कधी घोंघावणाऱ्या महापुराच्या रूपात. एकदा गंगा असेच महापुराचे पाणी घेऊन समुद्राला भेटायला गेली होती. तिने त्या प्रवाहाबरोबर समुद्रात लोटण्यासाठी खूपच काही वाहून आणले होते. ते सगळे अरिष्ट बघून समुद्र गंगेला म्हणाला.

"मत्प्रिय प्राणसखये, तुझ्या पुराच्या प्रवाहात मोठमोठे वृक्ष मुळासकट उन्मळून आणलेले असतात. पण वेताची काठी मात्र तू कधीच आणीत नाहीस; असे का ? वेत तुझ्या काठाला नसतातच का ?"

"असतात; पण ते बेटे शहाणे असतात. पुराचा लोंढा आला, की, त्यांची मान खाली ! पूर एकदा डोक्यावरून वाहून गेला, की पुन्हा आपले 'जैसे थे.' वृक्षांचे तसे नसते. पूर आला, तरी त्यांची मान ताठ. मग मी देते धडक. त्यासरशी ते कोलमडून पडतात आणि शाखामुळांसह आडवे तिडवे वाहू लागतात. आणि अखेर काय ? 'सागरास्तृप्यंतु !"

ही गोष्ट सांगितली आहे नम्रता हा नीतिगुण शिकवण्यासाठी. माणसाला व्यवहारात सदैव ताठ राहून चालत नाही. संकट निभावून न्यायचे, तर प्रसंगी नम्रच व्हावे लागते. अशा वृत्तीलाच 'वैतसी वृत्ती, असे सांकेतिक नाव आहे. 'महापुरे झाडे जातीं । तेथ लव्हाळे वाचती' ही तुकोबांची अभंगवाणी या वैतसी वृत्तीलाच अनुलक्षून आहे.

नीतिकथा ही एखादे नीतितत्त्व मनाशी धरूनच रचलेली असते. हे नीतितत्त्व कथेच्या शेवटी तात्पर्यरूपाने प्रच्छन्न वा प्रकटपणे व्यक्त होत असते. कधी अशा कथेच्या शेवटी तात्पर्यदर्शक सुभाषित दिलेले असते, तर कधी प्रथम

एखादा दृष्टान्त-श्लोक सांगून मग त्याच्या स्पष्टीकरणासाठी कथा सांगितलेली असते. हितोपदेशातली ' व्याघ्र-ब्राह्मण ' ही कथा दृष्टान्तश्लोकाने सुरू होते, ती अशी—

कङ्कणस्य तु लोभेन मग्नः पंके सदुस्तरे ।
वृद्धव्याघ्रेण संप्राप्तो दुर्बलः पथिको यथा ॥

एक होता वाघ. तो झाला म्हातारा. त्यामुळे त्याला भक्ष्य मिळविणे कठीण जाऊ लागले. मग त्याने एक युक्ती केली. तो एक सुवर्णकंकण घेऊन एका तळ्याच्या काठी बसला. आल्यागेल्या पांथस्थाला त्याने सांगायला सुरुवात केली. ' मी वाघ असलो तरी महाधार्मिक आहे. दान हे पुण्यकारक असते, हे मला ठाऊक आहे. म्हणून मी सुवर्णकंकण आज दान द्यायचे ठरवले आहे. या, कोणीतरी पुढे या अन् हे दान स्वीकारा. '

पण वाघाच्या बोलण्यावर कोण विश्वास ठेवणार ! जो तो त्याचे दर्शन होताच पळत सुटे. पण एका दरिद्री ब्राह्मणाला त्या कंकणाचा लोभ आवरला नाही. तो ते दान घ्यायला तयार झाला. वाघाने त्याला सांगितले, की ' प्रथम या तळ्यात स्नान कर आणि शुचिर्भूत होऊन दान घ्यायला पुढे ये. ' ब्राह्मण त्याप्रमाणे तळ्यात उतरला अन् त्याच क्षणी चिखलात रुतून बसला. वाघाची तीच युक्ती होती. मग वाघाने सावकाशपणे त्या ब्राह्मणावर चाल करून आपली क्षुधाशांती केली. मरताना तो ब्राह्मण एवढेच म्हणाला. ' मी द्रव्यलोभाने या हिंस्र प्राण्यावर विश्वास ठेवला तिथेच चुकलो.' गोष्टीचं तात्पर्य अगदी उघड आहे.

काही समीक्षक म्हणतात, की नीतिकथा ही लोकसमाजाने निर्माण केली आणि मग ती उच्च सांस्कृतिक थरावर चढली. पण हे मत खरे वाटत नाही. अशा कथा शिक्षित अन् सुसंस्कृत लोकांनीच निर्माण केल्या आहेत. अन्यथा इतके उच्च कोटीचे नीतिज्ञान त्यातून निष्पन्न झालेच नसते आणि त्यांना इतका बांधेसूद आकारही आला नसता.

नीतिकथांचा पहिल्याप्रथम आढळ होतो, तो उपनिषदात. बृहदारण्यकात पुढील नीतिकथा आढळते —

एकदा देव, मनुष्य अन् असुर हे प्रजापतीकडे गेले अन् ' आम्हांला

उपदेश करा ' असे म्हणाले. तेव्हा प्रजापतीने मेघगर्जनेतून त्या तिघांनाही 'द' हे अक्षर ऐकवले. अक्षर एक, पण त्याचे जातिपरत्वे अर्थ मात्र भिन्न घेतले गेले. देव म्हणाले, ' आमच्यात एकूण इंद्रियनिग्रह कमीच. तेव्हा ब्रह्मदेवाने 'द' अक्षर उच्चारून आम्हाला इंद्रियदमन करायला सांगितले. मनुष्य म्हणाले, ' आमची जात फार लोभी. आपले अर्जित धन दुसऱ्याला द्यायचे म्हणजे आम्हांला प्राणवियोगाचे दुःख होते. तेव्हा प्रजापतीनं 'द' अक्षर सांगून आम्हांला दान करण्याचा उपदेश दिला. ' असुर म्हणाले, ' आपली जात तर क्रूरकर्मासाठीच प्रसिद्ध. तेव्हा तसे करणे बरे नव्हे, म्हणून प्रजापतीने आम्हाला 'द ' अक्षर उपदेशून दयेचा मार्ग दाखवला.'

या छोट्याशा कथेत दमन, दान अन् दया या समाजधारणेला आणि व्यक्तीच्याही कल्याणाला उपकारक अशा तीन नीतितत्त्वांचा पुरस्कार केलेला आहे.

महाभारत हे तर नीतिकथांचे भांडारच आहे. वनपर्व, शांतिपर्व, अनुशासनपर्व, इ. पर्वांतून त्या सांगितलेल्या आहेत. व्यवहारधर्म, राजकारण अन् उच्चतम नैतिक मूल्ये यांना धरून त्या कथा आहेत. महाभारतातली कणिकनीती प्रसिद्ध आहे. कणिक हा धृतराष्ट्राचा मंत्री होता. तो राजकारणी विचारात चाणक्याचाही गुरु शोभू शकेल. राजनैतिक हेतू सिद्ध करण्यासाठी तो सूक्तासूक्ताचा कधीच विचार करीत नाही. ' पांडवांशी वरकरणी सख्य करून, गोड बोलून तू त्यांच्याकडून तुझं कार्य साधून घे अन् मग त्यांच्या तोंडाला पाने पूस ' असे सांगताना धृतराष्ट्राला तो पुढील नीतिकथा सांगतो –

एक होता कोल्हा. त्याला लागली होती भूक. त्याला दिसले एक भक्ष्य, पण ते त्याच्या आवाक्यातले नव्हते. म्हणून त्याने वाघ, घोडा, लांडगा अन् मुंगूस या प्राण्यांशी लाडीगोडी करून त्यांच्याकडून ते भक्ष्य फोडून घेतले अन् नंतर लुच्चेगिरीने त्या सर्वांना वाटेस लावून एकट्याने त्या भक्ष्यावर ताव मारला.

विदुरही नीतिकथा सांगण्यात कुशल होता. महाभारतात त्याच्या तोंडी अनेक व्यवहारज्ञानाची वचने घातलेली आहेत. तो होता कुरुकुलाचा हितचिंतक. त्यामुळे त्याचा कथा सांगण्याचा रोख वेगळा होता. कौरव-पांडवात कलह माजल्यास त्यात दोन्ही पक्षांच अकल्याणच होईल, हे धृतराष्ट्राच्या मनावर ठसवण्यासाठी त्याने पुढील नीतिकथा सांगितली आहे—

एका व्याधाने पक्षी पकडण्यासाठी जाळे पसरले होते. त्या जाळ्यात दोन कपोत सापडले. आलेले संकट ओळखून आपला जीव वाचवण्यासाठी ते जाळ्यासकट वर उडाले. पण काही वेळाने ते आपसातच भांडले अन् दोघेही खाली पडून व्याधाच्या हाती सापडले.

कुठल्याही गोष्टीला त्या त्या व्यक्तीचे पूर्वकर्म हे कारण असते, हा विचार उपनिषदात दृग्गोचर होतो. यालाच कर्मवाद असे म्हणतात. महाभारतानेही अनेक कथातून कर्मवादाचा पुरस्कार केला आहे. याविषयाची एक नमुनेदार कथा अशी–

गौतमी नावाची एक वृद्ध ब्राह्मणी होती. एके दिवशी तिच्या मुलाला नागीण डसली अन् तो मेला. गौतमीला पुत्रशोक आवरेना. एका पारध्याला तिची दया आली. त्याने त्या नागिणीला पकडून गौतमीकडे आणले अन् तिला म्हटले. 'तुझ्या पुत्राला मारणाऱ्या या नागिणीला मी आता ठार करतो.' त्यावर ती नागीण बोलली. 'गौतमीच्या पुत्राला मी मारले यात माझा दोष नाही. मला मृत्यूने तशी प्रेरणा दिली म्हणून मी त्याला डसले.' एवढ्यात साक्षात् मृत्यू तिथे आला अन् म्हणाला. 'या कृत्यात माझाही दोष नाही. मला काळाची प्रेरणा मिळाली. काळ हा आपल्या इच्छेनुसार इतरांकडून हवी ती कामे करून घेतो.' एवढ्यात काळ तिथे प्रकटला. तो म्हणाला. 'मी दोषी नाही. कर्माच्या प्रेरणेने मी ते काम केले. कर्म हेच गौतमीपुत्राच्या मृत्यूचे एकमेव कारण आहे.'

बौद्ध आणि जैन यांच्या वाङ्मयातही नीतिकथांचा बराच भरणा आहे. ते दोघेही कर्मवादी असल्यामुळे त्यांना तशा कथांची निर्मिती करायला अवसर मिळाला आहे. परंपरेने चालत आलेल्या कथा त्यांनी त्या कामी निवडल्या अन् त्यांना बोधवादी स्वरूप दिले.

पुढच्या काळातले पंचतंत्र अन् हितोपदेश हे ग्रंथ तर केवळ कथात्मकच आहेत. त्यांची कथनशैली गद्यपद्यमिश्रित आहे. ते कथा गद्यात सांगतात आणि नीतितत्त्वाच्या पुष्टीसाठी महाभारत, मनुस्मृती, इ., ग्रंथांतले श्लोक देतात. पंचतंत्राला तर जागतिक कीर्ती लाभली आहे. जगातल्या सर्व प्रमुख भाषांतून त्याचे अनुवाद झाले आहेत. भारतातल्या या नीतिकथा अरबस्थान, इराण, ग्रीस अशा मार्गे युरोपात गेल्या आणि तिथून जगभर पसरल्या.

सिंहासनबत्तिशीतल्या कथा विक्रमाच्या सिंहासनाला जडवलेल्या सुवर्ण-पुतळ्यांनी भोजराजाला सांगितल्या आहेत. उच्च अन् उदात्त असे नैतिक गुण त्या कथांमधून प्रकर्षाने प्रतीत होतात.

भारतीय नीतिकथांचे सामान्यपणे दोन भाग पडतात. त्यातला एक भाग राजनैतिक असून, दुसरा सामान्य मानवनीतीचा आहे. राजनैतिक विचारांचा उपदेश करणारे म्हणून विष्णुशर्म्यानें पंचतंत्रात मनू, बृहस्पती, शुक, पराशर, व्यास आणि चाणक्य यांची नांवे घेतली आहेत. राजनीतीचा उपदेश करणाऱ्या कथांचा मुख्य उद्देश राजाने मित्रांचे साहाय्य संपादून आणि शत्रूंवर विजय मिळवून आपले राज्य बळकट करावे, हे प्रतिपादण्याचा असतो. अशा कथांत साम, दान, दंड, भेद हे चारही उपाय प्रशस्त मानलेले असतात. त्यात साधनापेक्षा साध्याला महत्त्व दिलेले असते.

सामान्य नीतीच्या कथांत सत्य, अहिंसा, दया, ऋजुता, कृतज्ञता, सदाचरण, परोपकार, इ. सद्‌गुणांची मलावण असते.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ७१३२८ वि: निबंध
क्रमांक १५८८ नों. दि: १२।३।५०

# त्रिभुवनसंचारी

पुराणातली एक अनाकलनीय व्यक्ती म्हणजे नारद. देवर्षी ही त्याची पदवी, पण आचरण विक्षिप्त. नारदाचे नाव निघताच मनश्चक्षूंपुढे एक विशिष्ट मूर्ती उभी राहते. गळ्यात वीणा, हातात चिपळ्या, मुखाने नारायण, नामाचा घोष, निरंतर भ्रमन्ती, रोमरोमात भरलेला विनोद अन् कलागती लावणे हा छंद!

नारदाला प्रवेश नाही, असे या त्रैलोक्यात स्थानच नाही. सप्तस्वर्गापासून तो सप्तपाताळापर्यंत त्याचा अनिरुद्ध संचार असतो. मद, मान, दंभ, विद्वेष इ. आसुरी शक्तींचा जिथे अतिरेक होतो, तिथे योग्य वेळीं उपस्थित होऊन तो त्या शक्तींचा बीमोड करतो. अनेक राजांच्या दरबारात तसाच अंतःपुरातही कलहाग्नी पेटवून तो हाहाकार माजवतो आणि शेवटी ती आगही स्वतःच शमवून तिथे स्वर्गसुखाची पेठ उघडतो.

नारदाच्या बुद्धीला समस्त ब्रह्मांडाचे आकलन आहे. त्याला राजकारण अचूक हेरते. देव, दानव आणि मानव या सर्वांची परिस्थिती तो स्वयंप्रेरणेने

जाणतो. दानवांचा अन् राक्षसांचा गर्वभार तर तो हरण करतोच; पण देवांनाही 'ग'ची बाधा झाल्यास त्यांचीही गय करीत नाही. विष्णू शेषशय्येवर पहुडलेला असला, शिव कैलासावर समाधिस्थ असला किंवा इंद्र नृत्योत्सवात निमग्न असला, तरी तो नारदाची भेट नाकारू शकत नाही. नरदाचा देवलोकाशी घनिष्ट संबंध असला, तरी तो प्रेम करतो ते मात्र मृत्युलोकावर. इहलोकीच्या ईश्वरभक्तांबद्दल त्याला नितान्त आदर वाटतो. तो भक्तांना योग्य मार्गावरून पुढे नेतो आणि देवा-भक्तांचा संबंधही जुळवून देतो.

नारद हा ब्रह्मदेवाचा मानसपुत्र. त्याला विष्णूचा तिसरा अवतारही मानतात. भागवत पुराणात त्याने स्वतःचे पूर्वजन्मवृत्त कथन केले आहे, ते असे—

मी पूर्वजन्मी एका दासीचा पुत्र होतो. माझी आई सत्पुरुष अन् विद्वान् ब्राह्मण यांच्या घरी सेवाचाकरी करी. त्यामुळे लहानपणापासूनच मला संत-समागम घडला. त्यामुळेच माझ्या मनात भगवंताच्या भक्तीचा अंकुर उगवला. कालांतराने माझी माता मरण पावली. मी पोरका झालो. निर्हेतुकपणे काही काळ भटकत राहिलो. कोणी मायेने बोलेना, कोणी जवळ करीना. मग मला वाटले, की आता देवाची जवळीक करायची. त्याच्याच हाती जीवननौका सुपूर्त करायची. विचार पक्का झाला आणि मी एका वनात बसून देवाचे ध्यान करू लागलो. ध्यान तीव्र होताच मला भगवंताचे मानसिक दर्शन घडले; पण मला देव साक्षात् समोर भेटायला हवा होता आणि तसे काही घडेना. मी तळमळू लागलो. मग एक दिवस मला देववाणी ऐकू आली. 'या जन्मी तुला माझे साक्षात् दर्शन घडणे शक्य नाही. पुढच्या जन्मात ते घडेल.'

त्यानंतर कालांतराने माझा मृत्यू झाला. मला पुढचा जन्म मिळाला, तो ब्रह्मदेवाच्या घरी. आश्चर्याची गोष्ट म्हणजे मी आईच्या कुशीतून जन्मलो नाही, तर ब्रह्मदेवाच्या मांडीतून माझा जन्म झाला. ब्रह्मदेव म्हणाला, 'वत्सा. तू माझा मानसपुत्र आहेस.'

खरे म्हणजे एखाद्या व्यक्तीच्या जन्माची कथा एकच असायला हवी. आई अमुक, बाप अमुक! पण नारदाच्या बाबतीत याही गोष्टीला वैलक्षण्य आहे. वायू पुराणात त्याला कश्यप प्रजापतीचा पुत्र म्हटले आहे आणि तोही औरस नव्हे. ब्रह्मवैवर्त पुराणात ती कथा सांगितली आहे, ती अशी—

द्रुमिल नावाचा एक शूद्र होता. त्याच्या बायकोचे नाव कलावती. तिला बरेच दिवस मूलच होईना, म्हणून तिने पतीच्या अनुज्ञेने कश्यपाचे वीर्य प्राशन केले. लगेच तिला गर्भधारणा झाली. ती गर्भवती असतानाच द्रुमिल मरण पावला आणि ती अनाथ झाली. मग तिने एका ब्राह्मणाच्या घरी आसरा घेतला. तिथेच ती प्रसूत झाली. तिला मुलगा झाला. तिने त्याचे नाव नारद ठेवले. अनाथ स्त्रीने स्वतःचा आणि एका अर्भकाचा सांभाळ कसा करायचा ! म्हणून ती गेली कश्यपाकडे. त्याला म्हणाली, 'हा तुमच्या वीर्यापासून झालेला मुलगा. याला सांभाळा.' कश्यपाने त्याला स्वीकारले. मग तिथेच तो लहानाचा मोठा झाला.

नारद हा अत्यंत बुद्धिमान् होता. त्याने थोड्याच काळात अनेक विद्या आत्मसात् केल्या. तो विद्वान् झाला, पण त्या सर्व विद्या मिळवूनही त्याला समाधान लाभले नाही. अध्यात्मविद्या ही सर्व विद्यांत श्रेष्ठ. ती त्याला हवी होती. ती मिळविण्यासाठी तो सनत्कुमारांच्याकडे गेला आणि त्यांचा शिष्य म्हणून राहिला. ती विद्या मिळवूनच तो तृप्त झाला. त्याने मग तिचा अनेकांना उपदेश केला. चित्रकेतू, प्राचीनबर्ही, प्राचेतस, सावर्णी मनू, देवल, वसुदेव, मार्कंडेय, पुंडरीक यांना नारदाकडूनच ब्रह्मविद्येचा उपदेश मिळाला. नारायणाची कृपा मिळवून देणारा द्वादशाक्षरी मंत्र ध्रुव-प्रल्हादांना त्यानेच उपदेशिला. व्यास महर्षींला भागवत अन् वाल्मीकीला रामायण रचण्याची प्रेरणा त्यानेच दिली.

नारद हा ब्रह्मदेवाचा मानसपुत्र हे वर सांगितलेच. आपल्या मुलाने लग्न करून घरदार थाटून राहावे, अशी बापाची इच्छा. ब्रह्मदेवाला वाटत होते, की लग्नाच्या बेडीत एकदा पाय अडकले, की पोराचे भटकणे थांबेल. ब्रह्मदेव त्याला वारंवार तसा उपदेश करी; पण नारदाचे प्रेम संसारापेक्षा भक्तीवर आणि वैराग्यावरच अधिक होते. त्यामुळे तो बापाचा उपदेश कानामनावरच घेईना. शेवटी ब्रह्मदेव एक दिवस रागावला आणि त्याने नारदाला शाप दिला. 'वैराग्याच्या गप्पा मारतोस, पण एक दिवस तुझे ते वैराग्य कोसळेल. तू विषयलंपट बनून एका स्त्रीच्या आधीन होशील.'

नारदाने तो शाप ऐकून न ऐकल्यासारखा केला खरा, पण तो एके दिवशी त्याला बाधल्यावाचून राहिला नाही. केवढी फजिती झाली त्यात नारदाची !

शिव-पुराणात ती कथा दिली आहे ती अशी —

नारदाचा एक भाचा होता. त्याचे नाव पर्वत. कित्येकदा तोही नारदाबरोबर भटकायला असे. त्या दोघांचा एक करार होता. एकमेकांनी कुठलीही गोष्ट एकमेकापासून लपवून ठेवायची नाही. ते दोघे एकदा सृंजय राजाकडे गेले. राजाने त्यांना आपल्या अतिथिशाळेत ठेवून घेतले. त्याने त्या दोघांचा पाहुणचार उत्तम होईल अशी व्यवस्था केली आणि त्या व्यवस्थेवर देखरेख करण्यासाठी राजकन्या दमयंतीची नेमणूक केली.

दमयंती त्या दोघांच्या सेवेला सादर झाली. तिची सेवा घेता घेता नारदमुनीचे वैराग्य लटपटले. दृष्टीत वेगळीच चमक आली. दमयंतीलाही त्यात काही गैर वाटले नाही आणि मग नारदमुनी तिच्यावर चक्क प्रेम करू लागले.

मात्र हे सगळे चालले होते, पर्वताच्या डोळ्याआड; पण पर्वत काही दुधखुळा नव्हता. थोड्याच दिवसांत ते प्रेमप्रकरण त्याला समजले. त्याची तक्रार प्रेमाबद्दल नव्हती. ती होती नारदाने करार मोडल्याबद्दल! तोही तपोधनच होता. त्याने नारदाला सरळ शाप देऊन टाकला—'मामा, तुझे तोंड माकडाचे होईल.'

आणि खरेच तसे झाले. नारद आरशात पाहतो, तो त्याला स्वतःच्या जागी एक हुप्प्या दिसला. मग त्याने पर्वताची क्षमा मागितली. म्हणाला, की 'दमयंतीपासून मला वंचित करू नकोस.' पर्वतही काही दीर्घद्वेषी नव्हता. त्याने आपला शाप परत घेतला. नारद पुनश्च माकडाचा माणूस बनला. तसे घडले म्हणूनच दमयंतीने त्याच्या गळ्यात माळ घातली.

नारदाच्या शुभमंगलाची ही वार्ता पुराणावरून कळते; पण पुढे त्या दोघांचा संसार कसा झाला, त्याबद्दल मात्र पुराणाचे मौन आहे.

नारद अन् पर्वत ही वैदिक जोडी आहे. तशीच नारद अन् तुंबरू ही दुसरी जोडी पुराणातून आढळते. तुंबरू हा पट्टीचा गायक होता. त्याची मैफल म्हणजे देवांच्या श्रवणेंद्रियाला मेजवानी. नारदाला मात्र त्या कलेतले काही गम्य नव्हते. त्यामुळे लक्ष्मी एकदा त्याला खोचून बोलली. 'तुंबरू बघ कसा राग-रागिण्या आळवतो. कसे धुंद करतो सगळ्यांना. नाही तर तू! तुला सारेगम सुद्धा येत नाही.' नारदाला ते बोलणे लागले. तो तुंबरूला म्हणाला, 'उद्यापासून तू मला गाणे शिकवायचे.' त्याप्रमाणे तालीम सुरू झाली. नारद

सा,रे,ग,म चे आरोह-अवरोह करू लागला. ताना-पलटे घेऊ लागला. त्याने अगदी कसून मेहनत सुरू केली. तो मेहनत करीत असता एक दिवस काही स्त्रिया तिथे प्रकट झाल्या. हाडावर मांस नाही. मुखावर कांती नाही. त्यांचे दर्शनही दृष्टीला उद्विग्न करणारे! नारदाने तंबोऱ्यावरची बोटे थांबवून त्यांना विचारले. ' तुम्ही कोण ? आणि तुमचे माझ्याकडे काय काम ? ' त्यावर त्या स्त्रिया म्हणाल्या.

" तू ज्यांना आळवितोस त्या रागिण्या आम्ही! भैरवी, तोडी, गुजरी अशा नावाच्या! आम्ही किती सुंदर होतो! किती लोभस होतो! पण तुझ्या या अशुद्ध अन् कर्णकटू गायनाने आमची अशी दशा केली. "

" अरेरे! फार वाईट गोष्ट झाली, आता पुढे काय ? "

" आम्ही तुंबरूला विनंती करायला आलो आहो. तो एकदा गायला, त्याने आमच्यावर एकदा स्वरांची हळुवार फुंकर घातली, की आम्ही पुनश्च सतेज सुंदर होऊ. "

नारदाला त्या गोष्टीची लाज वाटली. त्याने तंबोरा गवसणीत घातला. तो सरळ उठून श्वेतद्वीपात विष्णूकडे गेला आणि त्याला म्हणाला.

" नारायणा, तू सकलकलांचा सम्राट! मला आधी गाणे शिकव. "

त्यावर विष्णू हसला अन् त्याला बोलला.

"शिकवीन, पण आता नव्हे. पुढे कृष्णावतारात! त्यावेळी तू द्वारकेला ये. "

त्याप्रमाणे घडले. रुक्मिणी, सत्यभामा अन् जांबवंती या कृष्णस्त्रिया गानविद्येत निष्णात होत्या. त्यांनी नारदाला साग्रसंगीत गाणे शिकवले आणि नारद हा उत्कृष्ट गायक बनला. पण त्याने गायनाच्या सर्व प्रकारांत पारंगत होऊनही शृंगार-करुणांची गाणी कधी गायिली नाहीत. तो भगवंताची भजनेच गात राहिला. गायन हेच त्याने ईश्वरभक्तीचे साधन ठरविले. नारद स्वमुखानेच ही गोष्ट सांगत आहे—

**देवदत्तामिमां वीणां स्वर ब्रम्हविभूषिताम् ।**
**मूर्छयित्वा हरिकथां गायमानश्चराम्यहम् ॥**

' देवाने दिलेली अन् स्वरब्रह्माने विभूषित झालेली ही वीणा वाजवीत आणि तिच्या स्वरावर हरिकथा गात गात मी त्रैलोक्यात भ्रमण करीत असतो. '

नारद हा ऋषीपेक्षा भक्त म्हणूनच विशेष प्रसिद्ध आहे. प्रातःस्मरणात परम भागवत म्हणूनच त्याचा उल्लेख केला आहे. या परम भागवताने भक्तिसूत्र लिहून भक्तीचे शास्त्र निर्माण केले. भक्तीची व्याख्या सांगताना तो म्हणतो —

**सा त्वस्मिन्परमप्रेमस्वरूपा अमृतस्वरूपा च।**

'परमेश्वरावर उत्कट प्रेम करणे हे भक्तीचे स्वरूप आहे. ती अमृतरूपही आहे.'

हे सूत्र सांगून तो भक्तीची महती पुढीलप्रमाणे सांगतो —

भक्ती हे ज्ञानाचेच नव्हे, तर कर्म आणि योग यांचेही अंतिम साध्य आहे. भक्तीत वर्ण, शिक्षण, कुल, संपत्ती, कर्म इत्यादी गोष्टी गैरलागू आहेत. भक्तीत सर्वांना मुक्त प्रवेश आहे. भक्तीमुळे मनाचे समाधान होते. सर्व वासनांचा नाश होतो. भक्ताला अखंड शांतीचा लाभ होतो.

महाभारतात अनेक ठिकाणी नारदाची म्हणून काही मते उद्धृत केली आहेत. त्यातले एक वचन मला उल्लेखनीय वाटले. फार महत्त्वाचा एक नीतिसिद्धांत नारदाने त्यात सांगितला आहे.—

**स्वमांसं परमांसेन यो वर्धयितुमिच्छति ।**
**नारदः प्राह धर्मात्मा नियतं सोऽवसीदति ॥**

'धर्मात्मा नारद सांगतो, की जो माणूस दुसऱ्याच्या मांसाने स्वतःचे मांस वाढवू इच्छितो, तो खात्रीने नरकात जातो.'

ψ ψ ψ

# मिथिलेची जन्मकथा

' मिथिलायां प्रदीप्ताया न मे दह्यति किंचन '—मिथिलेला आग लागली तरी तिच्यात माझे काहीसुद्धा जळणार नाही, ही उक्ती सुप्रसिद्ध आहे. तुम्ही म्हणाल, मिथिलेवर तुळशीपत्र ठेवायला निघालेला कोण हा खल पुरुष ? पण तो खल पुरुष नाही; तर साधु पुरुष आहे. त्याचे नाव जनक.

तो मिथिलेचा राजाच होता; पण त्याची अहंता अन् ममता गळाली होती. कुठल्याही भौतिक पदार्थात त्याची आसक्ती उरली नव्हती. तो स्थितप्रज्ञ बनला होता. त्या अवस्थेतले त्याचे हे उद्‌गार आहेत.

कोण्या एका काळी हा सारा प्रदेश म्हणजे नुसती दलदल होती. जसे कच्छचे धगधगीत रण, तशी ही ओली दलदल. अग्नीने त्या भूमीला कधी जिभोळी लावलीच नव्हती. तिथे माणसाचे पाऊल उमटत नव्हते. गायी-गोधन चरत नव्हते. पाखरे किलबिलत नव्हती. ऋतू येत अन् जात. संवत्सरे लागत अन् उलटत; पण त्या भूमीवर अंकुर उगवत नव्हता, फूल उमलत नव्हते. फक्त पाणथळ जमिनीत जगणारे जलजंतू तेवढे तिथे संसार मांडून राहिले होते.

पण एक दिवस कालचक्राने पलट खाल्ली. त्या भूमीचा ललाटलेख उजळला. शतपथ ब्राह्मणात ती कथा आहे. विदेह माथव हा सरस्वतीच्या तीरावरचा एक राजा. कालपुरुषाने त्याला प्रेरणा दिली. त्याला यज्ञीय अग्नी लपवून ठेवण्याची इच्छा झाली. त्याने तो अग्नी आपल्या मुखात लपवला. गोतम रहूगण हा त्याचा पुरोहित. तो आहुती देण्यासाठी यज्ञशाळेत येतो, तर अग्निकुंड थंड ! त्याने राजाला हाक मारली. पण राजा काही बोलेना ! बोलेल कसा ! अग्नी होता ना त्याच्या मुखात !

मग गोतमाने वेदसूक्तांनी अग्नीचे स्तवन मांडले. पण कशाचा काही उपयोग होईना. शेवटी एका मंत्रात 'तं त्वा घृतस्नुवीमहे' असे शब्द आले. घृत म्हणजे अग्नीचे वर्म. ते नाव ऐकताच अग्नीला विदेह माथवाच्या मुखात राहवेना. त्याने टपकन् खाली उडी मारली; पण पाहतो तो घृत नव्हतेच. नुसताच शब्दांचा खेळ. त्यामुळे तो कुंडात न शिरता सरळ पुढे चालू लागला. त्याने पूर्व दिशा धरली. त्याला धरण्यासाठी विदेह माथव त्याच्या मागून पळू लागला. त्याच्यामागून गोतम रहूगण धावत सुटला. अशी ती त्रिमूर्तींची शर्यत सुरू झाली.

अग्नी मार्गातली भूमी जाळीत, भाजीत चालला. वहाळ–ओहळ आटवीत चालला. नदी नाले सुकवीत चालला. कोसांमागून कोस, योजनांमागून योजने मागे पडली; पण अग्नीची धाव थांबली नाही. राजा अन् राजपुरोहित दमले, भागले; पण त्यांनी अग्नीचा पिच्छा सोडला नाही,

शेवटी मार्गात आडवी आली सदानीरा नदी. ती नावासारखीच होती. सहाही ऋतूंत दुथडी वाहणारी. अग्नी तिला मात्र आटवू शकला नाही. तिथे त्याची धाव खुंटली. अग्नी थांबला. पण अग्नीच्या त्या दीर्घ प्रवासामुळे त्या विस्तीर्ण प्रदेशात एक महान् क्रांती घडली. जाळल्याभाजल्यामुळे भूमीची कांती बदलली. पोत सुधारला. ती उत्पादनक्षम बनली. बियाण्याची वाट पाहू लागली. आता ती भूमी सस्यांकुरांनी लसलसणार होती. लतावल्लींनी लवलवणार होती. त्या भूमीवर जे हे नवयुग निर्माण होणार होते, त्याला कोणी तरी नेता, नवा शास्ता हवा होता. अग्नीने ते काम विदेह माथवाकडे द्यायचे ठरवले. अग्नी त्याला म्हणाला,

"तू इथे वस्ती कर. इथे तुझे राज्य निर्माण कर. ही भूमी फलपुष्पसंपन्न

अन् धनधान्यसमृद्ध कर. ”

विदेह माथवाने ती आज्ञा मानली. तो परत सरस्वतीच्या तीरावरच्या आपल्या मायभूमीकडे माघारला नाही. त्याने श्रमिक आणले, किसान आणले, कारूनारू आणले, बीजे आणली, रोपे आणली आणि त्या अग्निपूत भूमीची कसून मशागत सुरू केली.

गोतम रहूगणानेही राजाची संगत सोडली नाही. तो त्या नवनिर्मितीच्या कार्यातही त्याचा पुरोहित बनला. त्याचा मागोवा घेत घेत मग आणखी काही ऋषि-मुनी त्या प्रदेशात आले. त्यांचे आश्रम उभारले गेले. या ऋषींच्या वेदमंत्रांनी ते सारे वातावरण दुमदुमून गेले. यज्ञशाळा स्थापल्या गेल्या. यज्ञातल्या अग्नीचा सुवासिक धूर आभाळात पसरू लागला. अशा प्रकारे भारताचा हा पूर्व प्रदेश आर्यसंस्कृतीच्या कक्षेत दाखल झाला. सरस्वतीच्या तीरावरचा आर्यधर्म सदानीरेच्या तीरावर आपला अंमल चालवू लागला. तिथे एका समृद्ध आणि उत्कर्षाभिमुख अशा विदेह जनपदाची स्थापना झाली.

विदेह माथवाचा राजवंश आणि गोतम रहूगणाचा ऋषिवंश असे दोन्ही वंश तिथे सुरू झाले. गोतमाच्या वंशातलाच एक पुरुष म्हणजे अहल्येचा पती गौतम. तिथल्या ब्रह्मपुरीत त्याचा आश्रम होता, असे स्कंदपुराणाच्या हिमवत् खंडात सांगितले आहे. तिथे आजही गौतमकुंड नावाचे एक कुंड दाखवतात. जवळच अहियारी किंवा अहिला नावाचे एक गाव आहे. अहल्या शापग्रस्त होऊन पडली ती तिथे. स्कंद पुराणातला हा उल्लेख खरा मानला, तर राम प्रभूने आपल्या पदस्पर्शाने अहल्येचा उद्धार केला. ते ठिकाण म्हणजे अहियारी हे गाव होय. हे ठिकाण सांप्रतच्या दरभंगा जिल्ह्यात म्हणजे मिथिला प्रदेशातच येते.

विदेह माथवाच्या वंशात निमी नावाचा एक पुरुष निर्माण झाला. त्याने खूप राज्यविस्तार केला. यज्ञही बरेच केले. असाच एक त्याचा यज्ञ चालू असता तो पुरा होण्याच्या आतच त्याचा मृत्यू ओढवला. त्याच्या पोटी पुत्र-संतान नसल्यामुळे ‘ पुढे काय ’ हा प्रश्न उत्पन्न झाला. पण त्या यज्ञासाठी जमलेले ऋत्विज ऋषी काही लेचेपेचे नव्हते. त्यांना इतिहास अवगत होता. दुष्ट वेनराजाला हुंकारांनी ठार केल्यानंतर तिथल्या ऋषींनी त्याच्या देहाचे मंथन केले आणि त्यातून पृथू नावाचा एक महाप्रतापी पुत्र उत्पन्न झाला.

म्हणून मग ऋषींनी निमीच्या बाबतीतही तेच केले. ते त्यांचे मंथनकर्म वाया गेले नाही. त्यातून एक सुलक्षणी पुत्र निर्माण झाला. मंथनातून निर्माण झाला म्हणून ऋषींनी त्याचं नाव मिथी ठेवले. हा मिथी पुढे 'बापसे बेटा सवाई' ठरला. बापाने मिळवलेल्या राज्यात त्याने आणखी नव्या प्रदेशाची भर टाकली आणि आपल्या त्या विशाल राज्यासाठी एक नवी राजधानीही उभारली. तिला मिथिला असे नाव मिळाले.

मिथिलेच्या या संस्थापकाचे, त्याच्या पुरुषार्थी बाण्याचे यशोगान करताना मग महाभारताने म्हटले —

**सर्वे राजन् मैथिलस्य मैनाकस्येव पर्वता:।**
**निकृष्टभूता राजानो वत्सा ह्यनडुहो यथा॥**

'मैनाकाच्या पुढे जसे इतर पर्वत खुजे दिसतात, डरकाळ्या फोडणाऱ्या पुष्ट बैलापुढे वासरे जशी क:पदार्थ वाटतात, तसेच सर्व राजे या मिथी राजापुढे तुच्छ, निकृष्ट दिसतात.'

मिथीने आपल्या राज्याच्या चतु:सीमा कुठवर नेऊन भिडविल्या, ते बृहद्‌विष्णुपुराणाच्या मिथिलाखंडात सांगितले आहे—

**कौशिकीं तु समारभ्य गंडकीमधिगम्य वै।**
**योजनानि चतुर्विंश व्यायाम: परिकीर्तित:॥**
**गंगाप्रवाहमारभ्य यावद्धैमवतं वनम्।**
**विस्तार: षोडश: प्रोक्तो देशस्य कुलनंदन॥**
**मिथिला नाम नगरी तत्रास्ते लोकविश्रुता॥**

'एका अंगाने कौशिकी नदी, दुसऱ्या अंगाने गंडकी नदी. या दोन नद्यांमधला चौवीस योजने म्हणजे शहाण्णव कोसांचा प्रदेश. गंगानदीच्या तीरापासून हिमालयाच्या तराईपर्यंतचा सोळा योजनांचा म्हणजे चौसष्ट कोसांचा प्रदेश. एवढा सगळा भूविस्तार म्हणजे मिथिलेचे राज्य. आणि त्या राज्याची लोकविश्रुत राजधानी म्हणजे मिथिला.'

मिथिलेचा हा प्राचीन भूगोल आजही बदललेला नाही. इतिहासाबद्दल डॉ. लक्ष्मण झा म्हणतात की, मिथिलेचा इतिहास पाच हजार वर्षांहूनही प्राचीन आहे.

काही विद्वानांच्या मते मिथिला शब्द मिथ = युग्म यावरून बनला आहे. इतिहासातही त्याला प्रमाण आहे. नाभाग वंशाच्या विशाल नामक राजकुमाराने वैशालीची स्थापना केली होती; पण कालांतराने त्याची शक्ती घटली अन् विदेहांनी वैशाली जिंकून ती आपल्या राज्यात सामील केली. मग त्या दोन्ही देशांची मिळून मिथिला ही राजधानी बनली.

पुढच्या काळात मिथिलेला तीरभुक्ती म्हणू लागले. त्या शब्दाचा अर्थ नदीतीर-संबंधित प्रदेश असा आहे. पश्चिमेला गंडकी अन् पूर्वेला कौशिकी या दोन नद्यांच्या तीरांनी बांधलेली भुक्ती म्हणजे प्रदेश तो तीरभुक्ती अशी त्याची व्युत्पत्ती कनिंगहॅम सांगतो. तीरभुक्तीचाच अपभ्रंश म्हणजे तिरहूत. हाच अपभ्रष्ट शब्द पुढे रूढ झाला. सांप्रत बिहारमधल्या दरभंगा, मुजफ्फरपूर सारन आणि चंपारण्य या जिल्ह्यांना तिरहूत म्हणूनच ओळखतात.

मिथिलेची विद्यापरंपराही फार मोठी आहे. मीमांसा, सांख्य, न्याय, वेदान्त ज्योतिष, आगम, व्याकरण इत्यादी शास्त्रातले प्रकांड पंडित मिथिलेत गाजून गेले. भारताच्या पूर्व भागात पंडिती परंपरेस्तव मिथिलेलाच अग्रमान द्यावा लागेल. विदेहाचा राजा जनक हाही ' शाब्दे परे च निष्णात ' होता. व्यासपुत्र शुकाचार्य याला अध्यात्मविद्येच्या प्राप्तीसाठी मिथिलेत येऊन जनकाचे पाय धरावे लागले, ही गोष्ट सर्वश्रुत आहे. गोतम रहूगणाचा उल्लेख प्रस्तुत लेखाच्या प्रारंभी झालाच आहे. तो महाज्ञानी आणि सूक्तद्रष्टा होता. मिथिलेच्या विद्यापरंपरेचा उगम त्याच्यापासूनच होतो. आणखी बरीचशी नावे डॉ. तेज नारायण लाल यांनी आपल्या ' मैथिली लोकगीतोंका अध्ययन ' या ग्रंथात सांगितली आहेत —

विश्वामित्र हा गायत्री मंत्राचा द्रष्टा याच भागातला. कौशिकी हे तिथल्या नदीचे नाव त्याच्या कुलावरूनच पडले आहे. मनूच्या जोडीचा स्मृतिकार याज्ञवल्क्य कुसुमा या गावचा रहिवासी. सांख्य दर्शनकार कपिलमुनी याचा आश्रम इथल्या ककरौड गावी होता. हे स्थान दरभंगा जिल्ह्यात आहे. उदयनाचार्य हा करिअन ( दरभंगा ) गावचा रहिवासी. त्याच्यासारखा प्रौढ विद्वान् तोच, अशी त्याची ख्याती. त्याने जे अनेक ग्रंथ लिहिले, त्यातला मेरुमणी म्हणजे न्यायकुसुमांजली हा ग्रंथ. ईश्वरसिद्धी हा त्या ग्रंथाचा विषय. वाचस्पतिमिश्र वेदान्ती आचार्य झंझारपूर येथे राहत असे. त्याचा भामती हा ग्रंथ

आजही विद्वन्मान्य आहे. पूर्वमीमांसा शास्त्राचा प्रणेता जैमिनी ऋषी हाही मिथिलावासीच होय. याशिवाय शबरस्वामी, कुमारिल भट्ट, पक्षधर मिश्र, मीमांसाशास्त्रातला ज्याचा 'तृतीयः पंथा' प्रसिद्ध आहे तो मुरारी. अशी किती नावे सांगावी ! या सर्व मोठ्यांनी मिथिलेलाही मोठे केले. दार्शनिक विश्वात मिथिलेची कीर्ती अजरामर करून टाकली.

पण मिथिला खरी धन्य झाली, ती प्रभू रामचंद्राची सासुरवाड म्हणून. जनकनंदिनी सीतेचे माहेर म्हणून. पण या धन्यतेतही एक सूक्ष्म शल्य आहे. सीता ही रघुकुलाची कुलवधू म्हणून एकदा जी मिथिलेकडे पाठ करून गेली ती गेलीच. ती आयुष्यात कधी मिथिलेत माघारली नाही. त्या वेल्हाळी राजस-बाळीच्या पुनर्दर्शनासाठी मिथिलेतली सान–थोर प्रजा आसुसली होती; पण तिला त्या माहेरवाशिणीची येती पावले कधीच दिसली नाहीत. सीता माहेरी गेली; पण ती अगदी वेगळ्या ठिकाणी ! त्या माहेराने तिला मायेच्या हातांनी झेलले नाही, तर आपल्या पोटात गडप केले !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 59324 वि: निबंध
स्थळ 9058 नों दि 92/3/00

# ढोला मारू

पूगल या नावाचा एक देश होता. तिथल्या राजाचे नाव पिंगल. एकदा त्याच्या राज्यात दीर्घकालीन अवर्षण पडले. सर्वत्र दुष्काळ माजला. त्यामुळे बरीच माणसे मेली अन् बरीच देशोधडीला लागली. राजालाही एक दिवस दुपारची भ्रांत पडली. शेवटी त्यालाही राज्याबाहेर पडावे लागले. आपली राणी अन् एकुलती एक मुलगी मारवणी यांच्यासह पिंगल राजा निर्वासित झाला.

नरवर गढाचा राजा नल हा पिंगल राजाचा मित्र होता. 'कठिण समय येता' तो त्याच्या 'कामी' आला. पिंगल राजाला त्याने सन्मानपूर्वक आश्रय दिला. नलराजाला एक मुलगा होता. त्याचे खरे नाव होते साल्हकुमार; पण राजा-राणी त्याला ढोला या लाडक्या नावाने हाका मारीत. वय अवघे तीन वर्षांचे. पण रूप देखणे अन् बुद्धी तल्लख. त्यामुळे पिंगल राजाच्या राणीला तो फार आवडला. ती राजाला म्हणाली, की 'ढोलाला आपण जावई करून घेऊ.' त्यावर पिंगल म्हणाला, 'अहो, आपली मारू अवघी दीड वर्षांची. एवढ्यात कसला जावयाचा विचार करता?' राणी म्हणाली, 'असू दे. लहान

वयात लग्न करायची चाल आहे आपल्यात. '

मग पिंगलाने तो प्रस्ताव नलराजापुढे मांडला. नलराजाने त्याला रुकार भरला. मग एक दिवस बाहुलाबाहुलीचे लावतात, तसे ढोला-मारूचे लग्न लागले. पण ढोलाच्या वाट्याला तो एक बऱ्यापैकी खेळ झाला अन् मारूला तर कशा-चीच काही गंधवार्ता नव्हती.

काही कालाने पिंगलाच्या राज्यातला दुष्काळ संपला. राजा-राणी नलराजाचा निरोप घेऊन आपल्या राज्यात गेली. मारू अद्याप सासरी राहण्याच्या योग्य-तेची नसल्यामुळे त्यांनी तिलाही बरोबर नेले.

मारवणी अर्थात् मारू बापाच्या घरीच वाढली. यथाकाल वयातही आली. मग तिला समजले, की आपले लग्न ढोलाशी होऊन चुकले आहे. इकडे नलराजाला वाटले, की ढोलाचे लहान वयातले लग्न म्हणजे तो एक भातुकलीचा खेळ होता. ते लग्न खरे मानायचे कारण नाही. म्हणून त्याने ढोलाची नवी सोयरीक ठरवली. माळव्याच्या राजाची कन्या मालवणी ही त्याने ढोलासाठी वधू नेमस्त केली आणि एका शुभमुहूर्तावर ढोलाचे लग्न थाटामाटात करून टाकले. ढोला पुन्हा एकदा चतुर्भुज झाला. मालवणी ही मोठी लीलालाघवी होती. तिने अल्पावधीतच ढोलाचे मन जिंकले. त्या उभयतांचा संसार सुरळीत चालू झाला.

पिंगल राजाला हा नवा बनाव कळला नाही. त्याने नलराजाला निरोप धाडला, ' तुमची सून आता प्रौढ झाली आहे. तिला सासरी घेऊन चला. वृक्षावर वेल चढवा. ' पण तो निरोप नलराजाला किंवा ढोलाला मिळूच शकला नाही. कारण मालवणीला आपल्या नवऱ्याचे शैशवातले शुभमंगल कळून चुकले होते. ती आपल्या उरावर सवत येऊ द्यायला तयार नव्हती. तिने त्या दृष्टीने सगळा बंदोबस्त करून ठेवला होता. त्यामुळे मारूकडून येणाऱ्या निरोपांपैकी एकही निरोप किंवा त्यातला एक शब्दसुद्धा ढोलाच्या कानापर्यंत पोचू शकला नाही.

मारूचे बिचारीचे डोळे वाट पाहून पाहून थिजले. विरहाची आग तिला अहोरात्र जाळू लागली. एवढ्यात एका सौदागराने बातमी आणली, की ढोला दुसरे लग्न करून नव्या प्रेमपाशात अडकला आहे. ती बातमी म्हणजे मारूच्या काळजावर कुऱ्हाडच ठरली. तिने अन्नपाणी तोडले. ती वाळून कोळ झाली.

पिंगल राजाला आपल्या पोरीची ती दशा पाहवेना. त्याने मग काही गाथा-गायक ढाढी एकत्र केले अन् त्यांना पिंगल देशात पाठवले.

त्यांनी मारूची विरहव्यथा काव्यबद्ध केली आणि त्या राज्यात तिचे गायन आरंभले. हळू हळू राजवाड्यापर्यंत त्यांनी मजल मारली. एका रात्री ते ढोलाच्या महालाजवळ पोचले आणि बाहेरच्या भिंतीशी बसून गाऊ लागले. मारूची करुण कथा त्यानी तशाच प्रकारच्या मांड रागात सुरू केली. ढोलाचे लक्ष त्यांच्याकडे जायला वेळ लागला नाही. त्याने ती कथा जिवाचे कान करून ऐकली. त्याला वाटले, की यात काहीतरी रहस्य आहे अन् त्याचे धागेदोरे आपल्या जीवनाला येऊन भिडले आहेत.

दुसऱ्या दिवशी सकाळीं त्याने ढाढींना आपणापुढे बोलावून आणले आणि त्यांना फर्मावले, की ‘ खुले खुले काय ते सांगा. ’ त्यांनीही मग आडपडदा न ठेवता मारूची हकीकत आणि तिचा संदेश त्याला ऐकविला. त्या वेळीं त्याला कळले, की मालवणीच्या आधी मारूशी आपले लग्न झाले आहे. मग तो व्यथित झाला. उत्कंठित झाला. त्याने मनाशी निर्धार केला, की मारूची भेट घ्यायची अन् तिचे अश्रू आपल्या शेल्याने पुसायचे. पण मालवणी त्याच्या जीवनाला वेष्टून बसली होती. ती त्याला क्षणभरही विसंबत नव्हती. तिला टाळायचे कसे हीच आता त्याला विवंचना लागली.

अखेर एका रात्री मालवणीला गाढ झोप लागली आहे असे पाहून तो अंतःपुरातून सटकला. उंटाच्या पागेत जाऊन त्याने एक सांडणी बाहेर काढली अन् तिच्यावर मांड ठोकली. तो सुसाट पूगल देशाच्या मार्गाला लागला.

मालवणी थोड्याच वेळात दचकून जागी झाली. पाहते तो शेजारची उशी सुनी ! तिला वाटले, की घात झाला. पक्षी पिंजऱ्यातून उडाला. पण ती तशी स्वस्थ बसणारी नव्हती. तिच्या अंगी बऱ्याच कळा होत्या. ती पक्ष्यांना बोलते करीत होती अन् त्यांच्या करवी आपली कामे करून घेत होती. तोच उपाय तिने आता अवलंबिला. तिने एका पोपटाला पढवून ढोलाच्या मागावर धाडला.

चंदेरी अन् बूंदी या दोन नगरांच्या मध्यावर असलेल्या एका तलावाकाठी ढोला विसावला होता. एवढ्यात तो पोपट समोरच्या डहाळीवर बसला अन् बोलला, ‘ युवराज तुम्ही निघून आलात. पण तिकडे तुमची लाडकी मालवणी विरहज्वराने मृत्युपंथाला लागली आहे. ’

पण आता ढोलाला मालवणीची चीडच आली होती. तो ताडकन् उत्तरला. 'पोपटा, जा ! तुझी धनीण मेली, की तिची उत्तरक्रिया उरकून टाक.'

मालवणीने ढोलाच्या मार्गात आणखीही काही विघ्ने उपस्थित केली; पण ढोला त्या सगळ्यातून पार पडला. कारण त्याच्या निश्चयाचे बळ दांडगे होते.

ढोला पूगलच्या राजवाड्यापुढे येताच एकदम सगळा नूर पालटून गेला. राजा-राणीचा आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. मारूला तर जणू कैवल्यच लाभले. मग ढोलावर आदरातिथ्याचा पाऊस पडला. मारूने त्याच्या भोवती आपल्या प्रणयभावनांचे सूत्रवेष्टनच केले.

पंधरा दिवस असा सासुरवाडचा पाहुणचार घेऊन ढोला आपल्या देशाला परतला. त्याची खरी वरात आता निघाली. सांडणीवर पुढे तो अन् त्याच्या मागे त्याला कव घालून मारू ! असा तो त्यांचा प्रवास सुरू झाला. त्या उभयतांच्या सोबतीला त्यांचे दीप्तिमान् मनोरथही होते.

पण त्याच वेळी त्यांचे दुर्दैवही आपले डाव खेळायला लागले होते. एका रात्री त्यांचा जिथे मुक्काम पडला, तिथे कुठल्यातरी बिळातून नाग उपटला अन् मारूला डसून निघून गेला. त्याच्या मागोमाग मारूचा प्राणपक्षीही उडून गेला. ढोलाच्या मांडीवर उरले ते तिचे काळे-निळे अचेतन कलेवर ! ढोलाला मारू म्हणजे आरशांतले धन ठरले. तो म्हणाला, 'आता आपले तरी काय उरले !' त्यानेही तिच्या चितेवर स्वत: जळून जायचे ठरवले. त्या दृष्टीने तो तयारीला लागला.

पण त्या अश्राप दंपतीचे सुदैवही काही पाठ फिरवून बसले नव्हते. ते एका योग्याच्या रूपाने तिथे प्रकट झाले. मारूला चितेवर चढवायच्या आतच त्या योग्याने मंतरलेले पाणी मारूच्या कलेवरावर शिंपडले. त्यासरशी मारूने आपले कमलनेत्र उघडले. पाठोपाठ ती उठूनही बसली. तिला पुनर्जन्म अन् ढोलाला त्याचे प्रेमनिधान मिळाले.

थोडा काल विसावून ती दोघे पुनश्च मार्गस्थ झाली. योग्य वेळी राजधानीला पोचली. राजा-राणीने आपल्या सुनेचे सहर्ष स्वागत केले. तो सुखसोहळा पाहिल्यावर मालवणीला कळून चुकले, की सवत साहिली नाही तर या संसारातून आपले अस्तित्वच निपटून निघेल. म्हणून मग तिने आपला पवित्रा बदलला. ती मारूला म्हणाली. 'तू माझी मोठी बहीण अन् मी धाकटी. आपण

दोघी गळयात गळा घालून नांदू.' ढोलाला तरी आणखी काय हवे होते! त्याचे सर्व मनोरथ पुरले.

इथे ढोला मारूची कथा संपली. या कथेला सांप्रत निव्वळ लोककथेचे स्वरूप आले असले, तरी या कथेतली पात्रे कल्पित नाहीत. इतिहासाने आपल्या नोंदवहीत त्यांची नावे टिपून ठेवली आहेत. ढोला हा कछवाहा राजपुतांच्या वंशातला होता, हे आता संशोधकांना गवसले. हे एक राजघराणे होते अन् त्याच्या तीन शाखा ग्वाल्हेर, दुबकुंड अन् नरवरगढ या ठिकाणी राज्य करीत होत्या. हा वंश रामपुत्र कुश याच्यापासून आपली उत्पत्ती सांगतो. ढोलाचा बाप नलराजा हा १० व्या शतकात होऊन गेला असावा असे अनुमान आहे. नरवरगढ त्यानेच बांधला असे 'नैणसीरी ख्यात' या काव्यात म्हटले आहे.

मध्य प्रदेशात शिवपुरीपासून २६ मैलांवर नरवरगढ लागतो. सिंधुनदी (काली सिंध) या गडाला लागूनच वाहते. समुद्रसपाटीपासून त्याची उंची हजार फूट भरते. गडावर पोचायचे तर ४०० पायऱ्या चढाव्या लागतात. पाच मैलांचा त्याचा विस्तार आहे. किल्ल्याची तटबंदी लाल दगडाची आहे. आत प्रवेश करायला चार महाद्वारे ओलांडावी लागतात. प्रमुख महाद्वाराचे नाव दूल्हाद्वार असे आहे. हा दुल्हा म्हणजे ढोलाच असला पाहिजे. इथल्या कचहरी महालात एक लाकडी सिंहासन आहे. ते नलराजाच्या कारकीर्दीतले असल्याचे सांगतात. या महालाच्या पुढे राण्यांची स्नानगृहे म्हणून काही छुपे महाल दिसतात. गडावर तलाव बरेच आहेत. त्यांपैकी मकरध्वज हा तलाव सर्वांत विस्तीर्ण आहे. इथल्या जलसंपदेविषयी एक प्रसिद्ध लोकगाथा आहे ती अशी --

**आठ कुआँ नौ बावली सोलहसौ पनिहार।**
**एनके आवत जातते गढमे रहत बहार॥**

'आठ विहिरी, नऊ बावड्या अन् सोळाशे पाणी भरायला आलेली माणसे. त्यांच्या येण्याजाण्याने गढावर सदैव बहार असते.'

याचा वास्तव अर्थ असा, की आसपासच्या भागात पाण्याचा दुष्काळ असल्यामुळे तिथली सर्व माणसे पाणी भरायला गडावर यायची.

ढोला-मारूंनी राज्य केले, ते या गडावर राजधानी मांडून. या दोन्ही

प्रेमिकांवर अनेक लहानमोठी काव्ये निर्माण झाली आहेत. मध्य प्रदेश, ब्रज-मंडल, उत्तर प्रदेश आणि राजस्थान हे भूप्रदेश ढोला-मारूच्या काव्यानी गुंजत असतात. प्रत्येक प्रदेशातले त्या कथेचे पर्यायही वेगळे आहेत. 'ढोला-मारूरा-दूहा' हे त्यापैकी पहिले काव्य. कुशललाभ नामक एका जैन कवीने त्यात चौपायांची भर घालून त्या कथेच्या छिन्नभिन्न प्रसंगांची संगती लावली.

ढोला-मारूचे लांबलचक आख्यान गाणारा गायकांचा एक स्वतंत्र वर्गच आहे. त्यांपैकी गायकांना दुलैये म्हणतात अन् त्यांची री ओढणाऱ्यांना सुरैये म्हणतात. प्रस्तुत गायनाला चिकारा, ढोलक अन् मंजीरा या वाद्यांची साथ असते. प्रस्तुत काव्यात राजस्थानी संस्कृतीचे अन् जनजीवनाचे जितके सजीव चित्रण आढळते, तसे ते दुसऱ्या कोणत्याही मध्ययुगीन काव्यात आढळत नाही.

ψ ψ ψ

# मूर्तिकलेची अनोखी सृष्टी

नुकताच पुण्यात गणेशोत्सव पार पडला. शेकडो गणेशमूर्ती पुण्याच्या चौकाचौकातून बसल्या आणि वाजतगाजत विसर्जित झाल्या. एकच गणपती, पण त्यांची अवस्थाने किती वेगवेगळी ! वेषभूषा तरी किती भिन्न भिन्न ! ' यादृशी भावना कुर्यात् ' तसा तसा तो भक्तांच्यासाठी, कलाकारांच्यासाठी बनला. गणपतीबरोबर आरती करून घेण्यासाठी इतरही अनेक देव स्वर्गातून खाली उतरले. दहा दिवस कशी धमाल उडून गेली ! हा सारा उत्सव-समारंभ म्हणजे आपल्या मूर्तिपूजक प्रवृत्तीचा उत्साहजनक आविष्कार होता.

होय, आपण हिंदू मूर्तिपूजक आहोच ! इतर धर्मीयांनी कितीही हिणवले, निखंदले, तरीही आहो. आम्हाला त्याबद्दल मुळीच लाज वाटत नाही. इतकेच नव्हे, तर अन्य धर्मीयांनीही आम्हांला हिणवताना जरा जपूनच बोलायला हवे ! खिस्त, मेरी अन् संत यांच्यापुढे गुढघे टेकणे, त्यांना हार घालणे अन् त्यांच्यापुढे मेणबत्त्या जाळणे ही मूर्तिपूजा नव्हे, तर दुसरे काय आहे ? हाजी अन् पीर यांच्या कबरी सजवणे अन् त्यांच्यापुढे ऊद जाळणे याला तरी

दुसरे कोणते नाव द्यायचे ? मूर्तिपूजा हा मानवी स्वभावाचा एक भाग आहे, त्याला कोण निवारू शकणार ! कोणत्याही धर्माला आणि संप्रदायाला मूर्तिपूजा चुकलेली नाही आणि चुकवायची तरी कशाकरिता ? तिची तशी गरजच आहे. ती मुळीं अव्यक्ताकडे, निराकाराकडे नेणारी पहिली अन् सोपी पायरी आहे. म्हणूनच लो. टिळकांनी म्हटले, ' मूर्तिपूजा कित्येकांस जरी हीन वाटत असली, तरी ज्या कल्पना बाह्येंद्रियास अगोचरच असतात, त्या सामान्य लोकांस विशद करून दाखविण्यास प्रतिमेसारखे दुसरे साधनच नाही. '

स्वामी विवेकानंदांनीही वेगळ्या शब्दात मूर्तिपूजा आवश्यकच मानली आहे. ते म्हणतात, ' ज्या मूर्तिपूजेने जगाला श्रीरामकृष्ण परमहंस दिले, त्या मूर्तिपूजेत सहस्र दोष शिरले असले, तरीही ती मी उराशी बाळगीन ! '

माणसाच्या स्वभावात आदर अन् आतिथ्य या ज्या दोन भावना उपजतच असतात, त्यातूनच मूर्तिपूजेचा उगम झाला आहे. पूज्य, समर्थ अन् आदरणीय अशा विभूतीचे दर्शन घ्यावे, वाटेल तसे त्याचे अतिथ्य करावे, त्याच्या पूजेला अन् शक्य तर सेवेसाठी अवसर मिळावा, असे माणसाला नेहमी वाटत असते.

त्याच न्यायाने त्याला परमेश्वराचीही पूजा-सेवा करावीशी वाटते. पण तिथे आड येते, ते परमेश्वराचे निर्गुणनिराकारपण ! ईश्वराचा तो अव्यक्तपणा त्याच्या बुद्धीला पेलत नाही आणि श्रद्धेला भावत नाही. म्हणून मग तो आपल्या मनाने परमेश्वराचा काही तरी आकार कल्पितो आणि मग तशा त्या आकारात त्याला आपल्यापुढे स्थापून त्याच्या पूजेचे सुख-समाधान अनुभवतो.

जगात मूर्तिकलेने जन्म घेतला, तो माणसाच्या या आदरातिथ्य भावनेची तृप्ती करण्यासाठी. त्यातूनच पुढे या देशात अनंत मूर्तींची सृष्टी निर्माण झाली. जिकडे पाहावे तिकडे मूर्तीच मूर्ती ! घरात, देवळात, कोनाड्यात, झाडाखाली, नदीतीरी ! असंख्य कलाकारांनी हा मूर्तींचा पसारा सर्वत्र वाढवला.

मध्ययुगात भारतावर मूर्तिभंजकांची संक्रांत आली. त्यांनी अनेक ठिकाणच्या असंख्य मूर्तींच्या ठिकऱ्या ठिकऱ्या केल्या. त्या विध्वंसातच कृतकृत्यता मानली. अशा भग्न मूर्तींचे अवशेष सांप्रत भारतभर विखरून पडले आहेत; पण असा हा प्रचंड प्रमाणावर मूर्तिसंहार होऊनही अजून या देशात

लक्षावधी नव्हे, कोट्यवधी मूर्ती सर्वत्र उभ्या असलेल्या दिसतात. काही प्राचीन, काही मध्ययुगीन, तर काही अर्वाचीन! मूर्तिनिर्मितीला अजूनही खंड पडलेला नाही.

मूर्तिपूजेचा इतिहास प्रदीर्घ आहे. वेदकालीन आर्य लोक मूर्तिपूजा करीत की नाही, याविषयी 'अस्ति-नास्ति' मते आहेत; पण त्याच काळात भारतातले अवैदिक लोक मात्र कोणत्यातरी रूपाने मूर्तिपूजा करीत, याविषयी दुमत नाही. सनपूर्व अडीच-तीन हजार वर्षांच्या सुमारास सिंधू नदीच्या परिसरात जी संस्कृती नांदत होती, ती अवैदिकांची होती. ते लोक मूर्तिपूजक होते, असे निश्चयाने म्हणता येते. त्यांची एक विशिष्ट मूर्ती उपलब्ध झाली आहे. ध्यानमग्न शिवाशी तिची तुलना करता येते. तो देव आसनमांडी घालून बसला आहे. त्याला तीन मुखे, तीन डोळे आणि दोन शिंगे आहेत. सिंधु संस्कृतीच्या लोकांचा तो प्रमुख उपास्य देव असावा, असे संशोधक म्हणतात.

वैदिकांचे देवही निराकार नव्हते. त्यांच्या रूप-गुण-पराक्रमांचे वर्णन वेदात आढळते. पण ते लोक त्या देवांची पत्र-पुष्पांनी पूजा करीत नव्हते, तर अग्नीत आहुती देऊन त्यांची उपासना करीत होते. मात्र कालांतराने वैदिक आर्यही मूर्तिपूजेच्या मार्गावर आले. यजुर्वेद आणि ब्राह्मण ग्रंथ यात तसे उल्लेख आढळतात. तैत्तिरीय संहितेत सुवर्णपुरुषाचे विधान आहे आणि तैत्तिरीय ब्राह्मणात भारती, महती व मही या तीन सुवर्णमय देवींचा निर्देश आहे. रात्री आणि काल यांच्या प्रतिभा निर्माण करून त्या विटेवर स्थापाव्या, असे शतपथ ब्राह्मणातही सांगितले आहे.

धर्मसूत्रातले उल्लेख तर याहून स्पष्ट आहेत. बालकाच्या निष्क्रमण संस्कारात देवप्रतिमेची पूजा करावी, कोणत्याही मूर्तीपुढे शौचादी कृत्ये करू नयेत, देवमंदिर समोर दिसल्यास त्याला उजवी घालून पुढे जावे, देवघरात स्थापलेली मूर्ती फुटली, तुटली तर प्रायश्चित्त करावे, अशासारखे ते उल्लेख आहेत.

अगदी प्रारंभी जी देवमंदिरे निर्माण झाली, ती शिव-विष्णूची नसून यक्षांची होती असे म्हणतात. असा एक महान् यक्ष मध्यप्रदेशात पवाया येथे सापडला आहे. त्याची निर्मिती सनपूर्व पहिल्या शतकातली आहे. ती मूर्ती यक्षभक्तांनी पूजेसाठी बनविली होती, हे निर्विवाद आहे. महाभारतातही

मूर्तिपूजेचे अनेक उल्लेख आढळतात. अठरा पुराणेही मूर्तिपूजेचाच प्रपंच करतात. मनू तर तिचे विधानच करतो. ब्रह्मचाऱ्याने अन् गृहस्थाने नित्य देवपूजा करावी, असे तो सांगतो.

प्रतीकात्मक वस्तूच्या पूजेतून मूर्तिपूजा पुढे आली. प्रारंभी 'दगडांच्या देवा। बगाड नवस' अशीच स्थिती होती. प्रत्येक गावात किंवा गावाबाहेर एखाद्या वृक्षतळी देव म्हणून काही दगडधोंडे मांडलेले असत. त्यावेळी त्यांच्यासाठी मंदिरांचा निवारा निर्माण झाला नव्हता. म्हणून अशा जागांना देवस्थाने म्हणत. असे देवत्व पावलेले अन् वर्षातल्या ठराविक दिवशी पूजा-नैवेद्य ग्रहण करणारे दगड आजही अनेक गावांतून दृष्टोत्पत्तीस येतात. या दगडांचेच पुढे मूर्तीत रूपांतर झाले.

बौद्ध धर्माच्या सुरुवातीच्या काळात ते लोकही प्रतीकपूजकच होते. बुद्धाचे प्रतीक म्हणून ते स्तूप, चैत्य, बोधिवृक्ष अन् दगडावर कोरलेली बुद्धाची पदतले यांचीच पूजा करीत. बुद्धाची मूर्ती घडवावी, ही कल्पना स्फुरली बौद्धांच्या महायान संप्रदायाला आणि त्याला तशी मूर्ती घडवून दिली ती गांधार देशातल्या शिल्पकाराने. ही मूर्ती मानवी आकाराची, सुबक आणि सुंदर होती. तिच्या पाठोपाठ मग शतकानुशतके शेकडो बुद्धमूर्ती घडत राहिल्या.

या मूर्तिकलेची विशिष्ट शैली होती. ग्रीक मूर्तिकलेच्या अनुकरणातून ती निर्माण झालेली होती. इ. स. च्या पहिल्या दोन शतकांत गांधार ( काबूल-कंदाहार ) देशावर ग्रीकांचे आधिपत्य होते आणि सिंध-पंजाबही त्यांच्याच हाताखाली होते. त्याच कालात ग्रीक अन् भारतीय कलांचा परस्परपरिचय झाला. त्या काळी बुद्ध हा देवाधिदेव बनला होता. तत्कालीन कलाकारांनी त्याच्या मूर्ती घडवताना यत्किंचितही आळस केला नाही. या गांधारशैलीचा आशय भारतीय असला, तरी छबी ग्रीकांची होती, अर्थात् विदेशी होती.

हा विदेशीपणा निघून गेला तो मथुरा प्रदेशात. कुशाणांच्या कालात मथुरा ही मूर्तिकलेचे महान् केंद्र बनली. मथुरेच्या मूर्ती जैन-बौद्ध संप्रदायांचा आशय घेऊन साकारल्या. चैत्य, स्तूप, त्यांच्याभोवतीचे दगडी कठडे आणि स्तंभ यांच्यावर मूर्तिसृष्टीचा विस्तार झाला. कुशाण कालात यक्षपूजेचे बरेच प्रस्थ होते. विशेषतः जैनांनी यक्षपूजेला प्राधान्य दिले होते. त्यामुळे त्या

कालात अनेक यक्षमूर्ती निर्माण झाल्या. कुबेर हा यक्षांचा अधिपती. तो राजाधिराज ! ‘ कुबेराय वैश्रवणाय ’ असे आपणही मंत्रपुष्पाच्या वेळी उच्च स्वरात म्हणतो. हा कुबेरही त्या कलाकारांनी मूर्तिरूपात घडवला. ठेंगणा देहबांधा, पोट जणू ‘ सुखाचे पेलले दोंद, ’ हाती रुपयांचा कसा, मस्तकी मुकुट असा तो कुबेर पाषाणातून प्रकटला. त्याच कालात जैन तीर्थंकरांच्या मूर्तीही खूप निर्माण झाल्या.

गुप्त साम्राज्याचे युग हे मूर्तिसाम्रज्याचेही युग ठरले आहे. आकृतीचा घाटदारपणा, अलंकरणांची शोभा आणि विविध आधिदैविक अन् आध्यात्मिक आविष्कार यांनी गुप्तकालीन मूर्तिकला कळसाला चढली. या कालातल्या उभ्या अन् बैठ्या बुद्धमूर्ती जगातल्या कलाकोविदांना आश्चर्यवत् ठरल्या आहेत. विशेषतः बुद्धमूर्तींबद्दल हे म्हणता येते. अंडाकार मुखमंडल, शांत-गंभीर मुद्रा, नासाग्र दृष्टी, अभयहस्त, लहरदार चीवर. अशा त्या बुद्धमूर्तीकडे पाहताना मन कलात्मक सुखाच्या भावनेने काठोकाठ भरून जाते.

सातव्या-आठव्या शतकांत भारतीय कलाकारांनी बुद्ध आणि बोधिसत्व यांच्यावरचे लक्ष कमी करून ते शिव-पार्वतींकडे वळविले. वेरूळच्या कैलास लेण्यांत शैव मूर्तिकला सर्वांगी विस्तारली. शांत-सुंदर अशा शिवमूर्ती अजंटा, घारापुरी इत्यादी लेण्यांतून घडवल्या गेल्या. ध्यानमग्न शिव, पार्वतीचे पाणिग्रहण करणारा शिव, भिक्षाटनी शिव, त्रिपुरांतक शिव, अशी अनेक शिवरूपे आणि शैव कथाप्रसंग मूर्तिरूपाने व्यक्त दशेला आले. आणि घारापुरीच्या त्रिमूर्ती शिल्पाने त्या शैव सृष्टीवर हिरेजडित मुकुट चढविला.

मध्यप्रदेशात देवगढ, उदयगिरी इ. ठिकाणी वैष्णव संप्रदायाने आपली कलाकारी प्रकट केली. उभा चतुर्भुज विष्णू, शेषशायी विष्णू, नरनारायण, गजेंद्रमोक्ष, इ. वैष्णव आशय आणि कथासंकेत तिथे साकारले. मध्यप्रदेशाप्रमाणेच गुजरात आणि राजस्थान याप्रदेशांतही विष्णुमूर्तींचा सुकाळ झाला. या सर्व मूर्तींची कमनीयता आणि सुकुमारता दृष्ट लागावी अशी आहे.

ओडिसात भुवनेश्वर येथे ज्या नारीमूर्ती घडल्या, त्यांची विविध प्रकारची कलात्मक केशरचना पाहून घ्यावी. खजुराहोच्या नारीमूर्ती इतक्या नाजूक, इतक्या तुकतुकीत, की टिचकी मारली तर रक्त निघेल असे वाटावे. दक्षिणेत कलाकारांनी बेलूर येथे उभ्या केलेल्या मदनिका अनेक विश्वामित्रांचा तपोभंग

करू शकतील, इतक्या लावण्यवती आहेत. तिकडील कलाकारांनी अशा अनेक देवमूर्ती सायुध, सशक्तिक अन् सपरिवार घडविल्या आणि अनेक आध्यात्मिक प्रतीकांचा समुच्चय असलेला नटराज आकाराला आणून आपल्या कलामंदिरांचा कळशाध्याय रचला.

ψ ψ ψ

# वेदार्थाचे उपबृंहण

आपली अठरा पुराणे म्हणजे तो एक महासागरच म्हणायला हवा. या महासागराच्या पोटात काय आहे असे विचारण्यापेक्षा काय नाही, असे विचारा! सप्तस्वर्ग, सप्त पाताळ, सकल जीवसृष्टी या सगळ्या गोष्टी त्या महासागराच्या पोटात आहेत. त्यातली एकेक कथा म्हणजे एकेक प्रवाळद्वीपच. अशी शतसहस्र द्वीपे अन् बेटे. या बेटांवर देव, दानव, मानव, यक्ष, गंधर्व, या सर्वांना पुराणांनी एकत्र खेळवले आहे. त्यांची जीवने अन् कर्तृत्वे एकमेकांत गुंफून टाकली आहेत.

पुराणांतल्या या कथांचे प्रकार दोन. एक औरस अन् दुसरा दत्तक. औरस कथा पुराणानी स्वतः जन्माला घातल्या आहेत अन् दत्तक कथा वेदांनी त्यांच्या मांडीवर बसविल्या आहेत. वेद म्हणाले. 'आमच्या घरच्या या कथाकन्या तोकड्या आहेत, रोडक्या आहेत; तुम्ही त्यांना आशयाचे दूध-तूप पाजून बाळसेदार करा. आम्ही जे परोक्ष बोललो आहो, रूपकांच्या, प्रतीकांच्या भाषेत बोललो आहो, ते आमचे बोलणे तुम्ही जगाला उलगडून दाखवा, याविषयी

एक श्लोक आहे तो असा—

इतिहासपुराणाभ्यां वेदं समुपबृंहयेत् ।

' इतिहास अन् पुराणे यांच्या द्वारे वेदार्थाचे उपबृंहण करावे. ' म्हणजे वेदार्थांतले अपुरेपण दूर करून त्यातला सारगम्य आशय अनेक अंगांनी परिस्फुटित करावा. या उपबृंहणाची दोन उदाहरणे या लेखात सांगायची आहेत.

पहिले उदाहरण ' अहल्यायै जारः । ', इंद्र हा अहल्येचा जार झाला, असे अनेक वैदिक ग्रंथांत सांगितले आहे. इतकेच नव्हे तर तो सहस्राक्ष होता, असेही सांगितले आहे. पण फक्त एवढेच. त्यापुढे अवाक्षर नाही. पुराणांना या दोन त्रुटित संदर्भांच्या पायावर उपबृंहणाची इमारत उभी करायची होती. स्वर्गसाम्राज्याचा अधिपती असलेला इंद्र जारकर्म करतो, यातला आशय हुडकून सांगायचा होता. ते कार्य त्यांनी पुढील कथेच्या द्वारे केले—

अहल्या ही ब्रह्मदेवाची कन्या. ती त्याने गोतम ऋषीला दिली. गोतम जनस्थानात आश्रम बांधून राहिला. तो मोठा तपी होता. सारा दिवस तो तपच करी अन् अहल्या त्याची मनोभावे शुश्रूषा करी. गोतमाचे ते तप दिशीमाशी वाढू लागले. ते उग्र, अत्युग्र बनत चालले. त्यामुळे स्वर्गात देवांना धाक वाटू लागला. ते म्हणाले, ' हे भलतेच प्रकरण दिसते. हा ऋषी आपल्या तपःप्रभावाने एखादे वेळी सारे जनस्थान भस्म करून टाकायचा. याला काहीतरी उपाय किंवा अपाय केलाच पाहिजे. '

गोतमाचा तपोभंग करावा हे एकमताने ठरले. पण तो कसा करायचा, याविषयी मात्र निर्णय होईना. मग कोणी तरी म्हणाले. ' क्रोधाने तपोभंग होतो. ' पण पुढचा प्रश्न असा आला, की गोतमाला क्रोध आणायचा कसा ? आपणाला जे कळले, ते काय गोतमाला ठाऊक नसेल ? त्यावरही एकाने शक्कल लढवली, ' अहो, माणसाची काही मर्मस्थाने असतात. त्यांवर आघात झाला, की माणसाच्या क्रोधाचा अंगार फुलतो. बायको हे पुरुषाचे नाजूक मर्म. तेव्हा तुम्ही अहल्येचा विनयभंग करण्याचा प्रयत्न करा. गोतम क्रोधाने पेटून उठेल. अन् ते झाले, की त्याचे तप भंगेल. '

हा उपाय देवांना एकदम पटला. पण गोतमाच्या क्रोधाची शिकार व्हायचे

कोणी ? कारण तिथे प्राणाशीच गाठ ! तेव्हा देव इंद्राला म्हणाले, ' हे काम तूच करायचेस. तूच ही जबाबदारी उचलायचीस. देवराज्याची साजूक सुखे उपभोगायला तू अन् बळी जायला आम्ही, हे नाही चालायचे.' हा देवांच्या मनीचा आशय होता.

शेवटी इंद्र त्या कर्माला प्रवृत्त झाला. स्वतःच्या विषयवासनेच्या तृप्तीसाठी नव्हे, तर देवराष्ट्राच्या सुरक्षिततेसाठी ! तो गोतमाचे रूप घेऊन अहल्येच्या आश्रमात शिरला. अहल्येला वाटले, की आपला नवराच आला. मग त्याने जे मागितले, ते अहल्येने त्याला दिले. गोतम तपस्येहून परत येतो, हे पाहून त्याची आपल्यावर सहज नजर पडेल अशा बेताने इंद्र आश्रमाबाहेर आला. मग जे काय व्हायचे ते पूर्वकल्पनेनुसार झाले. गोतम रागाने रुद्र बनला. त्याने तात्काळ त्या दोघांनाही शाप दिला. ' अहल्ये, जारिणी, तू शिळा होऊन पड.' ' देवाधमा इंद्रा, तू सहस्रभगांकित हो ! ' मग ती दोघेही गोतमाच्या चरणाला लागली. त्यांनी अपराध कबूल करून उःशापाची याचना केली. गोतमाने तोही त्यांना दिला. ' तू भविष्यकाळी त्रेतायुगात श्रीरामाच्या पदस्पर्शाने उद्धरशील. ' असे त्याने अहल्येला सांगितले. अन् इंद्राच्या सहस्र-भगांचे सहस्र नेत्र करून टाकले.

अशा त्या शाप-उःशापांच्या प्रदानाने गोतमाचा तपोभंग झाला अन् देवांची काळजी दूर झाली.

प्रस्तुत कथेत इंद्राच्या जारकर्माचे वेदांनी न दाखवलेले कारण उपस्थित करून आणि ते कारण लोकोपकारक होते, असे सांगून पुराणांनी इंद्राचे ते पाप सौम्य अन् अपरिहार्य ठरवले. पण लोकोपकारासाठी असले म्हणून काय झाले ? पाप ते केव्हाही पापच ! त्याला प्रायश्चित्त हे मिळालेच पाहिजे. तसे झाले नाही, तर लोकव्यवहार अनिर्बंध होतील, ही जाणीव पुराणकर्त्यांच्या मनात ठाम होती. म्हणून त्यांनी इंद्रालाही शाप मिळण्याची व्यवस्था केली. तो शापही शहाणपणाने देववला. इंद्र सहस्रनेत्र होता, हा वैदिक संकेत. त्याला शाप मिळाला, तो सहस्रभगांचा अन् उःशाप मिळाला तो त्या भगांच्या जागी डोळे येण्याचा. अशा प्रकारे पुराणांनी तो वैदिक संकेत चरितार्थ केला.

हे झाले त्या वैदिक उद्गाराचे उपबृंहण. पण तरीही त्यात काहीतरी गोम राहिलीच. ' अहल्यायै जारः ' या वैदिक वाक्याचा एवढा साधा, सरळ अर्थ

असेल का ? विद्वानांच्या मनात शंका डोकावली. ते त्या वाक्याच्या अंतरात खोलवर शिरले. त्याच्या तळाशी त्यांना आणखी एक प्राकृतिक अर्थ गवसला. आणि मग मीमांसक कुमारिल भट्टाने आपल्या तंत्रवार्तिकात तो विशद करून सांगितला.

" अहो, हा इंद्र म्हणजे स्वर्गाधिपती इंद्र नव्हेच मुळी ! तो आहे आदित्य म्हणजे सूर्य. शतपथाने तसे स्पष्टच सांगितले आहे—' य एष सूर्यस्तपति एष उ एव इंद्रः ! ' त्यावरून इंद्र–अहल्येची कथा ही एका नैसर्गिक घटनेची द्योतक ठरते. या कथेतला गोतम म्हणजे चंद्र समजायचा. रात्रीला चंद्राची भार्या म्हणतात. अर्थात् अहल्या म्हणजे रात्र ठरते. ' अहर्लीयते यस्यां सा '—जिच्या ठिकाणी दिवस लय पावतो, ती अहल्या, अशी तिची व्युत्पत्ती आहे. या अहल्येचे इंद्राने अर्थात् सूर्याने घर्षण केले म्हणजे काय केले ? तर तिला जीर्ण करून टाकले. ' जीर्ण करतो तो जार ' अशा व्युत्पत्तीने सूर्य त्या रात्रिरूप अहल्येचा जार ठरला. ' आदित्योऽत्र जार उच्यते रात्रेर्जरयिता ' हे त्याविषयीचे कुमारिल भट्टाचे वचन. सूर्य उगवला, की रात्र जीर्ण होते, विलयाला जाते, ही दैनंदिन घटना आहे अन् ती सर्वांच्या परिचयाची आहे. उगाच त्या बापड्या इंद्राला दोष देऊ नका. वेद परोक्षाने बोलले ते असे वाच्यार्थाने घेऊ नका. "

आता दुसरी गोष्ट. तीही इंद्रासंबंधीच आहे ' विश्वरूपं जघानेंद्रः '— ' इंद्राने विश्वरूपाला ठार मारले, ' हा वेदातला उच्चार ! पण त्यावर प्रश्न येतो, तो हा की ' का मारले ? ' इंद्राला काय वेड लागले होते, का तो कुणी दुष्ट, जुलमी सम्राट होता ? वैदिक सूक्तांवरून तसे दिसत नाही. मग असे का घडले ? पण वेद त्याविषयी मौन बाळगून आहे.

या मौनाला वाचा फोडली पुराणांनी. त्यांनी विचार केला, की विश्वरूपाच्या हातून तशीच काहीतरी आगळीक घडली असली पाहिजे. काय बरे असेल ती ? मग त्यांनी कल्पनाजाल पसरले अन् एक कथा बांधली, ती अशी—

विश्वरूप हा त्वष्ट्याचा पुत्र होता. त्याला तीन शिरे, तीन डोळे अन् तीन तोंडे होती. एका तोंडाने तो दारू पिई. दुसऱ्या तोंडाने सोमरस प्राशन करी. अन् तिसऱ्या तोंडाने अन्न खाई. असा विचित्र होता हा देव. पण त्याला देव तरी कसे म्हणायचे ? त्याचा बाप ब्राह्मण होता; पण आई दैत्य कुळातली

होती. त्याचा ओढा बापाच्या कुलापेक्षा आईच्या कुलाकडे अधिक होता. ब्राह्मण असल्यामुळे तो वेदशास्त्रसंपन्न होता, तसाच मोठा याज्ञिकही होता.

त्याच्या काळात इंद्रावर अन् पर्यायाने सगळ्या स्वर्गावर परचक्र आले. वृत्रासुर माजला आणि तो स्वर्ग जिंकायला निघाला. त्याच्याशी सामना द्यायचा, तर इंद्राला अधिक सामर्थ्य मिळवायला हवे होते. ते मिळवायचे तर मोठा यज्ञ करायला हवा होता. अन् यज्ञ करायचा तर त्यासाठी जाणकार पुरोहित हवा होता.

बृहस्पती हा देवांचा नित्याचा पुरोहित. पण इंद्राने आपल्या वैभवकालात त्याचा अपमान केल्यामुळे तो स्वर्ग सोडून निघून गेला होता. इंद्रावर असे हे दुहेरी संकट होते. अशा वेळी कोणीही सांडलेल्यात शोधतो. इंद्रानेही तसेच केले अन् संकल्पित यज्ञासाठी त्यातल्या त्यात बरा म्हणून विश्वरूपाला पुरोहित बनवले. आणि मग इंद्राच्या यज्ञाला प्रारंभ झाला. असुरपराभवासाठी तो यज्ञ असल्यामुळे इंद्राला त्याच्याविषयी विशेष आस्था होती.

पण विश्वरूपाची बुद्धी ठीक नव्हती. तो यज्ञातला हविर्भाग देवांना देण्याच्या ऐवजी चोरून असुरांनाच चारू लागला. त्या हविर्भागाने देवांचे बळ वाढायचे ते राहून असुरच अधिक माजाला आले. भाकरी एकाची खायची अन् चाकरी दुसऱ्याची करायची, असा तो कृतघ्नतेचा प्रकार होता. इंद्राला विश्वरूपाची ती चोरी उमगली. त्या चोरीकडे काणाडोळा करणे त्याला शक्यच नव्हते. कारण तो त्याच्या अन् समस्त देवलोकाच्या जीवनमरणाचा प्रश्न होता. म्हणून त्याने खड्ग उपसले अन् विश्वरूपाची तिन्ही शिरे एका घावात उतरून टाकली.

आता या वधाबद्दल कोण बरे दोष देईल! कारण ‘ आत्मानं सततं रक्षेत् ’ ही मान्य नीती आहे. वेदार्थाचे पुराणांनी केलेले उपबृंहण ते हे. ‘ विश्वरूपं जघानेंद्रः ’ या एका वाक्यावर पुराणकार सुताने स्वर्गाला चढले. पण ते एवढ्यावरच थांबले नाहीत. त्यांनी म्हटले, की देवराष्ट्राच्या रक्षणार्थ इंद्राने आपला प्रच्छन्न शत्रू मारून टाकला हे ठीक. पण ब्रह्महत्येचे पाप त्याने भोगलेच पाहिजे. कोणत्याही चांगल्या हेतूसाठी अपकृत्य करू नये; केल्यास त्याचे प्रायश्चित्त भोगायला तयार राहावे, हा मुद्दा आम्ही नाही सोडणार!

इंद्राने पुराणांचा हा आग्रह मानला आणि प्रायश्चित भोगूनच तो त्या महादोषातून मुक्त झाला.

यावरून एक गोष्ट स्पष्ट होते ती ही, की पुराणांनी नीतीच्या मर्यादा तोडायला कुठेही प्रोत्साहन दिले नाही अन् त्या कामी साक्षात् देवेंद्राचीही गय केली नाही. इंद्रासारख्या लोकोत्तर पुरुषाला सैल सोडण्यात एक फार मोठा धोका होता तो हा —

**यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः ।**

# राजा गोपीचंद

भर्तृहरी अन् गोपीचंद हे दोन अद्‌भूत पुरुष लोकमानसात जोडीने वावरतात. नाथपंथाशी त्या दोघांचाही संबंध आहे.

गोपीचंद हा बंगालचा राजा. 'बाव्वन्न किल्ल्यांची बादशाही, छप्पन्न कोसांचे राज्य आणि त्रेपन्न करोड महसूल' अशी त्याच्या वैभवाची ख्याती. प्रतिमदन असे त्याचे पुरुषलावण्य. रतीला लाजवतील अशा त्याच्या सोळाशे सुंदर राण्या. सारी विलाससुखे सेवेला हात जोडून उभी. मैनावती ही त्याची आई आणि बीरम ही एकुलती बहीण. बीरम कंचनपूरच्या राजाला दिली होती. तिथे तिचे ठीक चालले होते. इथे गोपीचंदाचे ठीक चालले होते. कुठे उणेपणाला जागाच नव्हती. गोपीचंद विषयसुखात नुसता डुंबत होता. पण एक दिवस कालचक्र बदलले.

राजमाता मैनावती त्या साऱ्या राज्यवैभवात राहूनही अलिप्त होती, उदास होती. तिला वाटे, काहीतरी देहाचे सार्थक व्हावे. त्यासाठी काही साधन करावे. अशा स्थितीत एक दिवस जालंदरनाथ त्या राज्यात आला. तो म्हणजे

तपस्तेजाचा जळता गोळा होता. मैनावतीने त्याला राजवाड्यात आणून त्याचे उत्तम अतिथ्य केले. जातीने त्याचे हवे नको पाहिले. जालंदरनाथ तिच्या-वर प्रसन्न झाला. म्हणाला, की ' तुला दीक्षा देतो, ज्ञानाच्या मार्गाला लावतो. ' मैनावती तयार झाली. तिने त्याच्याकडून दीक्षा घेतली. ती गुरुसेवेसी अत्यंत रत झाली. त्याच्याकडून नित्य ज्ञानकथा ऐकू लागली.

पण कोण्या दुष्टाने गोपीचंदाचे कान फुंकले. मैनावती अन् जालंदर यांच्या आध्यात्मिक एकांताचा भलताच अर्थ त्याला सांगितला. लोणी अन् आग यांचा दृष्टांत दिला. गोपीचंदाला तेवढे पुरले. त्याने जालंदरनाथला उचलून एका पडक्या विहिरीत फेकून दिले. मैनावती त्यामुळे बहुत दुःखी झाली. जालंदरनाथाला मात्र सुख-दुःखाची कसली बाधाच नव्हती. जिथे फेकले, तिथेच तो ध्यान लावून बसला.

योगायोग असा, की या घटनेनंतर थोड्याच दिवसात गोरखनाथ तिथे पोचला. मैनावतीने त्याला राजवाड्यात आणून घडला वृत्तान्त सांगितला. गोरख-नाथाने गोपीचंदाला चार खडे बोल ऐकवले. ' तुझे हे कृत्य अधमपणाचे आहे ' असेही म्हटले. गोपीचंद अवाक् झाला, पश्चात्तापाने पोळला. म्हणाला, की ' मी आत्ताच्या आत्ता त्या अंधकूपातून जालंदरनाथाला वर काढतो. ' पण गोरखनाथाने म्हटले. ' राजा तसे करणे म्हणजे तो विस्तवाशी खेळ ठरेल. तू नको त्या वाटेला जाऊ. '

मग गोरखनाथ त्या कामाला जुडला. त्यालाही ते काम अवघडच वाटत होते. त्याने प्रथम गोपीचंदाचे दोन धातुपुतळे तयार केले. त्यातला एक पुतळा विहिरीच्या काठावर ठेवून जालंदरनाथाची प्रार्थना केली, ' महाराज, कृपा करून वर या. ' जालंदरनाथाचे ध्यान थोडेसे विचलित झाले. त्याने विचारले, ' कोण प्रार्थना करतो आहे ? ' गोरखनाथाने पुतळ्याच्या मागे उभे राहून उत्तर दिले ' गोपीचंद ! ' जालंदरनाथाने लगेच शापवाणी उच्चारली. ' जळून भस्म हो ! ' त्यासरशी तो धातुपुतळा आतषबाजीतल्या रावणासारखा उभा पेटला. पाठोपाठ त्याची राख जमिनीवर पडली. गोरखनाथाने दुसरा पुतळा त्या जागी ठेवून पुन्हा तशीच प्रार्थना केली. तोही पुतळा भस्मसात् झाला. तिसऱ्या वेळी त्याने खुद्द गोपीचंदाला उभे केले. पुन्हा तीच प्रश्नोत्तरे. पण आता जालंदराचा क्रोध शमला होता. त्याने पुरते डोळे उघडून गोपी-

चंदाकडे पाहिले आणि शापाऐवजी वर उच्चारला, ' अमर हो जाव ! '

गोपीचंदाने विहिरीत उतरून जालंदरनाथाला वर काढले. तो त्याच्या चरणाला लागून म्हणाला, ' तुम्ही आता माझे गुरु ! मला दीक्षा देऊन कृतार्थ करा. ' जालंदरनाथाने गोपीचंदाला गुरुमंत्र देऊन त्याच्या मस्तकी वरदहस्त ठेवला. त्यासरशी गोपीचंद पूर्ण बदलला. त्याने राज्य सोडले अन् निकराचे वैराग्य वरले. नाथपंथाचा सांप्रदायिक वेष करून अन् हाती कटोरा घेऊन तो मैनावतीच्या पुढे उभा राहिला. म्हणाला, की ' आई ! परमार्थसाधनाला जातो. मला आशीर्वाद दे. '

मैनावतीला हे सारे अघटित वाटले. ती स्वतः परमार्थमार्गी असली, तरी आपल्या पुत्राने राज्य सोडून भणंग व्हावे हे तिला पटेना. राज्यत्याग करून जाऊ नको, म्हणून ती त्याला विनवू लागली. तिचे शब्द गोपीचंदाच्या कानावर आदळले; पण मनात शिरले नाहीत. आता तो निर्धाराचा मेरुपर्वतच बनला होता. शेवटी मैनावती निकरावर आली.—' जाणारच असलास तर माझ्या दुधाची किंमत देऊन जा ! ' ती म्हणाली. त्यावर गोपीचंदाने म्हटले.

" आई, मला एक कट्यार आणून दे. मी माझा कलेजा कापून तुझ्यापुढे ठेवतो; पण माझ्याकडे दुधाचे मूल्य मागू नको. पुत्राला सर्व ऋणातून मुक्त होता येईल; पण आईच्या दुधाचे ऋण त्याला कधीही फेडता येणार नाही."

मग मैनावतीचा निरुपाय झाला. ती स्तब्ध बसली. तीच पडत्या फळाची आज्ञा गोपीचंदाने घेतली. पण तेवढ्याने भागले नव्हते. त्याच्या सोळाशे सुंदर राण्या कल्लोळ करून उठल्या. गोपीचंद राज्यत्याग करून निघाला म्हणजे त्यांच्या देहातला प्राणच निघून चालला होता. कसे त्यांनी ते सहन करावे ! अन् प्रजेने तरी राजाचा वियोग कसा सोसावा ? पण गोपीचंदाने हे सारे मायापाश निर्धाराने तोडून टाकले.

गोपीचंद निघाला. आता तो कदलीवनात जाणार होता, योगसाधना करणार होता, सिद्धी मिळवणार होता अन् कधीच परत येणार नव्हता. पण अजून एक पाश उरला होता. बीरम ही त्याची लाडकी बहीण. तिच्यावर त्याचे अपार प्रेम. त्याला वाटले, की एकदा शेवटचे तिला भेटून जावे. त्या विचारासरशी त्याने बीरमच्या सासरचा रस्ता धरला. मजल दरमजल करीत तो कंचनपुरात पोचला. बीरमच्या वाड्यापुढे उभा ठाकला. कोणी गोसावी आला

आहे, असे जाणून बीरमची दासी भिक्षा वाढायला पुढे आली. गोपीचंद तिला म्हणाला, 'तू उष्टया अन्नावर वाढलेली आहेस. तुझ्या हातची भिक्षा मी घेणार नाही. तुझ्या मालकिणीला बोलाव.' दासीला काहीतरी शंका आली. तिला वाटले, हा राजबिंडा पुरुष खरा गोसावी नसावा. तिने तसे जाऊन बीरमला सांगितले. बीरम बाहेर येताच गोपीचंदाने तिला नावाने हाक मारली. ती चपापली. तो म्हणाला 'अग, मला ओळखलं नाहीस? मी तुझा भाऊ आहे.'

बीरमला ते पटेचना. तिला वाटले, माझा भाऊ बंगालचा राजा आहे. तो भीकमाग्या गोसावी कसा होईल? ती त्याला कडवटपणे बोलली, 'भलते सलते बोलू नको. भिक्षा घे अन् चालता हो.' पण गोपीचंद तिथून हलेना. त्याला दुसरे तिसरे काही नको होते. फक्त तिने ओळखायला हवे होते. पण तेच घडेना.

ती त्याची परीक्षा घ्यायला निघाली. एकेक खुणेच्या गोष्टी विचारू लागली. तिने लग्नातले विचारले, वरातीतले विचारले, अनेक गोष्टींतले विचारले. गोपीचंदाने त्या सगळ्या प्रश्नांची बिनचूक उत्तरे दिली. साऱ्या खुणा पटल्या. आता खरे म्हणजे तिची खात्री पटायला हवी होती. पण ती मख्खच राहिली. तिने ठरवले, की लटक्याला घरापर्यंत पोचवायचे!

लग्न होऊन सासरी येताना तिला माहेराहून एक हत्ती आंदण म्हणून मिळाला होता. तिने माहुताला हुकूम दिला, की 'तो हत्ती सोडून या गोसाव्याच्या अंगावर घाल!' हत्ती सुटला, दणादणा धावत गोपीचंदाच्या अंगावर आला. पण दुसऱ्याच क्षणाला आश्चर्य घडले. हत्तीने जवळ येऊन सोंडेने गोपीचंदाला प्रणाम केला आणि त्याला उचलून आपल्या पाठीवर घेतले. त्या मोनजातीलाही आपल्या मूळच्या धन्याची ओळख पटली; पण बहिणीला मात्र भावाची ओळख अजून पटेना.

मात्र हत्तीच्या घटनेने ती हादरली होती. मग तिने एक पत्र लिहिले अन् ते पोपटाच्या तोंडी घेऊन त्याला माहेरी पाठवले. पोपट उडाला अन् थोड्याच वेळात उत्तर देऊन आला. उत्तरी लिहिल होते, की 'घटना सत्य आहे.' मग मात्र बीरम द्रवली, ओशाळली अन् भावाच्या गळा पडली. 'दादा, काय रे ही तुझी दशा!' म्हणून तिने गळा काढला. पण एकच हुंदका अन्

पुढे सगळे स्तब्ध. बीरमचे प्राणपाखरू केव्हा उडून गेले ते गोपीचंदालाही कळले नाही

मग राजवाड्यात एकच आकांत उडला. नंतर सारे कंचनपुरच शोकसागरात बुडून गेले. गोपीचंदाला तो मायापाश अशा रीतीने तुटायला नको होता. त्यामुळे तोही सैरभैर झाला. मग तो तिथे न थांबता सरळ मच्छिंद्रनाथाच्या वास्तव्यस्थानी गेला. आपली शोककथा त्याने मच्छिंद्रनाथाला ऐकविली. मच्छिंद्रनाथाने गोपीचंदाला काही कानमंत्र सांगितला. तो घेऊन तो परत कंचनपुरला आला.

अजून बीरमला कोणी हालवले नव्हते. त्याने एका कट्यारीने आपली करंगळी कापली अन् रक्ताचे दोन कढत बिंदू बीरमच्या मुखात घातले. त्या बिंदूंनी अमृताचे काम केले. बीरमने डोळे उघडले. ती उठून बसली अन् पुनश्च भावाला बिलगली. आता मात्र त्याने तो मायापाश कचकन् तोडला. तो तिथून निघाला तो सरळ कदलीवनात दाखल झाला.

गोपीचंदाची कथा इथेच संपते. पुढे त्याने कोणती योगसिद्धी मिळविली अन् काय कार्य केले त्याबाबतीत लोककथा मुग्ध आहेत. पुढले सारे ज्याने त्याने आपल्या कल्पनेने जाणायचे. गोपीचंदाच्या या कथेभोवती अद्‌भुताचे एवढे मोठे तेजोवलय आहे की त्यामुळे ती कथा या भूलोकीची वाटत नाही वास्तव तर नाहीच नाही. त्यामुळे गोपीचंद हा कल्पनासाम्राज्यातला नायक वाटतो. पण तसे मानावे, तरीही एक अडचण येते.

गोपीचंदाची ही कथा विशिष्ट कविरचित नाही. राजस्थान, उत्तर प्रदेश, बिहार, बंगाल, भोजपूर, महाराष्ट्र, या प्रदेशात, इतकेच नव्हे, तर दक्षिण-भारतातही तिचा प्रसार आहे. प्रत्येक भाषेत गोपीचंदावर गाथात्मक आख्याने निर्माण झाली आहेत. आणि ती सारी अज्ञात लोककवींनी निर्मिलेली आहेत. प्रत्येकात थोडाबहुत फरक असला तरी आख्यानाचा गाभा एकच आहे. तेव्हा साहजिकच वाटते, की गोपीचंद हा काल्पनिक नसून ऐतिहासिक पुरुष असावा. तदनुसार नाथसंप्रदायाच्या संशोधकांनी आणि इतरही काही विद्वानांनी त्या बाबतीत संशोधन केले आणि काही निष्कर्ष सांगितले ते असे—

गोपीचंद हा ऐतिहासिक पुरुष होता. तो बंगालचा राजा होता. माणिकचंद हे त्याच्या बापाचे नाव. गोपीचंदाचे पहिले नाव गोविंदचंद्र होते. बंगालच्या

पाल राजवंशात तो जन्मला. तिथेच त्याने राज्य केले असे बंगाली संशोधक म्हणतात. पण सत्यव्रत सिंह यांच्या मते पालवंशाची जी एक शाखा बिहारच्या गया प्रदेशावर राज्य करीत होती, त्या शाखेपैकी तो असावा. इ. स. चे ११ वे शतक हा त्याचा काल आहे. हा काल अनेक ऐतिहासिक पुराव्यांनी सिद्ध झाला आहे. दक्षिणेत तिरुपती येथे एक शिलालेख सापडला आहे. त्यात गोपीचंदाचे राजेंद्र चोल या दाक्षिणात्य राजाशी युद्ध झाल्याचे वर्णन आहे. राजेंद्र चोलाचा कालही ११ वे शतक हाच आहे.

त्या काळात भारतभर नाथसंप्रदायाची चलती होती. अनेक नाथयोगी त्या कालात आपल्या योगसिद्धीचे चमत्कार दाखवीत भारतभर हिंडत होते. प्रस्तुत गोपीचंदाच्या आख्यानात गोरखनाथ, मच्छिंद्रनाथ, जालंदरनाथ यांचा संबंध आला आहे. हे नाथपंथी प्रख्यात पुरुष ११ व्या शतकातलेच आहेत. गोपीचंद याच नाथसंप्रदायात दाखल झाला होता. त्याने बीरम या बहिणीच्या दारी जाऊन सारंगी वाजवली असा निर्देश प्रस्तुत गाथेच्या दुसऱ्या पर्यायात आहे. सारंगी हे नाथपंथाचे खास वाद्य आहे. गोपीचंदाचे हे सारे आख्यानच नाथपंथाने परिवेष्टित आहे.

नाथपंथात विषयवैराग्य आणि इंद्रियनिग्रह यावर फार भर असतो. ज्ञानेश्वरांनी गोरखनाथाला गौरवताना ‘ विषयविध्वंसैकवीरु ’ ही उपाधी त्याला जोडली आहे. गोपीचंदाच्या या आख्यानातही निकराची विरक्ती अन् मायापाशांचा विच्छेद या दोन गोष्टींवरच विशेष भर आहे. गोपीचंदाला सोळाशे राण्या असोत, सोळा असोत अथवा त्याहूनही कमी असोत; मुद्दा तो नाही. वैराग्य उत्पन्न होतींच त्याने आपल्या पट्टराणीला ‘ मा ’ म्हणून हाक मारली, ही नाथपंथाच्या दृष्टीने मुद्द्याची गोष्ट आहे. नाथसंप्रदायात ‘ स्त्री ’ ही घृणित आहे, परमार्थमार्गातली शृंखला आहे. गोपीचंदानेही तसेच मानले अन् ती शृंखला धैर्याने तोडली. त्यामुळे सांप्रदायिकात तोही ‘ विषयविध्वंसैकवीरु ’ ठरला.

निबंध
५१३८४
१५८४
१२।३।५०

# प्रहेलिका—एक बौद्धिक कसरत

काल सहज सुभाषित-रत्नभांडागार चाळीत होतो. फुरसतीच्या वेळचा तो माझा चाळाच आहे म्हणाना ! पाने उलटता उलटता, अधूनमधून एखाद-दुसऱ्या श्लोकाचा अर्थास्वाद घेता घेता एका पृष्ठावर येऊन थबकलो. तिथे एका नव्या प्रकरणाला प्रारंभ झाला होता अन् त्याचे नाव होते प्रहेलिका ! मराठी भाषेत सांगायचे, तर उखाणा.

भावकाव्य अन् चित्रकाव्य असे काव्याचे दोन प्रमुख भेद कल्पिता येतात. प्रहेलिका हा त्यातला दुसरा प्रकार आहे. चमत्कृती हा त्याचा गुण अन् अर्थाचे, वस्तुसत्याचे गोपन ( लपवणे ) हा त्याचा प्राण होय. प्रहेलिकेत काहीतरी लपवायचे असते अन् ते गुपित उकलण्याबद्दल समोरच्या माणसाला आव्हान द्यायचे असते. तो सोंगट्याचा खेळ नसून बुद्धिबळाचा खेळ असतो. त्याला साहित्यिक मूल्य थोडे असले तरी सांस्कृतिक मूल्य मात्र खूप आहे. आजकालचे नव्हे; तर पुरातन कालापासून. वैदिक ऋषींपासून ही प्रथा चालू आहे. इंद्राग्नींची स्तोत्रे करून थकले, की एखादवेळी त्यांना उखाण्याची

चार अक्षरे रचायची लहर येई. अशा काही ऋचा ऋग्वेदात आहेत.

ऋग्वेदात आढळणाऱ्या या प्रहेलिका एक तर सृष्टिज्ञानविषयक आहेत, नाहीतर आत्मज्ञानविषयक आहेत. दोहोंची दोनदोन उदाहरणे पुढे देतो—

**त्रिनाभिचक्रमजरमनर्व**
**यत्रेमा विश्वा भुवनाधितस्थु: ।**

'तीन अऱ्यांचे एक चाक न थकता न थांबता सतत फिरत आहे आणि त्यात सर्व भुवने भरून राहिली आहेत.'

'सांगा माझ्या उखाण्याचा अर्थ!' त्या वैदिक ऋषीने आव्हान दिले. त्या आव्हानाला उत्तर देणारा त्या काळी कोणी भेटला की नाही देव जाणे! पण अलीकडच्या काळात सायणाचार्यांनी त्याचे उत्तर दिले ते असे—

'तीन अऱ्यांचे चक्र म्हणजे उन्हाळा, पावसाळा, हिवाळा या तीन ऋतूंचे वर्षचक्र. ते सूर्यामुळे चालत राहिले आहे. सर्व विश्व या ऋतुचक्रात सामावलेले आहे.'

हेच सूत्र धरून एक ऋचा रचली गेली ती अशी—

**पंचारे चक्रे परिवर्तमाने**
**तस्मिन्नातस्थुर्भुवनानि विश्वा ॥**

'पाच आरे असलेले चक्र फिरत असून त्यात सर्व भुवने अधिष्ठित आहेत.'

आता आली का पंचाईत! सहा आऱ्यांचे चक्र म्हटले असते, तर सहा ऋतूंचे वर्षचक्र म्हणता आले असते. पण इथे तर पाचाचा आकडा घातला आहे. हे चक्र कोणते म्हणायचे? पण कोणीतरी थोडे डोके चालवले आणि उत्तर दिले, की पाच आऱ्यांचे चक्र म्हणजेही ऋतुचक्रच आहे. कारण वैदिक ऋषींना सहा ऋतूंपैकी शिशिर ऋतु माहीतच नव्हता. ते पाच ऋतूंचेच वर्ष मानीत—.

**ग्रीष्मो हेमंत उतनो वसंत :**
**शरद्वर्षा : सुवितं नो अस्तु ॥**

या ऋचेत शिशिर ऋतूचे कुठे नाव नाही.

आता तत्त्वज्ञानात्मक दोन प्रहेलिका वेदातल्याच सांगतो–

किं स्विद्वनं क उत वृक्ष आसीत्
यतो द्यावापृथिवी निष्टतक्षु: ॥

'असे वन कोणते अन् असा वृक्ष कोणता, की ज्याच्यापासून द्यावा-पृथिवीचा अर्थात् भूमी आणि आकाश यांचा आकार तासून काढला ?'

या प्रहेलिकेचे उत्तर दिले गेले ते असे–

ब्रह्म वनं ब्रह्म स वृक्ष आसीत्
यतो द्यावा-पृथिवी निष्टतक्षु: ॥

'ब्रह्म हेच ते वन आणि ब्रह्म हाच तो वृक्ष, की ज्याच्यापासून हा भूगोल अन् खगोल तासून आकाराला आणला गेला.'

सर्वव्यापी ब्रह्म हेच द्यावा–पृथिवीचा आधार असून, त्यातूनच हे ब्रह्मांड आकाराला आले आहे, असा त्याचा गर्भितार्थ.

'द्वासुपर्णा श्रुती' म्हणून जी प्रसिद्ध आहे, तीही एक प्रहेलिकाच आहे. 'एका वृक्षावर दोन पक्षी बसले आहेत. ते एकमेकाना धरून राहणारे अन् एकमेकांचे मित्र आहेत. त्यातला एक पक्षी पिंपळफळे खातो अन् दुसरा काहीही न खाता केवळ साक्षीरूपाने राहतो.'

हे दोन पक्षी कोण हे सांगा, असा तो कूटप्रश्न आहे. जीवात्मा आणि परमात्मा हे त्याचे उत्तर. त्या दोघांचाही संबंध अतूट आहे. जीवात्मा देहोपाधीत सापडून सुकृत-दुष्कृतांची फळे चाखतो; पण निरुपाधिक परमात्मा मात्र काहीच खात नाही, काहीच भोगत नाही अन् तरीही तो प्रकाशमान असतो. तो स्वयमेव 'ॐ पूर्णमदः पूर्ण' असल्यामुळे त्याला कसलीच तहानभूक नसते.

वेदांची ही प्रहेलिकांची परंपरा पुढच्या कवींनी अन् आचार्यांनीही चालू ठेवली. कूटातून किंवा उखाण्यातून अशी चमत्कृती निर्माण करता येते, बुद्धीला थोडा व्यायाम देता येतो, समोरच्याला जरा रानात पाडता येते, असे दिसून आल्यावर चारचौघे बुद्धिमंत एकत्र येताच ते कूटप्रश्न निर्माण करून वेळ

घालवू लागले. कोणीतरी एका पंडिताला विचारले, ' महाराज, तुम्ही उजाडला दिवस कसा काय सार्थकी लावता ? ' त्यावर तो पंडित उत्तरला. ' कसा म्हणजे ? इतर चारचौघे बुद्धिमान लावतात तसा. ' ' इतर बुद्धिमान लोक कसा दिवस घालवतात, ते तरी सांगा. ' पहिल्याचा आग्रह. त्यावर पंडिताने एका श्लोकात उत्तर दिले, ते असे–

प्रातर्द्यूतप्रसंगेन माध्यान्हे स्त्रीप्रसंगतः ।
रात्रौ चौरप्रसंगेन कालो गच्छति धीमताम् ॥

' सकाळी जुगार खेळण्याच्या प्रसंगात, दुपारी स्त्रीप्रसंगात आणि रात्रौ चोराच्या संगतीत बुद्धिमंताचा काल निघून जातो. '

आता पृच्छक लागला डोके खाजवायला. बुद्धिमान लोक जर असा काळ घालवीत असतील, तर ' यांची संगत नको रे बाप्पा. ' त्यावर त्या पंडिताने हसून विचारले, ' पडलास घोटाळ्यात ? अरे, मी उखाण्यात बोललो. केवळ वाच्यार्थाने त्याचा उलगडा होणार नाही. ऐक आता –

' कौरव-पांडव द्यूत खेळले ना ? ती कथा कशात आहे ? महाभारतात. म्हणजे मी सकाळी उठून महाभारत वाचतो. एवढे मोठे रामायण कशामुळे घडले ? एका स्त्रीच्या म्हणजे सीतेच्या अपहरणामुळे. म्हणून मी दुपारी रामायण वाचतो. कृष्णाने गोकुळात दह्यादुधाची, लोण्याची, चोरी केली होती, हे तुला माहीत आहे ना ? अरे, म्हणूनच त्याला ' माखनचोर ' ही पदवी भक्तांनी बहाल केली आहे. आता या चोराची संगत कुठे घडेल ? भागवतात. म्हणजे रात्री मी भागवत वाचतो. आणि अशा प्रकारे भारत, भागवत, रामायण यांच्या परिशीलनात दिवस सार्थकी लावतो. झाला उलगडा ? '

व्यासांचे महाभारत म्हणजे राजनीती, समाजशास्त्र, तत्त्वज्ञान यांचा ऊहापोह करणारा गंभीर ग्रंथराज ! पण त्यांनाही त्यात कूटे रचून घालणे चुकले नाही. व्यास स्वतः सांगतात—

अष्टौ श्लोकसहस्राणि अष्टौ श्लोकशतानि च ।
अहं वेद्मि शुको वेत्ति संजयो वेत्ति वा न वा ॥

' महाभारतात आठ हजार आठशे श्लोक असे कूटमय आहेत, की त्यांचा अर्थ मला अन् शुकाला तेवढा ठाऊक आहे. संजयाला ठाऊक आहे का नाही याची शंकाच आहे. '

प्राचीन काळीं चार विद्वान माणसे हमखास एकत्र येण्याचे ठिकाण म्हणजे यज्ञमंडप. एकेक यज्ञ बरेच दिवस चालायचा. मग शिळोप्याच्या वेळी उखाणे, कूटे, पुढे यायची. असे होता होता पुढे ही कूट प्रश्नोत्तरे म्हणजे यज्ञकर्माचाच एक भाग बनली. ‘ ब्रह्मोद्य ’ या नावाने त्यांचा तिथे समावेश झाला.

पण कूटे किंवा उखाणे ही कांही वैदिकांचीच मिरास नव्हे. वैदिकेतर समाजातही कूटांची निर्मिती अन् वापर सुरू होता. फ्रेझर या मानववंशशास्त्रज्ञाने जागतिक कूटवाङ्मयाचा अभ्यास केला आहे. तो म्हणतो, की हर्ष-शोकाच्या कोणत्याही महत्प्रसंगी कूटांचा उपयोग करणे ही चाल जगातल्या रानटी, असंस्कृत लोकांमध्ये पुरातनकालापासून रूढ आहे. एखाद्या गावावर किंवा समाजावर काही तरी अरिष्ट ओढवणार असे चिन्ह दिसले, की ते अरिष्ट निभावून जावे म्हणून ते लोक जसे काही धार्मिक विधी करतात, तसाच कूटांचाही उपयोग करतात. पाऊस पडावा, शेती फलद्रूप व्हावी अन् शिकार मिळावी म्हणूनही जगातले कित्येक अर्धसभ्य मानवसमाज कूटप्रयोग करतात, असेही फ्रेझरने सांगितले आहे. लग्नात नवरानवरीने उखाण्यात लपवून नाव घेणे हा प्रकार तर सुसंस्कृत समाजातही रूढ आहे. अंत्यक्रियेत मृत्यूच्या दहाव्या दिवशी मृताच्या आप्तेष्टांनी रात्री गावाबाहेर एकत्र जमून कूटात्मक गीते म्हणणे, ही चाल गोंड आदिवासीत असल्याचे श्री. दुर्गा भागवत सांगतात.

हा झाला माझ्या प्रस्तुत लेखाचा पूर्वरंग. मी सुरुवात केली होती सुभाषित-रत्नभांडागाराच्या उल्लेखाने. आता त्यातल्या काही प्रहेलिका सादर करून उत्तररंग पुरा करतो.

आपण अशी कल्पना करू. केवळ कल्पनाच बरे का ! नाही तर तुम्ही लागाल स्थल-काल, पौर्वापर्य यांच्या बाबतीत मला अडवायला. कालिदास, भारवी माघ, दंडी, बाण असे काही महाकवी एकत्र जमले आहेत. काव्यचर्चा करून थकले आहेत. आता काही तरी विरंगुळा हवा घडीभर. एवढ्यात कालिदासाला लहर येते. प्रहेलिका रचावीशी वाटते. मनात यायचा अवकाश, की श्लोक तयार होतो.

**अपदो दूरगामी च साक्षरो न च पंडित: ।**
**अमुखः स्फुटवक्ता च यो जानाति स पंडित ः ॥**

' पाय नाहीत; पण दूरदूर जाते. साक्षर आहे; पण पंडित नव्हे. तोंड नाही; पण स्पष्टार्थ बोलते. असा माझा उखाणा. जो जाणील, तो पंडित !

दंडीने थोडा विचार करताच त्याला उत्तर गवसले. तो म्हणाला, ' कविराज, प्रियतमेकडून नुकतेच पत्र आलेले दिसते तुम्हांला. तेच उत्तर आहे तुमच्या प्रहेलिकेचे. पाय नाहीत, पण दूर जाते; अक्षरे आहेत, पण पंडित नाही. तोंड नाही; बोलणे स्पष्ट. बरोबर ? '

कालिदासाने ते उत्तर मान्य करताच दंडीने आपली प्रहेलिका म्हटली —

**वने जाता वने त्यक्ता वने तिष्ठति नित्यशः ।**
**पण्यस्त्री न तु सा वेश्या यो जानाति स पंडितः ।।**

' वनात बनली, वनात टाकली गेली अन् वनातच कायम राहिली. ती पण्यांगना आहे; पण वेश्या नव्हे. उत्तर जाणील तो पंडित. '

त्यावर भारवी म्हणाला, ' मी सांगतो. तिला म्हणतात होडी. इथे वन शब्दाचे दोन अर्थ धरायचे. वन म्हणजे अरण्य अन् वन म्हणजे पाणी. होडी वनातल्या झाडाच्या मोठ्या खोडापासून तयार होते. तिला एकदा वनात म्हणजे पाण्यात टाकली, की ती कायम पाण्यातच राहते. पैलतीराला जाणाऱ्या लोकांना दाम घेऊन ती आत घेते. पण तरी तिला वेश्या कोण म्हणेल ? '

' कबूल, कबूल ! ' सर्वांनी माना डोलवल्या. मग दंडी म्हणाला, आता माझी प्रहेलिका ऐका —

**तरूण्यालिंगितः कंठे नितंबस्थलमाश्रितः ।**
**गुरूणां संनिधानेऽपि कः-कूजति मुहुर्मुहुः ।।**

' तरुणीने त्याच्या गळी मिठी घातली आहे, तो तिच्या नितंबावर विसावला आहे, गुरु म्हणजे वडीलधारे जवळ आहेत; पण तरीही तो कुजबुजतो आहे. असा कोण हा निलाजरा कामातुर ? '

कालिदास म्हणाला, ' आम्हांला असे बनवू नका. तो मुळी कोणी कामातुर पुरुष नाहीच. तो आहे पाणी आणायला गेलेल्या तरुणीच्या कमरेवरचा घडा. तिने त्याच्या गळ्याभोवती हाताचा विळखा घातला आहे. तिच्या डोक्यावर आणखी काही हंडे एकावर एक आहेत. ते गुरू म्हणजे मोठे आहेत; पण त्यांच्या देखत हा कमरेवरचा घट चुबुक् चुबुक् करून कुजबजतो आहे. झाले समाधान ? '

'झाले; पण आता आमची करामत ऐका ना!' माघ म्हणाला —

अस्ति ग्रीवा शिरो नास्ति बाहुरस्ति निरंगुलिः।
सीताहरणसामर्थ्यो न रामो न च रावणः॥

'गळा आहे; पण डोके नाही. बाहू आहेत, पण बोटे नाहीत. पण सीताहरणाचे सामर्थ्य मात्र आहे. तुम्ही म्हणाल रावण; पण नव्हे; तुम्ही म्हणाल राम; पण तोही नव्हे.'

बाण म्हणाला. 'राम नव्हे, रावण नव्हे. तो आहे कंचुक म्हणजे तुम्ही अंगात घातला आहे ना, तसला चोगा. ( लांब कोट ). बघा, गळा आहे, पण डोके नाही. बाह्या आहेत; पण बोटे नाहीत. इथे सीताहरणातली सी 'शी' समजायची. सीताहरण म्हणजे शीताहरण. म्हणजे थंडीचे निवारण. चोगा ते काम उत्तम करतो.'

प्रहेलिका, कूट, समस्या, कर्तृगुप्त, क्रियागुप्त हे सगळे प्रकार एकमेकाना जवळचे आहेत. सुभाषितरत्नभांडागार अशा प्रकारांनी खच्चून भरले आहे. संस्कृत कवींना असल्या शाब्दिक कसरती करण्याचा खूपच नाद होता.

ψ ψ ψ

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १६२९८
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# पंचपीर, नव्हे पंचवीर

देवपूजेइतकीच वीरपूजाही प्राचीन आहे. भारतातच नव्हे, तर साऱ्या जगात. किंबहुना देवपूजेपेक्षाही वीरपूजेतला भक्तिभाव अधिक घनसांद्र असतो. देव हा कल्पनेने कल्पावा लागतो. तंत्रमंत्रांतून, ध्यानधारणेंतून उभा करावा लागतो. वीराचे तसे नाही. तो कधीतरी प्रत्यक्षात झालेला असतो. कोणीतरी प्रत्यक्षात पाहिलेला असतो. त्याच्या वीरकृत्याने लोकांचे डोळे दिपलेले असतात. त्याच्या पराक्रमाचा व्यक्तीने किंवा समाजाने लाभ घेतलेला असतो.

वीर शब्दाची नेमकी व्याख्या करणे कठीण आहे. त्याचे वर्णन करावे लागते. वीर हा एक रस आहे अन् उत्साह हा त्याचा स्थायीभाव आहे; पण जो जो उत्साही तो तो वीर, असे समीकरण मांडता येणार नाही. त्या उत्साहाच्या मुळाशी काही तत्त्व पाहिजे, काही मूल्य पाहिजे.

वीराविषयी लोकांच्या काही कल्पना आहेत अन् त्या सर्वत्र सारख्या आहेत. ज्याने एखाद्या अबलेची अब्रू वाचवली, ज्याने एखाद्या नाडलेल्या व्यक्तीचा गळा सोडवला, ज्याने गावावरचे अरिष्ट स्वतःच्या छातीवर झेलले,

ज्याने हिंस्र श्वापदापासून पोराबाळांचे, गुराढोरांचे रक्षण केले, ज्याने बुडत्याला वाचवण्यासाठी महापुरात उडी घातली, ज्याने स्वातंत्र्यासाठी देहगेहावरची आसक्ती सोडली, ज्याने परधर्म भयावह मानून स्वधर्माच्या रक्षणासाठी क्रौर्य सोसले आणि या सर्वांसाठी पंचप्राण तृणवत् मानले, तो वीर !

एवंगुणविशिष्ट वीरांच्या स्तुतिस्तोत्रांनी, कथा-गाथांनी, कविता-पोवाड्यांनी भारतीय वाङ्मय भरून राहिले आहे. वीरांवरची सुभाषितेही शेकडो आहेत. एक सुभाषितकार म्हणतो —

> **एकेनापि सुपुत्रेण सिंही स्वपिति निर्भया ।**
> **स एव दशभिः पुत्रैर्भारं वहति गर्दभी ॥**

'सिंहिणीला एकच बच्चा असतो; पण तो शेजारी असला, की सिंहीण सुखाने, अभयाने झोपते, पण दशपुत्री गाढवी मात्र आपल्या दहाही पुत्रांसह पाठीचा कणा मोडेपर्यंत भार वाहते.'

ऋग्वेदातल्या कित्येक सूक्तांतून वीरांची आकांक्षा व्यक्त केलेली आहे. पुत्र म्हणजेच वीर अशी तिथली धारणा आहे. श्राद्धप्रसंगी यजमान पितरांना प्रार्थितो—'वीरं मे दत्त पितरः' पितर हो आम्हाला वीर द्या. 'पुत्र व्हावा ऐसा गुंडा, ज्याचा तिन्ही लोकी झेंडा' या अभंगवाणीतला आशयही तोच आहे.

अशा वीरांची पूजा अनेक प्रकारांनी होत असते. कुठे एखाद्या वीराच्या नावाने नुसती दगडांची रास उभारून ठेवलेली असते. माणसे त्या बाजूने जाता येता त्या राशीला नमस्कार करतात. कुठे त्याच्या नावाने एखादा कोरीव, घडीव दगडच उभा केलेला असतो. क्वचित त्यावर त्या हुतात्म्या वीराचे नावही कोरलेले असते. कधी त्याबरोबरच घडलेला प्रसंगही नमूद केलेला असतो. अशा दगडांना वीरगळ म्हणतात. असे वीरगळ महाराष्ट्राच्या भूमीवर रानोमाळ विखरून पडलेले दिसतात. कुठे एखाद्या वीराची समाधी बांधलेली असते, तर कुठे त्याचा पुतळा उभारलेला असतो. गावढ्या गावातून त्यांचे चबुतरेही असतात.

पंडित अन् वीर यांची मानसन्मानाच्या बाबतीत तुलनाच होऊ शकत नाही. पंडिताचा मान सभेपुरता. वीराचा मान सार्वत्रिक अन् स्थान सर्वांच्या हृदयात. मानसन्मानाच्या बाबतीत संत तेवढे वीरांशी बरोबरी करू शकतील.

काही काही प्रदेश तर वीरपूजेविषयीच प्रसिद्ध आहेत. राजस्थान हा त्यांपैकी एक. तिथे पंचपीरांची पूजा प्रामुख्याने चालते. हे पंचपीर म्हणजे

मुस्लिम संत असे समजू नका; ते बावनकशी हिंदू आहेत. 'व'च्या जागी 'प' हे लोकोच्चारण आहे. या पंचपीरांची नावे एका दोह्याच्या द्वारे सांगतो —

पाबू हरभू रामदे मांगलिया मेहा।
पांच पीर पधारज्यो गोगाजी जेहा॥

'पाबू, हरभू, रामदेव, मांगलिया, मेहा अन् गोगा हे पाच पीर होत.'

पाबू हा राठौड कुळातला राजपूत. मानाने मोठा; पण धनाने उणा. त्याचे एक दिवस लग्न ठरले. लग्नाला वधूगृही जायचे ते पायी कसे जायचे, हा प्रश्न त्याच्यापुढे उभा राहिला; कारण त्याच्यापाशी वाहनच नव्हते. देवलसी नावाची एक चारणी त्याच गावात होती. तिचे गोधन बरेच मोठे होते. तिच्याजवळ एक घोडी होती अन् तिच्यावर बसून ती गुरे वळींत होती. पाबूने ती घोडी लग्नापुरती तिच्याजवळ मागितली; पण देवलसी तयार होईना. ती म्हणाली, 'घोडी तुला देऊन मी गुरे कशी वळू ? ती लांब गेली, पांगली अन् कोणी चोरून नेली तर—'

त्यावर पाबू तिला बोलला.

"तू घाबरू नको. तुझी गुरे कोणीही पळवणार नाही. तसा दुरात्मा कोणी आलाच, तर तू मला हाक मार. मी असेन तसा धावत येईन."

मग देवलसीने त्याला घोडी दिली. तिच्यावर स्वार होऊन पाबू ऐटीने वधूगृही गेला. 'सुमुहूर्त सावधान' झाले. वधू-वर विवाहहोमासाठी अग्नीपुढे बसले. आता अग्नीला भांवरे ( प्रदक्षिणा ) घालायचे, सप्तपदी करायची, मग लग्नगाठ पक्की व्हायची. पाबू आपल्या नवोढा वधूचा कंकणबद्ध हात धरून उठला. त्याने एक पाय पुढे ठेवला. प्रदक्षिणा सुरू केली; पण ती पुरती मात्र होऊ शकली नाही.

देवलसी आरडत, आक्रोशत तिथे आली. 'माझ्या गायी जींदराज खींचीने पळवल्या रेऽऽ' म्हणून तिने गळा काढला.

पाबू वचनाचा सच्चा होता. आधी वचन द्यायचे अन् प्रसंग येताच मग त्यातून भिन्न अर्थाच्या पळवाटा काढायच्या, असले धूर्त शहाणपण पाबूला अवगत नव्हते. म्हणून दुसऱ्याच क्षणाला त्या नवोढेचा करस्पर्श त्याने झिडकारला, जवळची तलवार उचलली आणि सडेसोट धाव घेतली.

एका घटकेत पाबू अन् जींदराज यांची लढत जुंपली. पाबूजी एकटा अन् जींदराजाचे अनेक बलदंड सैनिक, असा तो सामना होता. त्यात पाबूची शक्ती कमी पडली अन् जींदराजाच्या शेवटच्या घावाने पाबू धारातीर्थी निजला. ही अशुभ वार्ता लगेच लग्नमंडपात गेली. पाठोपाठ राजस्थानभर पसरली. त्याच्या वधूने मग जो शोक केला असेल, त्याचे वर्णन कोण करील! सारा राजस्थान त्या वार्तेने हळहळला. वचनपूर्तीसाठी प्राणार्पण! केवढे अद्भुत वीरकृत्य! मग राजस्थानने जागोजाग पाबूचे चौथरे उभारून त्याची पुण्यस्मृती चिरकालिक करून टाकली.

गोगा चौहान हा तर राजकुलात जन्मला होता. बीकानेरजवळचे ददरेवा हे त्याचे राज्य. देवीचंद चौहानाचा तो सुपुत्र. सातव्या वर्षीच त्याला राजगादी मिळाली. गौड बंगालची राजकन्या सुर्जाला हिच्याशी त्याचे लग्न ठरले होते; पण वासुकी नाग त्या कामी आडवा आला. वासुकीचा त्या स्वरूपसुंदर राजकन्येवर डोळा होता; पण हे गोगाला कसे सहन व्हावे! त्याने वासुकीला युद्धाचे आव्हान दिले आणि समोरासमोरच्या सामन्यात त्याला यथेच्छ लोळवले. वासुकी कसाबसा जीव घेऊन पळाला. मग निर्विघ्न होऊन गोगाने सुर्जालेचे पाणिग्रहण केले. का कोण जाणे! पण लग्न झाल्यावर बारा वर्षे तो सासुरवाडीसच राहिला. त्या अवधीत त्याची बहीण त्याचे राज्य चालवीत होती.

गोगाला दोन मावसभाऊ होते. सुर्जन अन् अर्जुन. गोगाच्या राज्याबद्दल त्यांच्यात अभिलाषा निर्माण झाली. त्यांनी गजनीच्या महंमुदाला मदतीस घेतले अन् गोगाच्या राज्यावर चाल केली. ही बातमी गोगाला कळताच तो धावत आपल्या राजधानीला आला. लगोलग युद्धाला तोंड लागले. गोगाचा पराक्रम अभिमन्यूच्या जातीचा. त्याने बोल बोल म्हणता सुर्जन अन् अर्जुन या दोघांनाही रणभूमीवर निजवले; पण महंमुद त्यांच्या पाठीशी होता. गोगाच्या दणक्याला घाबरून तो पळाला; पण थोड्याच कालात पुनश्च गोगावर चाल करून आला. असे बारा वेळा घडले. बाराही वेळा त्याने शत्रूला खडे चारले. तेराव्या प्रसंगी मात्र दैवाचे फासे उलटे पडले आणि त्या लढाईत तो धारातीर्थी पडला.

त्या दिवशी भाद्रपद वद्य नवमी ही तिथी होती. उभ्या राजस्थानाने ती तिथी लक्षात ठेवली आणि त्या तिथीला त्या वीर पुरुषाची पूजा सुरू केली. अजूनही ती चालते. त्या दिवशी जागोजाग गोगाच्या नावाने मेळे भरतात.

कुंभार लोक त्याची मृण्मय मूर्ती बनवतात अन् लोक तिला घोड्यावर बसवून तिची मिरवणूक काढतात. गुजर लोकांना तर त्याची भक्ती विशेषच. ते गोगाला आपला पूर्वज मानतात.

रामदेव हा तोमर वंशातला सुपुत्र. अजमालाचा मुलगा. जुळ्या भावासह तो जन्मला. त्या भावाचे नाव बीरमदेव. एके दिवशी ते दोघे खेळता खेळता दूर गेले. एकत्र होते ते पांगले. बीरमदेव काही वेळाने परत आला; पण रामदेव चालतच राहिला. जाता जाता योगी बालकनाथ याच्या पुर्णकुटीजवळ पोचला. बालकनाथाने त्याची मुखमुद्रा पाहिली. अंतर्ज्ञानाने काही वेगळे जाणले. लगेच त्याच्या मस्तकी वरदहस्त ठेवून त्याला आपला शिष्य बनवले. रामदेव गुरूच्या तालमीत योगसिद्ध झाला. मग त्याने गुरूला विचारले. ‘ आता मी काय करू ? ’ त्यावर गुरू बोलला.

“ शिष्यवरा, तू आता पोकरण क्षेत्रात जा. तिथे भैरू नावाचा एक नरभक्षक दैत्य माजला आहे. सगळ्या माणसांना खाऊन त्याने तो प्रदेश उजाड बनवला आहे. तू जाऊन त्याचा समाचार घे. ”

रामदेव सरळ पोकरणाला जाऊन त्या दैत्याला भिडला. दोघांचे तुंबळ युद्ध सुरू झाले, रामदेवाने त्याला ‘ घे घे ’ म्हणून आपल्या वज्रमुष्टीचे ठोसे लगावले. भैरू रक्त ओकीत धराशायी झाला. त्या प्रदेशावरचे अरिष्ट निरसले. पण रामदेव तेवढ्यावरच थांबला नाही. त्याने आजूबाजूची माणसे आणून तो प्रदेश पुनश्च नांदता वसता केला. मग त्याने रुणेचा गावी स्वतःची पर्णकुटी उभारली. तिथे काही काळ ध्यानधारणाही केली. नंतर कृतकृत्य होऊन एक दिवस जीवत्समाधी घेतली.

त्या दिवसापासून तो पीर बनला. राजस्थानी जनतेचा उपास्य झाला. रुणेचा गावी तिथल्या चांभारांनी त्याचे समाधिमंदिर उभारले, तेच त्याचे पुजारी बनले. अजूनही तेच आहेत. त्यांना रिखिया किंवा भगत म्हणतात. भाद्रपद मासी रुणेचा गावी राजशहा रामदेवाचा मेळा भरतो. मुसलमानही पीर म्हणून याला भजतात. त्याचे भक्त राजस्थानात आहेत तसेच ते माळव्यात अन् पंजाबातही आहेत. सोन्याचांदीच्या पत्र्यावर रामदेवाची मूर्ती उमटवून तो टाक गळ्यात बांधतात.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
५१३५४ निबंध
९५५४

मांगलिया मेहा हा गुहिलोत क्षत्रियांचा वंशज होय. त्याची जहागीर होती अन् ती जैसलमीरच्या राजाच्या डोळ्यात सलत होती. त्याने एक दिवस मोठी फौज घेऊन मांगलियावर चाल केली. मांगलिया त्याच्याशी बहादुरीने लढला अन् त्या लढाईतच वीरगतीला गेला. त्याचा तो अद्‌भुत पराक्रम पाहून लोक म्हणाले, की ' हा पीर आहे. ' मग चारणांनी त्याच्यावर पवाडे रचले आणि ते गाऊन त्याची कीर्ती दिगंत केली.

हरभू हा मांगलियाचाच मुलगा. पण क्षत्रियाचा बच्चा असूनही तो शस्त्राचारापासून दूर राहिला. त्याने वैराग्याचा पंथ स्वीकारुन रामदेवाचा गुरू बालकनाथ याच्याकडूनच योगदीक्षा घेतली. रामदेव गेला, त्याच्या आठव्या दिवशी त्यानेही रामदेवाच्याच शेजारी समाधी घेतली. तोही लोकमानसात पीर म्हणून प्रतिष्ठित झाला.

अशी ही कथा आहे पंचपीरांची !

पण राजस्थानातल्या या पीरांची किंवा वीरांची संख्या पाचापुरतीच मर्यादित नाही. तेजा, भगोतासिद्ध, केसरिया कुंवर, जसनाथ, सिंहाजी असे आणखी कित्येक पीर राजस्थानात पूजोपचार घेत आहेत. मग ' पंचपीर ' असेच का म्हटले ?

त्याचे कारण संकेताचा प्रभाव. संकेत कोणाला चुकले नाहीत. आपल्या संस्कृतीत पाचांचा संकेत फार मोठा आहे. पंचजनापासून तो पंचपक्वान्नापर्यंत त्याची व्याप्ती आहे. ऋग्वेदात प्रथम या पंचकडीचा आविष्कार झाला. पंचजन, पंचकृष्टी, पंचचर्षणी असे शब्द तिथे आढळतात. महाभारतकाळी पंचपांडव प्रसिद्ध झाले. त्याच काळात यादवांमधले एक कुळ वृष्णीचे. त्यातही पाचच वीर प्रसिद्ध आहेत. ' वृष्णींना पंचवीराणाम् ' असा त्याविषयी निर्देश आहे. शीख समाजात गुरु गोविंदसिंहाकडून ' अमृत ' प्राशन करणारे निघाले तेही ' पंच प्यारे 'च.

अशा या संकेताचा प्रभाव पडून राजस्थानातही पीरांची संख्या पाचच मानली गेली. वेगवेगळ्या कवींनी पीरांची वेगवेगळी नावे सांगितली आहेत; पण त्यांची संख्या मात्र पाच हीच ठेवली आहे.

पंचपीर हे राजस्थानाच्या लोकसंस्कृतीचे एक फार मोठे अंग आहे. या पीरांचा संबंध नाग आणि यक्ष यांच्याशी जाऊन पोचतो. म्हणजे पीरपूजेत

नागपूजा अन् यक्षपूजा शिरून बसली आहे, असा त्याचा अर्थ. तो संबंधही विस्ताराने सांगण्याजोगा आहे. पण तो एका स्वतंत्र लेखाचा विषय ठरेल. तेजा या पीराची पूजा ही नागपूजाच आहे. पुराणातला मणिभद्र यक्ष हा बंगालमध्ये माणिकपीर बनला आहे. त्याच्याबरोबर सत्यपीरही आहेच.

राजस्थानातल्या लोकसमाजाला या पंचपीरांविषयी जेवढा आदर आहे, तेवढा दुसऱ्या कोणाबद्दलही नाही. पडत्या प्रसंगी नवस केल्यास पंचपीर आपल्या धावण्या धावून येतील, अशी त्या समाजाची दृढ श्रद्धा आहे.

ψ ψ ψ

# मथुरा : एक कलाकेंद्र

मथुरा आणि वृंदावन. दोन जवळिकेची सरोवरे असावी तशी दोन पुण्यक्षेत्रे. पहिले योगेश्वर श्रीकृष्णाचे जन्मस्थान अन् दुसरे क्रीडास्थान. मथुरा म्हणजे पुराणकालातली मधुरा. मधू दैत्यावरून ते नाव पडले होते. त्यानेच ती नगरी उभारली होती. तोच तिच्यावर राज्य करीत होता. उन्मत्त झाला नसता, तर ठीक होते; पण तो माजल्यावाचून राहिला नाही. मग श्रीविष्णूला त्याची दखल घ्यावी लागली. विष्णूने त्याला अन् त्याच्याबरोबरच कैटभालाही ठार मारले. ' मधु–कैटभारी ' हे त्याचे बिरुद ठरले.

या मधूचा पुत्र लवणासुर त्याच बापाचा सवाई मुलगा. तो दाशरथी रामाचा समकालीन होता. रामाने चौदाचौकड्यांचा रावण मारला, हे त्याच्या जीवाला झोंबले. लवणाला आपल्या शक्तीचा दर्प होता. हरिवंशावरून ती गोष्ट कळते. त्याने रामाला निरोप धाडला. ' तू रावणवध केलास, हे तुझे कृत्य मी निंद्य समजतो. आता माझ्याशी तुझी गाठ आहे, लक्षात ठेव. '

**विषयासन्नभूतोऽस्मि तव राम रिपुश्च ह ।**

न च सामंतमिच्छंति राजानो बलदर्पितम् ।।

' मी तुझ्या राज्याला लागून असलेला तुझा एक शत्रू आहे. माझ्यासारखे प्रतापी राजे तुझ्यासारखा एखादा सामंत शक्तीने फुरफुरल्यास त्याची गय करणार नाहीत. '

लवणाचे हे उन्मत्त धाष्टर्य रामप्रभूला सहन होणेच शक्य नव्हते; पण तो स्वतः त्याच्यावर चालून गेला नाही. ' कुस्कुटाच्या कामाला कुऱ्हाड ' काय करायची ! त्याने शत्रुघ्नाला म्हटले, की ' तू जा अन् त्या लवणाचा समाचार घे.'

मग शत्रुघ्न सेनादलासह मथुरेवर चालून आला. लवणानेही खड्ग उपसले. उभयपक्षी तुंबळ रण झाले. त्यात लवण कामी आला. शत्रुघ्न खऱ्या अर्थाने ' शत्रुघ्न ' ठरला. रावणवधाने रामाचा प्रतापसूर्य दक्षिणेत तळपला होता. लवणवधाने तो उत्तरेतही तळपला. रामराज्याकडे भुवई वाकडी करून पाहील, असा कोणी शत्रूच मग उरला नाही.

महाभारतकाळी मथुरा प्रदेश शूरसेन या नावाने ओळखला जाऊ लागला. शत्रुघ्नाचा पुत्र शूरसेन याच्यावरून ते नाव पडले. बापाच्या मागून तोच तिथे सिंहासनावर बसला होता. त्याने ते राज्य कीर्तिवंत केले होते.

पण कालांतराने त्याचीही सद्दी संपली. सात्वतकुळात जन्मलेल्या भीम यादवाने त्याचे राज्य जिंकून तिथे आपली सत्ता स्थापिली. शूरसेनाचे नाव राहिले, गाव गेले. मथुरा ही यादवांची राजधानी बनली. अंधक वृष्णी हे भीम सात्वताचे दोन पुत्र. पुराणांतून त्यांचा वारंवार उल्लेख येतो. यादव-कुळाच्या या दोन शाखा. कंसाचा बाप उग्रसेन हा अंधक शाखेचा तर कृष्णाचा पिता वसुदेव हा वृष्णी शाखेचा.

जरासंधाने मथुरेवर अनेक आक्रमणे केली. त्यात यादवांची बरीच हानी झाली. या परचक्राला तूर्त तरी तोंड देता येणे शक्य नाही असे जेव्हा समजून आले, तेव्हा श्रीकृष्णाने यादवांना मथुरेतून हालवले आणि नवी द्वारकानगरी निर्माण करून तिथे वसवले. अशा प्रकारे मथुरेवरचे यादवांचे आधिपत्य संपुष्टात आले.

पुढे गौतमबुद्धाच्या काळात अवंतीपुत्र हा मथुरेवर राज्य करू लागला. तो उज्जयिनीच्या चंडप्रद्योत राजाचा मुलीकडून नातू होता. त्याला वैदिक धर्माचा अभिमान होता आणि म्हणूनच बुद्ध मथुरेत आला असता त्याचे तिथे कोणी

विशेषसे आगत-स्वागत केले नाही. बुद्धाने आपला प्रवासाचा वृत्तांत सांगताना म्हटले, की 'मला मथुरेत धड भिक्षाही मिळाली नाही!' बुद्धाचा वेद-विरोधी मतप्रचार हेच त्याचे कारण असावे.

पण ही स्थिती फार काळ टिकली नाही. बुद्धाचा धर्म झंजावाती वेगाने देशभर पसरला. मथुरेतही त्याची विजयपताका फडकली. त्यामुळे वैदिक धर्म पाळामुळांसह हादरला. मौर्यकाळात तर मथुरा ही बौद्ध धर्माचे एक मोठे केंद्र बनली. मथुरेचा कलाविषयक इतिहास सुरू होतो, तो इथूनच! सनपूर्व पहिल्या शतकापासून तिथे कलेच्या पाउलखुणा दिसू लागतात.

ग्रीक आणि इराणी कलाकारांचा भारतीय कलाकारांशी संपर्क झाला तो याच काळात. भारतीय कलाकार या विदेशी कलावंतांकडून बरेचसे शिकले. स्थापत्य आणि मूर्तिकला यांचे तांत्रिक ज्ञान त्यांनी त्या विदेशी लोकांकडून मिळवले. आराखडा त्यांचा घेतला. आशय आपला भरला. भारतीय ललितकला या धर्माने अनुप्राणित आहेत, ही गोष्ट आता सर्वांनीच मान्य केलेली आहे. भारतीय कलेला धर्म आणि अध्यात्म यांचे कोंदण असते. मथुरेची कलाही त्याच भावनेने प्रस्फुरित होऊन वाढीस लागली.

इ. स. च्या प्रारंभी बौद्ध धर्माची पहिली भरतीची लाट ओसरली होती. वैदिक लोक आपले आसन हळूहळू घट्ट करू लागले होते. त्यांच्या जोडीला जैनही आपले अस्तित्व ठसवू लागले होते. मथुरेत या तिन्ही धर्मसंप्रदायांचा जम बसला होता. बऱ्याच अंशी त्यांच्यात सहिष्णुताही निर्माण झाली होती. जो तो आपापल्या परीने धर्माचा अन् संस्कृतीचा आविष्कार करायला सर-सावला होता. स्तूप, चैत्य, मठ, विहार, मूर्ती, अशा विविध अंगांनी धर्माचे सौंदर्य वाढत होते.

मथुरेत देवमंदिरे काही थोडीथोडकी नाहीत. त्यांचे दर्शन घेता घेता पाय थकतात अन् जीव मेटाकुटीला येतो. पण त्या भूमीवर पहिले स्थापत्य कोणते निर्माण झाले असेल असे तुम्हांला वाटते? कृष्णाचे? छेः! बुद्धाचे स्तूप अन् विहार. सम्राट अशोकाने यमुनेच्या काठाकाठाने अनेक स्तूप उभारून ठेवले अन् भिक्षुसंघासाठी अनेक विहारही निर्माण केले. फाहियान या चिनी यात्रिकाने त्यांची नावेसुद्धा लिहून ठेवली आहेत. आज त्यांपैकी एक चिरासुद्धा जाग्यावर नाही. उरली आहेत, ती फक्त नावे—हुविष्क विहार,

चेतीयविहार, मिहिरविहार...

वैदिकधर्मी देवमंदिर मथुरेत उभे झाले ते शकक्षत्रपांच्या कालात. ते देऊळ मात्र वासुदेव-कृष्णाचे अन् चतुःशाल होते.

सनपूर्व दुसऱ्या शतकापासून तो इ. स. च्या बाराव्या शतकापर्यंत मथुरेत मूर्तिकलेचा वैभवशाली संसार थाटला गेला. शैव, वैष्णव, जैन, बौद्ध अशा सर्व संप्रदायांच्या विविध देवमूर्ती इथे घडल्या. काही स्थानांवर राहिल्या, बऱ्याच देशभर गेल्या. इथल्या मूर्तिकारांना दगडही चांगला अन् जवळ मिळाला. वालुकामय अन् लालसर असा तो दगड होता. तातपूर, फत्तेपूर सीकरी, रुपवास या ठिकाणी त्यांच्या खाणीच्या खाणी होत्या.

मथुरेत अंकाली नावाची एक टेकडी आहे. ती शतकानुशतके मूर्ती, मुद्रा, वेदिका, स्तंभ अशी पुरातत्त्वसामग्री आपल्या गर्भात साठवून बसली होती. संशोधकांनी तिची ती श्रीमंती अंदाजली. त्यांनी तिथे उत्खनन केले आणि समुद्रमंथनातून चौदा रत्ने वर यावी तशा मूर्तीच मूर्ती तिथून वर आल्या. काही भग्न, काही समग्र. उत्तर प्रदेशाच्या शिक्षाविभागाने त्याविषयी एक पुस्तकच प्रकाशित केले आहे. त्यात तिथे सापडलेल्या मूर्तींचे तपशीलवार वर्णन केले आहे. त्यातला काही अंश त्याच्याच आधारे मी पुढे देत आहे —

ब्रह्मदेवाच्या मूर्ती सर्वांत कमी आढळतात. कारण तो अपूज्य ठरला आहे ना ! पण इथे त्याची एक मूर्ती मिळाली आहे. तीन तोंडे सरळ रेषेत अन् चौथे मधल्या तोंडाच्या मागच्या अंगाला. मूर्ती सुरेख आहे. आपण लिंगरूपात शिवाची पूजा करतो. प्राचीन काळीही तशीच करीत. पण मथुरेच्या कलाकारांची कल्पकता दांडगी. त्यांनी ते शिवलिंगच पंचमुखी बनवले. ही लिंगे कुषाण कालातली म्हणजे इ. स. च्या पहिल्या दुसऱ्या शतकातली आहेत. शिवालाच पंचानन म्हणतात. सद्योजात, वामदेव, अघोर, तत्पुरुष, ईशान, अशी त्यांची नावे आहेत. त्या कलावंतांनी लिंगाच्या चार बाजूंना चार मुखे कोरली अन् पाचवे मुख त्यांच्या माथ्यावर बसवले. शिवाच्या सपरिवार अन् अर्धनारीस्वरूप मूर्ती घडवल्या त्या वेगळ्याच.

शिवाची ध्यानमुद्रा अनेक ठिकाणी पाहायला सापडते; पण विष्णूची ध्यानमुद्रा कोणी पाहिली आहे काय ? विष्णू हा मुळी योगी नाहीच. तो आहे भोगी ! पण इथे त्याची ध्यानस्थ मूर्ती पाहायला मिळते. इथल्या कला-

कारांनी शैव आशय विष्णूच्या अंगी चिकटवला. देवच घडवतो असे नव्हे, तर माणूसही घडवतो. अघटित घडवतो. देवालाही आपल्या कल्पनेप्रमाणे वागायला लावतो.

इथे सापडलेला विष्णू पद्मासन घालून बसलेला असला, ध्यानस्थ असला, तरी त्याचे प्रसाधनवैभव तिथेही त्याला सोडून गेले नाही मस्तकी अलंकृत किरीट, कानी कुंडले, गळा मुक्ताहार, त्यावर रुळणारी वैजयंती, दंडात बाजूबंद, शिरावर छत्र, नेसते अतितलम चुणीदार वस्त्र, असे ते नयनमनोहर ध्यान आहे. ‘ रूप पाहता लोचनी ! सुख झाले वो साजणी ’ असेच कोणीही रसिक त्याला पाहून म्हणेल. ही मूर्ती गुप्तकालातली आहे. मथुरेत विष्णुमूर्ती केवळ दगडाच्याच बनवीत असे नाही, तर मातीच्याही त्या बनवीत अन् आव्यात भाजून पक्क्या करीत. त्यांचा आकृतिबंध पाषाणमूर्तींपेक्षा रतिभरही उणा नसे.

व्रजमंडलातला अणुरेणू गोपालकृष्णाच्या पदस्पर्शाने पुनीत झालेला आहे. तिथल्या अनेक स्थळांशी त्याच्या पराक्रमाच्या अन् लीलाविहाराच्या स्मृती निगडित आहेत. त्यामुळे एखाद्याला वाटावे, की मथुरेत कृष्णविषयक मूर्तींचा संभार असेल; पण वस्तुस्थिती नेमकी उलट आहे. कृष्णाच्या अवघ्या तीन-चार मूर्तीच अन् त्याही दुय्यम दर्जाच्या इथे आढळल्या आहेत. आश्चर्यच आहे हे ! मथुरेचे किंवा व्रजमंडळातले साहित्य तिथल्या कृष्णलीलेशी इमानदार राहिले, पण मूर्तिकलेने तिची फारशी दखल घेतली नाही.

मथुरेत जिनमूर्ती तर कुषाणकालाच्या आधीपासूनच घडू लागल्या होत्या. आदिनाथ, नेमिनाथ, पार्श्वनाथ, महावीर हे तीर्थंकर आकाराला आले होते. काही पद्मासनावर बसलेले, तर काही खड्गासनावर उभे. क्वचित् एकाच घडीव चौकोनी पाषाणाच्या चारी बाजूंवर चार ! अशा चतुर्मूर्ती पाषाणांना सर्वतोभद्रिक म्हणत. यक्षिणी या तीर्थंकरांच्या सेविका. आदिनाथाची चक्रेश्वरी अन् नेमिनाथाची अंबिका. या दोन मूर्ती घडवताना तिथल्या कलाकारांचा हात हळुवार अन् अतिकोमल झाला आहे.

बुद्धाने स्वतःला कधी देव म्हटले नाही, की अवतारही म्हटले नाही. त्याची भूमिका धर्मचक्रप्रवर्तकाची. पण त्याच्या भक्तांना त्याला देवपदवी दिल्यावाचून चैनच पडले नाही. ते त्याच्या उपदेशाचे मनन, चिंतन करण्याच्या ऐवजी

त्याची पूजा करू लागले. कुषाणकालाच्या आधीच हे परिवर्तन घडले. प्रथम प्रथम ते बुद्धाची पदचिन्हे कोरून त्याच्यावर पत्रपुष्प वाहत. त्याच्या जोडीने बोधिवृक्ष, धर्मचक्र, स्तूप, चैत्य, यांनाही बुद्धच मानून त्यांची पूजा करीत; पण पुढे त्यांचे तेवढ्यावर समाधान होईना. त्यांना प्रतीक नको होते, प्रतिमा हवी होती. बुद्ध मूर्तिमंत पुढे हवा होता.

गांधार देशातल्या कलाकारांनी अशी बुद्धमूर्ती साजिरी गोजिरी निर्माण केली आहे असे जेव्हा त्यांना समजले, तेव्हा बौद्ध कलाकार तिच्याकडे धावले. त्यांनी ते मूर्तितंत्र अभ्यासले, आत्मसात केले. मग एकटा बुद्धच नव्हे, तर समग्र बुद्ध-चरित्रच त्यांच्यापुढे कलाविषय म्हणून उभे राहिले. एका जन्माचेच नव्हे, तर जातकात वर्णिलेल्या अनेक जन्मांचे. किती घडवू अन् किती खोदू असे त्यांना झाले. मथुरेच्या तत्कालीन कुषाण शासकांनी त्या कलाकारांना सक्रिय प्रोत्साहन दिले. मग त्या कलाकारांनी एकाहून एक विशालकाय अशा बुद्धमूर्ती निर्माण केल्या. बुद्धाबरोबरच बोधिसत्त्वही घडवले. त्या दोघांतला फरक असा – बुद्ध म्हणजे ज्याला बोधी ( ज्ञान ) प्राप्त झाली आहे, असा अर्हत पुरुष ! अन् बोधिसत्व म्हणजे बुद्ध पदवीच्या प्राप्तीसाठी जन्मजन्मांतरी प्रयत्नपूर्वक साधना करणारा. मूर्तिकलेत त्या दोघांचे वेगळेपण दाखवले गेले, ते असे–

बोधिसत्त्वाचा राजवेष असतो. त्याच्या अंगाखांद्यावर दागिन्यांची श्रीमंती असते. मस्तकी मुकुट असतो. मुद्रा राजस असते. बुद्धाच्या अंगावर उपरणे-वजा केवळ एक चीवर ( वस्त्र ) असते. ते अतितलम अन् चुणीदार असते. अलंकारांचा अभाव असतो. शिरी उष्णीष म्हणजे जटाजूट असतो. केसांच्या लडी झालेल्या असतात. मुखमुद्रा चिंतनशील असते. ही त्याच्या बुद्धत्वाची ओळखण असते. मथुरेत या दोन्ही प्रकारांच्या मूर्ती सापडल्या आहेत. त्यातल्या काही उभ्या आहेत, तर काही पद्मासनावर बसलेल्या आहेत. कुषाणकालात बैठ्या मूर्ती घडल्या, तर गुप्तकालात उभ्या मूर्ती बनल्या.

यक्ष हे प्राचीन काळचे उपास्य देव. बौद्ध-जैनांनीही त्यांचा समादर केला अन् त्यामुळेच ते कलेच्या क्षेत्रांतही दाखल झाले. मथुरेत यक्षमूर्ती सर्वांत अधिक मिळाल्या आहेत. या सर्व यक्षांचा दादा शोभेल असा एक यक्ष म्हणजे परखम यक्ष. तो अतिविशाल आहे. त्याचे पाठपोट सगळे शरीर अंगाअंगाने बघून घ्यावे. मथुरेजवळच्या परखम गावी तो महाभाग सापडला, म्हणून त्याला

त्याच नावाने ओळखू लागले. सनपूर्व तिसऱ्या शतकातली ही मूर्ती आहे, असे समजतात. त्या काळातल्या लोकसमाजात यक्षपूजा सर्रास प्रचलित होती. बौद्ध ग्रंथात यक्षाविषयी बऱ्याच कथा आहेत. जैनांच्या तीर्थंकरांचेही यक्षांशिवाय चालले नाही. जैनांच्या व्यापारी सार्थवाह संघाचा तर मणिभद्र यक्ष हाच तारक अन् संरक्षक ठरला आहे.

यक्षांप्रमाणेच नागही वरील तिन्ही धर्मांना या ना त्या कारणासाठी पूज्य ठरले आहेत. श्रीकृष्णाचा थोरला भाऊ बलराम हा शेषनागाचा अवतार मानतात. श्रीविष्णू त्याच नागाच्या शय्येवर पहुडला आहे. जैन तीर्थंवर पार्श्वनाथ आणि बुद्ध या दोघांवरही विशिष्ट प्रसंगी नागांनी फणाछत्र धरले आहे. नागमूर्ती आवर्जून निर्माण करण्यात या सर्व गोष्टींची कृतज्ञता व्यक्त झालेली आहे. मथुरेतल्या या नागमूर्ती सर्पाकार अन् अर्धसर्पाकार अशा उभयविध आहेत. त्या सुरेख सुंदर बनवण्यात कलाकारांनी यत्किंचित् उणेपणा ठेवलेला नाही.

पण हे सारे कलावैभव केवळ मथुरेला देवदर्शनाला जाणाऱ्या यात्रिकाला दिसायचे नाही. याचे कारण ते कुठे वाटेवर पडलेले नाही किंवा देवळातही मांडलेले नाही. ते पाहायचे, तर मथुरेच्या वस्तुसंग्रहालयाची वाट विचारावी लागेल. तिथे जे दिसणार नाही, त्याच्या दर्शनासाठी मग लखनौच्या वस्तुसंग्रहालयाची वारी करावी लागेल.

ψ ψ ψ

# प्राणप्रतीक

एकदा मानवशरीरातल्या सकळ इंद्रियांत कळंभा माजला. जो तो म्हणू लागला, की ' मी मोठा, मी देहधारक ! ' सगळेच भांडणारे; मग निर्णय कोण करणार ! मग ती इंद्रिये गेली प्रजापतीकडे. प्रजापती त्यांना म्हणाला, ' एक सूत्र लक्षात ठेवा. ज्याच्यावाचून अडेल, खोळंबेल, तो श्रेष्ठ ! '

मग प्रत्येक इंद्रियाने आपापली श्रेष्ठता पटविण्यासाठी शरीरातून निघून जायचे ठरवले. प्रथम वाचा गेली. माणसाची जीभ जड झाली. मग गेले डोळे. सगळीकडे अंधार. मग गेले कान. कानामागून मन. अशी इंद्रिये एकामागून एक पसार झाली. जाग्यावर राहिला तो फक्त प्राण. इंद्रिये वर्षभर बाहेर राहिली. मग एकेक परत येऊ लागले. प्रत्येकाला वाटले होते, की आपल्या अभावी देह निश्चेष्ट पडला असेल, पण तसे काहीच झाले नव्हते. शरीर जिवंत होते.

ती सर्व परत आल्यावर मग प्राण म्हणाला, ' आता माझी पाळी. ' पण कसली पाळी अन् कसले काय; त्याने ' जातो ' म्हटले एवढ्यानेच

इंद्रियांचे राज्य हादरले. प्राण प्रयाणाला निघताच तीही देहांपासून खेचली जाऊ लागली. मोठा आकांत ओढवला. इंद्रियांना श्रेष्ठ कोण, ते डाग दिल्यागत कळले. त्यांनी प्राणाला कळवळून म्हटले, ' तू गेलास की आमचे संपले, आम्हा सर्वांत तूच श्रेष्ठ ! '

छांदोग्य उपनिषदात ही गोष्ट आली आहे. प्राणमहिमा कथन करण्यासाठी ती सांगितली आहे. प्राण दाखविता येत नाही, पण अनुभवता येतो. जडात नसतो, पण चेतनात असतो, तो प्राण ! कृमिकीटकापासून तो माणसापर्यंत सर्वांत प्राणाचे स्पंदन आहे. सजीव प्राणी म्हणजे देह अन् प्राण यांचा संयोगच होय. कारण प्राणाची प्रचीती यायला देहाची गरज असते.

प्राण सूक्ष्म आहे, चैतन्यमय आहे, स्फूर्तिमय आहे; आकुंचन, प्रसरण, इत्यादी हालचालींना तोच आधारभूत आहे. जीवनाचे मुख्य लक्षणच ते. शरीरांतल्या सर्व शक्तींचा प्राण हाच मूलस्रोत आहे. प्राणावाचून शरीर म्हणजे देवावाचून राऊळ !

जगाचा मूलाधार कोण, असा प्रश्न विचारला असता उपनिषदातल्या उषस्तिचाक्रायणाने ' प्राण ' असे त्याचे उत्तर दिले. तो जगाची नाभी आहे. रथचक्राच्या सर्व आऱ्या जशा तुंब्यात म्हणजे नाभिप्रदेशी एकत्र मिळतात, तद्वत् शक्ती शेवटी प्राणातच मिळतात. प्राण म्हणजेच जीव, तोच आत्मा, तोच परब्रह्म असा निर्णय कौषीतकी ऋषीने सांगितला. जीवशास्त्रदृष्ट्या प्राण म्हणजे आयुष्य, मानसशास्त्रदृष्ट्या प्राण म्हणजे प्रज्ञा आणि वेदान्तशास्त्रदृष्ट्या प्राण म्हणजे आत्मा, असे गुरुदेव रानडे यांनी सांगितले आहे.

ज्यांची प्राणशक्ती जबरदस्त त्याला वेदांनी ' असुर ' म्हटले आहे. असुर म्हणजे प्राणवान्. देवांनासुद्धा ऋग्वेदात असुरच म्हटले आहे. असुर शब्दाचा अर्थ देवविरोधी झाला, तो ऋग्वेदकाळानंतर. ' अन्नमय प्राण, प्राणमय पराक्रम ' या लोकोक्तीत हेच सार आहे.

प्राणाला आत्मा मानूनच उपनिषदांनी प्राणोपासना सांगितली. ती आत्मोपासनाच मानली. सर्वांचा प्राण हा तत्त्वतः एकच आहे. आत्म्याचे लक्षणही तेच. प्राणाचा एक विशेष म्हणजे त्याला पापाचा स्पर्श होत नाही. तो अन्न मागतो; पण ते केवळ देहधारणार्थ. मिळालेले अन्न तो सर्व इंद्रियांना पोचवतो. अग्नी जसा हव्यवाहक, तसाच प्राण हा अन्नरसाचा वाहक आहे. प्राणाला

साम असेही म्हटले आहे. साम म्हणजे समतेचे तत्त्व. मुंगी असो वा हत्ती असो; तो सर्वांशीं एकरूप होतो. मुंगीत मुंगीएवढा, हत्तीत हत्तीएवढा !

म्हणूनच प्राणायाम हे योगविद्येतले एक महत्त्वाचे अंग ठरले आहे. प्राणायाम म्हणजे प्राणांचा व्यायाम. पूरक, कुंभक, रेचक असे त्याचे प्रकार. हठयोगात त्याच्या उज्जायी, सीत्कारी अशा अनेक पद्धती दिल्या आहेत. शरीर हलके, चपळ, चिवट व्हावे; इंद्रियांवर प्राणांचा ताबा व्हावा अन चित्तशुद्धीही व्हावी, हा त्यातला हेतू.

उपनिषदे आणि दर्शने यांतले प्राणांचे माहात्म्य थोडक्यात असे आहे.

पण ही प्राणविषयक कल्पना उपनिषदे अन् दर्शने एवढ्यापुरतीच मर्यादित राहिली नाही. लोकसाहित्य ही त्याबाहेरची मोठी विद्या. ती ज्यांनी निर्माण केली, ते अज्ञात कलाकारही प्राणाविषयी उदासीन राहिले नाहीत. त्यांनी स्वतंत्रपणे प्राणाचा विचार केला आहे अन् तो करता करता ते उपनिषदांच्या-जवळ येऊन पोचले आहेत. मराठी लोकसाहित्यात ‘ कुडी-आत्मराज संवाद ’ नावाचे एक गीत आहे. कुडी बायको अन् आत्मराज अर्थात् प्राण हा तिचा पती —

**जिव जन्माचा सोबती कुडी बोलती**
**मला नका हो टाकून जाऊ प्राणपती**

या त्या गीताच्या पहिल्या पंक्ती आहेत. सुरवातीस दिलेल्या छांदोग्यातल्या गोष्टीसारखेच त्या गीताचे सार आहे. लोकसाहित्यात प्राण, जीव, आत्मा, हृदय हे सगळे एकार्थकच मानले आहेत. इथेही उपनिषदांशी एक-वाक्यता. पण त्या साहित्यातल्या कल्पनेचे उड्डाण गगनभेदी आहे. उप-निषदातला प्राण देह व्यापून, पण देहाच्या अंतर्गतच राहतो; पण लोकसाहित्यातला प्राण देह सोडून कुठेही दूरदेशी सातासमुद्रापार राहू शकतो अन् तिथून देह चालवू शकतो. उपनिषदातल्या प्राणाला आकार नाही. लोकसाहित्यातल्या प्राणाला तो असतो. पोपटाचा, भुंग्याचा, माशीचा, मुंगीचा अन् असाच कोणाचाही— कधी कधी माणसाचा प्राण वृक्षातही राहू शकतो. त्यामुळे तो डोळ्यांनी पाहता येतो आणि एखाद्या सुरक्षित ठिकाणी बंदही करून ठेवता येतो. त्या प्राणाला इजा झाली, तर इकडे शरीर विकल होते. तो प्राण

मेला, की इकडे शरीरही गारठते. म्हणून जादूगार किंवा दैत्य-दानव आपला प्राण ‘ गुह्यात् गुह्यतर ’ करून कुठेतरी ठेवतात अन् जगात हवा तसा धुमाकूळ घालतात. कारण त्यांना मग मरणाचे भय नसते. अशा प्रकारच्या लोककथांनी साहित्याचे भांडार भरून टाकलेले आहे. सगळ्या भाषांत अन् सगळ्या देशांत. ‘ ओल्ड डेक्कन डेज ’ असे एक लोककथांचे पुस्तक आहे. त्यातली प्राणविषयक एक लोककथा अशी–

एक होता जादूगार. त्याचे नाव होते पंचकिन. तो मोठा हिकमती होता. त्याचे एका राजाच्या राणीवर मन जडले; पण ती त्याचे ऐकेना. तेव्हा त्याने तिला जादूविद्येने पळवून आणले अन् एका गुहेत बंदिस्त केले. बारा वर्षे अशी गेली. राणी त्याला बधेना, तो तिला सोडीना. बारा वर्षांनंतर तिचा पुत्र शोध करीत करीत तिथवर पोचला. जादूगार तेव्हा जवळपास नव्हता. म्हणून त्या दोघांना मनाजोगते बोलता आले. राजपुत्राने जादूगाराला मारायचा निर्धार बोलून दाखवला, पण राणी म्हणाली, ‘ हे घडायचे कसे ? कारण त्याचा प्राण मुळी त्याच्या शरीरात नाहीच. ’

मग त्या दोघांनी मसलत रचली. राणीने जादूगाराच्या मागणीला रुकार द्यावा अन् प्रेम दाखवून त्याच्या प्राणाचे रहस्य समजून घ्यावे, असे ठरले. राजपुत्र लपला. जादूगार जवळ येताच राणीने ती सारी बतावणी केली. जादूगार हुरळला. तो म्हणाला.

“ तू माझ्या प्राणाला मुळीच भिऊ नको. तो मी एका निर्जन प्रदेशात, ताडामाडांच्या जंगलात लपवून ठेवला आहे. एकावर एक सात घडे. सहाव्या घड्यात एक पोपट. तोच प्राण. तिथवर कोणी पोचूच शकणार नाही. तो पोपट जोवर सुरक्षित, तोवर मला ब्रह्मास्त्राचेही भय नाही. ”

राजपुत्राने त्याची ही बढाई ऐकली. तो त्या कामगिरीवर निघाला. इष्टस्थळी पोचला. त्याने जादूगाराचा तो पोपटरूपी प्राण हस्तगत केला. तो घेऊन तो जादूगाराकडे आला. मांजर उंदराला खेळवून मारते, तसे त्याने जादूगाराला मारायचे ठरवले. जादूगार लागला गयावया करायला; पण आता डाव राजपुत्राच्या हाती होता. त्याने पोपटाचा एक पंख उपटला इकडे लगेच जादूगाराचा हात उखडला. राजपुत्राने दुसरा पंख उपटला. जादुगाराच्या दुसऱ्या हातातून वारे गेले. असा त्या पोपटाचा एकेक अवयव तोडीत,

त्याला अर्धमेला करीत, शेवटी त्याने पोपटाची मान मुरगळली. तिथेच जादूगाराचा अंत झाला. राजपुत्र आपल्या मातेला सोडवून कृतार्थ ठरला.

जागतिक लोककथांचे अनेक विद्वानांनी अनेक परींनी अध्ययन केले आहे. त्यावरून असे आढळून आले आहे, की लोककथा उगाच कशातरी निर्माण होत नाहीत. त्यांच्या मुळाशी विशिष्ट तत्त्व असते, विशिष्ट आशय असतो. त्या मूलभूत आशयाला त्यांनी नाव ठेवले आहे 'मोटिफ.' भारतीय शास्त्रज्ञ त्यालाच प्रतीक म्हणतात. लोककथांच्या मुळाशी असलेली अशी अनेक प्रतीके त्या शास्त्राच्या अभ्यासकांनी शोधून काढली आहेत. प्राणप्रतीक हे त्यांपैकीच एक होय. माणूस किंवा राक्षस अन् त्याचा प्राण या प्रतीकाचे अनेक पर्याय त्यांना गवसले आहेत. एका कथेत दुहेरी, तिहेरी प्रतीकेही गवसली आहेत. त्यांतले एक-दोन पर्याय आपणही शोधू या.

जुळ्या मुलांची गोष्ट बहुतेकाना माहीत असते. त्यांच्यापैकी एकाला काही व्यथा-वेदना झाली, की दुसराही मलूल पडतो, असा अनुभव सांगतात. 'जुळ्यांचे दुखणे असा वाक्प्रचार पडला आहे, तो त्यावरूनच. 'दो देही एक प्राण' असा त्यावरून निष्कर्ष निघतो. हा निष्कर्ष स्वीकारून लोकसाहित्यात अनेक कथांची निर्मिती झाली आहे. अशा कथांपैकी एक कथा अशी —

एका राज्यकन्येला अनेक राक्षसांनी मिळून पळवून आणली. ते तिला आग्रह करू लागले, की 'तू आम्हा सर्वांची बायको हो.' ती शहाणी होती. ती म्हणाली. 'ते ठीक आहे. पण तुमचे अन् मानवांचे सदाच वैर. समजा, एखादा पराक्रमी पुरुष आला अन् त्याने तुम्हाला कंठस्नान घातले तर? मग माझी गत काय?'

त्यावर राक्षस म्हणाले, 'आम्ही, कोणी मरणेच शक्य नाही. आमचा सगळ्यांचा मिळून एकच प्राण आहे अन् तो आहे एका माशीच्या रूपात. आम्ही ती माशी एका संदुकेत घालून एका झऱ्याखाली पुरून ठेवली आहे. ती जागा आधी कोणाला सापडायची नाही अन् सापडली, तरी ती संदूक उघडायची नाही.'

"मग तुम्हांला तरी ती संदूक कशी उघडेल?" मधेच त्या राजकन्येने प्रश्न केला.

"अग, त्यासाठी आम्ही एक परवलीचा शब्द ठरवला आहे."

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वकम

" तो कोणता ? "

" तमस् ! " तो शब्द सात वेळा उच्चारायचा, की संदूक उघडते. त्यात आणखीही एक गोम आहे. नुसते माशीला मारले म्हणून आम्ही मरणार नाही. तिला एका घावात मारले पाहिजे अन् तिच्या रक्ताचा एक थेंबही खाली पडता कामा नये. "

एक राजपुत्र या सगळ्या शर्ती पाळून त्या माशीला मारू शकला. त्यामुळे ते राक्षसही मेले अन् ती राजकन्याही त्याला मिळाली.

प्राणप्रतीकाभोवती ज्या कथा गुंफलेल्या आहेत, त्यांपैकी बहुतेक याच जातीच्या आहेत. एखाद्या साहसी राजपुत्राने शत्रूच्या प्राणप्रतीकाचा घात करून राजकन्येला मुक्त करणे अन् तिला आपल्या लग्नबंधनात अडकवणे. अशा कथांची निर्मिती करताना लोककथाकारांचा एक डोळा नेहमीच पुराणांकडे असतो. पुराणे जशीं वेदार्थाचे उपबृंहण करतात, तशा लोककथा पुराणांचे आशय फुगवतात.

सप्तशती हा देवीमाहात्म्याचा ग्रंथ मार्कंडेय पुराणातून वेगळा काढलेला आहे. त्यात रक्तबीज नावाचा एक असुर आढळतो. त्याचा प्राण त्याच्या रक्तात होता. त्याचे रक्त सांडले, की त्याच्या थेंबाथेंबांतून नवे नवे रक्तबीज निर्माण व्हायचे. त्यामुळे युद्धात देवीला तो अनाटोप झाला. मग देवीने एक महासाहस केले. तिने त्याचे रक्त भूमीवर पडू न देता वरच्यावर ते प्राशन करून रक्तबीजाचा वध केला.

वरच्या कथेत राक्षसाचा प्राण असलेल्या माशीचे रक्त भूमीवर पडता कामा नये अशी जी शर्त होती, ती सप्तशतीतल्या या कथेशी ताडून पाहावी.

कित्येकदा एखाद्या व्यक्तीचा प्राण बाहेर कुठे न राहता त्याच्याच एखाद्या अवयवात राहत असतो. त्या अवयवावर जोवर आघात झाला नाही, तोवर वज्रही त्याच्यावर निष्प्रभ होते. नेमका मर्मप्रहार झाल्यावाचून तो मरायचा नाही. याविषयी एक राजस्थानी कथा डॉ. कन्हैयालाल सहल यांनी दिली आहे, ती अशी—

उज्जयिनीत महासेन नावाचा एक राजा होता. त्याने गुणवती पत्नी मिळावी म्हणून तप केले. देवी त्याला प्रसन्न होऊन म्हणाली, ' अंगारक दैत्याची कन्या अंगारवती ही मी तुला वधू नेमस्त केली आहे. '

मग महासेन एके दिवशी शिकारीला म्हणून बाहेर पडला. एका रानडुकराचा पाठलाग करीत एका गुहेत शिरला. कर्मधर्मसंयोगाने ती गुहा त्या अंगारक दैत्याचीच होती. तो दैत्य झोपला होता; पण त्याची कन्या अंगारवती जागी होती. तिने महासेनाला पाहिले. मदनासारखे पुरुषलावण्य ती प्रथमच पाहत होती. महासेनाच्याही ती डोळ्यात भरली. त्यामुळे दोघेही प्रथमदर्शनीच एकमेकांवर अनुरक्त झाली. खरे म्हणजे ती बापाच्या जाचाला कंटाळली होती. शिवाय लग्नालाही योग्य झाली होती. दोघांच्या काही वेळ प्रणयकथा झाल्यावर ती महासेनाला म्हणाली.

" माझ्या बापाला ठार केल्यावाचून तुला माझी प्राप्ती व्हायची नाही; अन् तो तर अतुर्बळी आहे. त्याचे एक मर्म आहे. त्यावर घाव घातल्याशिवाय त्याला कोणत्याच शस्त्राने मरण येणार नाही. "

" कोणते मर्म ते सांग मला. " महासेन तिला उत्सुकतेने बोलला.

" त्याचा प्राण त्याच्या काळजात नाही. तो आहे त्याच्या डाव्या दंडाच्या सांध्यात. तू नेमका तिथे वार करशील, तर तुझे काम साधेल. "

एवढ्यात अंगारक दैत्य जागा झाला. त्याला माणूस-घाण आली. तो महासेनावर येऊन धडकला. महासेनाने त्याला काही वेळ हुलकावले अन् शेवटी त्याच्या डाव्या दंडावर घाव घातला.

हीही प्राणप्रतीकाचीच लोककथा असली, तरी तिलाही पौराणिक वास आहेच.

गांधारी डोळे बांधून राहिली होती अन् त्यामुळे तिच्या दृष्टीत विलक्षण सामर्थ्य आले होते. ती ज्याच्याकडे बघेल, तो अमर होईल असे ते सामर्थ्य होते. दुर्योधनाला नेहमीच भीमाचे भय वाटे. म्हणून त्याने आईच्या दृष्टीपुढे उभा राहून अमर व्हायचे ठरवले. तो नखशिखान्त उघडा होऊन गांधारीकडे जायला निघाला. कृष्णाला ते समजले. या गोष्टीत घात आहे, असे त्याने जाणले. तो दुर्योधनाला आडवा आला. म्हणाला, ' वेड्या, असले अवलक्षण करू नको. गांधारी तुला शापील. निदान कमरेभोवती तरी काही गुंडाळ. ' दुर्योधनाला ते खरे वाटले. त्याने एक पुष्पहार कमरेभोवती वेढला. तशा स्थितीत तो गांधारीपुढे उभा ठाकला. पुत्राला अमर करण्यासाठी तिने आपले डोळे सोडले; पण दुर्योधनाला पाहून ती खट्टू झाली. म्हणाली, ' वाटेत तुला कोण भेटला ते सांग. ' दुर्योधन म्हणाला, ' कृष्ण भेटला. ' ती बोलली,

'तरीच ! मी तुला जेवढे पाहिले तेवढा तू अमर झालास. ज्या भागावर माझी दृष्टी पडली नाही, तिथे मात्र तुझे मरण आहे.'

—आणि शेवटी झालेही तसेच. भीमाने गदायुद्धात नेमका त्याच्या मांडीवर प्रहार करुन त्याला रणभूमीवर निजवले.

वरच्या अंगारक दैत्याच्या कथेशी ही कथा ताडून पाहावी.

प्राणप्रतीकाच्या अशा आणखी कितीतरी गोष्टी सांगता येतील. पण या सर्व गोष्टींत नवल वाटते ते हे, की विशिष्ट प्राणवाले हे दैत्य, चेटकी, जादूगार आपले रहस्य उघड का करतात ? ही जीवघेणी फुशारकी आपल्या प्राणाशी बेतेल हे त्यांना कळत कसे नाही ? याचे उत्तर असे आहे' की अशा लोकांना विवेकच नसतो. त्यांनी जर आपले रहस्य ओठांच्या आतच ठेवले असते, तर त्यांचा अंतच झाला नसता. ते जगाचे काळ ठरले असते.

लोककथाकारांना त्यांना असे माजू द्यायचे नव्हते. त्यांची दृष्टी विश्वमंगलाची होती. दुष्ट-दुर्जनांचे, अत्याचारी दानवांचे कळप मोकाट सुटावे अन् त्यांनी जनतेला हैराण करावे, हे त्यांना मंजूर नव्हते. कथा निर्माण करताना त्यांनी ही लोककल्याणाची दृष्टी कधीच सोडली नाही.

# बुद्धघोष—एक प्रखर पांडित्य

‘ तू आता इथून सरळ लंकेत जा. तिथे राहून सिंहली भाषेचा अभ्यास कर. मग त्रिपिटकावरच्या अट्ठकथांचा पालीत अनुवाद कर आणि त्या अट्ठकथा घेऊन भारतात परत ये. अभ्यासकांना त्रिपिटकाचे मर्म कळायला त्या कथांची फार जरूरी आहे.’

रेवंत नावाच्या महास्थविराने नुकतीच प्रव्रज्या घेतलेल्या आपल्या शिष्याला ही आज्ञा दिली. हा शिष्य म्हणजे बौद्ध जगातला सूर्य समजला जाणारा महापंडित बुद्धघोष होय. वैदिक वाङ्मयात जे स्थान सायणाचार्यांचे तेच स्थान पाली वाङ्मयात बुद्धघोषाचे आहे. सायणाचार्य वेदांचा भाष्यकार, तर बुद्धघोष हा बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचा भाष्यकार आहे. जगातल्या बौद्ध दार्शनिकांत त्याचे स्थान अद्वितीय आहे. त्याच्या हस्ते पाली वाङ्मयाची जेवढी निर्मिती आणि जितका प्रचार झाला, तेवढा दुसऱ्या कोणाकडूनही झाला नाही. तो जन्मला नसता, तर लंका, सयाम, ब्रह्मदेश या देशातल्या थेरवादी बौद्ध धर्माचे काय झाले असते, ते सांगणे कठीण आहे.

पण आश्चर्याची गोष्ट ही, की अशा या महान् दार्शनिकाचे अधिकृत चरित्र उपलब्ध होत नाही. पाली साहित्यात आणि अन्यत्रही ज्या काही उल्लेखांच्या पिंजोळ्या मिळतात, त्या एकत्र करून त्याच्या चारित्र्याचे सणंग विणावे लागते.

इ. स. ५०० च्या सुमारास त्याचा जन्म झाला. ' महावंश ' ग्रंथावरून तो गयेजवळच्या घोषग्रामी जन्मल्याचे कळते. ब्रह्मी बौद्ध म्हणतात, की तो आमच्या देशात जन्मला. श्री. धर्मानंद कोसंबी म्हणतात, की त्याचे जन्मस्थान तेलंगणात कुठेतरी आहे. कालिदासाच्या जन्मस्थळाबद्दल जशी ओढाताण होते, तशीच ही आहे. त्याचा बाप मगधराज संग्राम याचा राजपुरोहित होता. घराणे सनातनी वैदिक ब्राह्मणाचे अन् पढिक पंडितांचे. त्यामुळे बुद्धघोषालाही बापाने वेदाध्ययनात घातले. तो एका नव्हे, तीन वेदांत पारंगत झाला. नंतर त्याने शास्त्राध्ययन केले. लहान वयापासूनच बुद्धी तल्लख अन् कुशाग्र. त्यामुळे वैदिक दर्शनात तो खूप खोलवर शिरला. वेदान्त त्याच्या जिव्हाग्री नाचू लागला. विशेषतः पातंजल योगदर्शनाची त्याला फार गोडी होती. वेळ मिळेल तेव्हा तो योगसूत्रांचे परिशीलन करी. पतंजलीचे गुप्त आशय शोधून काढण्याचा त्याचा प्रयत्न असे.

तरुण वय अन् विद्या दांडगी. त्यामुळे तो क्वचित् विक्षिप्तपणाही करी. एके दिवशी त्याला काय लहर आली कोण जाणे ! एका ठिकाणी एक उंच विष्णुमूर्ती होती. हा तिच्या खांद्यावर चढला अन् आरामात भाजलेले चणे खात बसला. असले अवलक्षण करायची काही गरज होती का ? नाही. पण ते त्याने केले. त्यामुळे वैदिक ब्राह्मण त्याच्यावर चिडले. तो म्हणाला, ' असे रागावता का ? या रागात तुमचे अज्ञानच व्यक्त होते. मी ज्याच्यावर बसलो आहे तो विष्णू हे मान्य. मग मी कोण ? मीही विष्णूच, तुम्हीही विष्णूच. ' सर्वं विष्णुमयं जगत् ' मग कोण कोणावर बसला म्हणायचे ? ' या शब्दज्ञानाच्या चावटीने ते चिडणारे निरुत्तर झाले; पण त्यांचा राग मात्र गेला नाही. . .

त्याच्या विद्वत्तेवर खूष होऊन गयेतल्या राजाने त्याला एक गाव इनाम दिले; पण तो इनाम गावी तुकडे मोडीत बसला नाही. त्याला दिग्विजयाची खुमखुमी होती. त्याने अनेक राज्यांत हिंडून तिथल्या पंडितांशी दोन हात केले. सर्वांना—विशेषतः जैन-बौद्धांना त्याने वादविवादात हार खायला लावली. त्यांनी बुद्धघोषाचा धसकाच घेतला.

त्याच्या अमदानीत रेवंत महास्थविर हे बौद्धजगातले एक बडे प्रस्थ होते. अंगी संस्कृत पांडित्य मुरलेले असूनही त्याला पाली-भाषेचे विलक्षण प्रेम होते. बुद्धगयेत असताना घोष एके दिवशी पातंजल योगसूत्रांचा पाठ करीत होता. त्याचे उच्चारण शुद्ध होते, श्रुतिसुखद होते. रेवंताने ती युवकमूर्ती एकवार बारकाईने न्याहाळली. त्याला तो तरुण काही तरी आगळावेगळा वाटला. तत्क्षणी त्याच्या मनात विचार आला. 'हा पंडितयुवा बौद्धधर्मात आला तर किती बहार होईल!' रेवंत मग जवळ जाऊन त्याचे सूत्रपठण ऐकू लागला. बुद्धघोषाला त्याला डिवचण्याची लहर आली. तो म्हणाला.

"काय भिक्षुमहाराज, कळते का काही यातले?"

"कळते. तू म्हणतोस चांगले; पण मुळात ही सूत्रेच सदोष आहेत." रेवत शांतपणे म्हणाला.

"बोलता काय भदंत? पातंजलसूत्रांना सदोष म्हणणे म्हणजे उद्धटपणाची कमाल झाली."

"जे सत्य ते सत्य!"

"पटवून द्याल का?"

"अवश्य!"

"या मग असे पुढे!"

मग त्या दोघांचा वादविवाद सुरू झाला. बुद्धघोष सूत्रांचे मंडन करी, तर रेवंत त्याचे खंडन करी.

रेवंत हा बुद्धगयेतल्या महाविहाराचा प्रमुख स्थविर होता. त्या वेळी तो महाविहार लंकेचा राजा मेघवर्ण याच्या ताब्यात होता. लंकेतून बुद्धगयेला येणाऱ्या सिंहली भिक्षूंची राहण्याची, उपासनेची सोय व्हावी म्हणून त्याने सम्राट समुद्रगुप्ताच्या संमतीने ती गोष्ट केली होती. महास्थविर रेवंताची तिथे नेमणूक झाली होती, ती त्याचे अगाध पांडित्य अन् शुचिर्भूत वर्तन पाहूनच.

थोड्याच वेळात रेवंताची शोधक, विवेचक बुद्धिमत्ता घोषाला कळून आली. तो जेव्हा गंभीर वाणीने आपले मत स्थिर करू लागला, तेव्हा बुद्ध-घोषाने ते प्रतिपादन ऐकण्यासाठी जिवाचे कान केले. अंती तो निरुत्तरही झाला. विद्या विद्येला शरण गेली. बुद्धघोष रेवंताला म्हणाला, 'मी शरण आहे. मला तुमचा शिष्य करून घ्या.' त्यावर रेवंताने सांगितले, 'शिष्य

करीन; पण त्यासाठी आधी तुला बौद्ध विनयाप्रमाणे प्रव्रज्या घ्यावी लागेल.'

प्रव्रज्या घेणे म्हणजे संन्यास घेणे. घोष तरुण होता, गृहस्थाश्रम करायला सत्पात्र होता; पण तरीही ज्ञानाच्या लालसेने त्याने प्रव्रज्या घ्यायचे ठरवले. रेवंताने लगेच त्याला ती दीक्षा दिली.

मग बुद्धघोषाने गयेच्या महाविहारात राहून रेवंताकडे विनय आणि अभिधर्म या दोन्ही ग्रंथांचे अध्ययन केले. मग तो ग्रंथ लिहायला बसला. 'ज्ञानोदय' या नावाने त्याने तो ग्रंथ पूर्ण केला. पुढे त्याला वाटले, की 'धर्मदेशना' या ग्रंथावर अठ्ठकथा ( अर्थकथात्मक टीका ) लिहावी. तो उद्देश त्याने रेवंताच्या कानी घातला, त्यावर रेवंताने त्याला म्हटले. 'अठ्ठकथा लिहिण्यापूर्वी तू सिंहल देशाला जा आणि तिथल्या अठ्ठकथा आधी मिळव. त्यांच्या परंपराही नीट ध्यानी घे अन् मग तुझा ग्रंथ निर्माण कर.'

बुद्धघोषाने गुरूची ही आज्ञा शिरोधार्य मानली. ते युग पराक्रमाचे होते. दूरदूरच्या देशी जाऊन ज्ञान अन् धन मिळविण्याचे होते. विदेशात भारतीय संस्कृतीचा फैलाव करण्याच्या जिद्दीचे होते. परदेशात गेल्याने धर्म बाटेल, असे त्या काळच्या आचार्यांना अन् प्रचारकांना वाटत नव्हते, तर धर्म वाढेल असे वाटत होते. बुद्धघोष त्या युगाचा सुपुत्र होता. कसा जाऊ, कसा राहू, असले कसनुसे त्याच्या मनात आलेच नाही. गुरूची आज्ञा होताच त्याने लंकेचे प्रस्थान ठेवले.

बुद्धघोष लंकेत पोचला त्या वेळी महानाम नावाचा राजा तिथे गादीवर होता. महास्थविर संघपाल हा तिथल्या महावीराचा संघनायक होता. असे सगळे महा महा होते. संघपालाने बुद्धघोषाचे स्वागत केले. त्याला विहारात जागा दिली. बुद्धघोष लगेच कामाला लागला. प्रथम त्याने सिंहली भाषेचा श्रीगणेशा केला. थोड्याच कालात ती भाषा त्याने आत्मसात केली. मग तो तिथल्या महास्थविरांना विनवून म्हणाला.

"आता मला तुमच्याकडचे अठ्ठकथाचे ग्रंथ द्या. मी त्यांचे अध्ययन करीन. जिथे अडेल तिथे तुम्ही माझे शंका-निरसन करा. त्या सर्व कथा मला मागधीत अनुवादायच्या आहेत."

स्थविरांनी त्याची विनंती ऐकली, पण तिला रुकार मात्र दिला नाही. कसे देतील ? भाषेचे अध्ययन केले म्हणून काही दार्शनिक पात्रता येत नाही. तशी

पात्रता दिसल्यावाचून ग्रंथ स्वाधीन करणे म्हणजे कोंबडीच्या पुढ्यात मोती टाकण्यासारखेच. ते स्थविर बुद्धघोषाला म्हणाले.

'आमच्याकडून ग्रंथ घ्यायचे, तर त्याआधी तुला दार्शनिक योग्यतेची परीक्षा द्यावी लागेल.'

बुद्धघोष त्या गोष्टीला एका पायावर तयार झाला. त्यांनी मग बुद्धघोषाला दोन धार्मिक गाथा दिल्या अन् सांगितले की, 'यांची तू व्याख्या कर.' त्यातली पहिली गाथा प्रश्नरूप होती अन् दुसरीत बुद्धाने दिलेले तिचे उत्तर होते.

एके दिवशी देवपुत्र नावाचा एक जिज्ञासू श्रावस्तीत आला, त्याने बुद्धाचे दर्शन घेतले आणि एका गाथेच्या रूपाने त्याला प्रश्न केला —

**अंतो जटा बाहिजटा जटाच जटिता पजा**
**तं तं गोतम पुच्छामि को इमं विजटये जटम् ॥**

"आता कोडे, बाहे कोडे, अशा प्रकारे सगळी प्रजा जणू कोड्यातच अडकली आहे. म्हणून हे गौतमा, मी तुला विचारतो, की हे कोडे कोण सोडवील अन् कसे लेडवील ?"

त्यावर बुद्धाने उत्तराची गाथा म्हटली ती अशी —

**सीले पतिठ्ठांय नरो समंजो चित्तं पंचंच भावये ।**
**आतापीं तिपको भिक्खु सो इमं विजटये जटम् ॥**

'प्रज्ञावान् मनुष्य जेव्हा शीलात प्रतिष्ठित होऊन समाधी व प्रज्ञा यांची भावना करील, तेव्हा त्या उद्योगी, ज्ञानवान् भिक्षूला हे जगाचे कोडे सोडवता येईल.'

बुद्धघोषाने त्या गाथा ऐकल्या.

त्यातले शील, समाधी आणि प्रज्ञा हे शब्द ऐकताच त्याला स्फुरण चढले. पातंजलयोगदर्शनाच्या परिशीलनात ते शब्द त्याच्या पूर्ण परिचयाचे झालेले होते. लगेच ते त्याने उचलले आणि त्यातून बौद्धसंकेताच्या अनुषंगाने एका समग्र दर्शनाची उभारणी केली. बौद्ध जनांसाठी त्याने योगशास्त्राच्या आधारे त्या ग्रंथात क्रमबद्ध साधनामार्गच निर्माण केला. परीक्षेसाठी रचलेल्या या ग्रंथाचे नाव होते, 'विसुद्धिमग्ग' ( विशुद्धिमार्ग )

विशुद्धी म्हणजे सर्व मलरहित परिशुद्ध निर्वाण आणि मग्ग म्हणजे त्याच्या प्राप्तीचा उपाय.

बुद्धघोषाने पुढे जे अनेक ग्रंथ लिहिले, त्यात विसुद्धिमग्ग मेरुमणी ठरला आहे. बौद्धसाधनेचे कोणतेही अंग त्या ग्रंथाच्या बाहेर राहिले नाही. बौद्ध-साधनेचा तो जणू विश्वकोशच आहे.

तो ग्रंथ ऐकून संघपाल अन् त्याच्या जोडीचे स्थविर एकदम खूष झाले. मनोमन ते त्याच्या ज्ञानाला शरणच गेले. त्यांच्यापुढे जणू एक नवे ज्ञानभांडार उघडले. मग त्यांनी आपल्याजवळचे अठ्ठकथांचे सारेच्या सारे ग्रंथ त्याच्या हवाली केले. बुद्धघोष ते घेऊन ग्रंथकारपरिवेण (ग्रंथभवन) मध्ये जाऊन बसला. एकेक करीत समग्र सिंहली अठ्ठकथा त्याने पालीत अनुवादिल्या. त्या अठ्ठकथांच्या संग्रहांना त्याने वेगवेगळी नावे दिली. तो एकेक ग्रंथच झाला.

**समंतपासादिका**—ही संपूर्ण विनयपिटकावरची अठ्ठकथा आहे. ही त्याची पहिली अठ्ठकथा असावी असे म्हणतात. प्राचीन भारताचा सांस्कृतिक, राज-नैतिक इतिहास या ग्रंथावरून बराचसा निर्माण करता येईल. बुद्ध आणि त्याचे अनेक शिष्य यांची चरित्रे या ग्रंथात सापडतात. तत्कालीन अनेक प्रसिद्ध ऐतिहासिक व्यक्तीही त्यात भेटतात. कित्येक भोगोलिक स्थानांचीही माहिती होते.

**कंखावितरणी**—या ग्रंथात 'पातिमोक्ख' या ग्रंथावरची अठ्ठकथा आहे. या कथेत तत्कालीन भिक्षुसंघाचे जीवन कळते, तसाच त्याचा उत्तरकालीन विकासही समजून येतो.

**सुमंगलविलासिनी**—ही दीघनिकायावरची अठ्ठकथा आहे. बुद्धाला तथागत का म्हटले, त्याची दिनचर्या कशी होती, तत्कालीन अंग, मगध, कोसल, दक्षिणापथ इत्यादी देशांची स्थिती कशी होती, या गोष्टींचे प्रामाणिक विवरण या ग्रंथात प्राप्त होते. दीघनिकायातल्या कठीण शब्दांची निरुक्ती अन् अर्थनिर्वचन हा तर त्यातला गाभाच आहे. या निरुक्तिनिर्वचनाने बुद्धघोष हा बौद्धसाहित्याचा यास्क ठरला आहे.

**पपंचसूदनी**—ही मज्झिमनिकायावरची प्रदीर्घ अठ्ठकथा आहे. कुरुप्रदेश, श्रावस्ती, हिमाचल प्रदेश या भौगोलिक विभागांची बरीच तपशीलवार जाणकारी या ग्रंथात मिळते. इथे त्याने बुद्धवचनांचा क्रम लावून त्यांची व्याख्या केली

आहे. पाणिनीची सूत्रे एका विशिष्ट क्रमाने मागेपुढे करून भट्टोजी दीक्षिताने जशी सिद्धांत-कौमुदी रचली, तशी ही अट्ठकथा आहे.

**मनोरथपूरणी**–ही अंगुत्तरनिकायावरची अट्ठकथा होय. भगवान बुद्धाने बोधिप्राप्तीनंतर ४५ वर्षांपर्यंत कोणकोणत्या ठिकाणी वर्षावास केले, त्याची नोंद हिच्यात मिळते. पिंडोल, भारद्वाज, पुण्ण, मनाक चान, सोण, राहुल, उपाली, कस्सप, इ. भिक्षूंची चरित्रेही यात सापडतात. त्यांची त्यांची योग्यता अन् कामगिरीही कळते.

बुद्धघोषाच्या या साऱ्या अट्ठकथा पाली भाषेत आहेत. त्याच्या या महनीय प्रयत्नामुळे पाली भाषेचा दर्जा खूप उंचावला. बौद्ध पंडितांचा तिच्या-विषयीचा दृष्टिकोनही बदलला.

खरे म्हटले, तर बुद्धघोषाचा काल हा पाली भाषेचा ऱ्हासकाल होता. बुद्धाने सामान्य जनांची भाषा म्हणून पालीलाच आपली धर्मभाषा बनवले होते. बुद्ध-शिष्यांनीही त्याचेच अनुकरण केले होते. हीनयान मताचे सगळे आचार्य पालीलाच धर्मभाषा समजत होते; पण इ. स. च्या प्रारंभापासूनच पालीला उतरती कळा लागली. बौद्ध संप्रदायात महायान मताचा जोर झाला. महायानी बौद्धांनी पालीला दूर सारून संस्कृत भाषेला जवळ केले. इ. स. च्या पहिल्या शतकात अश्वघोष जन्माला आला. त्याने बुद्धचरित्र नावाचे महाकाव्य संस्कृतातच लिहिले. त्याचा खूप बोलबाला झाला. त्यापुढे नागार्जुन, वसुबंधु, दिङ्नाग, इत्यादी महापंडित बौद्ध मतात आले आणि त्यांनीही आपली ग्रंथ-रचना संस्कृतांतच केली. गुप्त साम्राज्याचे युग हे तर संस्कृत भाषेचेही सुवर्ण-युग ठरले होते. गुप्त सम्राटांनी पाली जनभाषेला आश्रय न देता तो संस्कृता-लाच दिला. त्याचा परिणाम पाली साहित्याच्या अवनतीत झाला. त्याबरोबरच भारतातला थेरवाद किंवा हीनयान पंथही संपुष्टात आला.

नेमका याच वेळीं बुद्धघोष हा पालीचा उद्धारकर्ता जन्माला आला. त्याची दार्शनिक अन् वाङ्मयीन कामगिरी एवढी मोठी ठरली, की पुढच्या सगळ्या बौद्ध आचार्यांना धर्मज्ञानासाठी बुद्धघोषाचा अन् त्याबरोबर पालीभाषेचाही समादर करावा लागला. ब्रह्मदेश, सयाम, कंबोडिया, सिंहल, इ. देशांतला बौद्धधर्म हा थेरवादी अर्थात हीनयानी परंपरेचा आहे. बुद्धघोषाने त्या देशां-तही संचार करून तिथल्या धर्मज्ञानाला उजळा दिला, असे दिसून येते. कारण

वरील सर्व देशांत बुद्धघोषाबद्दल अपार पूज्यभाव आहे.

असा दिग्विजय करून आणि अठ्ठकथांचा अमृतकुंभ घेऊन बुद्धघोष जेव्हा बुद्धगयेला परत आला, तेव्हा त्याचा गुरू रेवंत याला निर्वाण भेटल्यासारखे झाले. तो महास्थविर जणू त्याच्या वाटेकडे डोळे लावूनच आयुष्याचे दिवस कंठीत होता. शिष्याच्या या महापराक्रमाने गुरूला स्वतःचे जीवन कृतार्थ वाटले. ही गुरु-शिष्यांची जोडी पाहून कोणालाही रामकृष्ण परमहंस अन् स्वामी विवेकानंद या गुरु-शिष्यांच्या जोडीचे पुण्यस्मरण होईल. परमहंसांची पुण्याई पाठीशी घेऊन स्वामी विवेकानंदांनीही असाच विश्वविजयी पराक्रम करून हिंदु धर्माची ध्वजा जगभर उंच उभविली !

ψ ψ ψ

# कामाख्या–कामरूप

आसाम आणि कामरूप ही दोन्ही एकाच प्रदेशाची नावे. पण आसाम म्हटले, की ते वरच्यावर जाते अन् कामरूप म्हटले, की ते अंतरात काही तरी स्पंदन उमटवते. कामरूप नावासरशी कुमारसंभवात कालिदासाने वर्णिलेला तो मदनदहनाचा कथाप्रसंग चित्रपटासारखा मनश्चक्षूंपुढे उभा राहतो.

मदनाची ती आगळीक गंभीरच होती. तो शिवशंकराला सामान्य पुरुष समजून कुसुमशरांनी विंधायला निघाला होता. शिवाचा तपोभंग करायला प्रवृत्त झाला होता. पण शिव म्हणजे काही विश्वामित्र नव्हे. आपला तपोभंग तो कसा सहन करील! तत्क्षणी त्याने तिसरा भालनेत्र उघडला. त्यातून निघालेल्या अग्निज्वालांनी मदनाचा रोख धरला अन् पुढच्या क्षणाला कामदेवाच्या शरीराचे भस्म होऊन जमिनीवर पडले.

पण मदनदहनाची ही दुर्घटना त्याला एकट्यालाच नव्हे, तर साऱ्या जगालाच बाधक ठरली. त्या क्षणी सृष्टिचक्र थांबले. भूमीतून वर आलेले अंकुर जागच्या जागी कोमेजले. वृक्षवल्लींची पालवी करपली. विलासिनींच्या तबकातले

विडे वाळले. रमणीच्या अधरावरची लाली काळवंडली. तिथले अमृत सुकले. वरवर्णिनींचे कटाक्ष बोथटले. जगातली आवाहनाची अव्यक्त सादच गोठून गेली. प्राणिमात्र जणू थंड गोळे बनले. स्त्री-पुरुषांना मीलनाची, एकत्र येण्याची वासनाच उरली नाही.

ही अवस्था भयावह होती. त्यामुळे मानवच नव्हेत, तर देवही हादरले. मग सर्वांनी मिळून शिवाची करुणा भाकली. ‘ देवाधिदेवा, मदनाला जिवंत कर, ’ असा सर्वांनी गदारोळ उठवला. मग शिवाने मदनाला उःशाप दिला आणि नंतर एके दिवशी तो पंचबाण मदन धरतीतून निघालेल्या लवलवत्या कोंभासारखा देहधारी होऊन प्रगटला. तो रूपवान् झाला. ज्या प्रदेशात कामाला त्याचे रूप मिळाले, त्याला मग लोक कामरूप म्हणू लागले.

कामरूपाची दुसरीही एक व्याख्या सांगतात. कामरूप म्हणजे इच्छेला येईल ते रूप देणे किंवा घेणे. एका काळी तो जादूटोणा करणाऱ्यांचा देश होता. विशेषतः तिथल्या बायका त्या कामात तरबेज होत्या. त्या मोठ्या विषयलंपट असत. एखादा देखणा नवयुवक दिसला, की त्या त्याला ‘ छू मंतर ’ करून बोकड बनवीत, दिवसभर त्याला आपल्या बरोबर चालवीत अन् रात्रौ त्याच्यावर दुसरी मांत्रिक फुंकर मारून त्याच्यासंगे मनसोक्त रतिक्रीडा करीत. तिकडच्या लोकगीतांतूनही या गोष्टीचे पडसाद उमटले आहेत. नवरा कामधंद्याला बाहेर पडला, की बायकोने त्याला चेतावणी द्यायची. ‘ चेटकिणी-पासून सावध राहायचे बरे ! ’

अशा या कामरूप देशात कामाख्या येऊन नांदली. कामरूपातली देवी कामाख्या ! दोन्हीकडे कामाची संगती आहे. कामसूत्राने खेचली जाऊनच देवीही इथे नीलाचलावर आली, असे शिवानेच सांगितले आहे.

> कामार्थमागता यस्मान्मया सार्धं महागिरौ ।
> कामाख्या प्रोच्यते देवी नीलकूटे रहोगता ।।

शिव म्हणतो—‘ मी नीलाचलावर राहत असे. म्हणजे कैलासापासून खूप दूर. देवीला माझा विरह असह्य व्हायचा. ती मग कामपरवश होऊन गुप्तरूपाने इथे यायची अन् माझ्याशी एकांत करायची. तिची ही कामप्रवण मनोवस्था जाणून लोकांनी तिचे नाव कामाख्या ठेवले. ’

कामाख्येच्या इथल्या प्रतिष्ठेत कोण्या देवामानवाचा हात नसून, तो एका असुराचा आहे. त्याचे नाव नरकासुर. कामाख्या ही शक्तिदेवता असून, नरकासुर हा कामरूपातल्या शक्तिपंथाचा प्रणेता आहे. तो महाप्रतापी असुर होता. कामरूपात पहिली राजसत्ता संघटित केली ती त्यानेच. पश्चिमेस करतोया नदीपर्यंत आणि पूर्वेस पार चीनच्या सीमेपर्यंत त्याचे राज्य विस्तारले होते. आजचा सारा आसाम अन् बंगालचा बराच मोठा भाग त्याच्या कामरूपात समाविष्ट होता; पण नरकासुराचा हा प्रतापी बाणा अन्य राजांना उपद्रवकारक झाल्यामुळे श्रीकृष्णाला द्वारकेहून येऊन त्याचा वध करावा लागला.

नरकासुर कृष्णहस्ते मेला; पण त्याने निर्मिलेले कामाख्येचे मंदिर मागे राहिले. त्याने सुरू केलेला शाक्तपंथही पुढे फार बळावला. कामाख्येच्या उपासनेतूनच त्या पंथाची प्रगती झाली. नरकासुराने नीलाचलावर कामाख्येचे मंदिर बांधले, हा झाला इतिहास; पण इतिहासाची कादंबरी होणे, ही काही आजकालची गोष्ट नाही. वास्तव घटनेला कल्पनेच्या मुळ्या फुटल्या, की इतिहासाची कादंबरी बनते. पूर्वकाळीं तिलाच आख्यायिका म्हणत. त्या आख्यायिकेचे स्वरूप असे –

एके दिवशी कामाख्या नरकासुरापुढे साक्षात् प्रकटली. तिचे अप्रतिम लावण्य अन् असामान्य तेज पाहून नरकासुर तिच्यावर भाळला. भक्तिभावाने तिला वंदन करायचे सोडून विषयवासनेने तिला जवळ करायला निघाला. त्याने देवीला म्हटले. ‘ हे स्वर्गीय देवते, मी महाप्रतापी असुरपुंगव आहे. मी तुला शोभेन. तू मला वरून कृतार्थ हो. ’ देवीची अवस्था कठिण झाली. रुकार देणे तर शक्यच नव्हते; पण त्या रांगड्या गड्याला नकार तरी कसा द्यायचा ? तेही अवघडच ! मग तिचे स्त्रीसुलभ चाणाक्षपण जागृत झाले. ती नरकासुराला म्हणाली.

“ पराक्रमाबद्दल नुसती तोंडची वाफ काय कामाची ! त्याची मला तू प्रचीती दाखव. इथे हा नीलाचल पर्वत उभा आहे. त्याच्या माथ्यावर तू माझ्या-साठी एक मंदिर बांध. तिथवर जायला खालपासुन वरपर्यंत दगडी रस्ता तयार कर अन् वर एक तलावही खोद. मात्र हे सारे एका रात्रीत उभे झाले पाहिजे, तर मी तुझी. नाही झाले, तर तू माझ्या वाटेला जायचे नाही. ”

नरकासुराने अट मानली. आपली सारी सत्ता अन् मत्ता पणाला लावून त्याने कामाला प्रारंभ केला. रात्रीचा तिसरा प्रहर संपायच्या आतच त्याने सारे काम पुरे करीत आणले. मग देवी घाबरली. तिला वाटले की आपण घातलेली अट आपल्या अंगाशी येणार ! मग तिला एक कपट करावे लागले. रात्र संपल्याची खूण म्हणजे कोंबड्याची बांग. तिने एका कोंबड्याला ती द्यायला लावली. त्या क्षणी नरकासुराचे काम करते हात स्तब्ध झाले. त्याबरोबरच त्याची ती अघोरी वासनाही निष्फळ झाली.

कामाख्या त्याला पत्नी म्हणून मिळाली नाही, हे खरे; पण आपली उपास्य देवता म्हणून त्याने ते आरंभलेले मंदिर कळसाध्यायाला भिडवले. देवीला स्थान मिळाले. नीलाचल तिच्या भक्तांनी गजबजून गेला.

कामाख्या ही मूळ आर्यांची देवता नव्हे. ती मुळात खासी अन् गारो या आसामातल्या पहाडी जातीची देवता होती. आर्यांनी तिला दत्तक घेतले अन तिचे माहात्म्य वाढवले. तिचे मूळचे नावही 'का-मै-खा' असे त्यांच्या भाषेप्रमाणे होते. आर्यांनी त्या नावाचे संस्कृतीकरण करून तिला कामाख्या बनवले. त्यातल्या काम शब्दाच्या अर्थावरून मग तशा कथात्मक व्युत्पत्तीही तयार केल्या.

खासी हे ऑस्ट्रोएशियाई वंशाचे आहेत. गारो हे मंगोल वंशाचे आहेत. खासी जैंतिया पर्वतश्रेणीत वसले आहेत. गारो त्यांच्या पश्चिमेला त्याच नावाने प्रसिद्ध असलेल्या पर्वतराजीत नांदत आहेत. त्या दोघांच्या मध्यभागी नीलाचल आहे. अन् त्यावरच कामाख्येचे निवासस्थान आहे. त्यामुळे त्या दोन्ही जातींना तिचे दर्शन सुलभपणे होते.

कामाख्या ही त्या दोन्ही जातींची मातृदेवता आहे. त्यांच्या वंशात मातृसत्ताक कुटुंबपद्धती चालते. केरळातल्या नायरात चालते तशी. त्या पद्धतीत घरची गृहिणी ही कुटुंबप्रमुख असते. वारसा पुत्रपरंपरेने न चालता कन्यापरंपरेने चालतो. खासी अन् गारो मुली लग्न करून सासरी जात नाहीत, तर नवऱ्यालाच आपल्या माहेरी आणतात.

कोणत्याही मातृसत्ताक परिवाराची सर्वश्रेष्ठ देवता पुरुष नसून स्त्री असते. आर्यांची कुटुंबसंस्था पितृप्रधान असल्यामुळे त्यांचा परमेश्वर पुरुष आहे.

पुराणातल्या गुणत्रयकल्पनेप्रमाणे रजोगुणी ब्रह्मा हा त्यांचा सृष्टिकर्ता आहे. मातृसत्ताकांच्या धारणेत मातृदेवता किंवा जगदंबा हीच सृष्टिनिर्माती असते. निर्मितीच्या कामी तिला पुरुषसंगाची मुळीच गरज नसते. गारो सांगतात, की आमची मातृदेवता स्वयंनिर्मित अंड्यातून बाहेर आली अन् तिने स्वतःच्या बळावर सकळ सृष्टी जन्माला घातली. अशीच कथा दक्षिणेतल्या काहीं जमातीतही प्रचलित आहे. खासी अन् त्यातल्या त्यात गारो हे कामाख्येविषयी हीच सर्वश्रेष्ठतेची भावना बाळगतात. सृष्टि-स्थिति-प्रलयकारिणी म्हणूनच तिला भजतात. गौहाटीजवळच्या नीलाचलावर कामाख्येची स्थापना झाल्यावर काही काळ गारो हेच तिचे पुजारी होते; पण कालांतराने ते अधिकार मग ब्राह्मणांकडे गेले. आणि ते त्या अधिकारापासून वंचित झाले. मग ब्राह्मणांनी तिच्या पूजेला तांत्रिक रूप दिले. मंत्र, यंत्र, पुरश्चरण, बलिदान इत्यादी सामान्यांना आकलन न होणारे गुंतागुंतीचे पूजाविधान तिच्याभोवती उभे केले. बौद्ध तांत्रिकांनीही त्यात काही भर घातली. कालिकापुराणात कालीशी तिचे अभिन्नत्व कल्पून कथा रचल्या गेल्या. वज्रतंत्र, योगिनीतंत्र अशी तंत्रेही निर्माण झाली. या सर्व साहित्यामुळे कामाख्येचा दबदबा वाढला. कामाख्या हे एक मोठे शक्तिपीठ म्हणून प्रतिष्ठा पावले. मग कालिकापुराणातल्या पीठनिर्मितीविषयीची कथा सांगितली गेली ती अशी —

दक्षयज्ञात शिवपत्नी सतीने आपली काया योगाग्नीत दग्ध करून घेतली. शिवाला ही दुर्वार्ता कळली. तो धावत तिथे आला. आपल्या प्राणप्रिय पत्नीचा अशा प्रकारे अंत झालेला पाहून तो परमेश्वरही दुःखविव्हल झाला. त्याने सतीचा तो अचेतन देह उचलून खांद्यावर घेतला; पण कुठे जावे, काय करावे, हेच त्याला कळेना. तो सैरावैरा भारतभर भटकत सुटला. त्या भ्रमंतीत सतीच्या देहाचा एकेक अवयव गळून पडू लागला. कुठे पाय पडला, तर कुठे हात पडला. कुठे हृदय पडले, तर कुठे शीर पडले आणि अखेर शेवटी शिवाच्या खांद्यावर काहीच उरले नाही. तो देहभार शिवाच्या नकळत हलका झाला, नाहीसा झाला. जिथे जिथे तिच्या देहाचा अवयव गळाला, तिथे तिथे एकेक शक्तिपीठ निर्माण झाले. त्यांची संख्या एकावन्न भरली.

आसामात नीलाचलावर सतीच्या देहातला योनिभाग गळून पडला, असे

सांगितले आहे. या कथनात मूळ ऑस्ट्रोएशियाई संकेत ग्रहण केलेला दिसतो. आसामातले गारो आणि तत्सम लोक आपल्या ' का-मै-खा ' देवीची पूजा योनिस्वरूपातच करीत होते. शिवाचे पुरुषप्रतीक जसे लिंग, तसेच जगदंबेचे स्त्रीप्रतीक भग.

सांप्रतच्या कामाख्यामंदिरातही देवीची मूर्ती नाही. महाराष्ट्रातल्याप्रमाणे एखादा तांदळाही नाही. तिथे मंदिराच्या अंतर्भागात एका दगडावर योनीची आकृती कोरलेली आहे. जवळूनच एक झरा झुळझुळतो अन् त्याच्या पाण्याने तो प्रतीकाचा पाषाण सदैव भिजलेला राहतो. त्या प्रतीकावरच भाविक लोक फूलपत्री वाहतात. त्याचीच अर्चना करतात. त्या प्रतीकाच्या दर्शनस्पर्शाने कसलाही अश्लील, अभद्र भाव भक्तांच्या मनात उदित होत नाही.

आषाढमासी वर्षाऋतूच्या प्रारंभी कामाख्येचा अंबुवाची नावाचा उत्सव करतात. हा उत्सव कामाख्येच्या रजोदर्शनाचा असतो. त्यासाठी तीन दिवस देवळाचे दरवाजे बंद ठेवतात. कोणालाही देवीचे दर्शन घेऊ देत नाहीत. चौथ्या दिवशी देवीला स्नान घातल्यावर मग देवळाचे दरवाजे उघडतात. मग त्या उत्सवासाठी जमलेल्या भक्तांना लाल वस्त्राचे तुकडे वाटतात. त्यातला आशय स्पष्ट आहे.

खासी, गारो यांच्याप्रमाणेच कोच हीही एक आसामातली प्राचीन जमात आहे. पण इतिहासाच्या ओघात ती केवळ जमातच राहिली नाही. आसामात स्वतंत्र राजवंश स्थापण्याचे भाग्य तिला लाभले. या जमातीत एक महत्त्वाकांक्षी पुरुष निर्माण झाला. त्याचे नाव विशू होते. त्याने प्रथम सभोवतालच्या काही छोट्या छोट्या राजांचा पराभव करून आपले असे एक नवे राज्य निर्माण केले. विशूचा विश्वसिंह बनून तो इ. स. १५१५ साली सिंहासनावर बसला. पण तेवढ्यावरच तो अल्पसंतुष्ट बनून राहिला नाही. त्याने आपल्या राज्याचा खूप विस्तार केला. तो कामाख्येचा भक्त होता. तिची पूजाअर्चा जाणकार पंडितांच्या हस्ते व्हावी म्हणून त्याने बरेच विद्वान् ब्राह्मण नीलाचलावर आणून स्थायिक केले. तोही कामाख्येच्या दर्शनासाठी अधूनमधून तिथे जात असे. त्यावेळी त्या विद्वान् पंडितांशी ज्ञानगोष्टीही करीत असे. त्याच्याच अमदानीत कामाख्यापीठ विशेष भरभराटले अन् भारतभर त्याची ख्याती झाली.

मोडतोडवाल्या असहिष्णू मुसलमानांचा विध्वंसक हात अन्य देवस्थानां-

प्रमाणेच कामाख्येवरही पडला होता. एकदा नव्हे; तर अनेकदा त्याची आवृत्ती झाली होती. कामाख्यामंदिर अनेक अंगांनी भग्न झाले होते. विश्वसिंहाला वाटले, की हा घाव आपल्या हृदयावरच पडला आहे. म्हणून त्याने प्रभूत धन खर्चून त्या मंदिराची पुनश्च डागडुजी केली. उरले सुरले ते जीर्णोद्धाराचे कार्य विश्वसिंहाचा सुलक्षणी पुत्र नरनारायण याने पुरे करून देवीभक्तांचे धन्यवाद घेतले !

# महाभाष्यं वा पठनीयम्

'महाभाष्यं वा पठनीयम्, महाराज्यं वा पालनीयम्!' अशी पंडितजनांतली एक प्रौढोक्ती आहे, महाभाष्य तरी अभ्यासावे किंवा महाराज्य तरी करावे, असा तिचा अर्थ. पहिली व्याकरणशास्त्राची परिसीमा अन् दुसरी सत्तेची पराकाष्ठा. एक विद्याविषयक महत्त्वाकांक्षा, दुसरी सत्ताविषयक. चुळकाभर विद्या अन् टीचभर राज्य हे खरे नव्हे. दोहोतलेही साम्राज्य अपेक्षित.

हे महाभाष्य कोणाचे अन् कशावरचे, ही यापुढची जिज्ञासा. पाणिनीची सूत्रे अन् कात्यायनाची वार्तिके यावरचे ते महाभाष्य आहे. त्याच्या कर्त्याचे नाव पतंजली. त्याच्या नावाविषयीही व्याकरण आहेच. या मूलग्राही पंडिताला शेषाचा अवतार समजतात. पहिला अवतार रामायणातला लक्ष्मण. दुसरा अवतार महाभारतातला बलराम. अन् तिसरा पतंजली. पहिल्याच्या हातात धनुष्य होते. दुसऱ्याने नांगर-मुसळ घेऊन आपला पराक्रम गाजवला. अन् या तिसऱ्याने हातात धरली लेखणी! शेषाला हा अवतार घेण्याचे प्रयोजन काय झाले, त्याची कथा अशी –

शेषाची मुख्य कामे दोन. एक आपल्या सहस्र फणांवर भूमीचा भार वाहणे अन् दुसरे आपल्या सर्वांगी श्रीविष्णूची शय्या होणे. या शेषशय्येवर श्रीविष्णू सुखरूप पहुडायचा, गाढ झोपायचा. युगायुगांची ही शय्यासोबत. पण त्या एका दिवशी विष्णूला गाढ झोप लागायच्या आतच इकडे शंकराने तांडवनृत्य सुरू केले. विष्णूला ते पडल्या पडल्या चित्रपटासारखे दिसू लागले. पाहता पाहता विष्णूचे भान हरपले. उघड्या डोळ्यात त्या नृत्यदर्शनाचा आनंद मावेचना. हृदयांतही तो भरून उरला. मग विष्णूने आपला घननीळ देह वाढवायला प्रारंभ केला. देह वाढला तसा त्याचा भारही वाढला. शेषाने तो भार थोडा वेळ सोसला; पण पुढे त्याला ती गोष्ट अशक्य झाली. तो सहस्रमुखांनी फूत्कार सोडू लागला. त्यामुळे विश्वांतले वातावरण कोंदाटले. शेषाचे अंग चिरडले जाऊ लागले, तसे त्याचे फणामस्तकही कंपित झाले. त्यासरशी त्याच्या मस्तकावरच्या पृथ्वीलाही हादरे बसू लागले. विष्णूला या गोष्टीचा पत्ताही नव्हता. तो त्या नृत्यानंदात निमग्न होता. जागी होती, सावध होती ती त्याची अर्धांगी लक्ष्मी. तिला हे सारे भयप्रद वाटले. तिने विष्णूला हालवून भानावर आणले. ‘ तुमची वृद्धी होते, पण तिच्यामुळे विश्वाचा क्षय होण्याची वेळ आली आहे ’ असे तिने विष्णूला जाणवून दिले. विष्णू चटकन् सावध झाला. लगेच गात्रसंकोच करून तो मूळ स्वरूपावर आला. मग शेषाचा अतिभार ओसरला. त्याने सुटकेचा निःश्वास टाकून विष्णूला म्हटले.

‘ देवा, आज माझी परीक्षा पाहायचे ठरवले होतेत का ? ’

देव म्हणाला, ‘ नाही ! ’ मग त्याने शिवाच्या तांडवनृत्याचे रसभरित वर्णन करून ते शेषाला ऐकवले. शेषही काही अरसिक नव्हता. तो म्हणाला, ‘ तुम्ही पाहिलेत ते मलाही पाहायला मिळेल असे करा. ’

त्यावर विष्णूने त्याला सांगितले. ‘ तू पृथ्वीवर पुन्हा एकदा अवतार घे. त्या अवतारात तुला शिवतांडव पाहायला मिळेल. ’

मग शेष तिथून निघाला. आपल्याला अवतार घ्यायला योग्य असे ठिकाण शोधू लागला. हिंडता हिंडता त्याला गोणिका नावाची तपस्विनी दिसली. ती पुत्रप्राप्तीसाठी तप करीत होती. शेषाने तिच्याकडे पाहिले. त्याला वाटले, की ‘ आपल्याला ही आई चांगली आहे. ’ मग त्याने मानवाचे बालरूप घेतले आणि गोणिका सूर्याला अर्घ्य देत असता तिच्या ओंजळीत उडी घेतली.

गोणिका चपापली. तत्क्षणी तो बालक मधुर वाणीने बोलू लागला, ' मी तुझा पुत्र आहे.' तिने ते वचन मानले. तिला तो पुत्र आवडलाही. लगेच तिने त्याला उचलून घेऊन हृदयाशी धरले. गोणिका कृतार्थ झाली. तिचे तप फळले. ती मग त्याला म्हणाली, ' तुझे नाव पतंजली. ' बालकाने विचारले, ' का ? ' ती म्हणाली, ' तू माझ्या अंजलीत पतन पावलास म्हणून. नाव उच्चारायला गोड अन् पुन्हा घडल्या घटनेचे स्मारक ! '

गोणिकेला पुत्र लाभला; पण पुत्रसुख मात्र लाभले नाही. तो लवकरच विद्याभ्यासासाठी गुरूकडे निघून गेला. थोड्याच काळात वेद-वेदांगात पारंगत झाला. त्याची सूक्ष्मबुद्धी अनेक शास्त्रांचा तळठाव घ्यायला धावू लागली. पण या सगळ्या विचारात आणि अभ्यासात तो शिवाचे तांडवनृत्य विसरला नव्हता. पण ते काय सुखासुखी पाहायला मिळते ! त्यासाठी हवे होते तप. पतंजली मग चिदंबर क्षेत्री जाऊन तपाला बसला. आशुतोष शिव थोड्याच कालात त्याला ' वरं ब्रूहि ' म्हणाला. ' देवा, मला तुमचे तांडव पाहायचे आहे. ते मनीचे आर्त पुरे करा. ' शिवाने मग विलंब लावला नाही. तिथल्या तिथे त्याच्या पायात स्फुरण भरले. हात थिरकले. मुखमुद्रा तरल झाली. लगेच भूमीवर नृत्याचा पदाघात झाला. अन् मग ते तांडव साद्यंत पतंजलीने डोळेभर पाहिले. तो तृप्त झाला. शिवशंकर मग त्याला म्हणाला.

" मी तुझी आस पुरवली. आता तू माझे एक इच्छित कार्य पुरे कर."

" कोणते कार्य महादेवा ? "

" तू पदशास्त्रावर म्हणजेच पाणिनीच्या व्याकरणावर भाष्य लिही. ते शास्त्र तडीला ने. "

" माझी योग्यता आहे का तेवढी ? "

" अवश्य ! मी तुझ्या बुद्धीला प्रचोदना देईन. "

" मग मी आपली आज्ञा स्वीकारली असे समजा. "

त्यानंतर चिदंबर क्षेत्रातच ठाण मांडून पतंजलीने ग्रंथारंभ केला. यथाकाल तो पुराही केला. ग्रंथाच्या अवताराने वेरूळ-अजंठ्यासारखे एक वाङ्मयशिल्प उभे झाले. पदशास्त्राच्या मस्तकी रत्नजडित मुकुट चढला. शंकर, रामानुज, निंबार्क, मध्व, सायण हे गीर्वाणभारतीचे अतिरथी-महारथी; भाष्यकार. पण त्यांनी निर्माण केलेली भाष्ये ही भाष्येच राहिली. संस्कृत वाणीच्या क्षेत्रात

महाभाष्य एकच झाले अन् ते म्हणजे पतंजलीचे व्याकरणमहाभाष्य !

जन्मताच त्या महाभाष्याची ख्याती झाली. सर्व भारतभरचे पंडित, महापंडित ते अभ्यासण्यासाठी शिष्यभावाने पतंजलीकडे येऊ लागले. आता त्यापुढचा एक किस्सा ऐका. त्या किश्शातही पतंजलीचे शेषावतारत्व विसरले गेलेले नाही.

पतंजली एका पडद्याआड बसून शेषनागाच्या रूपात स्वतःच्या सहस्र मुखांनी सहस्र शिष्यांना एकाच वेळी पढवू लागला. त्याने त्या सर्व शिष्यांना ताकीद देऊन ठेवली होती, की कोणीही पडद्याच्या आत डोकवायचे नाही; पण शिष्यांची जिज्ञासा अनावर ! एकच मनुष्य एकाचवेळी अनेक शिष्यांना निरनिराळी प्रकरणे कशी शिकवू शकतो, हे मोठे कुतूहल ! मग एकाने एके दिवशी हळूच तो पडदा बाजूला केला. पाहतो तो सहस्र मुखांचा प्रचंड शेषनाग आत बसला आहे. एकाने उघडले अन् सर्वांनी बघितले; पण त्याची चर्चा करायला ते जिवंतच राहिले नाहीत. शेषाच्या दाहक तेजाने त्या सर्वांची एकाच वेळी राख झाली. जगला तो फक्त एकच शिष्य ! तो त्या वेळी पाणी आणायला गेला होता, म्हणून वाचला. पतंजलीने मग त्याच्यावर अनुग्रह केला अन् त्याला आदेश दिला —

" यापुढे माझे महाभाष्य तू इतरांना पढव. तुझ्यापासून परंपरा सुरू होऊ दे ! "

पतंजली त्यानंतर चिदंबरक्षेत्री राहिला नाही. तो आपल्या आईकडे आला अन् तिला अखेरची भेट देऊन आपल्या शेषरूपात विलीन झाला !

पतंजलीची चरित्रकथा इथेच संपते. त्यापुढे राहतात ते निव्वळ तर्क ! पतंजली कोण, कुठला अन् केव्हाचा इथपासून त्या तर्कांची मालिका सुरू होते.

सनपूर्व दुसऱ्या शतकात तो जन्मला हे निर्विवाद आहे. वाद आहे तो त्याच्या जन्मस्थानाबद्दल. पतंजलीने कात्यायनाला दाक्षिणात्य म्हटले आहे. त्यावरून तो स्वतः उत्तर भारतीय असावा हे सिद्ध होते. गोनर्द हे त्याचे गाव म्हणून चरित्रात उल्लेखिले आहे; पण ते कुठे होते ते नक्की कळत नाही. प्रा. सिल्वा लेव्ही या फ्रेंच पंडिताने ते गाव विदिशा अन् उज्जयिनी यांच्यामध्ये कुठेतरी असावे, असा सप्रमाण तर्क केला आहे अन् इतर बऱ्याच पंडितांनी त्याला अनुमोदन दिले आहे. हे गोनर्द गाव वैदिक धर्माचे कट्टर अभिमानी

असावे आणि तितकेच बौद्ध धर्माचे विरोधक असावे, असेही अनुमान निघाले आहे. पतंजलीच्या चरित्राच्या दृष्टीने ही गोष्ट फार महत्त्वाची आहे.

पतंजलीला शेषाचा अवतार म्हटले त्या अर्थी तो नागकुलोत्पन्न असावा. नागकुल हे मातृसत्ताक कुटुंबपद्धतीचे होते. पतंजली गोणिकापुत्र म्हणून ओळखला जातो, त्याच्या बापाचा कुठे उल्लेखच होत नाही. शिवाय तो गोणिकेचा औरस पुत्रही नाही. एखादे अनाथ पोर तिला गवसले असावे अन ते सुलक्षणी असल्याचे पाहून गोणिकेने पुत्र म्हणून त्याचा स्वीकार केला असावा.

पतंजलीला अन्यत्र चरक म्हटले आहे. आयुर्वेदाची एक संहिता चरक या नावाने प्रसिद्ध आहे अन् ती पतंजलीचीच रचना आहे, असे म्हणतात. निदान त्या संहितेवर पतंजलीने महत्त्वाचे संस्कार तरी केले असले पाहिजेत. कारण पतंजलीला वैद्यकाचे चांगले ज्ञान होते हे त्याच्या महाभाष्यावरूनही दिसून येण्यासारखे आहे. चरक ही कृष्ण यजुर्वेदाची एक शाखाच होती. तिच्या अनुयायांनाही चरक असेच म्हणत. पतंजली त्याच वेदशाखेचा अनुयायी असावा. चरक लोक सामान्यपणे आयुर्वेद जाणणारे, यात्रिक अन् नागपूजक होते अशी प्रसिद्धी आहे. पतंजलीच्या बाबतीतही या गोष्टी लागू होतात. पण चरक या शब्दाचा एक राजकीय अर्थ श्री. अ. ज. करंदीकर यांनी सांगितला आहे, तोही लक्षात घेण्याजोगा आहे. त्यांच्या विवेचनाचा आशय असा —

पतंजली चरक अर्थात राजकीय हेर किंवा गुप्तचर असावा. त्या दृष्टीने त्याने देशात संचार केला असावा. सर्व परिस्थिती हेरली असावी. त्याच्या काळीं सत्री नावाची एक गुप्तचरविद्येचे शिक्षण देणारी संस्था होती. कौटिल्याने तिचा उल्लेख केला आहे. अनाथ, पितृहीन, पण गुणी अशी मुले त्या शिक्षणसंस्थेत शिकवून वाढवीत अन् पुढे त्यांचा गुप्तचर म्हणून उपयोग करून घेत. पतंजलीचे शिक्षण अशाच एखाद्या संस्थेत झाले असावे किंवा अन्यत्र शिकून त्याने आपण होऊन तो साहसी व्यवसाय पत्करला असावा.

पुष्यमित्र शुंग आणि पतंजली यांचा स्नेह, निदान दाट परिचय असावा असे म्हणतात. वैदिक धर्म आणि वैदिक संस्कृती यांचा जाज्वल्य अभिमान हे त्या स्नेहाचे मुख्य सूत्र होय. पुष्यमित्र हा महत्त्वाकांक्षी, तसाच पराक्रमी पुरुषश्रेष्ठ होता. त्याच्या काळी देशाच्या बऱ्याच मोठ्या भागावर बृहद्रथ मौर्य

याचे साम्राज्य गाजत होते. त्याच्या कारकीर्दीत वैदिक धर्माची उपेक्षा होऊ लागली होती. श्री. अ. ज. करंदीकरांच्या मते मौर्य सम्राट बौद्धधर्माकडे वळले होते. वैदिक धर्म त्यांना अप्रिय ठरला होता आणि त्यामुळे वैदिक धर्माभिमानी प्रजेत मौर्य सम्राटांविषयी अप्रीती वाढू लागली होती. बृहद्रथ मौर्याविरुद्ध मगधात एक युवक संघटना उभी झाली होती, असे बहुतेक इतिहासवेत्त्यांचे मत आहे. पुष्यमानव हे त्या संघटनेचे नाव. पुष्यमित्र हा त्या संघटनेचा पुढारी होता. दुसरा पुढारी कदाचित् पतंजलीही असू शकेल.

पुष्यमित्र हा बृहद्रथ मौर्याचा सेनापती होता. एके दिवशी बृहद्रथ आपल्या सैन्याची पाहणी करीत असता पुष्यमित्राने मोका साधून त्याचा वध केला आणि स्वतः मगधाचे सिंहासन हस्तगत केले. सम्राट म्हणून त्याने स्वतःच्या नावाची द्वाही फिरवली. त्यामुळे वैदिक धर्माभिमानी समस्त प्रजा आनंदित झाली. आता वैदिक धर्माला उत्कर्षाचे दिवस आले, हे प्रजेला पटवण्यासाठी पुष्यमित्राने दोन अश्वमेध यज्ञ केले आणि त्यांचे पौरोहित्य पतंजलीने संपादले. दोघेही संस्कृत भाषेच्या उद्धाराला बद्धपरिकर झाले. पाली–अर्धमागधी या दोन भाषा बौद्ध-जैनांनी आपल्या धर्मभाषा बनवल्या होत्या. मौर्य सम्राट त्या भाषांचे पोषण करीत होते, त्यामुळे त्यांचे माहात्म्य दिशीमाशी वाढू लागले होते. संस्कृत भाषेला पुनश्च राजाश्रय मिळवून देऊन आणि संस्कृतात ग्रंथरचना करून पुष्यमित्र–पतंजलीने त्या भाषेला पुनश्च उच्चासनावर बसवले.

पतंजलीचा संस्कृत भाषेचा आणि त्याबरोबरच वैदिक धर्माचाही अभिमान त्याच्या महाभाष्यात ठायीठायी दृग्गोचर होतो. संस्कृत आणि अपभ्रंश शब्दांनी जर सारखाच अर्थ व्यक्त होत असला, तर अपभ्रष्ट शब्दांऐवजी संस्कृत शब्दच स्वीकारावे, कारण त्यामुळे अभ्युदय होतो, असे पतंजलीने आग्रहपूर्वक सांगितले आहे.

पाणिनी आणि पतंजली या दोघात एक मोठा फरक आहे. पाणिनी वैदिक धर्माचा अभिमानी असला, तरी त्याचा आग्रही पुरस्कर्ता नाही. त्याने ‘ लोके वेदे च ’ आपली समदृष्टी ठेवली आहे. कोणत्याही ‘ दर्शना ’ विषयी पक्षपात न दाखवता त्याने लौकिक आणि वैदिक शब्दांचे यथार्थ ज्ञान घडवले आहे. पण पतंजली तसा नाही. पाणिनीच्या अष्टाध्यायीचे पांडित्यपूर्ण विवेचन करताना त्याने काही व्याकरणविषयक मौलिक सिद्धांत मांडले आहेत हे

कळते; पण त्याचबरोबर त्याने जी उदाहरणे दिली आहेत, ती मात्र वेदांतून आणि सूत्र-ग्रंथांतून घेतली आहेत. त्याने अनेक ठिकाणी वैदिक शब्दांच्या निरूपणासाठी यास्काचीच वाक्ये उद्‌धृत केली आहेत. तो वेदांचे अपौरुषेयत्व आणि स्वतःप्रामाण्य जागजागी आग्रहाने प्रतिपादितो.

मात्र दुसऱ्या एका दृष्टीने पतंजलीचे कार्य अलौकिक मानावे लागेल. व्याकरणातल्या रुक्ष अन् शुष्क सिद्धान्तांना त्याने लोकाश्रय, लोकविज्ञान आणि लोकव्यवहार यांच्या आधारावर सर्वगम्य केले. मौलिक विचारांची मांडणी करून व्याकरणाला ' दर्शन ' पदवी प्राप्त करून दिली ती पतंजलीनेच. स्फोट-वाद हा त्यापैकीच एक मौलिक विचार होय.

पतंजलीने महाभाष्याव्यतिरिक्त चरक संहितेवर प्रतिसंस्कार केला, हे वर सांगितलेच आहे. हे त्याचे दुसऱ्या शास्त्रातले पांडित्य. पण एवढ्यावरच त्याची विद्वत्ता संपत नाही. अष्टांग राजयोग या दर्शनाचाही तोच प्रणेता आहे. त्याने योगसूत्रे निर्माण करून त्या दर्शनाचा पाया घातला. त्या सूत्रांच्या द्वारे त्याने साधकांच्यापुढे एक नवा मोक्षमार्ग खुला केला. यम-नियमांपासून तो समाधी-पर्यंत मोक्षाची शिडी उभी केली.

पण पतंजलीचे वैशिष्ट्य हे, की त्याला मोक्षाइतकेच ऐहिक अभ्युदयाचे महत्त्व वाटत होते. त्याच्या काळी बौद्धधर्म भारतात आपला जम बसवून राहिला होता; पण त्या धर्माच्या पुरस्कर्त्यांनी अभ्युदय या पहिल्या धर्मांगाकडे केवळ दुर्लक्षच केले होते असे नव्हे; तर प्रत्यक्षपणे अभ्युदयविरोधी धोरण स्वीकारले होते. याविषयी श्री. अ. ज. करंदीकर म्हणतात–अभ्युदयाचा संबंध इहलोकाशी म्हणजेच वर्तमानकाळाशी येतो; पण बुद्धाने अनेक प्रकारे शब्दच्छल करून वर्तमानकाळाचे अस्तित्वच अमान्य केले होते. पतंजली अशा आर्यांच्या विरुद्ध सरसावून उठला. त्याने त्याच्या वर्तमानकालविरोधी वचनांचे खंडन करून वर्तमानकालाचे अस्तित्व सिद्ध केले. बौद्धांचा वर्तमानकालविरोध हा यज्ञविरोधी प्रचाराचाच एक भाग होता. त्यासाठी याने ' इह पुष्यमित्रं याजयामः '= इथे आम्ही पुष्यमित्राकडून यज्ञ करवीत आहो, हे विशिष्ट वाक्य वर्तमानकाळाचे उदाहरण म्हणून दाखल केले.

पतंजलीची अशी सर्वगामी बुद्धिमत्ता आणि प्रकांड विद्वत्ता पाहून भाराव-

लेल्या भर्तृहरीने आपल्या वाक्यप्रदीप ग्रंथाच्या प्रारंभी त्याला पुढील श्लोकाने विनम्र अभिवादन केले आहे —

योगेन चित्तस्य पदेन वाचां मलं शरीरस्य च वैद्यकेन ।
योऽपाकरोत्तं प्रवरं मुनीनां पतंजलिं प्रांजलिरानतोऽस्मि ।।

' योगाने चित्ताचा, पदाने ( व्याकरण शास्त्राने ) वाणीचा आणि वैद्यकशास्त्राने शरीराचा मला ज्याने दूर केला, त्या मुनिश्रेष्ठ पतंजलीला मी अंजलिबंध जोडून नमस्कार करतो. '

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७७३५४ वि: निबंध
क्रमांक ९५५४ नों. दि: २४/२/५०

# जैन रामकथा

ज्याच्या शोकालाही श्लोकत्व प्राप्त व्हावे, असा भाग्यवंत एखादाच ! ते भाग्य वाल्मीकीला लाभले. रामायण रचून तो आदिकवी ठरला. त्याने मर्यादापुरुषोत्तम राम अशा यशोवैभवाने उभा केला, की पाहता पाहता डोळ्यांना टक पडावे. रसिकतेला सुखाचे डोल यावे. सीता, लक्ष्मण, भरत, हनुमान् ही रामाची प्रभावळ. तिच्या दीप्तीने रामचरित्र तेजागळे झाले. रामाबरोबरच त्याच्या वैऱ्याला—रावणालाही उठाव मिळाला. त्या महाकाव्यरूप इतिहासात करुण रसाचा ‘ आवो ’ उत्तम उतरला.

आणि मग भारतातल्या सर्व कवींना तो जणू खजिनाच गवसला. जो तो कवी रामायण म्हणजे आपलीच मिराशी असे समजून त्याच्यावर आपल्या कल्पनेचे साज चढवू लागला. कित्येकांनी वाल्मीकीचे अनुसरण केले, कित्येकांनी त्याला अंशमात्र मानले, तर कित्येकांनी त्याला रामचरित्राची वाट विचारलीच नाही. कोणी त्यात आपल्या प्रदेशाचा इतिहास-भूगोल घुसडला, तर कोणी त्याच्यावर आपल्या धर्म-पंथाचे संकेत लादले.

भारतातल्या प्रमुख धर्मपरंपरा तीन—पौराणिक, बौद्ध अन् जैन. या तीनही परंपरा रामाला मानतात. रामकथेच्या रचनेत वाल्मीकीच्या रूपाने पौराणिकांचा मान पहिला. त्यानंतर बौद्धांनी संक्षिप्त स्वरूपात रामकथा अनुवादिली. त्या कथेचे नाव ' दसरथजातक. ' त्या कथेत राम हा बुद्धाचा पूर्वावतार मानला गेला आहे. तिथे तो रामचंद्र नसून रामपंडित झाला आहे. राम-सीता ही तिथे सहोदर भावंडे आहेत. वनवासाहून परत आल्यावर त्या दोघांचे लग्न होते. वाचायला गोष्ट चमत्कारिक वाटते; पण बुद्ध ज्या शाक्य वंशात जन्मला त्यात बहीण-भावाच्या विवाहाची चाल असल्याचा संकेत त्यांनी रामावर लादला अन् रामकथा गुंफली.

जैन परंपरेत ६३ शलाकापुरुष आहेत. तीर्थंकर, चक्रवर्ती, बलभद्र, वासुदेव अन् प्रतिवासुदेव अशा त्यांच्या श्रेणी आहेत. त्यात रामाची गणना आठवा बलभद्र या स्वरूपात आहे. जैनांनी रामाचे नाव पद्म असे ठेवले आहे. जैन साहित्यात रामविषयक मोठमोठी पुराणे आहेत. संस्कृतात, प्राकृतात, तशी अपभ्रंश भाषेतही. त्या पुराणांत रामाचे नाव आहे ' पद्म '. रविषेणाचे पद्मपुराण म्हणजेच रामायण संस्कृतात आहे. विमलसूरीचे ' पउमचरिय ' प्राकृतात आहे. अन् स्वयंभूचे ' पउमचरियु ' अपभ्रंशात आहेत. याशिवाय इतरही अनेक आहेत.

बहुतेक सर्व जैन कवींनी वाल्मीकीचा आधार घेतला आहे आणि त्या मूळ वृक्षावर अद्भुत कल्पनांचे कलम करून आपला सांप्रदायिक राम उभा केला आहे. त्यातल्या कित्येकांनी वाल्मीकीला दोष द्यायलाही कमी केले नाही.

वाल्मीकी अन् जैन कवी यांच्या रामकथेमधले फरक तपशीलवार कोष्टक मांडून दाखवता येतील; पण या लेखाचा तो उद्देश नाही. मला मुख्यत्वे जैन रामकथा संक्षेपात निवेदायची आहे; ती अशी –

राक्षस वंशातला एक राजा. रत्नश्रवा हे त्याचे नाव. लंकेचे राज्य त्याच्याकडे होते; पण वैश्रवण विद्याधराने ते जिंकून घेतले आणि रत्नश्रव्याला पाताळलंकेत आश्रय घ्यावा लागला. त्याच्या राणीचे नाव केकसी. तिला चार मुले झाली. रावण, कुंभकर्ण, बिभीषण हे तीन पुत्र अन् चंद्रनखा ही कन्या. रावण थोडा मोठा झाल्यावर त्याला कळले, की आपले राज्य वैश्रवणाने बळकावले आहे अन् तो लंकेत दिमाखाने मिरवतो आहे. रावण मोठा ईर्षालू

होता. त्याने ठरवले, की आपले राज्य आपण परत मिळवायचे; पण त्यासाठी वैश्रवणाला अवगत असलेल्या सर्व विद्या रावणाला अवगत व्हायला हव्या होत्या. त्याने तेही करायचे ठरवले. जंबुद्वीपात जाऊन तो तपाला बसला. तिथे होता एक यक्ष. तो रावणाची परीक्षा घ्यायला निघाला. त्याने रावणावर परोपरीचे घाले घातले. पण रावण कशानेच विचलित झाला नाही. सर्व विद्या सिद्ध करूनच तो आसनावरून उठला.

मग त्याने वैश्रवणाला युद्धाचे आव्हान दिले आणि अखेर चारी मुंड्या चीत केले. रावण लंकेचा राजा झाला. नंतर त्याने मंदोदरीशी लग्न केले; पण एकाच बायकोवर खूष राहण्याइतका तो अल्पसंतुष्ट नव्हता. त्याने अन्य सहा हजार कन्यांना आपल्या गळ्यात वरमाळा घालायला लावली. चंद्रनखा ही त्याची बहीण. ती खरदूषणाला दिली होती. तिच्या पोटी शंबूक नावाचा पुत्र जन्मला. ही झाली लंकेतल्या रावणाची पूर्वपीठिका.

किष्किंधा नगरीत वाली–सुग्रीव हे दोघे बंधू होते. ते वानर नसून विद्याधर होते. त्यातला वाली हा राजा होता. एके दिवशी रावण त्याच्यावर चालून आला आणि त्याच्या पराक्रमाचा गर्व जिरवून गेला. मग वालीला वैराग्य आले. सुग्रीवाला राज्यावर बसवून त्याने दिगंबरदीक्षा घेतली.

अंजनीचा पुत्र हनुमान हा चरमशरीरी महापुरुष होता. प्रथम रावणाचे अन् त्याचे सख्य होते. तो एकदा रावणाचा पक्ष घेऊन वरुणाविरुद्ध लढायलाही गेला होता. रावणाचा तो भाचेजावई होता. त्याची भाची अनंग-कुसुमा ही हनुमंताला दिलेली होती.

एक दिवस रावणाला कोणीतरी भविष्य सांगितले, की ‘ तुझा मृत्यू जनक अन् दशरथ यांच्या संततीमुळे होणार आहे. ’ रावण म्हणाला, ‘ ठीक आहे; आपण त्याचा बंदोबस्त करू. ’ मग त्याने बिभीषणाला हुकूम फर्मावला. ‘ जा; जनकाचा अन् दशरथाचा शिरच्छेद करून ये. ’ बिभीषण लगेच खड्ग घेऊन निघाला. नारदाला त्या घटनेचा वास लागला. त्याने येऊन जनकाला अन् दशरथाला सावध केले. त्यांनी मग स्वतःचा एकेक पुतळा करून महालात बसवला अन् ते बाजूला झाले. ( बिभीषण इतका भोळसट कसा देव जाणे ! ) तो त्या पुतळ्यांनाच व्यक्ती समजला अन् त्यांचे गळे कापून मोकळा झाला.

दशरथ हा अयोध्येचा राजा. त्याच्या राण्या तीन–कौशल्या, सुमित्रा अन् सुप्रभा. एके दिवशी तो देशभ्रमणासाठी निघाला असता योगायोगाने कैकेयीच्या स्वयंवराला पोचला. त्याला पाहताच कैकेयी भाळली अन् तिने सगळ्या जमलेल्या राजमंडळाला तिरस्कारून दशरथाला माळ घातली. हे दशरथाचे चौथे लग्न; पण ते निर्विघ्न पार पडले नाही. कैकेयी आपल्याला मिळाली नाही या गोष्टीने सगळे राजे बिथरले अन् दशरथावर तुटून पडले. दशरथ एकटा त्या सर्वांशी सामना देऊ लागला. ते पाहून केकयीने त्याच्या मदतीसाठी पदर बांधला. तिने त्या लढाईत दशरथाचा रथ असा काही कौशल्याने चालवला, की ‘ देखते रहो ! ’ लढाई जिंकल्यावर दशरथ तिला म्हणाला, की ‘ तुला हवा तो वर माग. ’ पण कैकेयी मोठी धूर्त. तिने म्हटले, की ‘ गरज लागेल तेव्हा घेईन. ’

पुढे कौशल्येचा पद्म ( राम ), सुमित्रेचा लक्ष्मण, कैकयीचा भरत अन् सुप्रभेचा शत्रुघ्न असे चार पुत्र दशरथाच्या घरी जन्मले. जनक राजाला विदेहा राणीच्या पोटी सीता ही कन्या झाली. जनकाला भामंडल नावाचा एक पुत्रही झाला होता. पण जन्मताच त्याला पूर्व भवातल्या एका वैऱ्याने पळवून नेले. त्याच्याकडून तो एका विद्याधराला मिळाला. विद्याधराने लालन पालन करून त्याला वाढवले.

एके दिवशी भामंडलाला नारदाची स्वारी भेटली. नारदाने त्याला काही चित्रे दाखविली. त्यात एक सीतेचे चित्र होते. ती चित्रातली सीता त्याला फार आवडली. ती आपली बहीण आहे हे त्याला माहीत नव्हते. त्याने विद्याधराकडे हट्ट धरला, की ‘ मला ही चित्रातली बायको मिळवून द्या. ’ विद्याधराने ती गोष्ट मनावर घेतली. त्याने कपट करून जनकाला आपल्या लोकांत आणले. तो जनकाला म्हणाला की, ‘ तुझी सीता माझ्या मुलाला दे. ’ जनक म्हणाला, की ‘तिचे लग्न मी रामाशी ठरवले आहे. ’ विद्याधर बोलला. ‘ तसे असेल तर तू त्यासाठी एक पण लाव. वज्रावर्त नावाचे धनुष्य वाकवून रामाने त्याला बाण जोडून दाखवावा. ती ताकद त्याने दाखवली, तर सीता त्याची. अन्यथा आम्ही तिला बलात्काराने पळवून आणू. ’

पण रामाने तो पण जिंकला अन् सीतेवरचे ते अरिष्ट टळले. सीता रामाची पत्नी झाली. भरत अन् लक्ष्मण यांचीही लग्ने त्याच मांडवात झाली.

आयोध्येत आल्यावर दशरथ रामाला म्हणाला, की ' आता हे राज्य संभाळ. ' रामाने हो म्हटले. राज्याभिषेकाचा मुहूर्तही ठरला. पण नेमकी त्याच वेळी केकयी आड आली. तिने आपला तो जुना वर त्यावेळी मागितला. ती म्हणाली, की ' भारताला राज्याभिषेक होऊ दे. ' रामाने त्याही गोष्टीला मान्यता दिली. तो राज्यत्याग करून दक्षिण दिशेला जायला निघाला. सीता अन् लक्ष्मणही त्याच्या संगे बाहेर पडले.

प्रवास करीत ती तिघे दंडकारण्यात पोचली. तिथे कर्णरवा नदीच्या तीरी त्यांनी वास्तव्य केले. तिथे दोन जैनमुनी त्यांना भेटायला आले. सीतेने त्यांना भोजन वाढले. त्यांचा वनवासी संसार सुखाने चालू झाला.

चंद्रनखेचा पुत्र शंबूक हा सूर्यहास खड्गाच्या सिद्धीसाठी बारा वर्षे वेळु-वनात तप करीत बसला होता. एके दिवशी त्याचे तप फळले अन् ते खड्ग त्याच्यापुढे प्रकट झाले. योगायोगाने लक्ष्मण त्याच वेळी तिथे पोचला. शंबूका-च्या आधी त्यानेच ते खड्ग हस्तगत केले. त्याची परीक्षा पाहण्यासाठी त्याने ते खड्ग वेळुवनावर चालवले. ते सगळे वेळुवन एकाच घावात तुटले अन् त्यातच शंबूकाचे शिरही तुटले. चंद्रनखा जेव्हा त्याला भोजन देण्यासाठी तिथे आली, तेव्हा तिला पुत्राचे धडावेगळे मस्तक पाहावे लागले. ती पुत्रशोकाने विव्हल झाली. तिने मग निराळ्या एका प्रकारे राम-लक्ष्मणांचा सूड घ्यायचे ठरवले.

राम-लक्ष्मणांपुढे येऊन तिने त्यांच्याविषयी आपले प्रेम प्रकट केले; पण त्यांनी तिचा स्वीकार केला नाही. ती चडफडत तिथून परतली. तिने घरी येऊन पुत्रनिधनाची वार्ता खरदूषणाला सांगितली. तो खवळला. त्याने रावणाला मदतीला घेऊन राम-लक्ष्मणांवर स्वारी केली; पण त्या कामी तोही अपेशी ठरला. मग दुसऱ्या एका दुर्घटनेचे बीज त्याच घटनेत पडले.

त्या स्वारीच्या वेळी सीता रावणाच्या दृष्टीस पडली. तिचे रूपलावण्य पाहून तो पक्काच पागल बनला. सीतेला पळवून न्यायची असे त्याने त्याच वेळी ठरवले अन् थोड्याच कालात कपटजाल पसरून त्याने ती गोष्ट साध्यही केली.

सीता आश्रमात नाही असे पाहून राम दुःखसागरात पडला. तो तिचा शोध करीत करीत आणखी दक्षिणेकडे निघाला. त्या प्रवासात त्याला सुग्रीव भेटला.

रामाने त्याच्याशी मैत्री केली. त्याच वेळीं साहसगती नावाचा एक विद्याधर तोतया सुग्रीव बनून त्याचे राज्य अन् त्याची पत्नी यांच्यावर अधिकार सांगू लागला. रामाने त्याला मारून सुग्रीवावरचे संकट दूर केले. मग सुग्रीव रामाचा भक्त बनला. त्याने आपल्या तेरा कन्या देऊन रामाला आपला जावईही करून घेतले.

सुग्रीवाच्या आज्ञेने विद्याधर मंडळी सीताशोधार्थ निघाली. त्यांच्यापैकी रत्नजटी नावाच्या विद्याधराने सीतेचा नक्की पत्ता आणला. रावणाच्या स्वाधीन सीता आहे, असे समजताच सुग्रीवादी मंडळी जरा कचरलीच; कारण रावण म्हणजे महाबलदंड. शिवाय विद्यासिद्ध. त्याला मारायचे सामर्थ्य कोणाच्या ठिकाणी असेल काय, ही सर्वांना शंका. पण अनंतवीर्य नावाच्या केवलीने सांगितलेली कोटिशिळा उचलून लक्ष्मणाने आपल्या तशा प्रकारच्या सामर्थ्याची ग्वाही दिली. मग हनुमान रामाचा संदेश घेऊन लंकेत गेला अन् सीतेला भेटला. ' रामाचा समाचार समजल्यावाचून आपण अन्नोदक ग्रहण करणार नाही, ' असा निर्धार करून सीता देवारण्य वनात बसली होती. हनुमंताने आणलेला रामसंदेश अन् खुणेची आंगठी मिळताच ती आनंदाने उजळून गेली. सीतेचा संदेश घेऊन हनुमान परत रामाकडे आला.

मग राम सारे विद्याधर-सैन्य एकत्र करून आकाशमार्गे लंकेत पोचला. रावणाला ही वार्ता समजली. रामासारख्या धुरंधर वीराग्रणीशी दोन हात करायचे, तर आपल्याला बहुरूपिणी विद्या साध्य करावी लागेल, हे त्याने जाणले. तो त्या गोष्टीसाठी मंत्रसाधना करायला बसला. विद्याधरांनी त्याच्या मंत्रसिद्धीत व्यत्यय आणण्याचे खूप प्रयत्न केले; पण रावणाने न डगमगता ती विद्या साध्य केली. एवढ्यात रामपक्षीय सैनिकांनी लंकेला चारी बाजूंनी वेढा घातला. ते लंकेच्या आत शिरूनही उपद्रव करू लागले. परिस्थिती मोठी बिकट आली.

अशातच रावण अन् बिभीषण यांच्यात मतभेदाची ठिणगी पडली. बिभीषणाला रावणाच्या कित्येक गोष्टी पसंत नव्हत्या. इतकेच नव्हे, तर रामा-विरुद्ध युद्धाला उभे ठाकणे म्हणजे पहिले पाप दुसऱ्या पापाने झाकणे असे त्याला वाटत होते. त्याने रावणाला त्या गोष्टीपासून परावृत्त करण्यासाठी हितोपदेशाच्या चार गोष्टी सांगितल्या; पण रावणाने घरभेद्या म्हणून त्याचीच

कडक शब्दांत निर्भर्त्सना केली. मग बिभीषण तिथे थांबला नाही. तो सरळ निघून रामाला येऊन मिळाला. रामाने त्यालाच लंकेचे राज्य द्यायचे ठरवले.

मग उभयपक्षी तुंबळ युद्ध सुरू झाले. त्यातच रावण अन् लक्ष्मण एकमेकांच्या समोर आले. रावणाने शक्ती फेकली, ती नेमकी लक्ष्मणाच्या हृदयाला लागली. लक्ष्मण घायाळ होऊन पडला आणि राम विलाप करू लागला. ही वार्ता अयोध्येतही गेली. कैकेयी मग विशल्या नामक कुमारीकडे गेली आणि तिने तिला लंकेत पाठवून दिले. लक्ष्मणाला लागलेली शक्ती दूर करण्याचे सामर्थ्य तिच्या अंगी होते. तिचे स्नानजल अंगावर पडताच लक्ष्मण मूर्च्छेतून सावध झाला अन् उठून बसला. मग लक्ष्मणाने विशल्येशी तत्काळ लग्न केले नश्व रावण अन् लक्ष्मण समोरासमोर आले. मग रावणाने लक्ष्मणावर चक्र फेकले; पण ते चक्र प्रदक्षिणा करून सरळ लक्ष्मणाच्या हाती आले. लक्ष्मणाने तेच चक्र रावणावर फेकून रावणाला ठार केले.

मग राम-सीतेची भेट झाली. सीतेला घेऊन राम अयोध्येत परत आला. नंतर राम-लक्ष्मणांना राज्याभिषेक झाला. भरताने राज्य रामाला समर्पून जिनदीक्षा घेतली. पण एवढ्यात सीतेविषयी लोकापवाद उत्पन्न झाल्यामुळे रामाने सीतेचा वनात त्याग केला. सीता तिथे एकटीच विलाप करीत असता वज्रजंघ नावाचा एक राजा तिथे आला आणि त्याने सीतेला बहीण मानून आपल्या घरी नेले.

सीता तिथे प्रसूत झाली. तिला लवण अन् अंकुश असे दोन सुपुत्र झाले. मोठे झाल्यावर त्यांना कळले, की आपल्या पित्याने आपल्या मातेचा अन्यायाने त्याग केला आहे. ती गोष्ट त्यांच्या जिव्हारी लागली अन् ते रामाला शासन करावे म्हणून त्याच्यावर चालून गेले. एवढ्यात नारदाने येऊन रामाला सांगितले, ‘ की तुझ्याविरुद्ध लढायला आलेले हे दोन वीरयुवक तुझे पुत्र आहेत. ’ मग रामाला आनंद झाला. राम त्यांना भेटला. पिता-पुत्रांचे मीलन झाले. नंतर सर्वांच्या विनंतीवरून रामाने सीतेला बोलावून घेतले. सीतेने तिथे येऊन आपल्या शीलाबद्दल अग्निपरीक्षा दिली. तिच्या सतीत्वाच्या प्रभावाने ते अग्निकुंड जलकुंड झाले. रामाने मग सीतेला आपल्याबरोबर अयोध्येत येण्यास सांगितले. त्यावर ती म्हणाली, ‘ आजवर संसार खूप पाहिला. आता वनवास अनुभवू दे. ’

असे म्हणून ती पुनश्च अरण्यात गेली अन् तिथे जिनदीक्षा घेऊन आर्यिका बनली. सीतेचा निःशल्य आत्मा तपःप्रभावाने अच्युत स्वर्गात प्रति-इंद्र झाला.

सीतेच्या जन्माचे असे सार्थक झाले खरे; पण बिचाऱ्या लक्ष्मणाला मात्र इमानेइतबारे केलेल्या सेवेचे भलतेच पारितोषिक मिळाले. तो मेला अन् स्वर्गात न जाता नरकात पडला. सीतेच्या जीवाने त्याला तिथून बाहेर काढण्याचा खूप प्रयत्न केला; पण तो व्यर्थ ठरला. पुढे थोड्याच काळात रामाने जिनदीक्षा घेतली आणि तप केले. तो मात्र केवली बनून अंती मोक्षाला गेला !

# शिवतांडव

भव, शर्व, उग्र, रुद्र अशी शिवाची अनेक नावे आहेत. पुष्पदंताने शिवाचे नामाष्टक दिले असले, तरी तेवढ्यावर ते भागत नाही. विष्णुसहस्र नामाप्रमाणेच शिवसहस्रनाही निर्माण झाले आहे. या नामसंभारात नटराज असेही एक नाव आढळते. शिवाचे हे नाव एका ललितकलेशी निगडित आहे. त्याचा अर्थही खोल आहे. त्याला अध्यात्माचा जरतारी पदर आहे.

नटराज म्हणजे नटांचा, नर्तकांचा राजा. नृत्याचा प्रवर्तकच म्हणा ना ! हे नाव त्याला दक्षिणेत मिळाले आहे. त्याच्या जोडीला आणखीही एक नृत्य-संबंधीचे नाव दक्षिणात्यांनी त्याला दिले आहे-नटनशिखामणि म्हणजेच नर्तकांचा मुकुटमणी. भरताच्या नाट्याला नृत्याची जोड मिळवून दिली ती त्यानेच.

शिवाच्या या नृत्याला तांडव म्हणतात. मात्र त्या नृत्याला नाव मिळाले ते शिवावरून नव्हे; तर त्याचा शिष्य तंडू याच्यावरून. शिवाने जे नृत्य निर्माण केले, ते प्रथम त्याने तंडूला शिकवले. एखादा मनुष्य रागाने थय-

थयाट करू लागला की आपण म्हणतो, ‘ काय तांडव करतो आहे ! ’ या वाक्प्रचारातच त्या नृत्याचे स्वरूप व्यक्त होऊन जाते. यावरून आणखीही एक गोष्ट कळते, की तांडव हे पुरुषनृत्य आहे आणि ते रभस आहे. त्यातले पदाघात दणदणीत असतात आणि त्यामुळे ते पाहणाऱ्याच्या मनातही भेणे-भाव निर्माण होतो. पुष्पदंताने म्हटलेच आहे, ‘ शिवाने तांडव नृत्य करताना पृथ्वीवर जे पदाघात केले, त्यांच्या नुसत्या आवाजाने ग्रहनक्षत्रांसह आकाश-मंडल हादरून गेले. ’

डॉ. आनंदकुमार स्वामी हे एक मोठे कलामर्मज्ञ होऊन गेले. त्यांचे मत असे आहे की, देवाचे अन् दैत्याचे असे दोन्ही अंश ज्याच्यात होते, अशा एका आर्येतर देवापासून तांडवाची उत्पत्ती झाली. हा देव रात्रीच्या वेळी नाचत कुदत फिरत असतो अन् केवळ आपल्या त्या थयथयाटाने लोकांना भयकंपित करीत असतो, अशा काही लोककथा दक्षिणेत प्रचलित आहेत. कालांतराने त्या नृत्याचा संबंध शिवाशी जोडला गेला. शिवाने तांडव सुरू केले की, देव अन् दैत्यही तिथे गोळा होतात अन् त्याच्या नृत्याला साथ करतात. जे पुराणांतरी उल्लेख येतात, त्यांवरूनही आनंदकुमार स्वामींच्या वरील मताला पुष्टी मिळते.

तांडवात अभिनय नसतो आणि म्हणूनच भावदर्शनही नसते. त्यात असते केवळ हस्तपादकर्म, आघात अन् गिरक्या, ताकद अन् जोम ही त्याची वैशिष्ट्ये. ताल अन् लय हे त्याचे प्राण. सांप्रतचे कथक नृत्य हे तांडवापैकीच आहे. कथकली हेही त्यापैकीच. चेंडे, मद्दुलम् या वाद्यांनी कथकली नृत्य दुमदुमते हे खरे; पण रावण, हिरण्यकशिपू इत्यादी दानवपात्रांचे पदाघात अन् डरकाळ्या त्या वाद्यध्वनीलाही मागे सारतात. यक्षगान आणि दशावतार यातली युद्धनृत्ये ही तांडवशैलीतूनच निर्माण झालेली आहेत. असा आहे या तांडवाचा महिमा !

उत्तरेला कैलासशिखर आणि दक्षिणेस चिदंबरम् येथील कनकसभा ही दोन शिवाची प्रमुख नृत्यस्थाने होत. कैलासावरचे त्याचे नृत्य हे पार्वतीच्या प्रसन्न-तेसाठी असते. लोकव्यवहारात पत्नी ही पतीच्या प्रसन्नतेसाठी झटत असते. निदान तिच्याविषयी तशी अपेक्षा तरी असते. पण शिवाचे सगळेच अलौ-किक. शिवाला वाटते, आपला संसार म्हणजे चंद्रमौळी. आपण सदा ध्यानस्थ,

योग हाच भोग ! पण त्या राजसवेल्हाळीला त्यात काय स्वारस्य ? तेव्हा निदान आपल्या जगीच्या कलेने तरी आपण तिचे मनरंजन करावे, दिवसातल्या काही घटका तरी तिला कलेचा आनंद उपभोगायला देऊन वस्तुस्थितीचा विसर पाडावा. म्हणून त्याने नृत्यांसाठी पदी घुंगुर बांधले. त्यासाठी त्याने प्रदोषकाल पसंत केला.

प्रभातकाल हा नेहमीच उल्हासमय असतो. दिवसभराचा शीण, विचारांचे आवर्त, चिंतेची काजळी, या गोष्टी मनाला घेरून टाकतात त्या सांजेच्या कातरवेळी. त्याच वेळी मनाला धीर हवा असतो. त्याचवेळी त्याला तमोमय विकारांच्या गर्तेतून वर काढायला हवे असते. हे काम एक तर भगवंताच्या प्रार्थनेने किंवा कलात्मक आनंदाच्या अनुभूतीने घडणे शक्य असते. शिवाने तो काल पसंत केला त्याचे कारण हेच. त्या सांध्य नृत्याच्या प्रसंगाचे वर्णन स्कंदपुराणात केले आहे ते असे—

**कैलासशैलशिखरे त्रिजगज्जनित्रीं गौरीं निवेश्य कनकांचितरत्नपीठे ।**
**नृत्यं विधातुमभिवांछति शूलपाणौ देवाः प्रदोषसमयेऽनुभजंति सर्वे ॥**

'कैलासभवनात शिव नृत्याला उद्युक्त होतो. त्यासाठी तो जगज्जननी पार्वतीला सुवर्णखचित रत्नपीठावर आणून बसवतो. ती त्याची प्रमुख प्रेक्षक. मग त्याचे नृत्य सुरू होते. ही वार्ता स्वर्गातल्या सर्व देवांना कळते. मग ते समस्त देव त्या नृत्याची साथ करण्यासाठी धावून येतात.'

**वाग्देवी धृतवल्लकी शतमखो वेणुं दधत्पद्मज**
**स्तालोन्निद्रकरो रमा भगवती गेयप्रयोगान्विता ।**
**विष्णुः सांद्रमृदंगवादनपटुर्देवाः समंतात्स्थिताः**
**सेवंते तमनुप्रदोषसमये देवं मृडानीपतिम् ॥**

'वाग्देवी येते आणि वीणा उचलते. इंद्र मुरली ओठावर ठेवतो. ब्रह्मदेव लोकांची झोप उडवणारी झांज हाती धरतो. रमा भगवती गीत गाऊ लागते. विष्णु मृदंगावर 'धिक् तान धिक् तान्'चे बोल सुरू करतो. नृत्याला गीत मिळते. गीताला ताल लाभतो. अन् मग काय ! सारी देव मंडळी त्या नर्तक शिवाच्या सभोवती येऊन उभी राहतात.'

पण पार्वती काही सदैव त्या नृत्याची केवळ प्रेक्षकच राहत नाही. कारण तीही कलावती आहे, नृत्यनिपुण आहे. लास्य नावाचा सुकुमार हावभावांचा

नृत्यप्रकार तिनेच जन्माला घातला आहे. तिच्या त्या नृत्यात हेला आहे, लीला आहे, अभिनयाच्या द्वारे भावदर्शनही आहे. शिवापेक्षाही नृत्यकलेत आपण अधिक श्रेष्ठ आहो, लोकोत्तर आहो, असे तिला वाटत असते. तांडवाचा धांगडधिंगा काय मी सुद्धा घालीन; पण माझे भावकोमल लास्य मात्र शिवाला जमायचे नाही, असे तिला प्रामाणिकपणे वाटते.

या भावनेतूनच तिने एक दिवस शिवाशी नृत्यस्पर्धा मांडली. शिव म्हणाला, 'हिने काय नाचावे माझ्या बरोबर!' पण शिवाचा हा भ्रम थोड्याच वेळात दूर झाला. बोलाला बोल अन् तालाला ताल धरून ती नाचू लागली. शिवाने ठेवणीतले अवघड ताल काढले. पण पार्वती कशालाच हटेना. शिवही जिद्दीला पेटला. त्याला वाटले, की निदान नृत्यात तरी आपण हिच्या वरचढ राहिलेच पाहिजे. म्हणून त्याने शेवटी एक अनोखा पवित्रा घेतला. त्याने आपला एक पाय उचलून त्याचा आंगठा भालप्रदेशी लावला आणि तशा अवस्थेतच तो एका पायाने नाचू लागला. पार्वतीला तो पवित्रा मात्र अवघड ठरला. स्त्री-सुलभ लज्जेने तिला तसे करवेना. तिथे तिचा पराभव झाला. तिने कलेतला पराभव पत्करला, पण विनयभंगाचा नैतिक अपराध घडू दिला नाही. ती शरण गेली, स्तब्ध उभी राहिली! आणि अशा रीतीने ती स्पर्धा संपली. शिवाने पार्वतीला हरवण्यासाठी ऊर्ध्वपाद करून जे हे नृत्य केले, तेच पुढे ऊर्ध्वतांडव या नांवाने प्रसिद्ध झाले.

शिवतांडवाचे सात भेद आहेत. आनंदतांडव, संध्यातांडव, कालिकातांडव, त्रिपुरतांडव, गौरीतांडव, संहारतांडव आणि उमातांडव अशी त्यांची नावे आहेत. शैव संप्रदायात या नृत्यांना विशिष्ट तत्त्वाची प्रतीके मानलेले आहे.

चिदंबरम् हे शिवाचे दुसरे नृत्यस्थान! नटराज या नावाने शिव प्रकट झाला तो तिथेच. गोष्ट घडली ती अशी—

चिदंबरम् हे एकाकाळी शाक्तांचे मोठे केद्र होते. ते शाक्तही उजवे नसून डावे होते, म्हणजे वाममार्गी होते. त्यांच्या उपासनेत कितीतरी अनैतिक गोष्टींचा समावेश होता. ते लोक धाकदपटशा दाखवून लोकांना अन् बाया-बापड्यांना आपल्या पंथात ओढीत. आपल्या पत्नीच्या–आदिमायेच्या–नावावर त्यानी माजवलेला अनाचार शिवाला रुचला नाही. त्या वाममार्गी शाक्तांचे पारिपत्य करण्यासाठी तो तिथे प्रकट झाला. त्याला पाहून ते वाममार्गी नमले

दा. क्र. १७२९८

तर नाहीतच, पण त्याच्याशी सामना द्यायला उभे राहिले. त्यांनी अग्नीत हवन करून एक नाग, एक वाघ अन् एक काळा कुरूप ठेंगू असे तीन हिंस्र प्राणी अग्नीतून निर्माण केले अन् शिवाच्या अंगावर सोडले. पण शिव त्या सामन्याला सिद्धच होता. त्याने नाग उचलून आपल्या गळ्यांत घातला. वाघाला करंगळीने उभा चिरून त्याचे चर्म पाठीवर पांघुरले आणि त्या मुयलकाला म्हणजेच कुरूप ठेंगूला पायातळीं दाबून तो त्याच्या पाठीवर थयथया नाचला. हा सारा अद्‌भूत पराक्रम पाहून त्या शाक्तांची गाळण उडाली. ते जीव घेऊन सैरावैरा पळाले. आणि मग चिदंबरम् हे क्षेत्र शिवाच्या स्वामित्वात आले.

नटराज शिवाच्या सात्विक नृत्यप्रकारात संध्या नृत्याप्रमाणेच नादान्त नृत्यही सुप्रसिद्ध आहे. जगात प्रसिद्ध असलेली चिदंबरम् येथील नटराजमुर्ती नादान्तनृत्याच्याच पवित्र्यात उभी आहे. या नृत्यभूमिकेत नटराज शिव चतुर्भुज असतो. त्याचा डावा पाय उचललेला असतो. या अवस्थानाला मूर्तिकलेत अतिभंग असे नाव आहे. अशा मूर्ती दक्षिणेत अनेक ठिकाणी आढळतात. या मूर्तीचा प्रत्येक अंगावयव, प्रत्येक आयुध अन् प्रत्येक भूषण हे प्रतीकात्मक आहे. या सर्व प्रतीकांच्या समुच्चयातून एक विराट प्रतीक निर्माण झाले आहे. तिरुमूलर हा शिवभक्त आपल्या तिरुमूलम या ग्रंथात त्या नटराज शिवाचे जे स्तोत्र करतो ते असे—

आकाश हे नटराजांचे शरीर, काळा मेघ हाच कृष्णवर्ण ठेंगू, चंद्र, सूर्य, अग्नी ही तीन तेजोरूपे म्हणजे त्याचे त्रिनेत्र. असा तो विराट नटराज आमच्या देहालाच चिदंबरम बनवून त्यातील हृदयाच्या कनकसभेत आपले नादान्तनृत्य करीत आहे.

दुसरे एक स्तोत्र असे—

हे प्रभो, तुझ्या हाती दिव्य डमरू आहे. त्या डमरुहस्ताने तू द्यावापृथिवी, अनंत लोक अन् असंख्य जीवात्मे यांची सृष्टी करतोस. तुझा ऊर्ध्व हस्त चराचर प्रपंचाची उभारणी अन् सांभाळणी करीत असतो. तुझ्या हातातला अग्नी हा विश्वात सदैव परिवर्तन घडवीत असतो. भूमीवर ठेवलेला तुझा पवित्र चरण कर्मबंधनात तडफडणाऱ्या जीवांना आधार देतो, तर तुझा ऊर्ध्वपाद त्यांना मुक्तिदाता ठरतो !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वत्वाव

REFBK-0017298
REFBK-0017298

पाच रुपये

•

१९६७ मध्ये केसरीत लिहिलेल्या लेखांचा हा संग्रह आहे. जे मनाला भावले ते लिहिले, अशा स्वरूपात हे लेखन झाल्यामुळे त्यात पूर्वापरसंगती आढळणार नाही. यात एक अव्यक्त सूत्र आहे, ते संस्कृतीचे. संस्कृती ही मूर्तिमंत दाखवण्याजोगी वस्तू नाही. ती माणसांच्या मनात भावनांच्या रूपाने वसते. संकेतांच्या द्वारे विधिनिषेधांच्या कक्षेत येते. साहित्याच्या द्वारे बोलते. श्रेष्ठ पुरुषांच्या आचरणातून शोभते. ऋषि-मुनी, संत आणि आचार्य यांच्या विचारधनाने श्रीमंत होते, आणि कलांच्या विविध संप्रदायांतून अमरपद मिळवण्याचा प्रयत्न करते. संस्कृतीचा असा कोणता ना कोणता तरी आविष्कार या पुस्तकातल्या प्रत्येक लेखात आढळून येईल.

•

ज्ञानराज प्रकाशन
पुणे २